मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

अंक ३२ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● डिसेंबर १९९७

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)


(फक्त खाजगी वितरणासाठी)

## रत्नागिरी संमेलन विशेषांक



डावीकडून - स्वागत समितीचे निमंत्रक भास्कर नरहर, प्रतिष्ठानचे कार्यवाह विनायक केशव, अध्यक्ष सुरेशभाऊ आणि स्वागताध्यक्ष कमलाकर नरहर

स्वागताध्यक्ष कमलाकर नरहर मराठे दीप-प्रज्वलन करताना



ईशस्तवन




**मराठे प्रतिष्ठान**

पब्लिक ट्रस्ट नोंदणी, क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.

Marathe Pratishthan

# ज्येष्ठ कुलबांधवाचा अध्यक्षांच्या हस्ते सत्कार



श्रीधर परशुराम (बापुसाहेब) मराठे



संमेलनाला उपस्थित कुलबांधव
पुढील रांगेत उजवीकडून पहिले श्री. अरविंद देशपांडे



भगवान प्रभाकर मराठे (मधे पाठीमागे भास्कर नरहर)



माधव भार्गव मराठे



संमेलनाला उपस्थित महिलावर्ग
पुढील रांगेत सत्कारित ज्येष्ठ कुलबांधव आणि
सिडकोचे अध्यक्ष नारायणराव मराठे (डावीकडून दुसरे)



धुंडिराज जयराम मराठे

## हार्दिक शुभेच्छा

# "मराठे ग्रुप"

श्री. कमलाकर मराठे संचालित
मध्यम वर्गीयांच्या सेवेत कार्यरत
नव्या मुंबईतील अग्रणी बांधकाम उद्योग

१०१, पर्सेपोलिस, सेक्टर १७,
वाशी, नवी मुंबई - ४०० ०७५.
फोन - ७६३०४१९, ७७०२६३७, ७७०१०८१

Marathe Pratishthan

# रेकॉर्डब्रेक संमेलन.... रेकॉर्डब्रेक विशेषांक !

**होणार, होणार म्हणून जून १९९७ पासून गाजत असलेले ६वे मराठी परिवार संमेलन ४ व ५ ऑक्टोबर १९९७ रोजी रत्नागिरीत धुमधडाक्यात पार पडले. आजवरच्या संमेलनांची, मेळाव्यांची अनेक रेकॉर्ड्‌स् या संमेलनात कोसळली.**

कुलबांधवांचा प्रतिसाद अमाप होता. दीडशेतरी माणसे जमतील का अशी धाकधूक वाटत होती; पण प्रत्यक्षात सुमारे साडेतीनशे 'मराठे' मातीच्या आणि आपल्या माणसांना भेटण्याच्या ओढीने संमेलनाला आले. पुढाऱ्यांच्या सभांना जशी माणसे 'जमवतात' त्याप्रमाणे उत्स्फूर्तपणे पुण्यातून व गोव्यातून गाड्या भरभरून माणसे आली. मुंबईतून तर कोकण रेल्वेचा जवळ जवळ पूर्ण डबाच मराठे परिवाराने व्यापला होता.

दक्षिण कानडातल्या दुर्ग सारख्या एका गावातून दोन–तीनशे वर्षापूर्वी तिकडे जाऊन स्थायिक झालेल्या 'मराठे' घराण्यातले पाच कुलबांधव मोठ्या उत्कंठेने, थोड्याशा साशंकतेने प्रथमच अशा संमेलनाला आले होते. दोन दिवसांच्या सहवासानंतर परतताना ते 'कुटुंबीय' म्हणून अनेकांना त्यांच्या गावी येण्याचे मनापासून निमंत्रण देऊन गेले. 'मराठे तितुके मेळवावे' या दृष्टीने या संमेलनाचे हे विशेष यश म्हणावे लागेल

दोन दिवसांच्या 'सहनिवासा'मुळे नव्या ओळखी झाल्या. जुन्या ओळखींना उजाळा मिळाला. स्त्री–पुरुष, पुणेकर–मुंबईकर – गोवेकर यांसारखे कृत्रिम भेदाभेद गळून पडले. खेळीमेळीच्या वातावरणात गप्पाटप्पा, उत्स्फूर्त हास्यविनोद, आणि निर्लेप उखाळ्यापाखाळ्या यांना ऊत आला.

आपुलकीने भारावलेल्या अशा वातावरणात संमेलनाने 'मला काय दिले' हा विचारच कोणाच्या मनात येत नव्हता. उलट कुलबांधवांसाठी, 'प्रतिष्ठान'साठी 'मी काय करू शकतो' ते अनेकांनी खाजगी व जाहीरपणे व्यक्त केले.

कुलवृतान्त, शैक्षणिक सहाय्य, वैद्यकीय मदत, दुखवटे आणि अभिनंदन अशा पारंपरिक ठरावांपलिकडे जाऊन कुलबांधवांमध्ये उद्योग–व्यवसाय–प्रवण मनोभूमिका निर्माण व्हावी या दृष्टीने व्यवसाय मार्गदर्शन तज्ञ श्री. अरविंद देशपांडे आणि रत्नागिरीतले दोन सफल उद्योजक यांचेशी कुलबांधवांचा साधलेला संवाद हेहि या संमेलनाचे आणखी एक वैशिष्ट्य !

श्रीक्षेत्र गणपतीपुळे आणि मालगुंड येथील केशवसुतांचे स्मारक यांचे दर्शन घडविणे तसेच 'देवीचा गोंधळ' आणि 'जाखडी' हा कोकणातील जोशपूर्ण लोकनृत्याचा एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकार यांचेहि संमेलनात आयोजन करण्यांतली योजकता कौतुकास्पद!

प्रवास–निवास–भोजन व्यवस्थेवर तर सर्व मंडळी बेहद्द खूष. कार्यकर्त्यांच्या वागण्या–बोलण्यातून सतत जाणवणाऱ्या जिव्हाळ्यामुळे सर्व कुलबांधव अगदी भारावून गेले. त्यांच्या प्रतिक्रियांचा पाऊस अजूनहि पडत आहे. आयोजकांच्या शिरपेचातला हा खरा मानाचा तुरा !

तर मंडळी असे हे रेकॉर्डब्रेक संमेलन ... आणि त्याला साजेसा हा हितगुजचा संमेलन विशेषांक. तोहि रेकॉर्डब्रेक ! घसघशीत ८० पानांचा, संमेलनाचा वृतान्त आणि रंगीत फोटो यांसह.

याचे श्रेय अर्थातच तुम्हां सर्व कुलबांधवांना; संपादक केवळ निमित्तमात्र. जाहिरातींच्या आवाहनाला आपण भरघोस प्रतिसाद दिलात म्हणूनच हे शक्य झाले. ज्यांनी जाहिराती दिल्या आणि त्या मिळवून देण्यासाठी ज्यांनी सहकार्य केले त्या सर्वांचे आभार न मानणे कृतघ्नपणाचे ठरेल.

अंकातला मजकूर चार विभागांत दिला आहे. प्रत्येक विभागाच्या सुरवातीला त्या त्या विभागाची अनुक्रमणिका दिली आहे. हे विभाग असे –


**१. रत्नागिरी संमेलन- पृ. ३-२६**
**भाषणे, वृतान्त, प्रतिक्रिया**
**२. कोकण रेल्वे, कोकण विकास पृ.२७-४०**
**३. 'मराठे' कोण ? कुठले ?पृ.४१-५६**
**मराठ्यांचे ललित लेखन**
**४. गणमान्य, उद्योगी मराठे पृ.५७-७२**


हितगुज हे केवळ 'प्रतिष्ठान'चे मुखपत्र न रहाता ते ज्ञान–मनोरंजन–प्रबोधन–प्रशिक्षण करणारे एक सर्वांगपरिपूर्ण मासिक संपर्क माध्यम व्हावे असे संकल्पचित्र आमच्या डोळ्यांपुढे आहे. हा विशेषांक एक प्रकारे अशा अंकाचा विसार आहे. असे म्हणायला हरकत नाही.

शेवटी हा सारा पैशाचा खेळ असतो. पैसा मिळाला तर काय करता येईल हे या अंकावरून जाणवेल. उद्योजक–व्यावसायिकांचा जाहिरातींद्वारे असाच प्रतिसाद यापुढेही मिळेल अशी खात्री वाटते. त्यामुळे अर्थातच अर्धे काम होईल. दुसरे अर्धे काम आहे ते मजकुराचा दर्जा व अंकाची निर्मिती. याहि बाबतीत मराठ्यांमध्ये टॅलेंटची वाण नाही – मराठे कुटुंबीय म्हणजे लेखक, कवी, संपादक, समीक्षक, पत्रकार, चित्रकार अशा अनेक रत्नांची खाण आहे. यांतली बरीच अजून खाणीतच आहेत – त्यांच्यापर्यंत आम्ही पोचू शकलो नाही (किंवा ते आमच्यापर्यंत पोचले नाहीत) हे खरे शल्य आहे !

या दोन्ही वर्गातल्या कुलबांधवांचे सहकार्याने हितगुज मासिकाचे संकल्पचित्र प्रत्यक्षात आणणे निश्चितच अशक्य नाही. 'किर्लोस्कर खबर'चे जसे किर्लोस्कर मासिकांत रूपांतर झाले तसे मुखपत्र हितगुजचे हितगुज मासिकांत रूपांतर करून आणखी एक रेकॉर्ड ब्रेक करण्याचा संकल्प आपणा सर्व कुलबांधवांच्या सहकार्याच्या विश्वासावर या वेळी केला तर ते अनाठायी होऊ नये !

**लक्ष्मण शंकर मराठे** — संपादक, हितगुज
**सु. स. मराठे** — अध्यक्ष, मराठे प्रतिष्ठान

**प्रभादेवी, मुंबई, दि. ७ डिसेंबर १९९७.**

**वर्धापनदिन समारंभ : २६-१-१९९८**

पुणे शाखेतर्फे प्रतिष्ठानचा वर्धापनदिन समारंभ २६-१-९८ रोजी सायंकाळी ४ ते ८ या वेळात वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या सभागृहात (पेशवे पार्क चौक, हॉटेल विश्व समोर, म्युनिसिपल स्पोर्ट्‌स् ग्राउंड नजिक, पुणे - ३०) साजरा करण्यात येणार आहे. सर्व कुलबांधवांना उपस्थित राहण्याचे पुणे शाखेतर्फे आग्रहाचे निमंत्रण आहे. **संपर्क** :

श्री. वा.आ. मराठे, पुणे (फोन ५४५२५५)
सौ. नीलांबरी मराठे, पुणे (फोन ४५६२७०)



Marathe Pratishthan

# विभाग १ : रत्नागिरी संमेलन - भाषणे, वृत्तांत, प्रतिक्रिया


| | पृष्ठ |
|---|---|
| १. अध्यक्ष सुरेशभाऊ यांचे प्रास्ताविक | ३ |
| २. स्वागताध्यक्ष श्री. कमलाकर मराठे यांचे भाषण | ५ |
| ३. संमेलन वृत्तान्त - विनायक केशव मराठे, कार्यवाह | ७ |
| ४. उद्योगविषयक मार्गदर्शनाचा वृत्तान्त - श्रीपाद माधव (आप्पा) मराठे | १३ |
| ५. दूरदर्शनवरील वृत्तनिवेदन - सौ. मंजिरी मराठे | १४ |
| ६. संमेलनाच्या यशाचे शिल्पकार - भास्कर नरहर मराठे | १५ |
| ७. कुलबांधवांचे करमणुकीचे कार्यक्रम - सदानंद (भाऊ) मराठे | १७ |
| ८. मराठे प्रतिष्ठान : पुढील वाटचाल (संमेलनात चर्चेसाठी टिपण) | २१ |
| ९. उपस्थित कुलबांधवांच्या प्रतिक्रिया | २२ |
| १०. त्रयस्थ ऑब्झर्वर म्हणून आले... कुटुंबीय होऊन गेले | २५ |
| ११. रत्नागिरीतील 'स्नेह'संमेलन - सौ. मीनाक्षी रविंद्र मराठे | २६ |


## रत्नागिरी अधिवेशन स्वागत समिती

**१. श्री कमलाकर नरहर (पृ.४६), ठाणे. स्वागताध्यक्ष.**

२. डॉ. भालचंद्र सखाराम (पृ.४३) मुटाट
३. श्री. श्रीधर केशव (पृ.३९६) संपादक 'किरात', वेंगुर्ले
४. डॉ. सुधीर विष्णु (पृ.४३७) कणकवली
५. श्री. आनंद माधव (पृ.४६), रत्नागिरी
६. श्री. सुरेश पांडुरंग (पृ.३२३) रत्नागिरी
७. श्री. बाळकृष्ण नारायण (पृ.४०५) सावंतवाडी
८. श्री. दत्तात्रय धुंडिराज (पृ.४७), खेड
९. श्री. भास्कर नरहर (पृ.४६), रत्नागिरी, **निमंत्रक**

Marathe Pratishthan

गोमंतकीय कुलबांधवानी
सन १९८० मध्ये पहिले संमेलन व
सन १९८६ मध्ये तिसरे संमेलन भरवून
मराठे प्रतिष्ठानचा पाया दृढ बनविला.

आणखी केव्हांही संमेलनाचे आयोजन करायला इच्छुक असलेल्या
व सगळया मराठे कुलबांधवाचे नेहमीच
स्वागत करायला तत्पर असलेल्या

## गोमंतकीय मराठे परिवारातर्फे सर्वांना
## हार्दिक शुभेच्छा



Marathe Pratishthan

# मराठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेशभाऊ यांचे प्रास्ताविक

आजच्या ह्या संमेलनाच्या निमित्ताने व अध्यक्ष ह्या नात्याने तुमच्या सर्वांचे मन:पूर्वक स्वागत करतो. आज कपिगात्रीय ब्राह्मण कुलोत्पन्न कुटुंबीय एकत्र आलो आहोत व ह्या गोष्टीचा आपल्या सर्वांनाच सार्थ अभिमान वाटत असेल ह्याची मला खात्री आहे.

आपल्यापैकी सर्वच मंडळी अतिशय सदाचारी, सुखवस्तु, व्यासंगी व उद्योगी आहेत. त्या दृष्टीने आपण स्वत: व स्वत:चे घर ह्याचे हित पहाणारच. परंतु आजच्या संमेलनाच्या निमित्ताने मराठे कुटुंबियांसाठी आपण काही करू शकतो का हे पहावयाचे आहे. सर्व महाराष्ट्र, कर्नाटक, गुजराथ व गोवा अशा लांबून ह्या संमेलनास कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याचे पाहून आमच्या सर्व कार्यकर्त्यांचे मन भरून आले आहे.

मारवाडी, गुजराथी, मद्रासी असे समाज एकमेकांस किती मदत करतात ते आपण पहातो. मग आपणच असे केल्यास कमीपणा का वाटावा? आपल्यातीलच काही मंडळी असेही म्हणतात की जग कोठे चालले आहे आणि ही तुमची कूपमंडूक वृत्ती काय करता? अशा मंडळींना एकच सांगावेसे वाटते की आपण आधी घराची व कुटुंबीयांची सुधारणा करूया. त्यातूनच देशाची व जगाची सुधारणा आपोआप होणार आहे.

सध्या वेगवेगळ्या अपप्रवृत्तींबाबत सर्व स्तरावर बोलले जाते. त्या कमी कशा होणार ह्यावरही खूप चर्चा होते. परंतु सद्य परिस्थितीत त्यात सुधारणा होईल असे वाटत नाही. एखादी अवतारी व्यक्ती त्या निपटून काढेल अशी अपेक्षा करणे अत्यंत चुकीचे आहे व ते एक प्रकारे स्वत:ची जबाबदारी टाळण्यासारखे आहे. आधी सुरवातीला आपल्या स्वत:मध्ये सुधारणा झाली पाहिजे. त्यानंतर घर सुधारेल व मग कुटुंबीय सुधारतील अशी सर्वसाधारण भावना आहे.

आता सुधारणा म्हणजे काय तर आपल्यापैकी कोण गरजू आहे ते शोधून काढणे व त्यास सर्वतोपरी मदत करणे. ह्यापुढे आपल्या मुलांना चांगल्या नोकऱ्या किंवा शिक्षणात प्राधान्य मिळणे फार कठीण होणार आहे. ह्या गोष्टींचा विचार करून आपणच मार्ग काढला पाहिजे. ह्याचाच अर्थ **मुलांनी नोकरीच्या मागे न जाता कोणताही धंदा किंवा व्यवसाय सुरू करणे क्रमप्राप्त आहे.**

मग प्रश्न येतो की म्हणजे काय करावे? **ह्याचेच मार्गदर्शन आपल्याला प्रतिष्ठानतर्फे देता आले पाहिजे**. आपल्या पैकी सर्व उद्योजक व व्यवसायिकांकडून अशा मदतीची आम्ही अपेक्षा करीत आहोत. खोलवर विचार करता काय करावयाचे हे ज्याचे त्यानेच ठरवावयास हवे. पण एकदा हे नक्की झाल्यावर त्या मुलाला प्रतिष्ठान तर्फे सर्वप्रकारची तांत्रिक व आर्थिक मार्गदर्शन व मदत देता आली पाहिजे. एखाद्या मुलास अशा प्रकारच्या मार्गदर्शनासाठी दत्तक घेता येईल का ह्याचाही विचार आपण सर्वांनी करावा. एका तरी मुलास आपण त्याचे पायावर उभे केल्यास ती एकप्रकारे राष्ट्रसेवाच होईल असे मी मानतो.

**दुसरे क्षेत्र शिक्षणाचे**. त्यालाही फार महत्व आहे. आपणास जर ह्यापुढे Paid Seat च घ्यावी लागणार असेल तर त्या दृष्टीने प्रतिष्ठानतर्फे अशी मदत करता येईल का ह्याचा विचार व्हावा. आता सुरवातीला अशी मदत केवळ १ किंवा २ विद्यार्थ्यांसाठी मर्यादित राहील. पण एकदा हा विचार पटला तर अनेक व्यक्ति ह्यात सहभागी होऊ शकतील.

**उद्योग - व्यवसायासाठी किंवा शिक्षणासाठी केलेली मदत ही त्या मुलांनी आणि त्याच्या पालकांनी कर्ज म्हणून घेतली पाहिजे**. त्या मुलाचे अर्थार्जन सुरू झाल्यावर त्याने ते पैसे प्रतिष्ठानला लवकरात लवकर परत करावयाचे आहेत. ह्या परत फेडीतूनच नवीन मुलांना आणखी कर्जरूपाने मदत करता येईल. त्याशिवाय प्रतिष्ठानच्या ह्या मदतीमुळे त्याने पुढील आयुष्यात आणखी एका मुलाची तत्सम जबाबदारी स्वीकारली पाहिजे -अगदी दत्तक घेतल्याप्रमाणे. आम्ही आवाहन केले तर पैसे कमी पडणार नाहीत. पण **लायक व गरजू व्यक्ती** मनापासून पुढे आली पाहिजे व ही व्यक्ती **शोधण्यासाठी आम्हाला एक कार्यकर्ता प्रत्येक गावात हवा आहे**.

आज जर विचार केला तर नुसत्या B.A., B.Com, किंवा B.Sc ला फारसे महत्व किंवा संधी उपलब्ध राहिलेल्या नाहीत. **कोणत्यातरी विषयात Specialisation केल्याशिवाय पुढे प्रगती होऊ शकत नाही**. आपल्या कुटुंबातील अनेक व्यक्ति आज निरनिराळ्या क्षेत्रात प्राविण्य संपादन केलेल्या दिसतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन व वेगळे कोणते अभ्यासक्रम आहेत ह्याची मार्गदर्शक सुची मराठे प्रतिष्ठान तर्फे तयार करता येईल. त्यासाठी आम्ही माहिती गोळा करीत आहोतच.

With Best Compliments From

S.K.Chakradeo
(Director)

**Interactive Software Pvt. Ltd.**

Complete Solution for Bank Automation

11/2. Ghamat Terrace (Gananath CHSL),
Senapati Bapat Marg, Opp. W. Railway Station,
Dadar, Mumbai - 400 028. Tel. 430 65 02

हार्दिक शुभेच्छा

**स्नेहा टूर्स अ‍ॅन्ड ट्रॅव्हल्स**

ठाणे ते पुणे तसेच सर्व डेली लक्झरी बसेसचे बुकींग

धनंजय श्रीराम विद्वांस
श्री लक्ष्मीनारायण मंदिर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे-४००६०२
फोन : ५४० ९१५२

Marathe Pratishthan

ज्यांना ह्याबाबत विशेष माहिती असेल त्याने ह्यात जरूर सहभागी व्हावे.

**आम्ही Offset Printing Machines बनवितो.** ती विकत घेणाऱ्या मुद्रकाला चांगल्या Operator ची गरज असते. तरी आपल्यापैकी एखाद्यास शिक्षण पूर्ण झाल्यानंतर अशाप्रकारच्या तांत्रिक कामाची आवड असल्यास **त्याला लागणारे तांत्रिक शिक्षण फुकट देण्याचे मी जाहीर करतो**. तो Skilled Operator झाल्यावर नोकरीची चिंता करण्याची गरज नाही.

आपल्यापैकी बरेच जण वेगवेगळया धर्मादाय संस्थांना देणगी रूपाने मदत करीत असतात मग तो अनाथाश्रम असेल किंवा वृद्धाश्रम असेल. आपली मदत संपूर्ण कार्याच्या दृष्टीने अगदीच तुटपुंजी असते. त्यामुळे अशा देणग्या प्रतिष्ठानला दिल्यास आपल्या मनातील हेतु किंवा उपक्रम ह्यांना वाव देता येईल.

मुंबई पुण्याकडील लोकांना कोकणचे विलक्षण आकर्षण आहे. परंतु सुट्टीमध्ये येऊन रहाण्यासारखे वाजवी दरातील हॉटेल उपलब्ध किंवा माहीत नसल्यामुळे येणे होत नाही. गोवेकरांची फार दिवसांची मागणी आहे. अशाप्रकारचे Holiday Home आपण बांधावे. परंतु असे करण्यासाठी लागणारा निधी व त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे त्याची नंतरची देखभाल करण्यासाठी लागणाऱ्या कार्यकर्त्यांचा अभाव ही खरी अडचण आहे.

ज्या कुलबांधवांची राहती मोठी घरे कोकण भागात आहेत त्यांनी घरातील एखादी पडवी किंवा खोली आपल्या मंडळींना वापरण्यास दिली तर उत्पन्ना बरोबरच जवळीकही निर्माण होईल. एकच Tourist Centre न होता वेगवेगळ्या गावी ती चालू होतील.

असे म्हणतात की पूर्वी कोकणात पैसे दिसत नसत, मुंबईहून Money Order आली की घर चालवयाचे. ती परिस्थिती बदलण्याची लक्षणे आता दिसत आहेत. कलमे व बागा ह्याचे बऱ्यापैकी उत्पन्न घरात येऊ लागले आहे. ह्या उत्पन्नाचा काही भाग नवीन व्यवसाय किंवा धंद्यात गुंतवण्याच्या दृष्टीने आता विचार करावयास हवा.

या संदर्भात मी एका गोष्टीकडे खास लक्ष वेधू इच्छितो. एखादा उद्योग अगर व्यवसाय अडचणीत का येतो? अनेक कारणांपैकी एक कारण अपुरा कर्ज पुरवठा व दुसरे प्रकल्प पुरा व्हायला लागणारा विलंब - ज्याला आपण 'ओव्हर रन' म्हणतो. यावरून एका गोष्टीची आठवण झाली सध्या एन्रॉन ही या भागातली एक ज्वलंत बाब आहे. भारतीय उद्योजकांनी हा प्रकल्प ४० महिन्यात पुरा करू असे सांगितले होते, तर एन्रॉनने तो १९ महिन्यात पूर्ण करण्याची हमी दिली.

हल्ली म्हणे विरोधकांनी एन्रॉन वसाहतीत जाणारे पाणी अडवण्याचा प्रयत्न केला. पाणीच नसेल तर काम बंद पडणार असे त्यांचे गणित. पण एन्रॉनने मुंबईहून दोन बोटी भरून पाणी आणले आणि काम थांबू दिले नाही. एन्रॉनची भलावण करण्याचा माझा उद्देश नाही; विलंब टाळण्याचे महत्व समजावे हा खरा उद्देश.

सरकारतर्फे अलिकडे कोकणात उद्योग विकासावर भर देण्यात येत आहे त्यांचे एक माहितगार व्यवसाय मार्गदर्शक अधिकारी श्री. अरविंद देशपांडे हे आमच्या विनंतीला मान देऊन आपल्याला मार्गदर्शन करण्यासाठी मुद्दाम इथे आले आहेत. त्यांचे विचार निश्चितच उपयुक्त ठरतील असा विश्वास व्यक्त करतो आणि त्यांचे आभार मानून मी माझे प्रास्ताविक संपवतो.


हितगुज रत्नागिरी अधिवेशन विशेषांकास
शुभेच्छा

# ज्ञानेश मंगल कार्यालय
# पुणे

फोन : ३२४६१७


Marathe Pratishthan

# स्वागताध्यक्ष श्री. कमलाकर नरहर मराठे यांचे भाषण

अध्यक्ष महाशय, श्रध्देय माता, भगिनी आणि ज्ञातीतील प्रतिष्ठित बंधूनो,

या भगवान परशुरामांच्या भूमीत, नररत्नांच्या खाणीत आपले स्वागत करताना मला अतिशय आनंद होत आहे. आपण सर्वजण 'कोकणस्थ'. म्हणजे आज कोकणात शरीराने कायम जरी रहात नसलो तरी मनाने कोकणाचे मात्र आहोत. आणि आपण जगाच्या पाठीवर उद्योगधंद्यासाठी कुठेही गेलो तरी या आपल्या मूळ पितृभूमीचा, आपल्या तांबडया मातीचा आपल्याला विसर पडलेला नाही हे आपण आवर्जून मोठ्या संख्येने या संमेलनात उपस्थित राहून दाखवून दिलेच आहे.

आपला हा भगवान परशुराम निर्मित "अपरांत" प्रदेश म्हणजे एकीकडे सिंधूसागर व दुसरीकडे सह्याद्री पर्वत यांचेमध्ये वसलेला कोकण प्रांत, निसर्ग सौंदर्याने भारंभार नटलेला आहे. सह्याद्री हा अतिप्राचीन पर्वत आहे. या पर्वताच्या गहन अरण्यांत 'सोमवल्ली' ही वनस्पती अजूनही सापडते. सोमवल्लीचा उल्लेख वेदांत वारंवार येतो. हे सह्याद्रीच्या प्राचीनत्वाचे निदर्शक आहे.

आपल्या कोकणांत आंबा, फणस, काजू, नारळ ही चिरपरिचित फळझाडे जशी आहेत तशाच बिब्बा, उंडी, मुचकुंद, भोपा, तिवर, भारांडी इत्यादी वृक्ष वनस्पती सुध्दा मुबलक आढळतात. या सर्वांचा अनेक प्रकारे उपयोग करण्यात येतो. याशिवाय करवंदे, तोरणे, अळू अशी चविष्ट विविध प्रकारची आणि विपुल प्रमाणांत फळे देणारी झाडेही आहेत. आता बदलत्या जमान्यात त्याचे कॅनिंग करून केव्हाही आस्वाद घेता येईल अशी सोयही झाली आहे.

अनेक प्रकारचे द्विपाद - चतुष्पाद पक्षी, प्राणी आपल्याकडे आढळतात जसे मोर, पोपट, लांडगे, वाघ, तरस इत्यादी. त्याचप्रमाणे फुरश्यासारखे, घोणसासारखे विषारी सरपटणारे जीवाणु सुध्दा कोकणात आहेत. एकविसाव्या शतकाकडल्या वाटचालीत मनुष्यवस्ती व कारखानदारी वाढत चालल्यामुळे अनेक प्राणी, वनस्पती एकतर दुर्मिळ झाले आहेत किंवा नष्ट तरी होत आले आहेत. ही एक चिंतेची बाब म्हटली पाहिजे.

आपले कोकण समुद्रकिनारी असल्यामुळे आणि खुष्कीच्या मार्गाने खैबर खिंडीतून परकीय आक्रमणे होण्यापूर्वीही येथे समुद्रमार्गे आक्रमणे होत असल्याने कोकण किनाऱ्यावर संरक्षणासाठी बरेच किल्ले प्राचीन कालापासून बांधण्यात आले आहेत. उदा. ठाणे जिल्ह्यात डहाणू, पालघर, वसई, शिरगाव, मानोर, दातिवरे, केळवे, माहीम हे भूइकोट किल्ले आहेत. यातील काही किल्ले पोर्तुगीजांनी बांधले आहेत व ठाणे, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात मिळून १६ किल्ले आहेत. यापैकी वसई, रायगड, रत्नागिरी, जयगड, सिंधुदुर्ग व विजयदुर्ग हे महत्वाचे आणि इतिहास प्रसिद्ध किल्ले आहेत.

रत्नागिरी किल्ला मध्ययुगीन आहे. शिलाहार राजानी सुमारे २ हजार वर्षापूर्वी तो बांधला. त्यानंतर कित्येक वर्षे हा किल्ला कोळी राजांच्या ताब्यात होता. त्यानंतर विजापूरच्या बादशहाकडून इ.स. १६७० साली तो शिवाजी महाराजांनी जिंकून घेतला आणि गावाकडचे बुरूज नव्याने बांधून किल्ला मजबूत केला. याच किल्ल्यात सदाशिवराव भाऊ पेशव्यांचे तोतयास नाना फडणीस यांनी नजरकैद करून ठेवले होते. येथे श्री समर्थ स्थापित मारुतीचे स्थान आहे. पूर्वीच्या किल्ल्याला लागून बंदर होते. आता त्याजागी बारमाही बंदराचे बांधकाम बरीच वर्षे सुरू आहे. किल्ल्यात भगवती देवीचे प्राचीन मंदीर आहे. देवळाचा प्रथम जीर्णोद्धार श्रीमंत भागोजीशेठ कीर यांनी केला. नंतर अलिकडेच स्थानिक समितीने दुसऱ्यांदा जीर्णोद्धार केला आहे. देऊळ व परिसर रम्य आहे. देवळाच्या पिछाडीच्या बुरूजावरून अथांग अरबी सागराचे दर्शन घडते.

रत्नागिरी जिल्ह्यात अनेक सुंदर आणि प्राचीन मंदिरे आहेत. आंजर्ल्याचा कड्यावरचा गणपती, चिपळूण जवळच्या बिवली येथील लक्ष्मी केशव, दापोली तालुक्यांतला केशवराज, गुहागरातल्या आपल्या सर्वांचा कुलदेव व्याडेश्वर व देवता योगेश्वरी, संगमेश्वर तालुक्यातील राजा कर्णाने बांधलेले उत्कृष्ट शिल्प सौंदर्याने नटलेले मध्ययुगीन काळांतले कर्णेश्वर, त्याच्याच वरच्या बाजूला असलेले सप्तेश्वर, देवरुखजवळ ऐन सह्याद्रीत राहिलेला मार्लेश्वर, जयगडच्या समुद्रकिनाऱ्याजवळचे कऱ्हाटेश्वर, तेथूनच जवळ असलेले प्रसिद्ध गणपतीपुळे, रत्नागिरी जवळच्या केळे-मजगावच्या डोंगरात कोरलेले गणपती मंदीर, हे मंदीर पांडवांनी कोरले अशी आख्यायिका आहे.

रत्नागिरी शहरात विश्वेश्वर, तृणबिंदुकेश्वर, जंबुकेश्वर, भागेश्वर, राधाकृष्ण, विठ्ठल, श्रीराम, पतितपावन अशी अनेक नवी जुनी मंदिरे आहेत. त्यातील श्री विठ्ठल मंदिर ४०० वर्षापूर्वीचे आहे. राजापूर तालुक्यातील धूतपापेश्वर येथे दर तीन वर्षांनी येणारी गंगा, देवगड तालुक्यातील कुणकेश्वर अशी अनेक ज्ञात-अज्ञात मंदिरे आहेत.

रत्नागिरी शहराला ब्रिटीशांच्या काळांत ब्रम्हदेशाचा राजा थिबा याला येथे नजरकैदेत ठेवल्यापासून महत्व आले. योगायोग असा की, रत्नागिरीत जन्मलेल्या लोकमान्य टिळक या भारतीय जनमानसाच्या अनभिषिक्त राजाला ब्रम्हदेशात मंडाले येथे स्थानबद्ध करण्यात आले आणि ब्रम्हदेशाचा राजा थिबा याला रत्नागिरीत स्थानबद्ध करण्यात आले. ज्वलंत देशभक्त स्वा. सावरकरांना सुद्धा येथे स्थानबद्ध करण्यात आले होते. त्या

मराठे प्रतिष्ठानला हार्दिक शुभेच्छा

अरुण चिंतामण मराठे
२, परदेशी मैदान, चिपळूणकर रोड, रामनगर, डोंबिवली (पूर्व)

श्रीमती शरयु श्रीराम मराठे
३२४, मत्री चाळ, व्ही.पी.रोड, गिरगांव, मुंबई-४०० ००४.

विद्वांस ब्रदर्स आणि सिस्टर्स
मणिनगर-अहमदाबाद, मालाड-मुंबई



Marathe Pratishthan

काळात त्यांनी या कर्मठ सनातनी वातावरणाच्या शहरात अस्पृश्योद्धाराचा मोठा प्रगतिशील उपक्रम राबविला होता. आणि ख्रिश्चन मिशनऱ्यांना येथून गाशा गुंडाळायला भाग पाडले होते. त्यांच्या या कार्याने कर्मवीर भाऊराव शिंदे फार प्रभावित झाले होते. त्यांच्याच प्रेरणेने भागोजीशेठ कीर यांनी सर्व हिंदूना प्रवेश देणारे पतित पावन मंदिर बांधले. अस्पृश्यांना मुक्त प्रवेश असणारे हे भारतातील पहिलेच मंदिर असावे.

स्वामी स्वरूपानंद, तात्यासाहेब केळकर, एस.एम. जोशी, सानेगुरुजी, महर्षी कर्वे, बाबासाहेब फाटक, आप्पासाहेब पटवर्धन, विनोबा भावे, पहिल्या महायुध्दात लढलेले वैमानिक श्री. लॅंकमन (लक्ष्मण) पटवर्धन, नाशिक कटातील क्रांतिकारक त्रिंबकराव मराठे, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बाळासाहेब खेर, चित्तपावन विद्यार्थी सहाय्यक संस्थापक बळवंतराव मराठे ह्या सर्व थोर व्यक्ती इथल्या मातीतच जन्मलेल्या आहेत. अशी किती म्हणून महती सांगावी?

आमचे रत्नागिरी शहर रहाटागर, झाडगांव, नाचणे व शिवरे या चार गावांचे मिळून बनले आहे. शिवकालापूर्वी पाटणहून आलेल्या सावंत नावाच्या सरदाराचे हे ४ वंशज. त्यांनी ही गावे वसविली. पूर्वीची रत्नागिरी किल्ला व पेठ एवढ्याच मूळ मर्यादित आटोपशीर वस्तीची. बाकीची सर्व वस्ती नंतरच्या काळात आसपासच्या परिसरातून येऊन येथे स्थायिक झाली आहे.

आता नजीकच्या भूतकाळात औद्योगीकरणामुळे रत्नागिरी शहराचा झपाट्याने विस्तार होत असून पूर्वीच्या शांत, टुमदार, निसर्गरम्य खेडेवजा शहराचा चेहरामोहराच पार बदलत चालला आहे. लवकरच पूर्णत्वाला जात असलेल्या कोकण रेल्वेमुळे कारखानदारीला वेग येणार आहे. उत्पादित मालाला त्वरित बाजारपेठ मिळणार आहे. मुंबईकडे धाव घेणाऱ्या कोकणातल्या हुशार, होतकरू, हरहुन्नरी तरुणांना आता त्यांच्या मातृभूमीतच स्वयंरोजगार मिळण्याच्या संधी वाढत आहेत. परंतु त्याचा फायदा घेण्यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन व मदतीचे हात पुढे येण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

आपले जे कुलबंधू आपल्या कर्तबगारीच्या जोरावर निरनिराळ्या उद्योगधंद्यात अग्रेसर राहून भरभराटीस आले आहेत त्यांनी कोकणातील आपल्या अन्य कुलबंधूंना मार्गदर्शन व मदतीचा हात द्यावा अशी विनंती करण्याची अमूल्य संधी मी ह्या संमेलनाच्या निमित्ताने घेत आहे. त्या दृष्टीने 'मराठे' प्रतिष्ठान या आपल्या घरच्या संस्थेने पुढाकार घ्यावा आणि या संस्थेला आपण सर्व कुलबंधूंनी सर्व दृष्टीने बलिष्ठ, कार्यतत्पर करावे अशी मी आपल्याला आग्रहपूर्वक विनंती करतो.

आम्हा रत्नागिरीकर मराठ्यांच्या विनंतीला मान देऊन आपण सर्व येथे आलात याचा आम्हाला अतिशय आनंद झाला आहे. आपला अभूतपूर्व प्रतिसाद पाहून आमचे मन भरून आले आहे. आमची येथे दोन-तीनच घरे आहेत. आमच्या दुबळ्या खांद्यावर एवढी मोठी जबाबदारी पेलताना आपली काही गैरसोय झाल्यास आपण आपले घरचेच कार्य आहे असे समजून घेऊन आम्हाला सांभाळून घ्यावे अशी आपल्याला प्रार्थना आहे.

संगच्छध्वं । संवदध्वं । संवोमनांसि जानतां ।

ॐ शांति : शांति : शांति :

## कै. श्री. महादेव व्यंकटेश विद्वांस यांच्या स्मरणार्थ

सन १८५० च्या सुमारास ब्रिटिश राज्यकर्त्यांनी त्यांच्या दप्तरातील पाच कर्मचाऱ्यांची निवड करून त्यांना सिव्हिल इंजिनिअरींगचे शिक्षण दिले. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांची सब ओव्हरसियर म्हणून नेमणूक केली गेली. भारतातील हे पहिले पाच इंजिनिअर. त्यातील एक होते आमचे खापरपणजोबा - कै. श्री. महादेव व्यंकटेश विद्वांस.

सब-इंजिनिअर या पदावरून निवृत्त झाल्यावर त्यांनी पुण्यातील मंडईपाठीमागे श्री मार्कंडेश्वराचे मंदिर बांधले व त्यासाठी विश्वस्त निधी करून ते मंदिर विश्वस्तांच्या ताब्यात दिले. आयुष्याचे शेवटचे दिवस त्यांनी याच मंदिरात काढले.

शेलारवाडी ते देहू हा रस्ता त्यांनी स्वखर्चाने बांधला व बोर्डाच्या स्वाधीन केला. जिच्या व्याजातून या रस्त्याच्या मेंटेनन्सचा खर्च निघेल एवढी देणगीही त्यांनी बोर्डाला त्या कारणासाठी दिली.

पुणे वेदपाठशाळेच्या संस्थापकांपैकी ते एक होते.

**अशा आमच्या खापरपणजोबांना आमचे नम्र अभिवादन
व त्याबरोबरच समग्र मराठे परिवाराला आमच्या शुभेच्छा**

- विद्वांस कुटुंबीय

Marathe Pratishthan

# संमेलन वृत्तान्त

**- विनायक केशव (पृ.२०), कार्यवाह, मराठे प्रतिष्ठान.**

**शनिवार ४ ऑक्टोबर १९९७**

चहा नास्ता आटोपून उपस्थित कुलबांधव **श्री क्षेत्र गणपतीपुळे** येथे खास गाडीने गेले. **श्रींचे दर्शन** घेतल्यानंतर मंदिरातील प्रशस्त दालनात सर्वांनी श्री गणपती अथर्वशीर्षाचे पठण केले. त्यानंतर **श्री. गणेश जाईल** (पृ.७५७) कुर्ला यांनी त्यांच्या खड्या व मधुर आवाजात 'गणराया लौकर येई' हा तुकाराम महाराजांचा अभंग व काही महिलांनी भक्तीपर रचना म्हटल्या.

श्री. धनवटकरांच्या निवासस्थानी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. **उत्तम सुग्रास भोजनात उकडीच्या मोदकांची भर पडली.** अगदी घरगुती वातावरणात श्लोकांच्या सोबतीने जेवण पार पडलं. परतीच्या प्रवासात **मालगुंड येथील केशवसुत स्मृतिस्थान** व केशवसुतांचे निवासस्थान पाहण्याची योजना संयोजकांनी आखली होती. समय साधून काही बांधवांनी केशवसुतांच्या प्रसिद्ध कविता म्हटल्या. केशवसुतांना काव्यात्मक श्रद्धांजली वाहून मंडळी संमेलनाच्या मंडपात परतली.

संध्याकाळी ६.३० वाजता संमेलनाचे परस्पर परिचय सत्र सुरू झाले. श्री. सुरेशभाऊ मराठे यांनी अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर कार्यवाह श्री. वि.के. मराठे यांनी संपूर्ण संमेलनाची कार्यक्रमाची रूपरेषा कार्यक्रम पत्रिकेनुसार सांगितली.

**सौ. शुभदा जोशी यांच्या स्वागत गीतानंतर कुमारी मीनल मराठे व दीपाली मेहेंदळे या छोट्या मुलींनी स्पष्ट शब्दांत गीतेचा पंधरावा अध्याय** म्हणून दाखवला. उपस्थित श्रोत्यांनी टाळ्या वाजवून त्यांचे कौतुक केले.

स्वागत समितीचे निमंत्रक श्री. भास्कर नरहर (पृ.४६) यांनी उपस्थितांचे संयोजक या नात्याने स्वागत केले. इतक्या मोठ्या संख्येने संमेलनाला उपस्थित राहिल्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले व पुढील सर्व कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन केले.

त्यानंतर अध्यक्षांच्या सूचनेनुसार **परस्पर परिचयाच्या कार्यक्रमाला सुरवात** झाली. जे बांधव सहकुटुंब सहपरिवार आले होते त्यांनी स्वतःच्या ओळखीबरोबर सौ.ची व परिवाराची ओळख करून दिली. हा कार्यक्रम नुसता परिचयाचा राहिला नाही. कारण ओळख करून देताना ज्या गोष्टी कौतुकास्पद होत्या त्याबाबतीत उपस्थितांनी टाळ्या वाजवून आपल्या भावना व्यक्त केल्या. ऐकू येणाऱ्या प्रत्येक टाळीबरोबर ओळख देणाऱ्या चेहऱ्यावरचे भाव बदलत होते. परिवार संमेलनाचा प्रमुख हेतूच साध्य होत होता.

परस्पर परिचय आटोपल्यावर मंडळी भोजनमंडपाकडे वळली. त्यानंतर ज्या धार्मिक

---


**कै. नाना व ताई चक्रदेव**

**यांचे**

**स्मृतीस अभिवादन**



**प्रकाश व सौ. अर्चना चक्रदेव** **कॅ. अतुल व सौ. मोनिका चक्रदेव**

७, सुयोजित, ४१५ नौपाडा, ठाणे


Marathe Pratishthan

कार्यक्रमाकडे **सर्वांचे लक्ष लागले होते तो गोंधळाचा कार्यक्रम** रात्री सुरू झाला. देवीची प्रतिष्ठापना झाली. मांडावरच्या देवीची यथासांग पूजा दांपत्याच्या हस्ते झाली. संबळाच्या नादलहरी आसमंतात पसरू लागल्या. गोंधळी तालसुरावर देवीची आळवणी करू लागले आणि सर्व वातावरण एका वेगळ्याच भावनेने भारून गेले. कुलबांधव दिवटी हातात धरून देवीचा जयजयकार करीत फेर धरू लागले. श्री. सुरेशभाऊ, संयोजक भास्करराव, सुधाकरराव, कमलाकर, श्री. अप्पासाहेब, श्री. वामनराव किती नावं घेणार? देवी मुळात मातृस्वरूप देवता. भक्तांनी हाक मारल्यावर ती धावून येणारच. मांडावर देवी आली हे पाहून गोंधळीबंधूंनी परंपरागत थाटात देवीचं आख्यान लावलं. खरं म्हणजे मांडावरची देवी काकड आरतीला मांड सोडून जाते. पण वेळेचं बंधन होतं. मोठ्या नाईलाजाने, किंबहुना नाराजी व्यक्त करीतच गोंधळीबंधू देवीला निरोप देण्याची कडवी म्हणू लागले. शेवटी आरती होऊन देवीजवळ आशीर्वाद मागून हा मन हेलावून टाकणारा कार्यक्रम समाप्त झाला.

**डॉ. सुधीर मराठे** (पृ.४३७), (कणकवली) **यानी या कार्यक्रमासाठी गोंधळी खास कणकवलीहून** आणले होते. बदलत्या काळानुसार गोंधळी लेंगा, सदरा, टोपी हा पोशाख करून आले होते. आख्यान सांगताना नारदीय कीर्तनकाराचे अनुकरण त्यानी केले होते. सहज मनात आले की गोंधळी त्यांच्या परंपरागत पोशाखात असते आणि पेटीवाला, तबलेवाला आणि माईक यामध्ये अडकून न पडता त्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे सुंदर पदन्यास करीत, संबळाच्या नादावर शरीर डोलावीत त्यानी देवीची आळवणी आणि आख्यानकथन केलं असतं तर किती बहार आली असती!




**रविवार ५ ऑक्टोबर १९९७**

संमेलनाच्या मुख्य कार्यक्रमाला सकाळी ९ वाजून २० मिनिटांनी सुरवात झाली. श्री. सदानंद विष्णू उर्फ भाऊ मराठे (दादर, मुंबई) (पृ.५०७) यांनी वैशिष्ट्यपूर्ण शैलीत कार्यक्रमाचे संचालन केले. सुरवातील **ब्रम्हवृंदांनी स्वस्तिवचन व इतर मंत्र** म्हणून ईशस्तवन केले. श्री. भास्कररावांनी या पुरोहितांचा यथोचित सत्कार केला.

यानंतर निवडक बंधु भगिनींनी सुंदर आवाजात **ईशस्तवन व स्वागतगीत** म्हटले.

त्यानंतर प्रतिष्ठान अध्यक्ष, स्वागताध्यक्ष, संयोजक, कार्यवाह यांच्या हस्ते **दीपप्रज्वलन** होऊन संमेलनाला रीतसर सुरवात झाली.

मराठे परिवारातील ज्ञात व अज्ञात दिवंगत व्यक्तींना तसेच पन्नासाव्या स्वातंत्र्यदिनानिमित्त देशासाठी प्राण अर्पण करणाऱ्या हुतात्म्यांना **श्रद्धांजली** अर्पण करण्यात आली.

त्यानंतर स्वागताध्यक्ष श्री. कमलाकर नरहर (पृ.४६) यांचे **स्वागतपर भाषण** झाले. त्यांना बोलतांना त्रास होत असल्याने त्यांचे लेखी भाषण श्री. भाऊ मराठे यांनी वाचून दाखविले.

त्यानंतर प्रतिष्ठान अध्यक्ष श्री. सुरेशभाऊ मराठे यांनी खालील **वृद्ध कुलबांधवांचा सत्कार** केला.

१) श्री. श्रीधर परशुराम (बापूसाहेब) (पृ.९८) पुणे.
२) श्री. माधव भार्गव (पृ.४६) रत्नागिरी.
३) श्री. धुंडीराज जयराम (पृ.४७), रत्नागिरी.
४) सौ. सुशिला धुंडीराज (सौ. नीलांबरी मराठे यांच्या हस्ते)
५) श्री. भगवान प्रभाकर (पृ.४५), रत्नागिरी.
६) सौ. कमला भगवान (सौ. नीलांबरी मराठे यांचे

Marathe Pratishthan

हस्ते)

**श्री. बापूसाहेब मराठे** (पुणे) निवृत्त पोलिस कमिशनर, यांनी यथोचित शब्दात सर्वांच्या तर्फे सत्काराला उत्तर दिले. दुसऱ्याला मदत करण्याची वृत्ती असली तर पोलिसाचा पेशा खरोखरच चांगला असे त्यांनी सांगितले.

त्यानंतर प्रतिष्ठानचे **अध्यक्ष श्री. सुरेशभाऊ मराठे यांनी प्रास्ताविक भाषण** केले. प्रथमत: त्यांनी उपस्थितांपैकी श्रेष्ठ कुलबंधू श्री. नारायणराव मराठे (अध्यक्ष, सिडको), श्री. मधुसुदन खांबेटे (लघुउद्योगतज्ञ), श्री. गणेश मोरेश्वर खांबेटे (निवृत्त न्यायाधीश), श्री. पंत मराठे (विश्वस्त, सिद्धीविनायक न्यास), रमाकांतविद्वांस (कन्सल्टिंग इंजिनियर), कोकण रेल्वेचे सर्व्हेकार्य केलेले श्री. जनार्दन यशवंत, तसेच वयस्करांच्या राष्ट्रीय पातळीवरच्या स्पर्धेत मागील तीन वर्षे सातत्याने पदके मिळवणारे बेळगावचे श्री. हरी कृष्ण, तसेच गोवेकर कुलबांधव या सर्वांना आर्जवून उल्लेख करीत त्यांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले. तसेच मोठ्या संख्येनी उपस्थित राहिलेल्या सर्वांचे त्यांनी मन:पूर्वक स्वागत केले. सुंदर शब्दात परिपत्रके व पत्रे तयार करणाऱ्या कार्यवाह श्री. वि.के. मराठे यांचा त्यांनी मुद्दाम उल्लेख केला.

**रत्नागिरीत संमेलन आयोजित करण्याचा उद्देश** विशद करताना त्यांनी कोकणवासी कुलबंधूंनी हातातले सोन्याचे ताट भिरकावून शहराकडे धाव घेण्याचे थांबवावे यासाठी प्रतिष्ठान काही काम करू इच्छित असल्याचे सांगितले. कोकण रेल्वेमुळे कोकण विकास शीघ्र गतीने होणार आहे. त्यात कोकणातील कुलबांधवांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर हवा विशेषत: सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर झाल्यामुळे आपण पर्यटनाचा विकास केला पाहिजे या मुद्यावर त्यांनी जोर दिला.

बऱ्याच तरुणांना व्यवसाय करावासा वाटतो पण व्यवसाय करणे म्हणजे काय करणे हेच मुळी त्यांना माहीत नसते. अशा वेळी व्यवसाय मार्गदर्शनाची गरज असते हे सांगून असे मार्गदर्शन करणारे श्री. देशपांडे यांना संमेलनाला प्रतिष्ठानने खास निमंत्रित केले होते. **श्री. अरविंद देशपांडे** यांनी व्यवसाय या विषयाला या मेळाव्यामध्ये स्थान दिल्याबद्दल प्रथमत: अभिनंदन केले. ज्ञान व शिक्षण यात फरक करताना शिक्षण हे कालबद्ध असते तर ज्ञानाला कालमर्यादा नसते, ते मरेपर्यंत संपादन केले जाते, हे स्पष्ट केले. व्यवसायाकडे माणूस कुतूहल म्हणून लहानपणापासूनच पहात असतो व त्याच्या अंतर्मनात त्याची प्रतिमा तयार होते. पण ही प्रतिमा बाह्यांगाचीच असते व ढोबळ असते. उदा. ठण् ठण् घंटा वाजवणारा वाहनवाहक मुलांना आकर्षित करतो किंवा शिट्टी वाजवून वाहने थांबविणारा पोलिस त्यांना खूप आवडतो. व्यवसायाची पारख त्याच्या अंगभूत गुणांवरून होणे आवश्यक असते. ही पारख जेवढी चोख तेवढी यशप्राप्ती निश्चित हे गणित आहे. येथेच व्यवसाय मार्गदर्शनाची जरूरी भासते.

कोकणासारख्या निसर्गसंपन्न व कच्च्यामालाची समृद्ध असलेल्या प्रदेशात नाना तऱ्हेचे उद्योग निर्माण करता येतील असे ठामपणे सांगून त्यांनी अशा उद्योगांची अनेक उदाहरणे दिली. उदा. कॅलिफोर्नियातून स्ट्रॉबेरीची रोपे आणून स्ट्रॉबेरी बारा महिने उपलब्ध झाली आहेत. काश्मीरचा मक्ता असलेल्या केशराची यशस्वी लागवड नाशिक येथे होत आहे.

---

हितगुज रत्नागिरी अधिवेशन विशेषांकास शुभेच्छा

***वामन आत्माराम मराठे***
***सौ. कमल वामन मराठे***

'तृप्ती', प्लॉट नं. २१८, सहकार नगर नं. २,
अजय मंगल कार्यालयाजवळ,
पर्वती, पुणे - ४११ ००९.

Marathe Pratishthan

आपल्या महाराष्ट्रात २८ विश्वविद्यालयातून बाहेर पडणारे किती कृषिपदवीधर स्वतःच्या शेतात राबतात असा सवाल करीत कृषी विज्ञानाच्या कक्षा रुंदावत आहेत. लँडस्केप आर्किटेक्चर (कृषी) कृषी स्थापत्य असे नवे अभ्यासक्रम आखण्यात आले आहेत हे सांगताना बऱ्याच अभ्यासक्रमांना फार मोठ्या गुणांची जरूरी नसते स्वतःची एक एकर जमीन असली तर १२% मार्क वाढतात हे उघड केले. तसेच दुधावर प्रक्रिया करण्याचे शिक्षण देणारा डेअरी टक्नॉलॉजी अभ्यासक्रम, बेसीक फूड टेक्नॉलॉजी कोर्स, सील्क टेक्नॉलॉजी तसेच हॉटेल व्यवस्थापन, पाककला अभ्यासक्रम, कॅनींग व बेकरी अभ्यासक्रम इत्यादि अभ्यासक्रमांची माहिती दिली. आपल्या तरुणांनी ठराविक अभ्यासक्रमांच्या पाठी न लागता असे फलदायी अभ्यासक्रम घ्यावे. असे आवाहन केले. मार्च ते मे या काळात माहिती घ्यावी आम्ही मार्गदर्शन करू असे आश्वासन दिले.

अध्यक्षमहाशयांनी श्री. देशपांडे यांना प्रेमाचे प्रतीक म्हणून श्रीफळ देऊन त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

यानंतर **'प्रतिष्ठान : काल - आज - उद्या' या विषयावर अनेकांनी आपले विचार व्यक्त केले.** तसेच त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना श्री. वि.के. मराठे कार्यवाह, श्री. ल.शं. मराठे (हितगुज), व श्री. सी.गो. खांबेटे (कुलवृत्तांत) यांनी योग्य शब्दात उत्तरे दिली. उपस्थितांचे काही विचार खालीलप्रमाणे होते.

१) कालिदास मराठे - गणमान्य व्यक्तींची यादी असावी. त्यांच्याकडे हितगुज पाठवावा.

२) विष्णू श्री. मराठे - हितगुजमध्ये व्यवसाय मार्गदर्शनपर माहिती असावी.

३) सुरेश ना. विद्वांस - अलीबागजवळ वृद्ध पर्यटक निवास आहे. मुंबईमध्ये कुलबांधवांची तात्पुरती निवासव्यवस्था असावी.

४) सौ. नीलांबरी मराठे - वैद्यकीय मदतीसाठी आलेल्या अर्जांचा ताबडतोब विचार व्हावा.

५) शाम चक्रदेव - नागपूर व अकोला येथे प्रतिष्ठानचे काम करीन. नागपूरला कुलबांधवांची रहाण्याची सोय करीन.

६) मुकुंद मा. मराठे - इंटरनेट कनेक्शन सर्चिंग सोय करता आली तर पहावी. काही सेवाभावी संस्थांमध्ये प्रतिष्ठानसाठी जागा राखून ठेवाव्या.

७) कमलाकर मराठे - मेडीकल इन्शुरन्सच्या धर्तीवर फंड निर्माण करावा.

८) यशवंत कृ. विद्वांस - केळशी येथील घरामध्ये ४ ते ६ विद्यार्थ्यांची केवळ निवासाची सोय होईल.

९) विष्णू श्रीधर मराठे - तरुणांना व्यवसाय सुरू करायचा असेल तर कॉस्टींग वगैरे विषयांत विनामूल्य मदत करीन.

१०) पुष्कराज मराठे - श्री. देशपांडे यांचा स्वतंत्र कार्यक्रम ठेवावा.

११) अशोक केशव मराठे - परळच्या परिसरांत वैद्यकीय कारणाकरता मुंबईमध्ये येणाऱ्या कुलबांधवांसाठी एखादी खोली घ्यावी.

१२) लक्ष्मण पां. मराठे - गोव्यामध्ये कोणाही कुलबंधुला कोणतीही मदत लागल्यास श्री. कालिदास मराठे, श्री. कृष्णा मराठे यांचेशी संपर्क साधावा. संस्कार वर्ग चालवावेत.

१३) विवेक प्र. मराठे - गुंतवणुकविषयी मी माहिती देईन. (Tel No. : 543 65 43)

१४) श्री. पंत मराठे - तरुण पिढीने पुढे येऊन प्रतिष्ठानच्या कामात भाग घ्यावा. संस्कार केंद्राची स्थापना करावी.


**With Best Compliments From**

# JANAKALYAN SAHAKARI BANK LTD.

140, Vivek Darshan, Sindhi Society, Chembur, Mumbai - 400 071
**Phone** : 522 2582, 522 8320, 523 0268, 524 6746 **Fax** : 523 0266

**Deposits - Rs. 242 crocres** **Advances - Rs. 152 crores**

**: Our Salient Features :**

First Bank in India to introduce non stop business hours form 8 a.m. to 8.pm Ranks amongst first 25 urban Banks in the country. Computerisation in Bank's working with convenient morning - evening hours. We pay 1% additional interest on deposits of Co-operative Societies. Safe deposit lockers facility available.

**Board of Directors**

**Shri V.P. Goyal - Chairman** **Shri V.R. Patwardhan - Vice Chairman**

**DIRECTORS**

Shri B.L. Boolani, Shri H.K. Dhruv, Shri R.R. Gehani, Ms. G.B.Gunde, Shri C.N. Jagtap, Shri V.V. Girkar
Shri R.P. Mishra, Dr. L.L. Oswal, Shri T.P. Sawant, Mrs. B.V. Vaidya, Shri R.G. Ketkar (Staff Rep.), Shri P.I. Singh (Staff Rep.)

**Shri S.K. Marathe - General Manager** **Shri N.D. Behere - Dy. General Manager**

**BRANCHES**

- Andheri (W)
- Antop Hill
- Bhandup
- Chembur
- Dadar
- Ghatkopar
- Juhu
- Kannamwar Nagar
- Khar
- Mulund (E)
- Mulund (W)
- Malad
- Sahar
- Sakinaka
- Sion
- Vikhroli
- Extension Couner At Chembur


Marathe Pratishthan

१५) डॉ. अरविंद मराठे - मी माझ्या घरी (हरकूळ) येथे कुलबांधवांची तात्पुरत्या निवासाची सोय करीन.
१६) सुरेश पांडुरंग मराठे - मी रत्नागिरी येथे नर्सरी उद्योग करतो. आंब्याचा व्यवसायसुद्धा करतो तसेच लाकडी खोके पुरवतो. कोकणी मालाला विक्रीसाठी मुंबईत जागा हवी.
१७) सुधाकर नरहर मराठे - मराठे प्रतिष्ठानने पुढाकार घेऊन मराठे परिवारातील तरुण वर्गांनी सहकारी तत्वावर व्यवसाय सुरू करावेत. कॅनींगचा व्यवसायाचा प्रकल्प सहकारी तत्वावर सुरू करावा. आर्थिक सहाय्याच्या योजनांचा लाभ घ्यावा.
१८) शुभदा मराठे - मी कोकणातील भगिनींसाठी गृहोद्योग सुरू केला आहे. कोकणातील आंबा, कोकम, यावर प्रक्रिया करून १९ ते २० भगिनींना समाविष्ट केले आहे. तसेच सुमारे २०० शाळकरी मुलांना मी काम पुरवते. कोकणांत येऊ इच्छिणाऱ्या कुलबांधवांची (२० ते २५ माणसे) मी सोय करीन मात्र आधी कळविणे आवश्यक आहे.

त्यानंतर श्रोत्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना उत्तरे देताना **श्री. लक्ष्मण शं. मराठे** यांनी स्पष्ट केले की सर्व कुलबांधवांना हितगुज पाठविण्याची आमची इच्छा आहे. गणमान्य व्यक्तींना हितगुज पाठविले जाईल असे आश्वासन देऊन बांधवांनी कोणतीही उपयुक्त माहिती किंवा मदत करण्याची इच्छा हितगुजकडे कळवावी त्याला प्रसिद्धी देण्यात येईल असेही सांगितले.

**श्री. सी.गो. खांबेटे यांनी कुलवृत्तांताचे नूतनीकरण** करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर अध्यक्ष श्री. सुरेशभाऊ यांनी थोडक्यात समालोचन करून रत्नागिरीकर श्री. नानासाहेब भिडे व श्री. पटवर्धन दुपारी उद्योगविषयक मार्गदर्शन करणार असल्याचे सांगितले.

कार्यवाह **श्री. वि.के. मराठे** यांनी आभार मानताना काही गोष्टी स्पष्ट केल्या. ते म्हणाले की प्रतिष्ठानचा कायम निधी एक लाख रूपये (अंदाजे) आहे त्याचे व्याज दरवर्षी १२ ते १३ हजार रुपये येते. या पैशात प्रतिष्ठानला सारा संसार चालवावा लागतो. प्रतिष्ठानने काही भरीव कार्य करावे असे आपणाला वाटत असेल तर **कायम निधी भरपूर वाढला पाहिजे. शिक्षण निधीसुद्धा** अंदाजे एक लाख रुपये आहे तो **जेवढा वाढेल तेवढ्या प्रमाणावर आपणाला शैक्षणिक मदत देत येईल.** श्री. मराठे यांनी संयोजक, त्यांचे बंधू, त्यांचे कुटुंबीय यांचा नामनिर्देश करून मन:पूर्वक आभार मानले. तसेच श्री. आनंदराव, श्री. दत्तोपंत, श्री. अप्पासाहेब व इतर सर्व रत्नागिरीकरांचे आभार मानले.

त्यापाठोपाठ संयोजक श्री. भास्करराव मराठे यांनी त्यांना मदत केलेल्या सर्वांचे आभार मानले.

सकाळचे सत्र संपल्यावर सर्वजण भोजनासाठी गेले. दुपारी ४.३० च्या सुमारास श्री. नानासाहेब भिडे व **श्री. भाऊसाहेब पटवर्धन** हे रत्नागिरी शहरातील प्रथितयश उद्योजक उपस्थित झाले.

**श्री. नानासाहेब भिडे यांनी** सुरवातीला आपली व्यक्तिगत हकीगत सांगून **त्यांच्या कौकण उत्पादनाविषयी माहिती दिली.** रातांबा वा कोकम हे अत्यंत आरोग्यदायक फळ असून त्याच्यावर प्रक्रिया करून उत्तम पेय बनविता येते असा स्वानुभव सांगितला. कोकणांत फळप्रक्रियेचे

हार्दिक शुभेच्छा

# अशोक अगरबत्ती वर्क्स

३०४, प्रभादेवी युनीक ईन्डस्ट्रीयल ईस्टेट,
ऑफ वीर सावरकर मार्ग,
प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.

MaratheePratishthan

अनेक व्यवसाय करता येतील फक्त तरुण वर्गाची इच्छा पाहिजे हे स्पष्ट केले.

**श्री. भाऊसाहेब पटवर्धन यांनी कोकणातील शेतीसुद्धा मेहनतीने फलदायी होते** हे सांगताना त्यांने अनेक अनुभव कथन केले. संपूर्ण स्वावलंबनाचा प्रयोग त्यांनी कसा केला हे फार सुंदर शब्दात सांगितले. कोणत्याही तरुणाला मार्गदर्शन करण्याची इच्छा या दोन व्यवसाय तपस्व्यांनी व्यक्त केली. श्री. सुरेशभाऊ यांनी दोघांचे मन:पूर्वक आभार मानले. संध्याकाळी कुलबांधवांचे करमणुकीचे कार्यक्रम झाले. (अहवाल पृ.१७-२० वर पहावा.) भगिनींनी भक्तीगीते, भावगीते म्हटली. शामराव मराठे यांनी उत्तम बासरी वादन केले. सौ. खांबेटे यांनी नाट्यप्रवेश सादर केला. सौ. शुभदा मराठे यांनी कथाकथन केले. सौ. मंजिरी मराठे यांनी दूरदर्शनच्या आठवणी सांगितल्या. त्या प्रथमच जाहीर कार्यक्रमात गायल्या. एक भगिनी तर चक्क तीस वर्षांनी गायल्या. हे सर्व त्यांच्या प्रतिष्ठान वरील आपुलकीचे प्रतीकच मानावे लागेल.

या संमेलनाचे एक वैशिष्ट्य म्हणजे जेष्ठ कुलबांधव **श्री. जनार्दन गोविंद** (पृ.४०५), कोफराड, आगाशी, **यांनी शनिवारी कीर्तन सादर केले.** कीर्तनाचा योग हल्ली क्वचितच येतो. प्रतिष्ठानवरील प्रेमामुळे आणि त्यांच्या मित्रांच्या आग्रहावरून श्री. जगूभाऊ यांनी कीर्तन श्रवणाचा लाभ श्रोत्यांना दिला.

भोजनानंतर संमेलनाचा **शेवटचा कार्यक्रम जाखडी** साजरा झाला. हा एक ग्रामीण कार्यक्रम आहे. वाद्य वाजविणारे मध्यभागी बसतात व लहान मुले नाना रंगाचे पोशाख करून त्यांच्याभोवती फेर धरतात. वाद्यांची गती वाढते तशी मुलांच्या नृत्याची गती वाढते. त्यांचेवर छतातून निरनिराळ्या रंगाचे प्रकाशझोत टाकले जात. ही लहान मुलं इतक्या चपळाईने फेर धरीत होती की वाद्यकरांची तारांबळ उडत असे. सर्व दर्शकांनी या बालकांचे टाळ्यांच्या कडकडाट करून कौतुक केले.

संमेलन संपले. दुसऱ्या दिवशी सकाळी बहुतेक मंडळींनी रेल्वे स्टेशन गाठले. डब्यांत शे-सव्वाशे कुलबांधव होते. संमेलनाची 'झींग' उतरली नव्हती. सकाळी सव्वासहा ते दुपारी सव्वाचार हा दहा तासांचा प्रवास म्हणजे संमेलनाचे उत्तरपर्वच होते. गाणी, भेंड्या, चुटके, चेष्टा यांना ऊत आला होता. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्व आपली वयं विसरून चेष्टा मस्करी करीत होते. अंताक्षरी आणि तीसुद्धा हिंदी सिनेमातल्या गाण्यांची अंताक्षरी गाजली. प्रौढ भगिनींनीसुद्धा हिरीरीने भाग घेतला.

पुणेकर विरुद्ध मुंबईकर, पुरुष विरुद्ध स्त्रिया असे पक्ष पाडून वाद-प्रतिवाद-संवाद यांना उधाण आले होते. या उतारवयात आपली सौ. धीटपणे बायकांच्या बाजूने भांडते हे पाहून नवरे थक्कच झाले. काय करणार? घरी जाऊन जेवायचे आहेना? असा मुद्दा पुढे करून किंवा बायकांच्या भापेत कांगावा करून पुरुषगट समेट करीत होता.

दादरला उतरल्यावर असा आनंदमेळावा पुन्हा केव्हा भरणार हाच प्रश्न प्रत्येकजण स्वत:ला विचारीत होता.

***

*मराठे प्रतिष्ठानला हार्दिक शुभेच्छा*

**श्री. गणेश मोरेश्वर जाईल**

With Best Compliments From

**Umesh Marathe**
**B.Tech (Elec.) M.I.E. MIETE**
**Director**

# Radio Electric Institute

Office : Lamington Chambers, Dr. Bhadkamkar Rd., Bombay - 40004.
Tel. 3864102, 3856082, 3886951 Fax. (91-22) 3870689
Gram : RADTRIC Resi Tel. 3864119

Institute : Everest Shopping Centre, Opp. Railway Station,
Dombivali (West).

Marathe Pratishthan

# उद्योगविषयक मार्गदर्शनाचा वृत्तांत

**- श्रीपाद माधव ऊर्फ आप्पा मराठे (पृ. ४६) रत्नागिरी.**

आपल्या मराठे परिवाराचे संमेलन दिनांक ४ व ५ ऑक्टोबर ९७ या दिवशी रत्नागिरी येथे साजरे झाले. त्यामध्ये, येणाऱ्या काळाची चाहूल ओळखून मराठे परिवारातील होतकरू तरुणांना व्यवसाय विषयक मार्गदर्शन व्हावे अशा हेतूने रत्नागिरीचे यशस्वी व कीर्तिमंत उद्योजक मा. गंगाधर भाऊ पटवर्धन व मा. नानासाहेब भिडे यांना पाचारण करण्यात आले होते. त्या दोघांचीही प्रकृती बरी नसतांना व कामाचे व्याप असूनही त्यांनी आपल्या विनंतीला मान देऊन संमेलनस्थळी येऊन अत्यंत कळकळीने मार्गदर्शन केले.




मा. नानासाहेब भिडे यांनी एका वेगळ्या दृष्टीने आपल्या व्यवसायाची निवड केली. ज्या भूमीत जे पिकतं, ज्या वृक्ष वेली उपजतात, त्या तेथल्या लोकांना मानवल्या पचनी पडतात आणि प्रकृतीच्या तक्रारी रहात नाहीत. परंतु त्याचे फक्त औषधी उपयोगच लक्षात न घेता रोजच्या उपयोगात ते खाद्यपदार्थ आणावेत. तसेच स्वागत समारंभ, लग्न कार्ये, स्नेहसंमेलने अशा वेळी सुद्धा त्यांचा उपयोग पेप्सी कोला, कोका कोला, केक, या सारखा सुद्धा करता येतो हे त्यांनी स्वत: अभ्यासपूर्वक संशोधन करून, पदार्थांची निर्मिती करून सिद्ध केले आहे.

वानगी दाखल त्यांनी रातांबे, कोकम याचे उदाहरण दिले. रातांबा किंवा कोकम याचा सालांचा उपयोग त्याच्या रसाची पुटे वाळलेल्या सालांवर ४-५ दिवस ठेऊन त्यापासून आमसोले बनविली जातात. त्याचा उपयोग स्वयंपाकात रुची येण्यासाठी. भाजी चटण्या वगैरे साठी केला जातो, तसाच समारंभासाठी उत्तम पेय असा केला जाऊ शकतो परंतु कोकम सरबत पित्त झाले तरच घ्यायचे ही परंपरागत कल्पना दूर करण्यासाठी २ वर्षे जावी लागली असे ते म्हणाले. त्याच्या बियांच्या तेलाचा उपयोग जुलाब थांबविण्यासाठी होतो. त्याचप्रमाणे तळपायाच्या भेगा बुजविण्यासाठी करणे वगैरे दुसरे उपयोग आहेत. परंतु या उद्योगाकडे कोकणातील तरुण उद्योजकांचे म्हणावे तसे लक्ष नाही असे त्यांचे म्हणणे होते.

आपल्या कोकणात बुद्धी आहे. उत्पादनासाठी कच्चा माल मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे फक्त कल्पनाशक्ती, परंपरागत विचारांपासून वेगळे होऊन नवीन उत्पादने निर्मिण्याची इच्छा, चिकाटी यांचा अभाव दिसतो. यासाठी मार्गदर्शनाची अत्यंत आवश्यकता आहे हे त्यांनी मान्य करून असे मार्गदर्शन करण्याची त्यांनी केव्हाही तयारी दर्शविली.

कोकणात पडून कुजून फुकट जाणाऱ्या फणसापासून केवळ फणस पोळी बनत नाही तर त्याचे इन्सटंट सांदणे, तळलेले गरे, त्याचा उग्र वास कमी करून आरोग्याला उपायकारक टॉनिक म्हणून उपयोगी पडणारे सरबत सुध्दा करता येते. नाचणे या दुर्लक्षित आणि गरिबांचे धान्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धान्यापासून नाचणीचे सत्व, मुलांसाठी नाचणी चॉकोलेट बार असेही पदार्थ बनविता येतात, त्यांना बाजारपेठ मिळू शकते असे त्यांनी सांगितले. थोडक्यात कोकणातल्या तरुणांनी नोकऱ्यांच्या नादी न लागता आपल्या आसपास शोधक दृष्टीने इथेच सहज मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणाऱ्या करवंदे, आंबे, फणस, रातांबे, तोरणे, अळू (हे चविष्ट फळ आहे) यापासून रासायनिक पदार्थ न वापरता टिकाऊ पदार्थांचे उत्पादन करून त्यांना बाजारपेठ मिळविता येते असे त्यांना आग्रहपूर्वक सांगितले. त्यांना चिकाटी, उद्यमशीलता, शोधकदृष्टी, सतत धडपड याची आवश्यकता आहे. एवढे असल्यावर भांडवलाची उपलब्धता होऊ शकते. सरकारी वित्तीय संस्थांचा उपयोग होऊ शकतो असे त्यांचे सांगणे होते.



त्यानंतर माननीय गंगाधरभाऊ पटवर्धन यांनी श्री नानासाहेब भिडे यांचा सूर पकडून कोकणांत फळबागा करण्याची फार मोठी संधी उपलब्ध असल्याने स्वत:च्या उदाहरणावरून सांगितले. कोकणात १५ लाख एकर पडीक जमीन आहे. त्यामध्ये ज्यांच्याकडे बुद्धी आहे, कल्पना आहेत, पायाभूत सोयी आहेत, भांडवल गुंतविण्यासाठी पैसा आहे, अशा सर्व गोष्टी कोणा एकाकडे नसल्या तरी ज्यांच्याकडे वरीलपैकी एकेक गोष्ट आहे त्यांनी एकत्र येऊन बरेच काही करता येईल असे त्यांनी सांगितले.

आज आपण काही भांडवल गुंतवून बागा तयार केल्या तर पुढील बरीच वर्षे चढत्या भाजणीने त्यापासून सतत उत्पन्न मिळू शकते हे त्यांनी स्वत:च्या उदाहरणावरून सांगितले. कोकणात आलेल्या रुळवाटेचा (रेल्वेचा) पुरेपूर उपयोग करून मुंबई, पुणे या बाहेरच्या इंदूर, ग्वाल्हेर, कानपूर, दिल्ली, कलकत्ता, मद्रास येथील बाजारपेठांमध्ये सुद्धा आपल्या हापूस आंब्याचा प्रवेश होऊ शकतो असे त्यांनी सांगितले.

कमी पाण्यावर वाढणाऱ्या आणि जास्त उत्पादने देण्याऱ्या काजू सारख्या पिकांची फार मोठ्या प्रमाणावर लागवड करणे शक्य आहे. त्यासाठी जमीन खरेदीपासून सर्व गोष्टींसाठी वित्तीय संस्थांचा उपयोग करून घेण्याची क्षमता आपल्याकडे निर्माण होण्याची आवश्यकता आहे. आता तर कलमांना पाण्याचे शिंपणे न करता कलमी आंब्याची लागवड करणे शक्य झाले आहे असे मार्गदर्शनही त्यांनी केले.

तात्पर्य, उपलब्ध पड जमीन, नवीन संशोधनाची दखल घेऊन त्याचा लागवडीसाठी, वाहतूकीसाठी, पदार्थ टिकविण्यासाठी उपयोग करून अनेकांनी एकत्र येऊन हा प्रयोग केला तर हा उद्योग किफायतशीर आणि पिढ्यानपिढ्यासाठी शाश्वतचे उत्पन्न मिळू शकते. यासाठी ज्यांच्याकडे पड जमीन आहे, भांडवल गुंतवणूक करण्याची क्षमता आहे, ज्यांच्याकडे बुद्धी आहे, क्षमता आहे परंतु जमीन व पैसा नाही अशांनी एकत्र येऊन, थोडे धाडस करून, सुरवातीला तोटा निराश न होता सहन करून उद्योग केला तर कोकणातल्या तरुणांचे भवितव्य अतिशय उज्वल आहे असे त्यांनी सांगितले.

Marathe Pratishthan

# दूरदर्शनवरील वृत्तनिवेदन

**- सौ.मंजिरी मराठे (पृ.३९२) यांनी रत्नागिरी संमेलनात निवेदन केलेल्या आठवणी**

१) ते दिवस क्रिकेटनी भारावलेले होते. श्रीलंका-भारत सामना निर्णायक अवस्थेत होता. सात वाजता बातम्या सांगायच्या होत्या. पावणेसात झाले तरी बातम्या तयार नव्हत्या. इतक्यात फटाके वाजले. भारताच्या विजयाची बातमी तयार झाली. पण हाय् सातला पांच मिनिटे कमी असताना समजलं, भारत हरला. एकच गडबड झाली. कसातरी बातम्यांचा सातचा मुहूर्त साधला.

२) अगदी अलिकडची दंगल, वरळी-प्रभादेवी भागात वातावरण तंग होते. बातम्या सांगायची वेळ जवळ येत होती. दूरदर्शन केंद्रावर जावे की न जावे अशी मनात धाकधुक होत होती. शेवटी मनाची तयारी करून मिस्टरांबरोबर सुखरूप टी.व्ही सेंटरवर पोचले. कर्मचारी वर्गाचा पत्ता नव्हता. बातम्या तयार नव्हत्या. शेवटी संपादकांनी सांगितलेल्या बातम्या स्वत: हाताने लिहून काढल्या. मॉनेटरवर सारखे घड्याळ पुढे जाताना दिसत होते. शेवटी अक्षरश: धावत जाऊन सात वाजून एक मिनीटानी बातम्या सांगितल्या.

३) मी त्यावेळी दूरदर्शनच्या जगात नवीन होते. निवडणुकांचे निकाल धडकत होते. प्रेक्षक टी.व्ही वरच्या बातम्यांची आतुरतेने वाट पहात होते. ठळक बातम्यांमध्ये 'शिवसेनेचा' आमदार निवडून आल्याचा उल्लेख केल्यावर फोन खणाणला; तो आमदार 'शिवसेनेचा' नव्हता. पुढील बातमीमध्ये दिलगिरी व्यक्त केली; पण लिखित बातमीत दुरुस्ती नव्हती. पुन्हा ठळक बातमीत तीच चूक घडली; पण वाचता वाचता मोठ्या खूबीने दुरुस्ती केली. या प्रसंगावधानाबद्दल वरीष्ठांकडून शाबासकी मिळाली.

सौ. मंजिरी आठवणी सांगताना श्रोत्यांचा उत्साह उतू जाऊ लागला. ते उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारू लागले. - काही भक्ती बर्वे बातम्या सांगताना तोंडावर बसणारी माशी एकसारखी त्रास देत असे मग तुम्ही बातम्या सांगताना ती कुठे जाते?

कुठे जाणार? हं, त्या माशीचं आणि भक्तीचं सख्य असलं पाहिजे. किंवा माझा चेहरा माशीला आवडत नसावा.



- काही वेळा ठळक बातम्यांमधल्या बातमीचा सविस्तर बातम्यांमध्ये पत्ताच नसतो असं का?

हे पहा, या बातम्यांची जवळजवळ २८ ते ३० पानं असतात. आवश्यक (MUST) असा ठळक उल्लेख असलेली पानं ठळक बातम्या म्हणून वाचली जातात व पुन्हा सविस्तर बातम्यांत येतात. काहीवेळा एखादं असं पान बाकीच्या पानात मिसळून जात आणि बातमी ठळक बातमीतच अडकून राहते. या पानांच्या उलथापलथी क्षणांत करायच्या असतात कारण बातम्या सांगण्याचा व्हिदमराखणे जरूर असते. फार क्वचितच अशी गफलत होते.

- कां हो समजा तुमच्या घरी तुमचा जवळचा नातेवाईक फार आजारी आहे आणि कर्तव्यबुद्धीने तुम्ही ड्यूटी फर्स्ट म्हणून कामावर हजर राहिलात. तर मनातली काळजी चेहऱ्यावर व्यक्त होते का?

असे प्रसंग कधी कधी येतात. त्रयस्थ माणसाला हे फरक मुळीच जाणवत नाहीत; पण माझ्याबाबतीत एका प्रसंगात मला माझ्या नातेवाईकाच्या दृष्टीला हा चेहऱ्यावरचा फरक जाणवला व त्यांनी मला लगेच विचारलं काय गं, कोणी आजारी आहे कां घरी? स्टुडिओत पाऊल टाकण्याअगोदरची दु:खं सवयीने विसरता येतात. पण काम हातावेगळं केल्यानंतर मात्र भावना अनावर होतात.

- मंजिरी मराठे हे नाव वाचल्यानंतर किंवा तुमची एखादी पर्सनल गोष्ट समजल्यानंतर मराठे कुटुंबातील किंवा अन्य प्रेक्षकांकडून कौतुकाची किंवा सहानूभूतीची प्रतिक्रिया घडून येते का?

- हो ना! मी नुसती मंजिरी नाही, मंजिरी मराठे आहे हे समजल्यावर मराठे कुटुंबियांना अभिमान वाटतो. ही भावना समजल्यावर मी सुद्धा सुखावते. याबाबतीत मला पुण्याच्या शांताबाई जोशी चांगल्याच आठवतात. मला आई नाही हे समजल्यावर त्यांनी मला मातेच्या प्रेमाने निरोप दिला की मी केव्हाही त्यांना भेटावं मला सुद्धा निरोप ऐकून अगदी भडभडून आलं. मला मानस-माता अनेक आहेत पण सख्खी आई नाही याची हळहळ वाटते.

- समजा तुम्ही निवेदिका नसतात तर कोण झाला असतात?

- तर मी वक्तृत्वकलेचा खूप अभ्यास केला असता. मला भाषणं करायला खूप आवडतं. सुंदर शब्दांनी सजलेलं भाषण करावं व ते करताना श्रोत्यांच्या प्रतिक्रिया डोळे भरून पहाव्या हे माझं स्वप्न आहे. माझं दुसरं स्वप्न संगीत. मी ज्यावेळी माझ्या आवडत्या कलावंताचं गाणं ऐकते तेव्हां क्षणभर डोळे मिटून स्वत:ला त्या कलावंताच्या ठिकाणी पहाते आणि हे सुंदर स्वर माझ्याच मुखातून येताहेत असं स्वप्न जागेपणी पहाते.

- कोणालाही दुरदर्शनवर निवेदिका म्हणून काम करता येईल का? काही अटी आहेत का?

आहेत तर, नोकरीला लागताना वय वीस वर्षाहून कमी असावं. पदवी आवश्यक. पत्रकारिता अभ्यासक्रमाला प्राधान्य आहे. चेहेरा फोटोजेनिक पाहिजे. स्पष्ट शब्दोच्चार व बोलण्याची योग्य ढब आवश्यक. बातमी लिहिणे, भाषांतर, सामान्यज्ञान यांचा शंभर गुणांचा पेपर असतो. पेहराव प्रसंगानुरूप असावा. महाराष्ट्रात पातळ नेसणं आवश्यक असतं.


**मराठे प्रतिष्ठानला हार्दिक शुभेच्छा**

**विजय श्रीधर मराठे**
मराठे रेडिओज, सातारा, दूरध्वनी २०३३४/३०४३३

**मराठे बंधू प्रसाद पूजा सेंटर,**
महालक्ष्मी मंदिर, कोल्हापूर ४१६ ०१२. दूरध्वनी ५२५२९१




Marathe Pratishthan

# संमेलनाच्या यशाचे शिल्पकार

**संमेलनाचे निमंत्रक श्री. भास्कर नरहर (पृ. ४६) रत्नागिरी**

सर्व कुलबांधवांना
मानाचा मुजरा

आपण ४ व ५ ऑक्टोबर ९७ला रत्नागिरीत परिवार संमेलनाला उपस्थित राहून परतलेवर आता आपापले दैनंदिन व्यवहारात मग्न झाला असाल आणि अशाचवेळी या संमेलनाचा संयोजक या नात्याने माझे हृदगत घेऊन आपल्या भेटीस येण्याचे धाडस करीत आहे.

संमेलन यशस्वी झाले, सर्वांना समाधान देऊन गेले अशा विविध प्रतिक्रिया प्रत्यक्ष माझेपर्यंत Direct किंवा कर्णोपकर्णी आल्या. याची नोंद घेताना अभिमान वाटतो - मन भरून येते - अंगावर मूठभर मांस चढते - पण स्वस्थचित्ताने विचार करताना एक विचार येतो. माझे मन म्हणते "अरे! तू तर केवळ एक माध्यम आहेस. या यशाचे शिल्पकार अनेक आहेत." ते दृष्यपटलावर यावेत हाच या पत्रप्रपंचामागील हेतू बरं.

रत्नागिरी संमेलन आयोजित करावयाचे अशी कल्पना पुढे आलेवर आम्ही आमचे रत्नागिरी स्थित चुलते सर्वश्री माधव भार्गव (पृ.४६), धुंडीराज जयराम (पृ. ४६) व भगवान प्रभाकर (पृ.४६) या वयोवृद्धांचे (योगायोगाने त्या सत्कारमूर्ती झाल्या.) आशीर्वाद घेवून प्रतिष्ठानकडे "होकार" कळविला आणि एकेक मोहरे कार्यरत झाले.

प्रतिष्ठान मुख्यालयातून उदंड प्रतिसाद लाभला. **जादूई भाषाप्रभू V.K.** नी एका आमंत्रणपत्रांत सर्वांना "मानापमानाची गाठोडी" वेशीवरच ठेवून रत्नागिरीत प्रवेश करण्याचे आवाहन केले आणि काय आश्चर्य, उपस्थितांनी त्यांचे आवाहन शिरसावंद्य मानले. **संगणक तज्ञ श्री. खांबेटेजींनी** सर्व माहिती संगणीकृत माध्यमातून वक्तशीर पुरविली. **लक्ष्मण शंकर** (पृ.५२०) तर **हितगुज स्मरणिकेचे कल्पनाचित्र** आमच्या नजरेपुढून बाजूला होणार नाही याची सतत काळजी वहात होते आणि **अध्यक्ष श्री. सुरेशराव तर आधारवटासारखे** पाठीशी होते. आम्ही थोडे आर्थिक संकटांत येण्याच्या विवंचनेत दिसतांच अध्यक्ष नव्हे तर सुरेशभाऊ पाठीमागून खांद्यावर हात ठेवून आश्वासक स्थितीत उभे राहिले व आमची अडचण दूरच नव्हे तर Dissolve झाली व आमचे उणेपुरे २०-२२ हात जोमाने कामास लागले.

हे आपले घरचे कार्य आहे त्यामुळे प्रत्येकाचा सहभाग हा आश्वासितच. तेथे आभाराचे अवडंबर कशासाठी? तरी सुद्धा आपल्या माणसाच्या पाठीवर "प्रेमाची थाप" मारली तर त्याचे मानसिक बलवर्धन होते आणि म्हणूनच हा धन्यवादाचा - नामोल्लेखाचा अट्टाहास.

**आनंदराव मराठेनी** कार्यालय तर दिलेच पण मिठ्ठास वाणीने प्रत्येकाचे प्रश्नास सामोरे जावून संमेलनाचे सूप वाजेपर्यंत कोणालाही तक्रार करण्यास तसूभरही वाव ठेवला नाही. त्यांचे सर्व कुटुंबीय व कर्मचारी वर्ग यांनी हे घरच्या मुलीचेच लग्न आहे अशा भावनेने सर्व केले. **त्यांचे ज्येष्ठ बंधू श्री. मा. तथा अप्पा** यांनी पहिल्याच दिवशी "सांगशील ते काम करण्यास केव्हांही तयार आहे" अशी जाहीर गर्जना केली आणि शब्दश: ती कृतीत आणली. त्यांचे सर्व कुटुंबच संमेलनमय झालेले होते. **श्री. मोरेश्वर मुळे** S.T. कार्यालयात पायही न टाकता S.T. दाराशी आल्या. **दत्ता-नंदा-श्रीकांत-कुमार या बांधवांनी** रजा घेऊन जातीने जे पडेल ते काम पुर्णत्वास नेले. श्री. माधवराव धनवटकर (गणपतीपुळे), दत्त मंगल कार्यालयाचे मालक दत्ता जोशी यांनी पर्यायी भोजन-निवास व्यवस्था कल्पनेपेक्षाही वरच्या दर्जाची राखली. आमचे **सुरेश पांडुरंगांनी** तर राजेश चौहानसारखा विजयी षटकारच हाणला की! सर्वांना आमरस खाऊ घालून, आदल्या दिवसाच्या गणपतीपुळ्याच्या मोदकांची चव पार सीमारेषेपलीकडे भिरकावून दिली.



आम्हां तीन बंधूंपैकी मी (पृ.४६) व कमलाकर व्यासपीठावरच असलेमुळे सर्वांच्या नजरेत होतो. पण मधला **सुधाकर** प्रसिद्धी पराङ्मुख राहून आरंभापासून अखेरपर्यंत, अविरत कार्यमग्न होता. त्यामुळे आम्हां तिघांना जर १०० गुण असतील तर त्यातील त्याच्या एकट्याचाच वाटा ५० गुणांचा आहे हे नमूद करण्यास अभिमान वाटतो.

सर्वच कार्यक्रम आपापल्या परीने सुव्यवस्थित झाले. पण **मुंबई-पुणेकरांनी संगीत कार्यक्रमाद्वारे** तर षटकार - चौकारांचा पाऊस पाडून एजाझ अहमदची कामगिरीही फिकी पाडली. Brevo मुंबई



- पुणेकर आणि **त्यांचे कॅप्टन "भाऊ"**; क्या बात है! त्यांच्या निवेदनाची तारीफ करण्यास म्या पामराकडे शब्दच नाहीत. एवढेच म्हणेन "कोंकणी ओल्या काजुगरांची उसळ समोर आहे, वास दरवळतोय, तोंडाला पाणी सुटलंय आणि तोंडात टाकावे तो अळऽऽणी! काय तर, संगीत मैफलीत भान विसरलेले बल्लावाचार्य उसळीत मीठच टाकण्यात विसरले की हो!! 'भाऊ'विना हीच स्थिती सर्वच कार्यक्रमांची झाली असती" - असो.

आपल्या **पुणेकर सौ. नीलांबरी.** आदर्श कार्यकर्त्यांचा नमुना! एरवी प्रतिनिधींना भावलेल्या



व्यवस्थेत आयत्यावेळी अडचण उभी ठाकण्याचा धोका समोर आला. यावरती पाठीवरच्या बहिणीप्रमाणे सौ. नीलांबरीच धावून येवून काही रामबाण देईल अशी माझी मनोदेवता म्हणाली. मी नीलांबरींकडे अडचण उच्चारली मात्र तत्क्षणी ती दूर झाली! आमच्या रत्नागिरीकरांच्या व्यवस्थापनात यशाच्या एक मोरपिसाची भर पाडली आणि तीही नीलांबरीनेच. असे म्हटले जाते की "पुणे तेथे काय उणे". मी तर असे म्हणतो की ज्या आपल्या प्रतिष्ठानला नीलांबरीसारख्या कार्यकर्त्या लाभल्या आहेत त्याला कशातच काही 'उणे' रहाणार नाही आणि म्हणूनच

Marathe Pratishthan

प्रतिष्ठानची पुणे शाखा आघाडीवर आहे. माझ्या शुभेच्छा.

संमेलनातील उपस्थितांतील ज्येष्ठ व श्रेष्ठ प्रतिनिधी पुणेकर **निवृत्त पोलिस कमिशनर मान. वापूसाहेबांनी** पोलिसांतील 'माणुसकीचे' आपल्या छोट्याशा भाषणांत दर्शन घडविले.

या संमेलनातील करमणूक कार्यक्रमाद्वारे **TV निवेदिका सौ. मंजिरीनी 'गायिका' म्हणून रंगमंचावर पहिले पाऊल टाकले,** कोणी १४ वर्षांचा अज्ञातवास संपवून नाट्यछटा सादर केली, तर एक मॅडम चक्क २३ वर्षांनी रंगमंचावर पाय ठेवत्या झाल्या. या सगळ्या जमेच्याच बाजू नाहीत का? Best of Luck to all concerned.

शनिवारी रात्री **'गोधळ' हा पारंपारिक कुलाचारापैकी एक धार्मिक कार्यक्रम** 'कणकवली' करांनी सादर केला. पुष्कळशा कोंकणाबाहेरील कुलबांधवांना या कार्यक्रमाबद्दल एकप्रकारने औत्सुक्य होते. कार्यक्रमात पुष्कळजण सहभागी झाले. व सर्वांना कुलाचार पार पाडल्याने समाधान मिळाले.

रविवारी ज्या कार्यक्रमाने संमेलनाची सांगता झाली तो **"जाखडी" हा ग्रामीण नृत्याचा कार्यक्रम** दोन प्रतिस्पर्धी चमूतील सवाल-जबाबांनी विलक्षण रंगला व उत्तर रात्री २ पर्यंत प्रेक्षकवर्ग जागच्याजागी खिळून होता. मात्र प्रवासाची दगदग, दिवसभराचा शीण यामुळे काही प्रतिनिधी लवकर निद्राधीन झाले व त्यांना या कार्यक्रमाचा आनंद लुटता आला नाही यानेच वैषम्य. पण इलाज नाही.

आणि हो एका प्रमुख गोष्टीचा उल्लेख करणे राहूनच जात होते. आमचे सर्व कार्यकर्ते संमेलन आयोजनांत व्यस्त असताना महिलांनी घरची आघाडी आनंदाने, विनातक्रार सांभाळली. इतकेच काय तर प्रत्यक्ष संमेलनाने २ दिवस संमेलनस्थळी हजर राहून प्रत्येक महिला प्रतिनिधींची जातीने विचारपूस केली. त्यामुळे संमेलनाचे यशांत त्यांचा हक्काचा वाटा आहे व त्याचे Credit त्यांना देताना कर्तव्यपूर्तीचा आनंद लाभत आहे.

संमेलनाचे V.D.O. Shooting झालेले असून त्याची एक कॅसेट आम्ही मुंबई प्रतिष्ठानकडे देत आहोत. ती पाहून सहभागी झालेल्यांना संमेलनातील काही क्षण पुन्हा जगता येतील तर भाग घेवू न शकलेल्यांची जिज्ञासा तृप्त होईल.

मराठे कुलबांधवांव्यतिरिक्त **श्री. अरविंद देशपांडे, कृ.प. तथा नाना भिडे व श्री. गं. गो. तथा भाऊ पटवर्धन** यांनीही 'मराठे' परिवारावरील आपले प्रेम 'औद्योगिक विषयावरील चर्चेतील' योगदानाद्वारे व्यक्त केले आहे. त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच.

वर उल्लेख आलेल्या व्यक्तींशिवाय अनेक अनामिकांनी या संमेलनाचे यशस्वी (लोक म्हणतात - मी नाही) संयोजनात योगदान दिलेले आहे. मै तो केवल नामके वास्ते था। त्यांनाही माझे धन्यवाद.

दरवर्षी येणाऱ्या गणरायाला निरोप देताना आपण "पुनरागमनायच" असे म्हणतो. मी सुद्धा पुन्हा पुढीलवर्षी नवीन स्थळी ७व्या संमेलनात पुनर्भेटीसाठी निरोप घेताना "पुनरागमनायच" असेच म्हणतो व सिद्धी विनायकाने ते शब्द मूर्त स्वरूपांत आणावे अशी प्रार्थना करतो.

लोभ आहेच. तो वर्धिष्णू रहावा.

***


*हितगुज रत्नागिरी अधिवेशन विशेषांकास शुभेच्छा*

# सौ. उर्मिला दिनकर मराठे

मॉडेल स्कूल सप्लायर्स,
५५० शनिवार पेठ,
पुणे - ४११०३०.


Marathe Pratishthan

# कुलबांधवांचे करमणुकीचे कार्यक्रम

- सदानंद विष्णु तथा भाऊ मराठे (पृ.५०७), मुंबई (फोन. ४४४ ८६ ४८)

**कलावंत कुलबांधवांच्या टीमचे "कॅप्टन भाऊ" यांच्या माहितीपूर्ण, नाट्यमय निवेदनामुळे कार्यक्रमाची रंगत कशी वाढली हे सर्वांनी संमेलनात अनुभवले आहेच. त्यांनी या कार्यक्रमाचा पाठवलेला लिखित वृत्तांतही तितकाच नेटका व आकर्षक. तो जसाच्या तसा आपल्यापर्यंत पोचवण्याचा मोह, खर्चिक असूनहि, आम्ही टाळू शकलो नाही. 'गुणी गुणं वेत्ति' हेच खरे! (जाता जाता आमचीहि पाठ थोपटून घेतली झाले!!) - संपादक.**

४ ऑक्टोबर रोजी रत्नागिरीत दाखल झाल्यापासून दोन दिवस सतत चालू असलेल्या विविध कार्यक्रमांत सहभागी झालेले मराठे कुलबंधू-भगिनी जरासे शिथिल झाले होते. पण दि. ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी मराठे कुलबंधू आणि भगिनिंनी जो उत्स्फूर्त कलाविष्कार सादर केला त्यामुळे रत्नागिरीकर मराठ्यांनी उत्साहाने आयोजित केलेले "मराठे संमेलन" खऱ्या अर्थाने गाजले.

रंगमंच व्यापून टाकणारं व्यक्तिमत्त्व आणि आत्मविश्वास हे यशस्वी कलाकाराचे अत्यंत महत्वाचे गुण. अतिशय प्रसन्न व्यक्तिमत्त्व लाभलेल्या आणि शब्दांची उत्तम जाण असलेल्या प्रा. सुलभा मराठे ह्या मैफिलीच्या opening batsman होत्या. प्रा. सुलभा मराठे ह्यांनी केलेली कथेची निवड - कथेच्या अनुषंगाने केलेला मुद्राभिनय - गाण्यात ज्याप्रमाणे आरोह - अवरोह असतात तसे वाक्यातले भावभावनांचे चढउतार ह्या सर्व गोष्टी प्रा. सुलभा मराठे ह्यांनी फार समर्थपणे पेलल्या. आपण अंगविक्षेप म्हणतो तसा शब्दविक्षेपही करता आला पाहिजे. शब्द किती किमया करतात. शब्दाची ताकद किती प्रचंड आहे हे सांगताना केशवसुत म्हणून गेले आहेत -

"यदि एक एक शब्द नवा तू शिकसी
शक्ति तयाची उलथील सर्व जगासी -"

तरीही पद्याप्रमाणे गद्य शब्दांनासुद्धा एक लय असते. ती मुष्किल लय प्रा. सुलभा मराठे ह्यांना निश्चित सापडलेली आहे. प्रा. सुलभा मराठे ह्यांनी "हसरे दुःख" ही व. पु. काळे ह्यांची कथा सांगितली. ही कथा वरवर विनोदी वाटली तरी ह्या कथेला मानवनिर्मित कारुण्याने झाकोळून टाकलेलं आहे. कथा ऐकणारा आणि कथा सांगणारा यांच्यामधला अदृष्य पडदा भेदून शब्द श्रोत्यांच्या काळजापर्यंत पोहोचावे लागतात. ह्या कथेतल्या सबनीस दांपत्याच्या जीवनातलं कारुण्य प्रा. सुलभा मराठे ह्यांच्या उत्तम कथनामुळे सर्व श्रोत्यांच्या काळजाचा ठाव घेऊन गेलं. सुरुवातीलाच मैफिल एका कलात्मक उंचीवर नेऊन ठेवणं ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाही.

प्रा. सुलभा मराठे ह्यांनी मैफिलीचा लावून दिलेला सूर श्री. गणेश जाईल ह्यांनी त्यांच्या गायनातून अलगद उचलून धरला. साहित्यातल्या सर्व प्रकारांत आयुष्यभर एखाद्याची सोबत करायची ताकद फक्त कविता ह्या प्रकारात आहे. आता साहित्याचा सर्व व्यवहार म्हणजे शब्दांचा व्यापार हे तर खरंच. तुकाराम महाराज म्हणूनच गेले आहेत -



Marathe Pratishthan

"शब्दचि अमुच्या जीवाचे जीवन
शब्दे वाटू धन जनलोका –"

पण शब्द आपल्या सर्व ताकदीनिशी उभे राहिल्याचा प्रत्यय कुठे आणून देत असतील तर ते कवितेमध्ये. फक्त गद्याच्या दुनियेतले शब्द पद्याच्या दुनियेतले रहिवासी केव्हा होतात हे सांगणं कठिण आहे. कागदावरती कवितेचा एक नकाशा असतो - चित्र म्हणा हवं तर. पण त्या चित्राला नादब्रह्माची प्राणप्रतिष्ठा लाभल्याबरोबर त्या शब्दांना चैतन्य प्राप्त होतं. जिवंत श्वासांची फुंकर लाभलेली गीतं आणि गीतकार अमर असतात. म्हणून

"नादामध्ये शब्द, शब्दामध्ये नाद
भेदामध्ये अभेद सकळ कळे",

हा समर्थ रामदासांनी सांगितलेला गायनाच्या विस्ताराचा जो मंत्र आहे तो लक्षात घेऊन श्री. गणेश जाईल ह्यांनी "गणराया लवकर येई - भेटी सकळांसी देई" हा तुकोबांचा अभंग आळवला. त्या पाठोपाठ "कर हा करी धरिला शुभांगी - सुदिनी रमाकांता समोरी" हे हल्ली सहसा ऐकायला न मिळणारं संशयकल्लोळ नाटकातलं पद सादर केलं. श्री गणेश जाईल ह्यांना शांतारामबुवा दीक्षित ह्यांच्याकडून शास्त्रीय गायनाची पद्धतशीर तालिम मिळालेली आहे. म्हणून –

"गुरुने कहा वैसा कर
गुरुने किया सो मत कर"

ह्या मंत्राचा त्यांनी अभ्यास केलेला असल्यामुळे गाताना थांबायचं कुठे हे समजल्यामुळे श्री. गणेश जाईल यांचं गायन रंगतदार झालं.

पूर्ण अर्थ स्पष्ट करणारा शब्द समूह म्हणजे वाक्य – "वाक्यं रसात्मकं काव्यं" श्रवणरसाने भरलेलं वाक्य म्हणजे काव्य आणि उत्कट भावनांच्या सौंदर्यपूर्ण आविष्कार म्हणजे कविता. उत्तम कवितेमध्ये आवश्यक असणाऱ्या तीन गोष्टी – सौंदर्य, भावना आणि उत्स्फूर्तता. "भावनेला येऊ दे गा शास्त्रकाट्याची कसोटी" असं बा. सी. मर्ढेकर म्हणून गेले आहेत. कवितेतली भावना ह्या कसोटीची फार मोठी अपेक्षा करत असते. म्हणून हल्लीची भावगीतं ऐकल्यावर म्हणावसं वाटतं की "ज्या गीतांमध्ये भाव अभावानेच आढळतो आणि तरीही ते गीत भाव खायचा प्रयत्न करतं ते हल्लीचं भावगीत." शब्दांचं सौंदर्य आणि शब्दांचा केवळ सोस यातला फरक चांगल्या आणि वाईट कवितेतून चटकन उमगतो. "कवी" हा विनोदी लेखकाचा अत्यंत आवडीचा विषय आहे. कारण विनोदाप्रमाणेच कवितेचा आव आणता येत नाही. सौंदर्य, भावना आणि उत्स्फूर्तता नसतानाही जेव्हा काव्य घडवलं जातं त्यावेळी ते काव्य निव्वळ विनोदाचा विषय होतं. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, राम गणेश गडकरी आणि आचार्य प्रल्हाद केशव अत्रे या तिघांच्याही उत्तम विनोदबुद्धीचा पाया उत्तम काव्याच्या प्रेमावर उभा होता ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. म्हणून सौ. शुभदा जोशी - सौ. स्वाती मराठे - सौ. मंजिरी मराठे - सौ. सुनिती खांबेटे - संध्या खांबेटे - धनंजय मराठे - सौ. माधुरी मराठे ह्या सर्व गायक-गायिकांनी निवडलेली गीतं ही खरी भावगीतं होती.

सौ. शुभदा जोशी (तोच चंद्रमा नभात - अवघाची संसार सुखाचा करीन) आणि संध्या



Marathe Pratishthan

खांबेटे (हृदयी प्रीत जागते जाणता अजाणता - विसरशील खास मला - केव्हा तरी पहाटे उलटून रात्र गेली - सलोना सा सजन और मैं हूँ) ह्या दोघींनी मुंबईच्या कार्यक्रमात आपली गायनकला सादर केली होती. रत्नागिरीच्या कार्यक्रमात दोघी जमून गायल्या. सौ. शुभदा जोशी ह्यांनी गायन हा छंद म्हणून जोपासला आहे तर संध्या खांबेटे आता रसिकांना व्यावसायिक गायिका म्हणून परिचित व्हायला लागली आहे. संध्या खांबेटे आता स्वतंत्र गाण्याचा कार्यक्रम करते. पण सर्वात कौतुक वाटलं ते सौ. स्वाती मराठे आणि सौ. मंजिरी मराठे ह्या दोघींचे. सौ. मंजिरी मराठे हे दूरदर्शनवरचं मुरलेलं व्यक्तिमत्त्व आहे. त्यामुळे त्यांनी दूरदर्शनवरच्या गमती जमती सांगणं अगदी स्वाभाविक होतं. परंतु सौ. मंजिरी मराठे (रिमझिम झरती श्रावणधारा) आणि सौ. स्वाती मराठे (आज जानेकी जिद ना करो) ह्या दोघीजणी आयुष्यात प्रथमच गायल्या. घरात गाणं वेगळं आणि श्रोत्यांसमोर वाद्यांच्या साथीने गाणं हे फारच वेगळं प्रकरण आहे. ह्या दोघींचं गाणं ऐकणं हा एक सुखद धक्का होता. सौ. सुनिती खांबेटे (मागे उभा मंगेश, पुढे उभा मंगेश आणि राधा कृष्णावरी भाळली) ह्यांनी रियाज सुटून बरीच वर्षे झाली तरी व्यासपीठावरून गायची धडाडी दाखवली ह्यातच त्यांनी अर्धी लढाई जिंकली. सौ. माधुरी मराठे ह्यांनी आवाजाने साथ न दिल्यामुळे "चांदणे शिंपीत जाशी" हे एकच गीत सादर केले.

धनंजय मराठे हे मराठे संमेलनाचे गायक कलाकार म्हणून find आहे. गोड गळा - गळ्यात असलेली उत्तम फिरत आणि डोळस रियाजाने येत चाललेली गाण्याची नजर या तिन्ही गुणांनी परिपूर्ण असलेला धनंजय उत्तम गायक बनेल हा विश्वास देऊन गेला. प्रथम त्याने "विमला अधरी निकटी मोही हा" हे संशयकल्लोळ नाटकातलं पद दणदणीतपणे सादर केले. नंतर एक हिंदी गजल अतिशय नजाकतीने पेश केली. "गाता गळा आणि शिंपता मळा" असं म्हटलं आहे. गळा गाता हवा. गाताना एखादी मुष्किल जागा गायची गायकाला ऊर्मी येते. पण गाता गळा आणि गाण्याची नजर नसेल तर तो गायक बेसूर होतो. धनंजयकडे ह्या दोन्ही गोष्टी असल्यामुळे तो दाद घेऊन गेला.

कुमार शशांक मराठे ह्या बालकलाकाराने "पांडगो इलो रे इलो" ह्या मालवणी नाटकातला एक प्रवेश सादर केला. बहुदा बालकलाकार नेहमी भाव खाऊन जातात. पण शशांकने मालवणी भाषेतला ठसका - झटका आणि इरसालपणा असा तोऱ्यात दाखवला की सगळा श्रोतृवृंद खुष होऊन गेला. सौ. सरोज खांबेटे ह्यांनी सादर केलेली "बाई मंडळात गेल्यात" ही स्वतः लिहिलेली नाट्यछटा विनोदाची पखरण करून गेली. श्री. गजाननराव मराठे ह्यांनी आयुष्याची जोडीदारीण कशी मिळाली ह्या घटनेची हृद्य आठवण सांगितली. वृद्धापकाळातसुद्धा माणूस किती रसिक आणि रंगेल असू शकतो याचं प्रत्यंतर श्री. गजाननरावांच्या अनुभव कथनातून आलं. श्री. श्याम मराठे ह्यांनी दाखवलेल्या गणिताच्या खेळातल्या त्यांच्या अचाट स्मरणशक्तीला बालके भाऊ मराठ्याचे नम्र प्रणाम. आमच्या आयुष्यात गळके - फुटके हौद, अबक नावाचे एक नंबरचे काम चुकार मजूर, दोन फूट पुढे गेल्यावर पुन्हा अर्धाफूट मागे येणाऱ्या पाली असल्या अत्यंत नीरस गणितांनी आम्ही हैराण झालो होतो. गणिताचासुद्धा खेळ करता येतो हे श्याम मराठे ह्यांच्यामुळे कळलं.

Marathe Pratishthan

भारतीय शास्त्रीय संगीतात प्रत्येक वाद्याची स्वतःची खासियत आहे. सतार हितगुज केल्यासारखी श्रोत्यांशी बोलली पाहिजे. हार्मोनियम् वाऱ्याची हळुवार झुळुक येते तशी वाजली पाहिजे. सनई देवळाच्या नगारखान्यात वाजावी आणि देवळाजवळच्या तळ्यात पाय सोडून आपण ऐकावी. आपल्या शेतातल्या झाडाच्या सावलीत पहुडलेले असताना पलीकडच्या शेतातल्या बांधावरून बासरीचे सूर वाऱ्यावर तरंगत आपल्यापर्यंत यावेत. पण बांबूचे दोन प्रकार असतात. सरकारी कार्यक्रमात बांबू वापरतात तो लोकांना अडवण्यासाठी असतो. संगीतातली माणसं तोच बांबू सप्त स्वरांचं चांदणं निर्माण करण्याकरता वापरतात. अशा अस्सल स्वरांचा आनंद श्री. अरविंद मराठे ह्यांच्या बासरी वादनातून मिळाला.

मराठे संमेलनात कथाकथन-गायन-वादन-नाट्यछटा हा जो कार्यक्रम सादर झाला त्याचा फायदा काय? काहीही नाही. "प्रत्येक गोष्टीतून फायदा काय?" असा एक अतिक्षुद्र विचार विचार करणारी दळभद्री जमात असते. अशा लोकांच्या हातात सुंदर गुलाब जरी दिला तरी त्याचा सुवास घेण्या अगोदर ते त्याचा गुलकंद करायला जातील. कार्यक्रमात रंगलेल्या मराठे कुलबंधू आणि भगिनींच्या चेहऱ्यावरचा अनिर्वचनीय आनंद पहायला मिळणं हाच कार्यक्रमाचा फायदा आणि हेच संमेलनाचं यश.

ह्या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन जरी मी केलेलं असलं तरी कार्यक्रमाचे खरे conductor होते श्री गणेश आणि सौ. विद्या जाईल हे दांपत्य. श्री. प्रशांत मराठेला तबल्याच्या साथीला घेऊन ह्या उभयतांनी सगळ्या कलाकारांकडून गाणी बसवून घेण्याची जी मेहनत घेतली त्याला तोड नसावी. सौ. विद्याताईंनी हार्मोनियमवर धरलेला सूर आणि प्रशांत मराठेचा गायकाला गाता ठेवणारा तबल्याचा डौलदार ठेका ह्यामुळेच ही मैफिल अविस्मरणीय झाली. सौ. विद्याताईंनंतर श्री सुरेश विद्वांस ह्यांनी हार्मोनियमवर सुरेल साथ केली.

पूर्वीच्या काळी लग्नाचा सोहळा संपला की भटजीबुवा सूप वाजवून आता पाहुणे मंडळींनी आपापल्या घरी जावं अशी सूचना देत असत. स्वगृही म्हणणार होतो. पण स्वगृही जाण्याला मराठी भाषेत एक निराळाच राजकीय अर्थ प्राप्त झाला आहे. म्हणून आपापल्या घरी म्हणतो. कोठलीही पूजा यथासांग पार पडली की पुजारी म्हणायचे, "यान्तु देवगणाः सर्वे पूजामादाय पार्थिवीम् । इष्टकाम प्रसीद्यर्थम् पुनरागमनायच ।" मराठे संमेलनाचा सोहळा संपला आहे, पण आमच्या इष्ट कामाच्या पूर्ततेसाठी ह्या संमेलनात उपस्थित असलेले आणि नसलेल्या मराठे कुल बंधुंनो आणि भगिनींनो पुन्हा या असा मी आपल्याला निरोप देत आहे.

Marathe Pratishthan

# मराठे प्रतिष्ठान : पुढील वाटचाल

**रत्नागिरी अधिवेशनात चर्चेसाठी तयार केलेल्या टिपणातून**

**१. सभासद व हितगुज वर्गणीदार** : सुमारे साडेचार हजार जिवंत पुरुष व्यक्तींपैकी कर्त्या कुलबांधवांची संख्या तीन हजारांच्या वर आहे. त्यापैकी ९२५ म.प्र.चे सभासद आहेत तर ६०० हितगुजचे वर्गणीदार आहेत. म्हणजेच **तीन पैकी एक कुलबांधव प्रतिष्ठानचा सभासद आहे आणि पांचपैकी एक कुलबांधव हितगुजचा वर्गणीदार आहे.** प्रतिष्ठान सर्व समावेशक व्हावे आणि संपर्क माध्यम सर्वांपर्यंत पोंचावे म्हणून सभासद वाढ आणि वर्गणीदार वाढ व्हायला हवी.

**२. कुलवृत्तांत** : हे साध्य नसून साधन आहे. परस्पर सहकार्याच्या दृष्टीने त्यांतील माहितीचा उपयोग कुलबांधवांना होण्यासाठी ही माहिती सातत्याने अद्ययावत् करीत रहायला हवे. **प्रत्येक घराण्यांतल्या २/३ व्यक्तींनी आपापल्या घराण्यापुरती जबाबदारी स्वीकारल्यास** दर ३-४ वर्षांनी सर्व घराण्यांची अद्ययावत माहिती मिळणे शक्य होईल.

**३. उद्योग व्यवसाय डिरेक्टरी** : मराठे परिवारातल्या अनेक व्यक्ती आज भारतातच नव्हे तर परदेशांतहि उद्योग व्यवसाय यशस्वीपणे करीत आहेत. अशा मान्यवर व्यक्तींच्या अनुभवाचा, त्यांच्या सहकार्याचा व मार्गदर्शनाचा फायदा परिवारातल्या इतर व्यक्तींना मिळावा म्हणून **उद्योग व्यवसाय क्षेत्रानुसार कुलबांधवांची वर्गवारी करून ही माहिती प्रसिद्ध होणे गरजेचे आहे.** अशा तऱ्हेची उद्योग-व्यवसाय डिरेक्टरी नव्याने उद्योग व्यवसायात पदार्पण करू इच्छिणाऱ्या तरुणांना अतिशय मार्गदर्शक ठरेल.

**४. उद्योग-व्यवसाय प्रवर्तन** : तरुण वर्गाने नोकऱ्यांच्या मृगजळामागे न धावता स्वतःचा उद्योग व्यवसाय करण्याची जिद्द बाळगायला हवी. विशेषतः सेवा व्यवसायांच्या विविध क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करायला हवे. उद्योग-व्यवसाय प्रवण मनोभूमिका निर्माण होण्याच्या दृष्टीने निरनिराळ्या क्षेत्रातले प्रस्थापित अनुभवी कुलबांधव आणि होतकरू तरुण यांनी वरचेवर अनौपचारिकपणे एकत्र यायला हवे. **यासाठी स्थानिक पुढाकार हवा.** या दृष्टीने अलिकडेच मुंबईत अंधेरी व मुलुंड येथे झालेली **स्वयंव्यवसाय चर्चासत्रे कुलबांधवांना उपयुक्त ठरत आहेत असे दिसते.**

**५. स्थानिक संपर्क मेळावे** : प्रतिष्ठानच्या कार्याला खऱ्या अर्थाने गति येण्यासाठी ज्या ठिकाणी **२०-२५ कुलबांधव आहेत अशा परिसरासाठी स्थानिक शाखा कार्यरत व्हायला हव्या.** अशा शाखांनी इतर काही कार्यक्रम केले नाहीत तरी **वर्षातून निदान तीनदा, (२६ जानेवारी, १मे व १५ ऑगस्ट) कुलबांधवांचे मेळावे आयोजित करावे.** यामधून परस्पर संपर्क निर्माण होईल. याबरोबरच विद्यार्थ्यांचे मेळावे, स्त्रीवर्गासाठी हळदीकुंकू, पाक-कला स्पर्धा, रांगोळ्या स्पर्धा इ. कार्यक्रम तसेच सर्व कुलबांधवांसाठी कलादर्शन, क्रीडास्पर्धा, सहली यांसारखे उपक्रमही परस्पर संपर्क दृढ होण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरतील.

**६. विद्यार्थी-पर्यटक निवास** : ज्यांच्याकडे थोडीफार मोकळी रहाती जागा आहे अशा कुलबांधवांच्या सहकार्याने गरजू विद्यार्थ्यांची रहाण्याची सोय आणि पर्यटन अथवा उद्योग व्यवसायानिमित्त आपल्या गावात येणाऱ्या कुलबांधवांची अल्पकालीन निवासाची सोय करणे या गोष्टी नाही का शक्य होणार?


६ व्या मराठे परिवार संमेलनास हार्दिक शुभेच्छा

**खांबेटे आणि खांबेटे**
**फॅब्रिकेटर्स व इंजिनिअर्स**

ए-६५/६६, औद्योगिक वसाहत, अजिंठा रोड,
जळगांव-४२५००३.
फोन : फॅक्टरी - २१०६५० व २१०२०६
निवास - २२३३३८ व २४९६०

**उत्पादक**
सोलर वॉटर हिटर्स व थर्मल पॉवर स्टेशनचे सुटे भाग
व इतर सबअसेंब्लीज

हार्दिक शुभेच्छा

**डाईश क्रॉफ्ट व्हर्के**
**डीलर इन**
**कॉम्प्युटर हार्डवेअर अँड सॉफ्टवेअर**

आमच्याकडे सर्व प्रकारच्या
संगणक सुविधा उपलब्ध

५९४, नारायण पेठ, उमाशंकर कॉम्प्लेक्स,
पुणे-४११०३०.


Marathe Pratishthan

# उपस्थित कुलबांधवांच्या संमेलनाबाबत प्रतिक्रिया

### अध्यक्षांकडून अभिनंदन

श्री. भास्करराव यांस,

स.न.वि.वि.

रत्नागिरी संमेलन मराठ्यांना साजेसं साजरं झालं. रत्नागिरीला मराठे कुलबंधू अल्प प्रमाणात असतांना सुद्धा आपण आत्मविश्वासाने पुढाकार घेतलात आणि संमेलन यशस्वी करून दाखविलेत याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन. **भास्कर-सुधाकर-कमलाकर ही त्रिमूर्ती** लाभली म्हणूनच हा महोत्सव कोणतीही अडचण न येता पार पडला.

आपल्या जोडीला आपले **तमाम कुटुंबीय आणि श्री. आनंदराव व श्री. दत्तोपंत** ही माणसं होतीच. शिवाय नोकर - चाकर मंडळींचं सहकार्य सुद्धा उत्तम लाभलं. या आनंद मेळाव्याला आपल्या कुटुंबातील जेष्ठ व्यक्ती उपस्थित होत्या हे आपल्या प्रतिष्ठानचे भाग्य. याशिवाय कर्नाटक, विदर्भ, मराठवाडा, गोवा, सातारा, सांगली, नाशिक, पुणे या व इतर ठिकाणाहून प्रतिष्ठानवरील प्रेम व्यक्त करण्याकरिता शेकडो कुलबांधव आवर्जून उपस्थित होते. या सर्व गोष्टी जुळून हा सुवर्णयोग प्राप्त झाला.

प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांच्या दोन-तीन दिवसांच्या वास्तव्यात आपणाला खूप ('त्रास' म्हणत नाही पण) गैरसोयी झाल्या असतील. पण त्याबद्दल तुम्ही मला काहीच बोलू देणार नाही. तेव्हा मी फक्त कृतज्ञता व्यक्त करतो. माझ्या व कार्यकारी मंडळाच्या सदर भावना आपण संबंधित व्यक्तींना कळवाव्या ही नम्र विनंती. कळावे, आपला नम्र,

**सु.स. मराठे**

अध्यक्ष, मराठे प्रतिष्ठान.

### संमेलन केवळ अविस्मरणीयच

रत्नागिरीत मराठे परिवाराचे ४ व ५ ऑक्टो. ९७ रोजी झालेले संमेलन केवळ अविस्मरणीय. पूर्वीची २/३ संमेलने मी पाहिली. त्यामानाने या संमेलनास लोकांची उपस्थिती चांगलीच जाणवली. दोन दिवस झालेल्या कार्यक्रमांचा दर्जाही उच्च प्रकारचा होता. या सर्व गोष्टी इतक्या उत्तम तऱ्हेने होण्याचे कारण म्हणजे माझ्या मते सर्व रत्नागिरीकर कार्यकर्त्यांनी घेतलेली मेहनत.

राहण्याची, भोजनाची व चहापाण्याची इतकी उत्तम व्यवस्था होती की आम्ही कुठे बाहेरगावी दोन दिवस राहतोय असे वाटलेच नाही.

एकच छोटीशी सूचना करावीशी वाटते पुढील वेळेस असे संमेलन भरविले जाईल तेव्हा संपूर्ण कार्यक्रम पत्रिका आधीच तयार करून साधारण १ महिनातरी अगोदर पाठविलीत तर सभासदांना जाण्यायेण्याचे आयोजन व्यवस्थितपणे करता येऊ शकेल.

**- डॉ. सुरेंद्रनाथ गणेश** (पृ.२८४),
घाटकोपर, मुंबई.

*[संमेलनाचा एकूण कार्यक्रम इतक्या झपाट्याने व झटपट ठरला की त्यानंतर पुरेशी पूर्वसूचना तपशीलवार देणे मनात असूनहि जमले नाही. पुढीलवेळी हे जमेल अशी आशा करूया. - संपादक.]*

### गोवेकरांची दाद संमेलनाला -आमरसाला.

संख्येने लहान असूनही मराठे संमेलनाचे मोठे कार्य (संख्येच्या दृष्टीनेही उच्चांक गाठण्याचे) आपण सर्वांनी अतिशय व्यवस्थित केले. आम्हा सर्व गोवेकरांतर्फे हार्दिक अभिनंदन. समारोपाचे आमरसाचे जेवण कायम लक्षात राहील.

सर्वांनी गोव्यात येण्याचे करावे.

**- कालिदास बाळकृष्ण** (पृ.५४१) गोवा.

### कार्यक्रमाचे नियोजन आठवणीत रहावे असे ऊत्कृष्ट

नाशिकहून रत्नागिरीला संमेलनासाठी मी व वडील दोघे आलो होतो. त्या दोन दिवसांच्या कार्यक्रमाचे नियोजन आठवणीत रहाण्यासारखेच ऊत्कृष्ट होते.

**- संजय अनंत** (पृ.३६३), नाशिक.

### सर्वांना घरीच असल्यासारखे वाटत होते.

तुम्ही व तुमच्या परिवारानी ज्या पद्धतीने आमचे आदरातिथ्य केलेत त्यास तोड नाही. आम्हा सर्वांना घरीच असल्यागत वाटत होते.

**- सदानंद विष्णू** (पृ.४१७) बांद्रा, मुंबई.

### करमणुकीचे कार्यक्रम फारच छान

संमेलनामध्ये आमची उत्तम सोय केली. तसेच जेवणपण चांगले होते. कार्यक्रम चांगल्या तऱ्हेने आखला होता. करमणुकीचे कार्यक्रम फारच छान झाले. माझ्या तर्फे सर्वांचे अभिनंदन करावे व आभार मानावे.

**प्रभाकर रामकृष्ण खांबेटे** (पृ.६०५),
सिकंदराबाद.


रत्नागिरी अधिवेशनास शुभेच्छा !

**रामचंद्र श्रीपाद मराठे**

३, कपिलवास्तू, तेजपाल स्कीम रस्ता क्र. २,
विलेपार्ले (पू), मुंबई - ४०००५७.

हितगुज रत्नागिरी संमेलन
विशेषांकास शुभेच्छा

- हितचिंतक


Marathe Pratishthan

### क्षण आला भाग्याचा

कार्यकर्त्यांचे मर्यादशील, आदबशीर व सौजन्यपूर्वक वागणे याने मी अगदी भारावून गेलो.

दुसरा योगोयोग म्हणजे माझा जन्म सावंतवाडीचा. माझी एक इच्छा होती ती म्हणजे माझी जन्मभूमि पाहाण्याची. आम्ही राहत होतो, ते घर व आजूबाजूचे शहर 'याचि देही याचि डोळा' मी पाहून आलो. वयाच्या ६व्या वर्षी मी सावंतवाडी सोडली. आज ५५ वर्षांनी मी परत सावंतवाडी पाहिली. हे सर्व मराठे प्रतिष्ठानमुळे मला साध्य झाले. हा एक माझ्या आयुष्यात आलेला भाग्याचा क्षण आहे असे मी समजतो.

- **पांडुरंग पुरुषोत्तम जोशी** (पृ.७४७)
बोरीवली, मुंबई

### दरवर्षी असा सोहळा व्हावा

सम्मेलनाचा संपूर्ण सोहळा फार आनंद व उत्साहात पार पडला. ते पाहून मला अत्यंत समाधान वाटले. दरवर्षी हा सोहळा असाच पार पडो अशी इच्छा आहे.

वरील सम्मेलनामध्ये आपण अनोख्या भाऊबीजेचा उल्लेख केला होता. ती कल्पना मला खूप आवडली.

- **दत्तात्रय आत्माराम** (पृ.३२६)
मुलुंड, मुंबई.

*[द.आ. यांना बहीण नसल्यामुळे त्यांनी हितगुज संवर्धन निधीलाच 'भाऊबीज भेट' म्हणून रु. ५१ संमेलन स्थळीच दिले होते. - संपादक]*

### पुणेकर मंडळी संमेलनावर खूष

गुरुकृपा मंगल कार्यालयात मराठे प्रतिष्ठानचे संमेलन अतिशय उत्कृष्टपणे पार पडले. सर्व व्यवस्था अतिशय छान ठेवली होती. त्यामुळे सर्व पुणेकर मंडळी रत्नागिरी संमेलनावर अतिशय खूष आहेत. कायमस्वरूपी स्मरणात राहणारे आयुष्यातील दोन आनंददायी दिवस असेच या संमेलनाच्या दोन दिवसांचे वर्णन करावे लागेल.

आपण दिलेला नाष्टा व तिन्ही जेवणे खरोखरच मिष्टान्ने होती यात शंकाच नाही. या दिवसात Unlimited आमरसाचे जेवण म्हणजे पर्वणीच होती.

संमेलनाच्या जोडीला कोकणातली इतरही स्थळे पाहून झाली. त्यामुळे विश्रांती कमी मिळाली. परंतु मानसिक समाधान निश्चितच मिळाले. संमेलनाच्या यशाची पत्रे व फोन पुणेकरांकडून सतत माझ्याकडे येत आहेत.

संमेलनात तुम्ही आयोजित केलेले देवीचा गोंधळ व जाखडी नृत्य हे दोन्ही कार्यक्रम अतिशय चांगले झाले. जाखडी हा कार्यक्रम नव्यानेच पाहिला. खूपच आवडला.

- **सौ. नीलांबरी रमेश** (पृ. २९०) पुणे.


## *मराठे प्रतिष्ठानला हार्दिक शुभेच्छा*

**श्री. शंकर दामोदर मराठे**
अ/६, श्री दत्तप्रसाद सोसा., पंचि इंडस्ट्रीज, नौपाडा, ठाणे(प)-४००६०२

**स्वरूप ब्युटी पार्लर**
५०१, रास्ता पेठ, ३२ आदित्य बिल्डिंग, पुणे - ११

**श्री. गजानन भास्कर मराठे**
बी ४२, कैशुरीना सोसा., घाटकोपर डेपोजवळ, मुंबई-४०००७५

**श्री. विलास नारायण मराठे**
११, नीलकंठ तीर्थ, कर्वे हॉस्पिटल जवळ, ठाणे (प).

हार्दिक शुभेच्छा

# लक्ष्मी कृषी सेवा

आमचे येथे नामवंत कंपन्यांची कीटनाशके व बुरशीनाशके, स्प्रे पंप, फवारणीचे पंप दुरुस्ती, रद्दी, तारचुका योग्य दराने मिळण्याचे खात्रीचे ठिकाण.

**श्री. जयंत विष्णु करमरकर**
गणेश निवास, २८२८ वीर सावरकर पथ,
झाडगांव, रत्नागिरी.

हार्दिक शुभेच्छा

# शैलजा नर्सरी

**आमच्या येथे खात्रीची हापूस आंबा कलमे, पायरी आंबा कलमे, चिकू कलमे, नारळ सिंगापूर, बाणवली रोपे योग्य दराने मिळतील.**

***श्री. संजय रघुनाथ मुळ्ये***
६२२ अ/२, 'शैलजा', पॉवरहाऊस मागे,
नाचणे रोड, रत्नागिरी
फोन : २०७६४


Marathe Pratishthan

**प्रतिक्रिया** - पुढे चालू

## आणखी दोन दिवस हा आनंदमेळा हवा होता.

श्री. भास्करराव यांस,

स.न.वि.वि.,

आपल्या प्रतिष्ठानचे रत्नागिरी संमेलन निदान गेले ३ महिने गाजत होते. या काळांत रत्नागिरी, भास्करराव, सुधाकरराव, कमलाकरराव, गुरुकृपा, आनंदराव ही नावे संध्येतल्या नावाप्रमाणे घेतली जात होती. रत्नागिरीला मराठे कुलबंधू फारच अल्प या नांदीपासून सुरू झालेले संमेलनपुराण एक अत्यंत यशस्वी, संस्मरणीय संमेलन म्हणून गाजून गेले.

आम्ही पूर्वी ६ संमेलने भरवली. विभागीय मेळावे आयोजित केले. पण रत्नागिरीचं पाणीच और. आमचे आनंदराव तर विचारूच नका. किती २६० येणार? येऊ द्यात. ३०० आलेत? येऊ द्यात. आणखी येणार? खुशाल आणा. द्रौपदीची थाळी तयार आहे. खरं म्हणजे आनंदरावांची व आमची (माझी) पहिली भेट २ तारखेला. पण अक्षरश: चार दिवसात मला वाटू लागले की या इसमाशी माझा ४० वर्षांचा संबंध आहे.

भास्करराव तुमचे आणि तुमच्या भावांची कुटुंबे अगदी संमेलनमय झाली होती. 'आपल्या घरचं कार्य आहे असं समजा' असं आपण व्यवहारात बोलतो. पण तुम्ही हे प्रत्यक्षात उतरवून दाखविलेत.

अगदी मनातलं सांगायचं तर हे संमेलन लवकर आटोपलं - आणखी दोन दिवस तरी हा आनंदमेळावा हवा होता.

- **विनायक केशव** (पृ.२०), मुंबई.

With Best Compliments From

**Parle Marketing Services Ltd.**



**Address**
Western Express Highway,
Andheri East, Mumbai - 400069.

Marathe Pratishthan

# त्रयस्थ ऑब्झर्वर म्हणून आले - - - आणि दोन दिवसांत कुटुंबीय होऊन गेले।

*[दक्षिण कन्नड जिल्ह्यातील (आता उडुपी) आपले कुलबांधव प्रथमच मराठे प्रतिष्ठानच्या संमेलनात सामील झाले. उडुपी जिल्ह्यातल्या, कारकल तालुक्यातल्या दुर्ग या खेडेगावातले पाच कुलबांधव मोठ्या उत्कंठेने या संमेलनाला आले होते.*

*त्यांची भाषा अर्थातच कानडी. काहींना इंग्रजी येते. घरात मात्र ते अद्याप 'चित्पावनी' भाषाच बोलतात. त्यांनेपैकी काही जणांनी संमेलनात आपली ओळख 'चित्पावनीतच' करून दिली. बहुतेकांना ती समजली. गरजेपुरते दुभाष्याचे काम हितगुजचे संपादक लक्ष्मण शंकर (पृ.५२०) यांनी केले. गोव्यांत त्यांच्या घरी तसेच गावातहि वडीलधारी मंडळी 'चित्पावनी' बोलतात.*

*भाषेच्या अडचणीमुळे आपल्याला फक्त निरीक्षकाचीच भूमिका करावी लागेल अशी भीती केवळ त्यांच्या मनांत होती. पण दोन दिवस ते सर्व मराठे कुटुंबियांत इतके मिसळून गेले की जाताना त्यांच्या गावाला येण्याचे निमंत्रणहि ते देऊन गेले. त्यांच्या या प्रतिक्रिया. - संपादक]*

"With the language barrier as an obstacle for our free mingling with the other delegates we thought we would be attending the Convention more as observer than as true delegates.

Initially our primary objective was to avail the opportunity to have a feel of the District from which our forefathers supposed to have migrated to Dakshina Kannada District (now Udipi District) a couple of centuries ago.



Front L to R :- Nagabhushana Govinda Marathe, Chakrapani Sakharam Marathe.
Back L to R :- Vishnu Janardan Marathe, Virupaksha Govinda Marathe, Keshav Rama Marathe.

However, a pleasant surprise was awaiting us at the Convention. Our initial inhibitions were laid to rest by the warm welcome we received and very cordial atmosphere prevailing at the Convention. The arrangements for the delegates were good and the proceedings of the TWO DAY MEET quite interesting.

We were much impressed by the welfae activities undertaken by the Prathisthan.

In the end we were made to feel that all of us there belong to one BIG FAMILY and we have a stake in the progress and prosperity of the Pratisthan. Some people at the convention expressed their desire to visit our District sometime in the near future. They are always welcome. Such visits are sure to give them First Hand Knowledge of our people in these parts and their way of life."

Yours Faithfully,

1) Sakharam Marathe (P.577)
2) M.V. Marathe
3) M. Keshava Marathe (P.581)
4) D. Nagabhooshan Rama Marathe (P.570)
5) M. Virupaksha Govinda Marathe (P.570)


हार्दिक शुभेच्छा

**मे. नरेन्द्र स्टोअर्स**

म्हसळा, रायगड, ४०२ १०५.

* स्टेशनरी व जनरल मर्चंट
* S.T.D. I.S.D. सेंटर
* झेरॉक्स सेंटर
* मंगलोरी कौलांचे व्यापारी

हार्दिक शुभेच्छा

**मॉडेल स्कूल सप्लायर्स-पुणे**

यांची कोल्हापूर शाखा

**मराठे शैक्षणिक साहित्य वितरण**

बालवाडी साधने, क्रीडा साहित्य, नकाशे, शैक्षणिक साहित्य
यांचे उत्पादक व वितरक
२९४६, ए वार्ड, कपिलतीर्थ मार्केट (पूर्व बाजू),
पोतदार ज्वेलर्स शेजारी, कोल्हापूर. फोन नं. (०२३१) ५३०१४५


Marathe Pratishthan

# रत्नागिरीतील 'स्नेह' सम्मेलन

**- सौ. मीनाक्षी रविंद्र (पृ.२२०), कर्जत**

कोकणची मैना डौलात चाले
पूल-बोगदे पार करीत ।
कोकण-मुंबई जवळ आणीत
झुकझुक झुकझुक चालली धावत ॥

अशा या कोकण रेल्वेने प्रवास करण्याची इच्छा खूप दिवसांपासून होती. ती इच्छा मराठे प्रतिष्ठानच्या स्नेहसंमेलनामुळे पूर्ण झाली.

सकाळी ६॥ वाजता रत्नागिरी स्टेशनात आमची गाडी थांबली. सकाळचे प्रसन्न वातावरण. सूर्यदेव नुकताच वर आला होता. चोहिकडे सोनेरी किरणं पसरली होती. आम्ही आपापले सामान घेऊन प्लॅटफॉर्मवर उतरलो. इथे कसे स्वागत होईल असं वाटत होते. स्टेशनच्या बाहेर पडायचा रस्ता शोधायला लागलो तर तो उंचावर दिसला. इतर स्टेशनापेक्षा याचं वेगळेपण दिसून आले.

जिना चढून बाहेर पडलो तर समोरच "मराठे प्रतिष्ठान स्नेहसंमेलन, रत्नागिरी" असा बोर्ड घेतलेले आमचे एक बांधव दिसले. त्यामुळे आम्ही सर्व त्यांच्या भोवती गोळा झालो. त्यांनी आम्हाला एका बाजूला थांबायला सांगितले. जवळच दोन एस.टी. बसेस उभ्या होत्या. त्यात आम्हाला बसायला सांगितले. मनात विचार आला व्याह्यांची सुद्धा इतकी सोय कोणी करणार नाही.

"पुंडलिक वरदा हऽऽरी विठ्ठल" असे म्हणून आमच्या बसेस रत्नागिरी गावाच्या दिशेने धावू लागल्या. नुकताच पावसाळा संपल्यामुळे सर्वत्र हिरव्या पाचूचे साम्राज्य पसरले होते. जणू धरतीमाता हिरवा शालू नेसली आहे. हे सर्व विलोभनीय दृश्य पाहता पाहता दत्तमंगल कार्यालय कधी आले ते समजलेच नाही. सर्वांनी आपापल्या बॅगा घेतल्या व दत्तमंगल कार्यालयाच्या वरच्या प्रशस्त हॉलमध्ये प्रवेश केला.

भिंतींच्या कडेला सतरंज्या टाकलेल्या होत्या. थोडावेळ बसलो. तितक्यात चहा आला. नंतर 'आंघोळी करून तयार व्हा' असे सांगितले. जोतो आपआपल्या कार्याला लागला. सर्वच मराठे परिवारातले. एकमेकांच्या बोलण्यात आपुलकी ओसंडत होती. सहकार्य उफाळून येत होते. पटापट जिथे नंबर लागले तिथे जाऊन सर्वजण तयार झाले. कुठे गडबड नाही गोंधळ नाही. नंतर नाष्टा म्हणून उप्पीट आले व चहा झाला. त्याचा पुरेपूर आस्वाद घेऊन आम्ही सर्व परत एस.टी. बसमध्ये बसलो.

आता आम्हाला जायचे होते गणपतीपुळे बघायला. कित्येक दिवसांपासूनची इच्छा आज पूर्ण होणार होती. जाताना दुतर्फा घरे व वाड्या दिसत होत्या. नारळ-पोफळीच्या बागा, आंबा - फणसाच्या बागा मन मोहून घेत होत्या.

दोन तास प्रवास करून गणपतीपुळे येथे दाखल झालो. समोर खळखळणारा समुद्र, बारीक मऊ वाळू, लाटांचा आवाज व समुद्रकिनारी डौलाने उभे असलेले गणपतीचे देऊळ. सर्वजण एस.टी.तून उतरलो व पूजेचे साहित्य घेऊन देवळात गेलो. दर्शन घेतले. मग मात्र प्रत्येकजण समुद्राच्या दिशेने जायला लागला. मोठ मोठ्या लाटा उसळत होत्या. पायाखालची वाळू तापली होती. तरीपण तिचा पायला होणारा स्पर्श हवाहवासा वाटत होता. पुढे जाऊन पायावर लाटा घेतल्या. एक मोठी लाट आली. तिने तर आम्हाला पार भिजवूनच टाकले. १०-१५ मिनिटे समुद्रावर घालवल्यावर सर्वजण परत फिरले. दुपारचा १॥ वाजला होता. पोटात कावळे कोकलत होते.

आम्हाला तिथून जवळच असलेल्या एका घरी जेवायला नेले. मस्त सारवलेली जमीन. ओळीने मांडलेली ताटं, बसायला सतरंज्या, काय थाट वाटला तो. भराभर लोकं वाढत होती. वरण भात, चवळीची भाजी, काकडीची कोशिंबीर व उकडीचे पांढरेशुभ्र मोदक. दमून आल्यामुळे सर्वांनीच जेवणावर ताव मारला.

परतीच्या प्रवासात मालगुंडला एस.टी. थांबवली. मराठीतील थोर कवी केशवसुतांचे ते जन्मस्थान. तिथल्या मातीतून चालताना केशवसुतांची "नव्या मनूतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे", ही कविता म्हणावीशी वाटली.

संध्याकाळी परस्पर परिचयाचा कार्यक्रम झाला. सर्वच क्षेत्रात मराठे वावरत आहेत असे दिसून आले. मनात आले "मर्द आम्ही मराठे खरे". कार्यालयात रात्रीच्या जेवणाची सोय होती. खिचडी, कढी, कोशिंबीर, पापड असा साधाच पण चटकदार बेत होता. रात्री स्थानिक लोकांनी करमणुकीचा कार्यक्रम केला व शनिवारचा दिवस गतकालात सामील झाला.

रविवारी ठीक ९॥ वाजता गुरुकृपा मंगल कार्यालयात संमेलनाच्या मुख्य कार्यक्रमास सुरवात झाली. ईशस्तवन, दीपप्रज्वलन होऊन उद्घाटन झाले. उपस्थितांचे स्वागत झाले. आम्हा सर्व स्त्रियांना हळदीकुंकू व गजरे दिले. जवळजवळ ३५० प्रतिनिधी उपस्थित होते. सर्वांशी बोलताना, ओळख करून घेताना वेळ कसा गेला ते कळले नाही. मराठे प्रतिष्ठान 'काल - आज - उद्या' यावर चर्चा झाली.

दुपारच्या जेवणात तर चक्क आमरस पुरी चा बेत होता. आम्ही सर्व थक्क झालो. आमरस खाताना मनोमनी सुखावलो. या दिवसात आमरस खाऊ घालणाऱ्या संयोजकांना सर्वांनी दुवा दिला. मधल्या वेळात आम्ही रत्नागिरीतील आजूबाजूची प्रेक्षणीय स्थळे पाहिली. संध्याकाळी ५ वाजता कुलबांधवांनी सादर केलेल्या करमणुकीच्या कार्यक्रमांना सुरवात झाली. कथाकथन, गायन, नकला, नाट्यछटा, कोडी, नाट्याभिनय अशा विविध अंगानी कार्यक्रम रंगला. पण कार्यक्रमात सर्वात जास्त रंग भरला तो श्री. भाऊ मराठे यांच्या निवेदनाने. अतिशय उत्कृष्ट निवेदन त्यांनी केले.

आणखीन एक कार्यक्रमाचे आकर्षण म्हणजे मंजिरी मराठे यांच्या बातम्या. बातम्या सांगताना येणाऱ्या अडचणी त्यांनी सांगितल्या. प्रेक्षकांच्या प्रश्नांना उत्तरे पण दिली. रात्रीची जेवणे झाल्यावर स्थानिक मंडळींनी कार्यक्रम केला. पहाटे ५ला मुंबईला निघण्यासाठी कार्यालय सोडले.

जाताना बरोबर होती संमेलनाच्या आठवणींची शिदोरी, संयोजकांबद्दल आदरभाव व उत्तम सोय करणाऱ्या बांधवांबद्दल कृतज्ञता.

Marathe Pratishthan

# विभाग २ : कोकण रेल्वे, कोकण विकास


पृष्ठ

१. कोकण रेल्वे - साकारलेले स्वप्न
- श.द. लिमये, चीफ. इंजि. (को. ऑर्डि.)
कोकण रेल्वे कॉर्पोरेशन २७

२. कोकण रेल्वे - काही अनुभव
- जनार्दन यशवंत मराठे २९

३. कोकणची माणसे
- रमाकांत माधव विद्वांस ३२

४. कोकणातील उद्योग विकासाच्या दिशा -
(संमेलनात चर्चेसाठी टिपण) ३३

५. नर्सरी व्यवसाय
- सुरेश पांडुरंग मराठे ३५

६. वाचा आणि विचार करा
- रमाकांत माधव विद्वांस ३५

७. व्यवसाय पुराण
- वामन गणेश मराठे ३६


८. सहज करता येणारे सेवा उद्योग ३७

९. सिंधुदुर्ग जिल्हा 'पर्यटन जिल्हा' (शासन निर्णयाचा गोषवारा) ३८

१०. कोकणातील पर्यटन विकासाची स्थळे ३८

११. पर्यटन विकासासाठी सरकारी प्रोत्साहने ३९


Marathe Pratishthan



# 'हितगुज' ला शुभेच्छा

श्री. मोहन सदाशिव मराठे, दिल्ली
सौ. स्वाती मोहन मराठे

Marathi Pratishthan

# कोकण रेल्वे - साकारलेले स्वप्न

- शशिकांत दत्तात्रय लिमये, चिफ इंजिनियर (कोऑर्डिनेशन), कोकण रेल्वे कार्पोरेशन

हिंदुस्थानातील पहिली रेल्वे १६ एप्रिल १८५३ रोजी कोकणपट्टीत बोरीबंदर पासून ठाण्यापर्यंत धावू लागली. एकोणीसाव्या शतकाच्या दुसऱ्या अर्धात रेल्वेचे जाळे झपाट्याने पसरले. आजमितीला भारतीय रेल्वेचे ६१,२०० कि.मी.चे जाळे सर्व देशभर पसरले आहे. रेल्वेचा इतका विकास होऊनही कोकणपट्टीत रेल्वेचे जाळे पसरू शकले नाही.

१८९० पासून कोकणातून रेल्वे मार्ग करण्याचा प्रस्ताव अनेक वेळा पुढे आला. त्यांसाठी १८९८ कराड ते मुंबई, १८९६ कराड ते मुंबई, १९१९ कराड ते उल्वा, १९२६ दिवा ते दासगाव अशी सर्वेक्षणेही झाली. परंतु दऱ्याखोऱ्यांनी व डोंगरांनी व्याप्त अशा कोकणच्या प्रदेशात रेल्वे बांधण्याचे अवघड काम साधनसंपत्तीच्या अभावी इतके वर्षे शक्य झाले नसावे.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात कोकण रेल्वेचे काम हाती घेण्यासाठी दिवा-दासगाव (१९५३) आपटा-मंगलोर (१९७०) अशी सर्वेक्षणे करण्यात आली. त्या अनुषंगाने दिवा-पनवेल (१९६३) पनवेल-आपटा (१९६६) आणि आपटा-रोहा (१९८६) असे (एकूण १०५ कि.मी.) रेल्वे बांधकाम टप्याटप्याने पूर्ण करण्यात आले.

संपूर्ण रोहा-मंगलोर प्रकल्प सर्वेक्षणाचे काम रेल्वे मंत्रालयाने १९८४ मध्ये हाती घेतले व ह्या सर्वेक्षणाच्या आधारावर १९८९-९० आणि १९९०-९१ मध्ये कोकण रेल्वेच्या पूर्ण प्रकल्पास अनुमती प्रदान केली.

**स्वायत्त कार्पोरेशनकडून**
**बीओटी तत्वावर उभारणी :**

रोहा ते मंगलोर एकूण मार्गाची लांबी होती ८३५ कि.मी. ह्या शतकातील भारतातील हा सर्वात मोठा व अवघड रेल्वे प्रकल्प ५ वर्षात पूर्ण करण्यासाठी नवीन पद्धतीचा अवलंब करण्याचे ठरविण्यात आले. त्यासाठी रेल्वे मंत्रालयाने कोकण रेल्वे कॉर्पोरेशनची स्थापना जुलै १९९० मध्ये केली. प्रत्यक्षात प्रकल्पाचा एकूण खर्च १४०० कोटी रु. असून कर्जावरील व्याजाचा बोजा धरून खर्च ३०६० कोटी रु. आहे. त्यापैकी ८०० कोटी रु. भाग भांडवलातून १८०० कोटी रु. करमुक्त रोख्यातून व राहिलेले ४६० कोटी रु. परकीय व्यापारी कर्जातून उभे करण्यात आले आहेत.

प्रकल्पाच्या १४०० कोटी रुपयांच्या तरतुदीसाठी एक नवीन कल्पना अंमलात आणली गेली. प्रथमच रेल्वे प्रकल्पासाठी मध्यवर्ती सरकार व चार राज्य सरकारे (महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ) ह्यांनी ह्या खर्चाचा वाटा उचलण्याचे ठरविले. एकूण १४०० कोटी रुपयांपैकी १००० कोटी रुपये ९ टक्के व १०.५ टक्के करमुक्त रोख्यातून व ४०० कोटी रुपये केंद्र व चार राज्य सरकारांच्या भाग-भांडवलामधून उभे करण्याचा महत्वाचा निर्णय घेण्यात आला. भाग भांडवल केंद्र सरकार व चार राज्य सरकारांमध्ये खालील प्रमाणात वाटण्यात आले. केंद्र सरकार (५१%), महाराष्ट्र (२२%), गोवा (६%), कर्नाटक (१५%), व केरळ (६%).

प्रकल्पात बीओटी-बिल्ड ऑपरेटर ॲन्ड ट्रान्सफर अशा प्रकारच्या तत्वाचा प्रथमच वापर करण्याचे ठरले. ह्या तत्वानुसार कोकण रेल्वे कॉर्पोरेशन हा प्रकल्प पूर्ण करून थांबणार नाही तर त्यानंतर १० वर्षे कॉर्पोरेशन मार्गावरील गाड्या चालवून होणाऱ्या फायद्यातून कर्ज परत करील व त्यानंतर रेल्वे मंत्रालयाकडे कोकण रेल्वेचा कारभार सोपवील. देशातील साधन-संपत्तीचा कार्यक्षमतेने वापर करण्याचा हा एक महत्वाचा प्रयोग ठरणार आहे.

कोकण रेल्वे कॉर्पोरेशनने ऑक्टोबर १९९० मध्ये संपूर्ण प्रकल्पाचे काम आपल्या हाताखाली घेऊन पूर्ण प्रकल्पाचे पुन: सर्वेक्षण केले. त्याचे मुख्य हेतू असे होते.

अ) डोंगराळ प्रदेशात रेल्वे मार्गांनी चढ व उतरण कमी करणे ज्यामुळे गाड्यांची अधिभार क्षमता वाढेल.

ब) रेल्वे मार्गाची आरेखना अशा पद्धतीने करणे की ज्यामुळे ताशी १६० कि.मी. वेगाने गाड्या धावू शकतील.

पुन: सर्वेक्षणानंतर रेल्वे मार्गाची लांबी ८३७ कि.मी. वरून ७६० कि.मी वर आली. ह्याचा कोकण रेल्वेला कायमचा फायदा होणार आहे. त्यापैकी ३८३ कि.मी. महाराष्ट्रात, १०५ कि.मी. गोव्यात, २७२ कि.मी. कर्नाटकात आहे.

With Best Wishes From

M/s. QUALITY SERVICE

Offset, Screen Printing, Xerox, Rubber Stamps
& Nylo Stamp of 1 lakh impression

Plot No. A/4, M.I.D.C., Mirjole, Ratnagiri-415 639
Tel.: (02352) 28720, 28689 Fax : 28689

*हार्दिक शुभेच्छा*

खेर बाग

आंब्याची तसेच फुलझाडे व फुलझाडांची उत्कृष्ट कलमे रास्त भावांत मिळतात

बोर्डिंग रोड, रत्नागिरी ४१५ ६१२
दूरध्वनी २२९०५

Marathe Pratishthan

**प्रकल्पाची वैशिष्टये**

**गेज** - ब्रॉड गेज (१६७६ मि.मी.)

**लांबी** - ७६० कि.मी. एकेरी मार्ग

**स्थानकांची संख्या** - ५८

**पुलांची संख्या** -

मोठे पूल १८१ लांबी २१.५ कि.मी.,

छोटे पूल १६७० लांबी ५.७३ कि.मी.

**बोगद्याची संख्या** - ९२१, लांबी ८३.६ कि.मी.

**सर्वात लांब पूल**-शरावती नदी (होनावर) २कि.मी.

**सर्वात उंच पूल**-पनवल नदी (रत्नागिरी) ६४ मीटर

**सर्वात लांब बोगदा**-६.५ कि.मी. करबुडे- रत्नागिरी

**गाड्यांचा वेग** -

ताशी १३० कि.मी. (भविष्यात १६० कि.मी.)

नद्या व टेकड्यांनी व्यापलेल्या हिरव्यागार प्रदेशातून कोकण रेल्वेचा मार्ग जात आहे व कोकण रेल्वेतील प्रवास हा नक्कीच एक आनंददायक अनुभव ठरणार आहे.

**अत्याधुनिक प्रशासकीय व्यवस्था**

कोकण रेल्वे महामंडळाने कामाच्या प्रगतीच्या दृष्टीने ७६० कि.मी.ची लांबी ७ विभागात वाटली. प्रत्येक विभाग एकेका चीफ इंजिनीयरच्या नियंत्रणाखाली ठेवला. कोकण रेल्वेने आपले अद्यावत मुख्यालय बेलापूर, नवी मुंबई येथे स्थापन केले. संगणक, फॅक्स यंत्रणा, टेलेक्स वगैरे आधुनिक उपकरणांचा योग्य उपयोग करण्यात आला. कोकण रेल्वेचे मुख्यालय चीफ इंजिनीयर्स कार्यालयांशी संगणकाद्वारे जोडण्यात आले. ह्या सर्व यंत्रणेमुळे त्वरित निर्णय घेणे व तो निर्णय अंमलात आणणे शक्य झाले.

ऑक्टोबर १९९० मध्ये हाती घेतलेले हे काम आता लवकरच पूर्णतेकडे जात आहे. आत्तापर्यंत ७६० कि.मी. पैकी ७४० कि.मी. रेल्वे मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. उरलेला २० कि.मी. लोहमार्ग नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करण्याचा महामंडळाचा मानस आहे.

**कोकण रेल्वेमुळे कोकण विकास**

कोकण रेल्वे कोकणपट्टीत एक महत्वाचे दळणवळणाचे साधन ठरणार आहे. कोकणातील नैसर्गिक, खनिज व मानव संपत्ती, कोकणच्या उत्कर्षामध्ये उपयोगात आणण्यातही रेल्वे सिंहाचा वाटा उचलणार आहे. ह्या रेल्वेमुळे कोकणचा पूर्ण कायापालट अपेक्षित आहे. ह्या रेल्वेमुळे प्रवासास लागणारा वेळ व अंतरे खूपच कमी होणार आहेत. मार्मगोवा बंदराला कोकण रेल्वेमुळे ब्रॉड गेज उपलब्ध होणार असून त्यामुळे कन्टेनरचे दळणवळण सुलभ होणार आहे.

गुजरातपासून मुंबईपर्यंतच्या पश्चिम किनारपट्टीवरील औद्योगिक क्षेत्रास कोकण रेल्वेमुळे दक्षिण भारतात कन्याकुमारीपर्यंत जाण्याचा एक नवा जलद गती रेल्वे मार्ग उपलब्ध होणार असल्याने ह्या विभागातील दळणवळण खर्च व इंधन यात खूपच बचत अपेक्षित आहे.

*मराठे प्रतिष्ठानला हार्दिक शुभेच्छा*

**नितीन यशवंत खांबेटे**
४-अनंत छाया, गोखले रोड, नौपाडा, ठाणे - ४००६०२

**Chintamani Hari Marathe**
Hari-niketan, Brahman Society, Naupada, Thane 400602

**मातोश्री लक्ष्मीबाई व पत्नी मालती यांचे स्मरणार्थ**

**ज. य. मराठे**
१२, रूपाली, ७७७ शिवाजी नगर,
पुणे - ४११००४

For SPARK EROSION

Contact

Girish Khambete
RAMSON ENGINEERS

Phone Factory : 532 0152
Office : 534 2281/534 3708

Marathe Pratishthan

# कोकण रेल्वे - काही अनुभव

- जनार्दन यशवंत (पृ. ४२६), पुणे.

**आजच्या आपल्या कोकण रेल्वेची पहाणी व आखणी आपल्याच एका कुलबांधवाने केली होती हे समजले की किती अभिमान वाटतो नाही? मग त्यांना आज किती समाधान वाटत असेल त्यांचे स्वप्न साकार झाल्याचे पाहून? पंचवीस वर्षांपूर्वीचे पहाणी काळातले हे त्यांचे अनुभव आपल्याला खचितच अंतर्मुख व्हायला लावतील. - संपादक.**

१९७१-७२ साली मी सेंट्रल रेल्वेवर 'इंजिनिअर-इन-चीफ' या पदावर काम करत असताना, माझ्या देखरेखीखाली पश्चिम किनारा रेल्वे-मार्ग (आपटा ते मंगलोर) या प्रकल्पाचे अन्वेषण, आखणी व मूल्य-मापन (survey, alignment and estimate) करण्यात आले. पश्चिम किनारा रेल्वे मार्गातच कोकण-रेल्वे समाविष्ट आहे.

आपटा ते मंगलोर हा ८६७ कि.मी.चा मार्ग अत्यंत कठीण अशा भूप्रदेशातून जातो. तो [illegible] स्थापत्य शास्त्राच्या अडचणी कशा आल्या व त्या कशा सोडविल्या त्याचा ऊहापोह न करता सर्वसामान्य अनुभव काय आले हे सांगण्याचा उद्देश आहे.

मी स्वत: कोकणस्थ असलो तरी १९७०-७१ पर्यंत म्हणजे वयाच्या ५० वर्षापर्यंत कोकणात कधीही जाण्याचा प्रसंग आला नव्हता. या रेल्वे मार्गाच्या निमित्ताने मात्र कोकणच्या जवळजवळ सर्व भागातून दीड-दोन वर्षे भरपूर हिंडलो व कोकणच्या खेड्यांची व माणसांची प्रत्यक्ष ओळख झाली.

एक्दा मी व माझे एक्झीक्युटिव्ह इंजिनिअर श्री. आजगावकर हे कशेळी डोंगरावर असलेल्या पठारावर हिंडत असताना एकाएकी पावसाच्या सरी येऊ लागल्या. जवळच असलेल्या एका झोपडीवजा जागेत अडोशासाठी आम्ही गेलो. झोपडीतून एक तरुण बाई दोन छोट्या मुलांसह बाहेर आली. त्या झोपडीला लागून असलेल्या गुरांच्या गोठ्यात आम्ही उभे होतो. बाई तरुण पण किडकिडीत होती. तिच्या अंगावर केवळ लाज राखण्यापुरतेच एक फाटके कपडे होते. त्या बाईकडून समजले ती एकटी तिच्या दोन मुलांसह तेथे रहाते. सासू कधीतरी येऊन जाऊन असते. तिची जी थोडीशी जमीन त्या पठारावर आहे, त्यातून जे धान्य निघते ते तिला कट्टाकट्टी ४ महिने पुरते. तिने एक गाय पाळली आहे; तिचे दूध ती 'नातूवाडी' या गावामध्ये दररोज २ मैल खाली जाऊन विकते व त्या पैशात काही मीठ मसाला विकत घेऊन वर येते. तिला व मुलांना दूध काही फारसे मिळत नाही. बाकीचे ६/८ महिने गुजारा कशावर होतो हे विचारता "आमचे 'हे' पलटण मध्ये आहेत व त्यांची महिन्याला मनीऑर्डर येते" असे उत्तर मिळाले. पण तिचा नवरा सध्या कोणत्या गावात असतो व कोठून मनीऑर्डर येते हे तिला माहीत नव्हते. वर्ष सहा महिन्यांनी नवरा जेव्हा रजेवर येईल, तेव्हा गाठभेट. इतरवेळा असेच.

या प्रसंगावरून कोकणात दारिद्रय काय आहे याची कल्पना आली. अशा तऱ्हेची कुटुंबे नंतर अनेक ठिकाणी पहायला मिळाली. शिवाय त्या बाईला लिहिता वाचता येत नव्हते; त्यावरून दारिद्रय व निरक्षरता किती आहे ते दिसून आले.

कोकणात अनेक ठिकाणी हिंडताना दिसून येई की कोणत्याही कुटुंबातील सक्षम माणसे (मुख्यत: पुरुष माणसे) ही पैसा कमावण्यासाठी मुंबईस किंवा इतरत्र गेली आहेत. घरी फक्त बाया-माणसे, मुले व वृद्ध पुरुष आहेत. त्यांचा चरितार्थ मुख्यत्वे सक्षम माणसानी पाठविलेल्या मनीऑर्डवर चाललेला असतो.

खेड ते चिपळून या भागात उत्तर-दक्षिण वाहणाऱ्या 'जगबुडी' नदीच्या बाजूने रेल्वे-लाईन आखली जात होती. त्या भागात हिंडताना एक जख्ख म्हातारा मुसलमान भेटला. त्याने जवळ येऊन मोठ्या अदबीने विचारले की "साहेब हे काय चालले आहे? " त्याला जेव्हा समजले की आम्ही रेल्वे - लाईनची आखणी करत आहो, तेव्हा तो म्हणाला "साहेब मी लहान पोऱ्या असताना एका इंग्रज साहेबानेही रेल्वे-लाईनच्या खुंट्या मारल्या होत्या व त्यांचा खलाशी (नोकर) म्हणून मी काम करत होतो. तेव्हापासून मी गेले ५०/६० वर्षे लाईन होणार होणार असे ऐकतो आहे. अल्ला करे व तुमच्या प्रयत्नाला यश येवो." असे म्हणून पूर्वी मारलेल्या व कॉन्क्रीटमध्ये गाडलेल्या खुंट्याही त्याने दाखविल्या. "तुम्ही आखता आहे तोच पूर्वीचा मार्ग होता" असे तो म्हणाला. त्याच्या तोंडावरचे ते नम्र व प्रामाणिक भाव अजून स्मरतात.

खेड भागामध्ये हिंडताना एका गृहीत कल्पनेला धक्का बसला. 'पांगारकर' हे नाव मला हरिभक्त परायण पांगारकरबुवा व त्यांची सुश्राव्य कीर्तने यासंबंधात माहीत होते. 'पांगारकर' म्हणजे कीर्तनकार किंवा हिंदू समाजातील कोणीतरी संभावित गृहस्थ असणार असा ग्रह होता. पण खेडमध्ये "खान बहादुर पांगारकर मार्ग" पाहून मी चाटच पडलो व आपल्यातील उच्च वर्गातील लोकही इतर धर्मात कसे गेले आहेत हे समजले.

एकदा सावर्डे, असुर्डे, अरवली या भागात आमची सर्व्हेपार्टी काम करत होती. मी व श्री. आजगावकर दुपारचे सुमारास सर्व्हेपार्टीच्या शोधार्थ हिंडत होतो. पार्टीचा शोध लागेना म्हणून आम्ही एका झोपडीवजा जागेकडे चौकशीसाठी गेलो. झोपडीचे दार बाहेरून बंद केले नव्हते व कुलूपही लावले नव्हते. दाराला हलकासा धक्का दिल्यावर दार उघडले; पण आत कोणीही माणूस नव्हते. आता काय करावे या विचारात असताना सुदैवाने एक बाई डोक्यावर काटकोट्याचा भारा घेऊन आली. तुम्ही घराला कडी-कुलूप न लावता बाहेर कशा जाता असे विचारता "घराला आम्ही कधी कुलूप लावत नाही; येथे चोरी होत नाही; शिवाय चोरण्यासारखे घरात काही नसते" असे उत्तर मिळाले. हीच स्थिती अनेक

Marathe Pratishthan

ठिकाणी व विशेषत: रत्नागिरी, जिल्ह्यात पहायला मिळाली. 'अठरा विश्वे दारिद्र्य' म्हणजे काय हे येथे दिसून येते.

चिपळूण - संगमेश्वर या भागात मी माझ्या एक-दोन सहकाऱ्यांसह हिंडत होतो. हिंडता-हिंडता पाराने पाणी वहात असलेले; बाग शेती असलेले एक बऱ्यापैकी प्रशस्त कौलारू घर दिसले. चौकशी करता एक वृद्ध गृहस्थ आपल्या पत्नीसह तेथे रहात असलेले समजले. त्यांचे नाव करंदीकर का पाटणकर असे काही होते. गृहस्थांची गाठ पडली; त्यांनी आमचे आदरातिथ्य केले. त्यांनी आपण कष्टातन्हेने उत्तम शेती व बाग बागायत करीत आहो ते सांगितले. पण त्यांची व्यथा अशी की त्यांचे मुलगे, पुतणे वगैरे तेथे न रहाता नोकरीसाठी मुंबईला गेले आहेत व ते परत येण्याची आशा नाही. त्यामुळे आपण करत असलेल्या खटपटीचे भविष्य उदास आहे याची खिन्नता त्यांनी दर्शविली. कदाचित रेल्वे-लाईन जर झाली व कोकणात उद्योगधंद्याची सुरवात झाली तर आपल्या पुढील पिढीतील कोणीतरी इकडे येईल असा आशेचा अंकुर त्यांचे तोंडावर दिसू लागला व हा रेल्वे-प्रकल्प लौकर होवो अशी इच्छा त्यांनी प्रकट केली.

इंग्रजांनी अनेक चांगल्या गोष्टींपैकी एक गोष्ट जी केली ती म्हणजे सर्व देशासाठी "सर्व्हे ऑफ इंडिया " चे नकाशे तयार करणे. या नकाशांच्या सहाय्यानेच आम्हाला दीड-दोन वर्षांत या अवघड भूप्रदेशातील एवढ्या लांबीचा रेल्वे-मार्ग शोधता आला. तसेच इंग्रजांनी "गॅझेटियर ऑफ इंडिया" या नावाचे प्रदेशाबद्दल माहिती देणारे ग्रंथ रचले. या ग्रंथात कोकण भागाची माहिती आम्ही वाचत असू. वाचता वाचता एका ठिकाणी रत्नागिरी जिल्ह्यासंबंधी मजकूर असा आहे की त्यावेळी रत्नागिरीच्या कलेक्टरनी मुंबईच्या गव्हर्नरकडे प्रस्ताव पाठविला की रत्नागिरी जिल्हा हा इतका गरीब जिल्हा आहे की शेतसाऱ्याच्या उत्पन्नापेक्षा तो सारा वसूल करायला जास्त खर्च येतो; तेव्हा सारा-वसुलीची यंत्रणा बंद करून सर्वांना सारा माफ करावा. त्यावर गव्हर्नरचे उत्तर आले की वसुलीचा खर्च जास्त आला तरी सारा वसुली चालून ठेवावी; कारण त्यामुळे सत्ता कोणाची आहे हे सर्व लोकांना समजेल व हे जरूर आहे.

आमचा सर्व्हे अभियांत्रिकी व वाणिज्य स्वरूपाचा होता. 'वाणिज्य' म्हणजे रेल्वेमार्गाने काय फायदा होईल याचा शोध घेणे. या संदर्भात रत्नागिरीस सागर-वहातुकी संबंधाने एक ऑफिस होते, त्याचे मुख्य 'वाय. दामले' यांना भेटायला गेलो. मला वाटले की हे कोणी ब्राम्हण गृहस्थ असावे. आमचे संभाषण इंग्रजीत झाले व बाहेर आल्यावर त्या गृहस्थांचे नाव "याकुब दामले" असल्याचे समजले. खेडच्या पांगारकरानंतर हा दुसरा अनुभव.

साखरपा-खारेपाटण भागात सह्याद्रीजवळच्या एका पठारावर 'पटवर्धन' नावाचे एक उद्योगी व महत्वाकांक्षी गृहस्थ भेटले. त्यांनी आधुनिक पद्धतीने शेती-व्यवसाय करून नावारूपाला आणला होता. फळ-फळावळीच्या बागा होत्या. ते ऊसही पिकवीत. मालास मागणी मुंबईत किंवा घाटावर कोल्हापूर सांगली येथे व वहातुक-खर्च जास्त, त्यामुळे त्याना हवा तसा फायदा होत नव्हता. रेल्वे-मार्ग झाल्यास हा प्रश्न सुटेल व त्यांच्यासारखे व्यवसाय इतरत्र सुरू होतील असे ते म्हणाले.

कोकणात फिरत असताना मधूनमधून कोठेतरी एखाद्या सुबक, आकर्षक व आधुनिक बांधणीचा


## पेस्ट कंट्रोल अँड जनरल सर्व्हिसेस

२८०९, आठल्ये कंपाऊंड
पतितपावन मंदिरासमोर,
रत्नागिरी - ४१५ ६१२.
फोन : (०२३५२-२१०३०)

**शासकीय मान्यताप्राप्त पेस्ट कंट्रोल कॉंट्रॅक्टर्स**

**अधिकृत वितरक**

- पेस्ट कंट्रोल इंडिया लि.
- लॅक्मे
- इमामी
- डाबर इंडिया लि.
- फेविकॉल
- पार्क डेव्हिस

**हार्दिक शुभेच्छा**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील असंख्य ग्राहकांची आगळी वेगळी आपुलकी आणि जिव्हाळा संपादन केलेले 'वाडातर' येथील प्रसिद्ध दुकान 'कार्लेकर भिडे'

## कार्लेकर भिडे

**दुकान 'वाडातर' - ता. देवगड (सिंधुदुर्ग)**
**स्थापना - १९२३ - 'विजया दशमी'**
**(मूळ संस्थापक - कै. त्रिंबक गणेश कार्लेकर व कै. बाबजी कृष्ण भिडे)**

**दुकानाची वैशिष्ट्ये**

गोदरेज अॅग्रोव्हेट लिमी (मिरज) यांचे पशुखाद्ये, किटकनाशके, खते यांचे अधिकृत वितरक. गोदरेज सोप लि. (मुंबई) यांचे, साबण, वनस्पतीचे अधिकृत वितरक. गोल्डन बिस्किट कं. (मिरज) यांचे अधिकृत वितरक शिवाय सर्व प्रकारची कडधान्ये, मसाल्याचे सामान, जनावरांची खाद्य पेंड, जंतूनाशके, स्टेशनरी, घरगुती औषधे इ. चे एकमेव विक्रेते

**फोन : ०२३६४/४९२२६**

**'कार्लेकर भिडे' यांची तिसरी पिढी आज ग्राहकांच्या सेवेत मग्न आहे.**


Marathe Pratishthan

बंगला दिसायचा. चौकशी करता असे समजायचे की ते अमुक अमुक स्मगलरचा बंगला आहे. बहुतेक ते आखाती देशाशी व्यापार उदीम करणारा असायचा. येवढे बंगले सोडले तर बाकी सर्व सामान्य नाखव्यांची वस्ती.

आपण महाराष्ट्रातील पश्चिम-किनारा भागाला कोकण म्हणतो; तसेच उत्तर व दक्षिण कानडाचे लोकही आपल्या भागाला कोकणच म्हणतात. तसेच महाराष्ट्रात व कानडात किनार-पट्टीला 'परशुराम-भूमीच' म्हणतात. महाराष्ट्रात कोकणात मराठी भाषा बोलली जाते. गोव्यात मराठी व कोकणी बोलली जाते. तर कानडामध्ये कानडी-मिश्रित कोकणी भाषा बोलली जाते. पण या सर्व किनार-पट्टीतील लोक मृदुभाषिक, नम्र व प्रामाणिक आहेत. तेच तुम्ही कोकणातून डोंगर चढून देशावर गेलात की लोकांची भाषा कर्कश, उर्मट व बेफिकिरीचे वाटते. एक दरिद्री मुलूख व एक सधन मुलूख याचा तर हा परिणाम असेल?

कानडा भागातील सर्वसाधारण प्रजा कृष्णवर्णांची. पण मधूनच गोरेपान लोक दिसत. विशेषत: उडुपी हॉटेले चालविणारे लोक गोरेपान असत. यासंबंधी चौकशी करता ती मंडळी "जी.एस.बी." म्हणजे गौड सारस्वत ब्राम्हण आहेत असे समजले. ही मंडळी प्रथम काश्मीरजवळ सरस्वती नदीचे काठी रहाणारी होती. नंतर मुसलमानांच्या आक्रमणाचे वेळी ती गोव्यात येऊन स्थिरावली. तिथे पोर्तुगीजांचे जाच सुरू झाले व ती मंडळी कानडा मुलुखात पसरली. या मंडळींची गोव्यातील 'शांतादुर्गा' व 'मंगेशी' ही देवस्थाने. त्या देवस्थानांना जाता येत नाही म्हणून त्यांनी त्याच देवतांची प्रतिदेवस्थाने कानडा मुलखात स्थापन केली आहेत व त्यातील मूर्तींची आराधना ते मूळ देवताना स्मरून करतात असे समजले.

सर्व्हेवरील जीवन खडतर असे. कित्येक वेळा सर्व्हे कर्मचाऱ्यांना तंबूत रहावे लागे; खाण्यापिण्याची नीट सोय नसे, एवढेच काय पण गोडे पाणीही भरपूर मिळत नसे. आपल्या कुटुंबापासून दूर रहावे लागे. त्यामुळे स्पेशल भत्ता असूनही कर्मचारी सर्व्हे कामावर यायला नाखूष असत. मंगलोर विभागात असलेल्या नरसिंहन नावाच्या सर्व्हेयरची गोष्ट मला आठवते. हा सर्व्हेअर आपल्या कामात चांगलाच कुशल होता; पण वरचेवर गैरहजर राही. एकदा तर त्याने कमाल केली. सर्व्हे करत असता तो एकाएकी नाहीसा झाला व आठ दिवसांनी उगवला. काय झाले हे विचारता 'मला गुंडांच्या टोळीने वनविभागात पकडले व डांबून ठेवले. त्यांच्या बऱ्याच विनवण्या केल्यावर त्यांनी मला सोडून दिले' असे सांगितले. नंतर बारीक चौकशी करता तो आपल्या घरी जाऊन परत आल्याचे समजले तेव्हा त्याने 'मला माफ करा व पुन्हा असे करणार नाही' असे वचन दिल्यावर त्याला तोंडी ताकीद देण्यापलीकडे काही कारवाई केली नाही; कारण आम्हाला कामगारांची जरूरी होती व कामगार टिकवावयाचे होते.

१९७१-७२ साली आखणी करत असलेला हा रेल्वेमार्ग प्रत्यक्षात बांधला जाईल की नाही याबद्दल शंका वाटे; कारण त्याच्या खर्चावर उत्पन्नाचे प्रमाण फारच कमी होते. पण कालाचा महिमा अगाध आहे. ७१-७२ साली या प्रकल्पाची किंमत अंदाजे २०० कोटी रुपये होती पण ती आता १२/१५ पट वाढूनही हा प्रकल्प पुरा झाला. त्यात माझा थोडासा वाटा होता हे पाहून मन थरारते. ह्या प्रकल्पाने कोकणचे 'स्वित्झरलंड' केव्हा होईल हेच आता पहायचे आहे!


सुबक, सुंदर, व्याकरण-शुध्द
इंग्रजी व मराठी अक्षर-जुळणी

**भाग्यश्री**

सौ. राधा मराठे, ३/४१, जुहूदर्शन,
न्यु डी.एन.नगर, अंधेरी (पश्चिम),
मुंबई - ४०० ०५३.
दूरभाष - ६२३ १०६२

श्री. श्रीकांत धुंडिराज व कुटुंबीय
यांच्याकडून शुभेच्छापूर्वक



हार्दिक शुभेच्छा

फडणीस (मराठे) परिवार
मुलुंड

अभिजित् प्रभाकर फडणीस
२/१४ चिंतामणि सोसायटी,
मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०० ०८१.
(दूर. ५६४ ३८४५)


Marathe Pratishthan

# कोकणची माणसे

**- रमाकांत माधव विद्वांस (पृ. ६२३), मुंबई.**

**कोकणी गरीबाला कामाची गरज नसते का?**
**आपले राहणीमान सुधारावे असे कोकणी माणसाला का वाटत नाही?**
**कोकणी दुकानदाराला आपली धंद्यात भरभराट व्हावी असे वाटत नसावे का?**
**कोकणी माणसे खरंच इतरांपेक्षा वेगळी आहेत का?**

मूळ कोकणात असलेल्या पण धंदा किंवा व्यवसायाच्या कारणास्तव काही पिढ्यापूर्वीच कोकणाबाहेर स्थायिक होऊन कोकणाशी संबंध सुटलेल्या आम्हा बऱ्याच लोकांना कोकणवासियांबद्दलची माहिती ही काही सिनेमे पाहून, कादंबऱ्या वाचून, किंवा पु.लं.च्या अंतू बरवा सारखी कॅसेट्स ऐकून मिळवता आली तेवढीच असते.

त्यामुळे काहींना कोकणची माणसे साधी भोळी तर काहींना ती बेरकी वाटतात. काही म्हणतात कोकणात गरीबी फार आहे आणि तरीसुध्दा लोक सुखी व समाधानी आहेत. काहींना वाटते कोकणातील आयुष्य खडतर आहे पण कोकणी लोक जरा आळशीच आहेत. त्यांना आकांक्षा व अपेक्षाच नाहीत. असा एक समज आहे की कोकणस्थ लोक जिद्दी असतात. कोणत्याही लहानश्या गोष्टीवरून किंवा मुद्यावरून ते केवळ तत्वासाठी भांडण करतात व वेळेस कोर्टाची पायरी चढतात. तरीही मनाने ही माणसे फार चांगली असतात.

कोकणवासीयांबद्दल शहरात बरेच समज व गैरसमज आहेत. त्यावरून काही मजेदार आख्यायिका पण ऐकायला येतात. त्यातील एक अशी : काही परदेशी पर्यटक कोकणातल्या समुद्रकाठी फेरफटका मारत असतात. त्यांना सुरूच्या वनात सावलीत पडून दोन कोळी गप्पा मारताना दिसतात. दिवसाची वेळ, समोर शांत समुद्र तरीही मासेमारीऐवजी आराम करत असलेले ते दोघे कोळी पाहून पर्यटकांना आश्चर्य वाटते. एक पर्यटक त्या कोळ्यांकडे जातो. त्यावेळी पर्यटक व पडल्या पडल्याच बोलणारे कोळी यांच्यातील संभाषण -

**पर्यटक** : बाबांनो, समोर माशांची अमर्याद संपत्ती असलेला शांत सागर आहे. दिवसाची काम करण्याची वेळ आहे. लोळत गप्पा मारण्यापेक्षा मासेमारी का करत नाही?

**कोळी** : मासेमारी केली तर काय होईल?

**पर्यटक** : तुम्हाला चांगले पैसे मिळतील.

**कोळी** : तर काय होईल?

**पर्यटक** : तुम्हाला दोन-चार होड्या घेता येतील. त्यावर माणसे नेमून धंदा वाढविता येईल.

**कोळी** : मग काय होईल?

**पर्यटक** : तुमची भरभराट होऊन तुम्हाला आरामाचे आयुष्य जगता येईल.

**कोळी** : एवढा खटाटोप करायचा आरामाच्या आयुष्यासाठी? मग आता काय करतोय आम्ही! ● ● ● ● ● ●

मुंबईत नोकरीच्या निमित्ताने रोज ७१ नंबरच्या बसने शिवाजीपार्क ते बॅलार्ड पिअर असा प्रवास बरीच वर्षे करत होतो. दररोज निरनिराळ्या बँकात काम करणाऱ्या मराठी लोकांचा एक ग्रुप बसमध्ये असे. त्यांच्या गप्पातून ते सर्व तळ कोकणातले होते असे लक्षात आले. "मला साहेबांनी दिलेले काम मी कसे हुशारीने टाळले, साहेबाला मी कसे ठणकावले किंवा कसे निरुत्तर केले, एवढेच यांचे गप्पांचे विषय. मी कोणतेही काम कसे चांगल्या तऱ्हेने केले किंवा अशा विषयांवर संभाषण मी एवढ्या वर्षात त्यांच्याकडून ऐकले नाही. ● ● ● ● ● ●

धाकट्या बहिणींच्या लग्नाच्या निमित्ताने बऱ्याच साड्या खरेदी करायच्या होत्या. कौतुकाने दादरमधील एका प्रसिद्ध कोकणी मराठी दुकानात शिरलो. मालक गल्ल्यावर व चारपाच विक्रेते बसलेले. आम्ही दुकानात उभे व हे सर्व बसलेले.

"मला कोणी साड्या दाखवेल का?" असे मी वैतागून विचारले.

"काय किंमतीच्या साड्या पाहिजेत?" पुन्हा विचारणा.

"मला लग्नासाठी चांगल्या, बऱ्याच साड्या खरेदी करायच्या आहेत"

यावर एकजण म्हणाला, "पण किंमतीचा अंदाज? आमच्याकडे किंमतीप्रमाणे काऊंटर्स आहेत".

मी दुकानातून बाहेर पडलो. समोरच्या गुजराथी दुकानात गेलो. त्याने न कंटाळता इतक्या साड्या दाखवल्या की खरेदी पूर्ण करूनच तेथून बाहेर पडलो. ● ● ● ● ● ●

कर्नाटकातील अवघड बोगद्यांच्या कामासाठी कोकण रेल्वेचा तांत्रिक सल्लागार म्हणून माझा कारवार ते मंगलोर असा बराच प्रवास झाला. तसेच रत्नागिरीच्या आसपासच्या बोगद्यांच्या कामासाठी काही कंत्राटदारांचा तांत्रिक सल्लागार म्हणून खेड, चिपळून, रत्नागिरी इ. भागात फिरण्याची खूप संधी मिळाली. त्यानिमित्ताने माझा कोकणवासियांसी जो काय थोडाफार परिचय झाला त्यात आलेले अनुभव:

कोकणात इरिगेशनची सोय जवळजवळ नाहीच. त्यामुळे शेतात पावसाळ्यानंतर भाताचे एक पीक येते. त्याचे काम साधारण दिवाळीनंतर संपते. आंब्याची झाडे डिसेंबर-जानेवारीतच विकली जातात. काजूचे पीक साधारण एप्रिल-मे मध्ये तयार होते. मधल्या काळात बरेच लोक रिकामे असतात. परंतु आमच्या कामासाठी आमची इच्छा असूनही चांगल्या मजुरीवर पण कोकणी कामगार मिळाले नाहीत. केरळी, तेलगू, उडिया व नेपाळी कामगारांकडून काम करून घ्यावे लागले.

Marathe Pratishthan

# कोकणातील उद्योग विकासाच्या दिशा

**रत्नागिरी अधिवेशनात चर्चेसाठी तयार केलेले टिपण**

कोकणाची अर्थव्यवस्था प्रामुख्याने मुंबईतून चाकरमान्यांकडून येणाऱ्या मनीऑर्डरवर अवलंबून राहिली आहे. गेली काही वर्षे कोकणाच्या सर्वांगीण विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात आहेत. कोकणची नैसर्गिक परिस्थिती लक्षात घेऊन 'कोकणचा कॅलिफोर्निया' करण्याच्या महत्वाकांक्षेची वारंवार आश्वासन दिले जाते. कोकण रेल्वेचे कोकणी माणसाचे स्वप्न आता साकार होत आहे. त्यामुळे नजीकच्या भविष्यकाळांत कोकणचा कायापालट होण्याची दाट शक्यता आहे.

या दृष्टीने कोणते उद्योग-व्यवसाय करणे फायदेशीर होईल याबाबत या संमेलनात काही अर्थपूर्ण चर्चा व्हावी, मार्गदर्शन व्हावे हा हे संमेलन रत्नागिरीत भरविण्याचा एक महत्वाचा उद्देश आहे.

उद्योग-व्यवसाय क्षेत्रांत अनेक जाणकार अनुभवी, द्रष्टे कुलबांधव या संमेलनाला उपस्थित राहणार आहेत. तसेच कोकणात राहून जिद्दीने व्यवसाय करणारे कुलबांधवही या मेळाव्यात आहेत. या सर्वांच्या चर्चेतून कोकणातील कुलबांधवांच्या उद्योग-व्यवसाय विकासाला पोषक असे काही अर्थपूर्ण विधायक कार्य प्रतिष्ठानला करतां येईल का त्याचा शोध घेणे, प्रयत्नांची दिशा ठरवणे शक्य झाले तर ते प्रतिष्ठानच्या कार्याचे मानाचे पान ठरणार आहे. या चर्चेच्या दृष्टीने उपयुक्त अशी काही माहिती येथे संकलित स्वरूपात दिली आहे.

१. महाराष्ट्रातील निरनिराळ्या जिल्ह्यांच्या विकासातील असमतोल दूर व्हावा म्हणून वैधानिक विकास मंडळांची स्थापना करण्यात आली आहे. ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांच्या विकासाकडे उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाने खास लक्ष देण्याचे ठरविले आहे.

२. कोकण विकासाच्या कामावर लक्ष केंद्रित करणे, त्याला गती मिळावी म्हणून मंत्रिमंडळाची दर वर्षी एक बैठक कोकणात व्हावी असे राज्य शासनाने ठरविले आहे. त्यानुसार जून १९९६ व जून १९९७ मध्ये रत्नागिरीत मंत्रिमंडळाच्या बैठका झाल्या असून त्या वेळी कोकणाच्या विकासासाठी घोषित केलेल्या सर्व कार्यक्रमासंबंधीचे एकत्रित आदेश राज्य सरकारने १५ जुलै १९९७ च्या शासन निर्णयानुसार जाहीर केले असून या कालबद्ध कार्यक्रमाच्या पूर्ततेसाठी संबंधित प्रशासकीय विभागानी आपापल्या अखत्यारीतील कार्यक्रमांकडे सातत्याने लक्ष ठेवून नियंत्रण करायचे आहे.

३. कोकण विकासाच्या कालबद्ध कार्यक्रमानुसार **रत्नागिरी जिल्ह्यांत प्रामुख्याने फलोत्पादन व उद्योगावर, सिंधुदुर्ग जिल्ह्यांत पर्यटनावर आणि रायगड जिल्ह्यांत उद्योगावर** भर देण्यात यावा असे ठरविण्यांत आले आहे.

४. दर तीन महिन्यांनी या कालबद्ध कार्यक्रमाच्या प्रगतीचा आढावा विभागीय आयुक्त (मुंबई), आणि राज्य स्तरावर प्रधान सचिव (कोकण विकास) यांनी घ्यायचा आहे.

५. उद्योग-व्यवसाय विकासासाठी **चांगल्या वाहतूक व्यवस्थेची मुख्य गरज** असते. कोकण रेल्वे पूर्णांशाने कार्यरत झाली की मुंबईशी जलद संपर्क साधता येईल. रस्ते वाहतुकीवरील ताण कमी होईल. मुंबई-गोवा हा अतिवेगवान महामार्ग करण्याची योजना होत आहे. यांत मुबई ते महाड हा पहिला टप्पा १६० किलोमीटरचा असेल. रत्नागिरी येथील विमानतळाचा विकास करण्यात यायचा आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यांत आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यांत यायचा आहे. कोकणातील एकूण ४८ बंदरापैकी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेडी, विजयदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील रत्नागिरी, जयगड, दाभोळ आणि निवडी (परवडे) ही ६ बंदरे खाजगीकरणाच्या माध्यमातून विकसित करण्यात येत आहेत.

६. सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला आहे. पर्यटन विकासाबरोबरच पर्यावरणाचे योग्य संतुलन आणि संरक्षण यांवरहि या जिल्ह्यांत भर देण्यांत यायचा आहे. रासायनिक आणि अपायकारक उद्योगांना या जिल्ह्यांत यापुढे बंदी घालण्यात येणार आहे.

७. सिंधुदुर्ग जिल्ह्यांत स्थानिक लोकांना पर्यटन व हॉटेल सेवा यासंबंधी प्रशिक्षण देण्यासाठी एक प्रशिक्षण केंद्र स्थापन होणार आहे.

८. सिंधुदुर्ग जिल्ह्यात आंबोली हे थंड हवेचे ठिकाण म्हणून विकसित करण्यात येईल. तसेच शिरोडा, मिठबाव, मोचेमाड, तारकर्ली ही पर्यटन केंद्रे खाजगी उद्योजकांमार्फत विकसित करण्यात येतील. रत्नागिरी जिल्ह्यांत मार्लेश्वर व प्रचीतगड यांचा पर्यटन केंद्र म्हणून विकास करण्यांत येईल. पैकी मार्लेश्वर हे तीर्थक्षेत्र व पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यांत येईल.

९. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत निवळीफाटा (जि. रत्नागिरी) आणि महाड (जि. रायगड) येथे पंचतारांकित सुविधा असलेली औद्योगिक क्षेत्रे पुढील ५ वर्षात विकसित होणार आहेत. तसेच रत्नागिरी जिल्ह्यांत अतिरिक्त लोटे, दाभोळ टप्पा क्र. २, मार्ग ताम्हाणे व वेळदूर अशा ४ मोठ्या औद्योगिक वसाहती पुढील ५ वर्षात विकसित होणार आहेत.

१०. माणगांव-मागाड, श्रीवर्धन, दापोली, देवरुख, राजापूर, मालवण व सावंतवाडी येथे लघु/मध्यम औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची कामे सुरू आहेत. ती त्वरेने पूर्ण करण्यात येत आहेत.

११. कोकणातील अनुकूल **हवामान व जमीन फळबाग लागवडीसाठी** अतिशय योग्य आहे. आंबा, नारळ, काजू, चिकू, तसेच **मसाल्याची पिके** यांच्या लागवडीला कोकणात मोठा वाव आहे. फळांप्रमाणे **औषधी वनस्पती** हेहि कोकणाचे एक सुप्त वैशिष्ट्य आहे. सर्पगंधा, गुळवेळ, बाहावा, अनंतमूळ, वावडिंग, बेहडा, बिब्बा इ. अनेक प्रकारच्या औषधी वनस्पतींची योग्य प्रकारे जोपासना केल्यास आयुर्वेदिक औषधांच्या विकासाला चालना मिळेल.

१२. कोकणांत फळपिकांसाठी लागवडीखाली आणता येईल अशी ६ लाख हेक्टर पडीक जमीन आहे. यापैकी रोजगार हमी योजनेखाली आतापर्यंत १.२० लाख हेक्टर क्षेत्रावर आंबा व काजूची लागवड करण्यात आली असून पुढील ४ वर्षात



Marathi Pratishthan

१.२५ लाख हेक्टर क्षेत्र काजू व आंबा लागवडीखाली आणायचे आहे.

१३. फलोद्यान विकासाला गती प्राप्त व्हावी म्हणून कोकणाच्या ४ जिल्ह्यात २५ शासकीय रोपवाटिका आणि कोकण कृषिविद्यापीठांतर्गत दापोली, वाकोली, मुळघे, वेंगुर्ला येथील रोपवाटिका यांची उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी ठोस प्रयत्न करण्यात येत आहेत.

१४. फलोद्यान विकासाच्या दृष्टीने साठवणुकीसाठी शीतगृहे, कॅनिंग सेंटर्स, पॅकिंग करिता लघुउद्योग, विक्रीची व विशेषत: निर्यातीची व्यवस्था अशा सर्वंकष स्वरूपाच्या मोठ्या योजनेची शासनातर्फे आखणी होत आहे.

१५. कोकण कृषिविद्यापीठातर्फे वेंगुर्ला ७ ही काजूची नवी जात, रत्नागिरीतील शिरगांव कृषिसंशोधन केंद्राने सात वर्षाच्या संशोधनानंतर प्रसारित केलेली 'कोकण अमृता' ही कोकम लागवडीची नवी जात, फोंडाघाट कृषिसंशोधन केंद्राने निर्माण केलेली फोंडाघाट-१ ही बारीक दाण्याच्या भाताची नवी जात आणि दापोलीच्या वनस्पती शास्त्र विभागाने दुभत्या जनावरांसाठी विकसित केलेली कोकण राईस बीन-१ ही द्विदल चारापिकाची जात अशा पिकांच्या सुधारित जाती नव्याने प्रसारित केल्या आहेत.

**नवा दृष्टिकोन हवा**

कोकणातील पुढील काळातील उद्योग विकास कार्यक्रमांची दिशा वरील माहितीवरून स्पष्ट होईल. या संदर्भात कोकणातील शेती व अन्य व्यावसायिकांनी आपली परंपरागत विचारसरणी व जीवनपद्धती बदलायला हवी. नवीन शेती संशोधनाचा फायदा घेऊन उत्पादन वाढ करणे, फळफळावळ उत्पादनाबरोबरच त्यावर प्रक्रिया करण्याचे व्यवसाय, त्यापासून नवीन उत्पादने बनवण्याचे व्यवसाय, यांसारख्या पूरक उद्योगांची जोड देण्याचा विचार करायला हवा. पर्यटन विकासाबरोबरच अशा वस्तूंची मागणी वाढणार आहे.

पर्यटनकेंद्रांच्या विकासामुळे त्या त्या परिसरांत वाहतूक व्यवसाय, निवास व्यवस्था व्यवसाय, व्यापार, टुरिस्ट गाईड व्यवसाय, अशा व्यवसायाच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत. अनेक लोकांच्या घरांत थोडीशी फेर रचना करून अगर घराला लागून नवीन बांधकाम करून पर्यटकांची राहण्याची सोय करणे शक्य आहे. तसेच त्यांच्या चहापाण्याची, जेवण-खाणाची कोकणातल्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने सोय करण्यालाहि बराच वाव आहे.

**प्रतिष्ठान काय करू शकेल?**

सुधारित शेती, उत्पादनावर व पर्य ावर आधारित व्यवसाय, मोठ्या उद्योगांना पूरक व त्यांच्या उत्पादनावर आधारित छोटे छोटे उद्योग अशा उद्योग-व्यवसायात ज्या कुलबांधवांना स्वारस्य आहे, ज्यांना याबाबतीत काही मार्गदर्शन हवे आहे, अशा कुलबांधवांनी आपली निश्चित गरज सांगितली, तर संबंधित बाबतीतल्या, कुलबांधवांपैकी वा अन्य अनुभवी व जाणकार व्यक्तींशी संपर्क साधून त्यांचे मार्गदर्शन मिळवता येईल.

दुसरा पर्याय म्हणजे कोकणातल्या कुलबांधवांनी पुढाकार घेतल्यास त्यांना हव्या असलेल्या विषयावर अनुभवी व जाणकार व्यक्तींना कोकणात बोलावून चर्चासत्रहि आयोजित करता येणे शक्य आहे.


हार्दिक शुभेच्छा !

# विद्युत कॉर्पोरेशन

राणकपूर दर्शन, आळंदी रोड,
पुणे-४११००६.

सर्व इलेक्ट्रॉनीक, इलेक्ट्रीकल वस्तू
व फर्निचरचे विक्रेते



# सु-गीता मंडळ

परांजपे नगर - 401301

स्पष्ट उच्चार, विचार, आचार व प्रचार
या चार सूत्रांवर उभारलेले संस्कार केंद्र

स्वराज्याचे सु-राज्य घडविण्यासाठी
कृतज्ञ व कर्तबगार पिढी घडवू या

ज.गो.मराठे
संचालक सु-गीता मंडळ


Marathe Pratishthan

# नर्सरी व्यवसाय

**- सुरेश पांडुरंग, रत्नागिरी यांचे संमेलनातील भाषण**

संमेलनातील उपस्थित बंधु भगिनींनो, नमस्कार.

हे सत्र, उद्योग-व्यवसाय करणाऱ्या बांधवांनी आपल्या व्यवसायासंबंधी काही माहिती द्यावी या उद्देशाने ठेवलेले आहे. प्रथम माझा परिचय. मी **सुरेश पांडुरंग** (पृ.३२३), रहाणार रत्नागिरी. व्यवसाय नर्सरी, हापूस आंबा विक्री (दलाला मार्फत) आणि आंबा व्यवसायाकरिता लागणारे लाकडाचे खोके घाऊक पुरविणे.

सुरवातीची काही वर्षे किराणा मालाची दुकानदारी करावी असा विचार होता. म्हणून मोठ्या किराणा दुकानात काही वर्षे उमेदवारी करावी लागली. एकाच किराणा दुकानांत ठिकठिकाणी काम केल्यामुळे बराच अनुभव जमा झाला. त्या आधारावर भागीदारीत स्वतंत्र व्यवसाय सुरू केला. ३/४ वर्षानंतर स्वतंत्ररीत्या दुकान चालविले. शहराची वस्ती वाढू लागली तशी ठिकठिकाणी किराणा मालाची दुकाने सुरू झाली. स्पर्धा वाढली. नवा व्यवसाय सुरू करणे भाग होते म्हणून प्रथम नर्सरी सुरू केली. २०-२२ वर्षे झाली. प्रथमच सांगून ठेवतो. व्यवसाय संबंधी माहिती देत आहे म्हणजे गैरसमज होईल की माझा व्यवसायाचा एकूण व्याप प्रचंड असावा. परंतु नोकरी करण्यापेक्षा स्वतःचे व्यवसायात उत्पन्न जास्त आहे एवढेच.

नर्सरी व्यवसायात २ भाग असतात. कोय कलमे, भेट कलमे स्वतः तयार करणे व त्यांची विक्री करणे. या दोन्ही भागांची कार्यक्षेत्रे निरनिराळ्या ठिकाणी असल्यामुळे एकाच वेळी दोन्ही भागात काम करणारा नर्सरी मालक सहसा असत नाही. स्वतः कलमे तयार करण्याकरितां, स्वतःची बरीच जागा, लायक मातृवृक्ष किंवा कोयी यांची उपलब्धता आणि माती व मजूर यांची आवश्यकता असते. त्यामुळे हा भाग शहरापासून दूर खेडेगावांत ठेवणे अपरिहार्य होते. शहरात विक्री व्यवस्था ठेवणे फायदेशीर आहे. कारण कलम खरेदीदारांना फार लांब जावे लागत नाही, वाहने चटकन उपलब्ध होतात आणि नर्सरीच्या या भागाला तुलनेने मजूर कमी लागतात. माझा व्यवसाय तयार कलमे विकणे हा आहे.

रत्नागिरी शहरापासून १० मैल दूर माझी स्वतःची कलम बाग होती. परंतु कोकण रेल्वेने संपादित केलेल्या जमीनीत ही कलम बाग गेली. त्यामुळे सध्या मी निरनिराळ्या आंबा बागेच्या मालकांकडून त्यांच्या कलम बागा ठराविक मुदतीकरिता कराराने घेतो आणि मूळ मालकाला ठरलेली रक्कम देऊन बागेतील फळांची विक्री, मुंबई, पुणे या बाजारांत दलाला मार्फत करतो. करारानें घेतलेल्या बागेत पिकाचा नाश होऊ नये म्हणून फवारणी करणे, फळांचे चोरांपासून संरक्षण करणे, फळे तोडणे, त्यांची निवड करणे व लाकडी पेट्यांत भरून बाजारात पाठविणे ही कामे करावी लागतात. या शिवाय चिरकामाच्या गिरणीवर तयार लाकडी पट्ट्या घेऊन त्याचे आंबा भरण्याकरिता लागणारे खोके बनवून ते विकणे हाही एक छोटासा व्यवसाय मी करतो.

मनुष्यबळ उपलब्ध असल्यास, या सर्व व्यवसायांची खूप वाढ करता येईल. परंतु माझी अवस्था एक खांबी मांडवाप्रमाणे असल्यामुळे विस्तारीकरण मला शक्य नाही. या सर्व व्यवसायामध्ये माझी मुलगी सौ. सीमा संजय मुळ्ये हिची संपूर्ण साथ होती व आहे.

माझे हे शब्द आपण शांतपणे एकून घेतले याबद्दल मी आभारी आहे.

# वाचा व विचार करा

**- रमाकांत विद्वांस, (पृ.६२३), मुंबई.**

कोकणात पावसाचे समुद्रात वाहून जाणारे पाणी अडवून साठविण्याच्या योजना जवळजवळ नाहीत. त्यामुळे कोकणात सिंचन सुविधा (इरिगेशन फॅसिलिटीज) पण नाहीत.

पाऊस मुबलक म्हणजे जवळजवळ ४००० ते ५००० मि. मी. (१५० ते २०० इंच) पडतो. पण पावसाचे सर्व पाणी समुद्रात वाहून जाते. यामुळे कोकणात फक्त एक म्हणजे भाताचे पावसाळी पीक घेता येते व जवळजवळ ७ ते ८ महिने शेते उजाड असतात. पाण्याअभावी या काळात दुसरे एखादे पीक घेता येत नाही. कोकणात बऱ्याच जागी शेतातील काही भाग खडकाळ किंवा मुरमाड म्हणजे शेतीयोग्य नसतो. काही शेते पूर्णपणे शेतीयोग्य असतात.

समजा, अशा कोणत्याही शेतातील १० ते १२ टक्के भागात ४ मी. (१३ फूट) खोल खड्डा केला व त्यात पाणी साठून राहील म्हणजेच जमीनीत झिरपून जाणार नाही अशी व्यवस्था केली तर पावसाळ्यात केवळ त्या खड्डयावर पडणाऱ्या पाण्याने तो खड्डा पूर्ण भरून जाईल.

पालेभाजी सारखे एक पीक घेण्यास साधारण ४५० मि.मी. (१८ इंच) पाणी लागते. १० ते १२ टक्के जमीनीत साठविलेल्या ४ मी. (१३ फूट) खोल पाण्यावर, उरलेल्या ९० ते ८८ टक्के जमीनीत भाजीचे एक पीक सहज घेता येईल.

पालेभाजी हे फक्त एक उदाहरण. कोकणातील जमीन व हवामान पालेभाजीसाठी कदाचित योग्य नसेलही. योग्य असे पीक शोधणे शास्त्रज्ञ सुचवू शकतील. पूर्ण शेतीयोग्य जमीनीतूनही ९० ते ८८ टक्के भागात पावसाळी भाताचे एक व त्यानंतर दुसरे इतर एक अशी दोन पिके घेता आली तर १०० टक्के जमीनीतील भाताच्या एका पिकापेक्षा ते खचितच फायदेशीर ठरेल व दोन तीन वर्षात खड्डयावर केलेला खर्च पूर्णपणे भरून निघेल. खड्डा खणताना निघालेला दगड, मुरूम किंवा माती ही बांधकामासाठी किंवा इतर योग्य उपयोगात आणता येईलच. हा विचार कोणाला पसंत पडल्यास त्यांना तांत्रिक मदत व सल्ला मी देऊ शकेन.

••••••

कोकणातले आंब्याचे बागाइतदार साधारण डिसेंबरच्या सुमारास बाहेरील दलालांना आपली झाडे त्या वर्षासाठी एकरकमी भाडे घेऊन देऊन टाकतात. त्यानंतर अकाली पाऊस पडल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणास्तव आंब्याचे पीक

- पृष्ठ ३६ वर



Marathe Pratishthan

# व्यवसाय पुराण

- वामन गणेश (पृ. ५०३), नवी मुंबई.

व्यवसायात्मिका बुध्दिरेकेह कुरूनन्दन।
बहुशाखा ह्यनन्ताश्च बुद्धयोऽ व्यवसायिनाम् ॥
हे कुरुनन्दना - व्यवसाय म्हणजे कार्याचा निश्चय करणारी बुद्धी ह्या मार्गात एक म्हणजे एकाग्र असावी लागते. (श्री मद्भगवद्गीता २/४१)
कार्यनिश्चय करी जी बुद्धी ।
ती कार्यास आणते पूर्ण सिद्धी ।
अनिश्चयी असे जी बुध्दी । फोडि फाटे अनेक ती ॥

ज्यांच्या बुद्धीचा अशा प्रकारे एक निश्चय होत नाही त्यांच्या बुद्धी म्हणजे वासना अनेक फाटे फुटलेल्या व अनंत प्रकारच्या असतात. म्हणूनच मला असे सुचवायचे आहे उद्योगी मुलांना की त्यांनी आपल्याला उद्योगी, व्यासंगी व शेंडी तुटो वा पारंबी, उपाशी राहो की तुपाशी पण मी एकलव्याप्रमाणे उद्योगीच बनणार अशी स्वत:शी, आपल्या मनाशी खूणगांठ बांधून त्याप्रमाणे जे जे म्हणून उद्योगांशी निगडित असेल, दिसेल त्याच्या मागे लागावयास हवे एवढे निश्चित.

उद्योग मग लहान की मोठा. भांडवली की बिन भांडवली, रस्त्यावरचा की हातावरचा, म्हटले तर हातावरचा की पोटावरचा, डोक्यावरचा की पायाखालचा, की ओरड्याचा असे कितीतरी प्रकारांनी उद्योग करता येतात.

मुलांनो तुम्ही कधी पुण्याला गेलात तर साधारणत: दुपारी २.३० ते ३.००च्या दरम्यान 'पेरू घ्या पेरू' असे म्हणून तुमची वामकुक्षी हमखास घालवून तुम्हाला जागे करतो. अथवा 'रद्दीऽऽ' असे म्हणून ओरडतो. हा ही एक उद्योगाचाच प्रकार आहे तर सायकलवरून हंडा घेऊन जाणारे दूधवाले. गुरांना घास घेऊन जाणारे शेतकरी वगैरे.

मुंबई शहरांत लोटा घेऊन येणारे कच्छी, लमाणी असे निरनिराळ्या प्रांतातले लोक त्यांच्या उद्योगांच्या कल्पना. त्यांचे उद्योग तंत्र, कामाची पद्धति ह्या सर्वांचा आपण अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरेल.

खरं पाहता आपल्या देशांत जात ही उद्योग व्यवसायांतूनच निर्माण झाली. शिंपी, सोनार, लोहार, कोष्टी, माळी वगैरे. पण आताच्या काळात त्या सर्वांना सामाजिक विकृतीचे स्वरूप दिले गेले आणि एकूणच समाज स्वास्थ्य घातक बनत चालले. आपल्याला तर मुसलमान, ख्रिस्ती, पारशी ह्या उद्योगी जाती विषयींच बोलावयाचे आहे. त्यांची उद्योगी भाषा शिकावयास हवी. तरच उद्योगी मराठे निर्माण होण्यास मदत होईल, आपली जात श्रेष्ठ आहे की कनिष्ठ असा वाद न घालता आपण आपली जात उद्योगाची बनवावयास हवी व तशी ती टिकविण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करावयास हवे.

मी भाजी विकतो असे सांगणारा ब्राम्हण मला भेटला. तर दुसरा एक बाटा शू विकतो, त्याचे दुकान आहे. दूधवाले मराठेसुद्धा कर्जतला आहेत. कोणी मोटरचे गॅरेज चालवतात तर कोणी मालाची चढउतार करतात. म्हणजेच काय तर प्रत्येकाने स्वत:चे कार्यक्षेत्र धुंडाळणे जरूर आहे. मागे तर एका मराठे बंधुंनी रद्दीचे दुकान काढण्यासाठी काय काय गोष्टींची जरूरी असते असेही विचारले होते. अशा कित्येक बंधु भगिनींनी मार्गदर्शनासाठी पत्र पाठविली असूनही आज आपण त्यांच्या शंकांचे निरसन करू शकलो नाही कारण अजून आपल्या ह्या उद्योगी विभागाची स्थापना कार्यरत झालेली नाही.

तर त्याकरिता आता नवी पिढी प्रथम प्राधान्य देऊन उद्योगाची मुहूर्तमेढ रोवते आहे त्याबद्दल नवचमूंचे अभिनंदन. परंतु त्याचबरोबर एखादा उद्योग लवकर यश मिळवून देतो तर एखादा उद्योग अतिशय परिश्रम केल्यावरच फळ देतो. चालायचेच काही झाडे लवकर फुलतात, बहरतात, व गोड गोड फळे देतात. तसंच उद्योगी वृक्षांचे पण आहे. चिकाटी, सचोटी, जिद्द ही महत्वाची अंगे आहेत हे विसरून चालणार नाही.

तद्वतच उद्योगाने प्रदूषण होऊ न देता, आपल्या उद्योगाने लोकांना त्रास होणार नाही याची उद्योग सुरू करण्यापूर्वीच काळजी घेणे हितावह आहे. ह्याचा अर्थ कायदेशीर तरतुदी, सरकारी कामे दाखले वगैरे वगैरे. आणि स्वत:ची आर्थिक परिस्थिती ही महत्वाची बाब आहे. कारण आजकाल टि.व्ही. वरती उद्योग मालिका आपण पाहातोच. मोठ मोठे बेत आखले जातात आणि शेवटी पश्चाताप करावयाची पाळी येते. म्हणजेच हातचे सोडून पळत्याच्या मागे लागण्यासारखाच प्रकार होतो तेव्हा उद्योगी चुकतो. सारासार विचार करा अभ्यास करा प्रथम आपले उद्योगी मन तयार करा. एवढेच तुर्तास पुरे!

***

---

वाचा व विचार करा, पृष्ठ. ३५ वरून

कमी आले तरी त्याची झळ या बागाईतदारांना पोचत नाही.

जर एखाद्या वर्षी आंब्याचे पीक कमी आले तर शहरात आंब्याचे भाव कडाडतात. पीक भरपूर आले तरी भाव मात्र फार पडत नाहीत.

या सर्व व्यवहारात बागाईतदारांना व्यावसायिक धोका न पत्करता ठराविक रक्कम मिळून जाते. पण दलाल व घाऊक व्यापारी मात्र यावर खूप जास्त कमाई करतात.

एकेका भागातल्या बागाईतदारांनी एकत्र येऊन आपापल्या सहकारी संस्था स्थापल्या व संस्थेमार्फतच घाऊक व्यापाऱ्यांना आंबे पुरविण्यास सुरवात केली तर दलालीचे पैसे हे संस्थांकडे राहतील. पीक कमी आले तरी या संस्थांना योग्य भाव वाजवून घेता येतील.

१९९२ साली कोकण रेल्वेच्या मार्गाचा अभ्यास करण्यासाठी मी कोकणात खूप भ्रमंती केली. भेटेल त्याला ही कल्पना सांगितली. परंतु अशा संस्था निघाल्याचे ऐकिवात आलेले नाही.

***


मराठे प्रतिष्ठानला हार्दिक शुभेच्छा

अनिल श्रीपाद मराठे
१०, जीवनतारा को. हौ.सो, पाचपाखाडी, ठाणे - ४००६०२.

नारायण जनार्दन जाईल
१२, साधना सदन, हायवे सोसायटी, वेस. ह्वी. रोड, नौपाडा, ठाणे(प) -४००६०२

श्री. शरदचंद्र वामन मराठे
३१, गोविन्द निवास, ब्राह्मण सोसा., नौपाडा, ठाणे -४०० ६०२

श्री. प्रभाकर दत्तात्रय मराठे
आदर्श को.हौसिंग सोसायटी, नौपाडा, ठाणे-४००६०२


Marathe Pratishthan

# सहज करता येणारे सेवा उद्योग

सेवा (सर्व्हिस) इंडस्ट्रीला पैसा-भांडवल कमी प्रमाणात लागते. मात्र पैशाचे भांडवल कमी लागले तरी कष्ट व जिद्द असावी लागते.

अनेक सेवा उद्योग घरच्या घरी, छोट्याशा जागेत करता येतात. हल्ली अनेक स्त्रिया नोकरी व व्यवसायानिमित्त घराबाहेर पडत असल्यामुळे यातील अनेक उद्योगांना महत्व प्राप्त झाले आहे.

नीटनेटकेपणा, मृदू बोलणे या गोष्टी जशा सेवा उद्योगाच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत त्याचप्रमाणे दिलेला शब्द पाळून बाजारात पत निर्माण करणे महत्वाचे आहे. जे पैसे येतात ते आपले नाहीत, योग्य वेळी ते परत करून फक्त फायदा आपला आहे हे समजून व्यवहार करत राहिले पाहिजे.

सहज करता येणारे काही सेवा उद्योग.

१) युरेका फोर्बसने जेव्हा व्हॅक्यूम क्लिनर बाजारात आणली, त्यावेळी एका उद्योजक महिलेने घर, ऑफिस साफ करून देण्याचा व्यवसाय सुरू केला. महिन्यातून ४ वेळा तुमच्या घरी अथवा ऑफिसमध्ये येऊन घर साफ करून देणे हा व्यवसाय चांगलाच वाढला.

२) टेलिफोनमध्ये सुगंधी डिस्क घालून देणे.

३) ऑफिस अथवा घरात कृत्रिम पुष्परचना करून देणे व पुष्परचना दर आठवड्याला बदलणे. लायब्ररीप्रमाणे ती बदलणे.

४) खऱ्या रोपट्याची अथवा झाडांची पण लायब्ररी म्हणून उद्योग करता येईल.

५) लहान मुलांना खेळण्यासाठी लागणारी खेळण्यांची पण लायब्ररी म्हणून ठेवता येईल.

६) पुस्तकांची लायब्ररी हा उद्योग आहे.

७) वॉशिंग मशीन आणून ज्यांच्याकडे मशीन नाही, त्यांचे कपडे धुवून देणे.

८) घरघंटी - आटा चक्की आणून स्वच्छ चांगले पीठ घरी करून देणे.

९) भाज्या स्वच्छ निवडून, साफ करून देणे.

१०) दूध घरी पोचवणे.

११) क्लासेस - निरनिराळ्या वर्गाचे क्लास घेणे, स्कॉलरशिप, भाभा वैज्ञानिक, नॅशनल स्कूल टॅलेंटच्या स्पर्धा परीक्षांचे क्लास घेणे.

१२) फ्रेंच, जर्मन (फॉरेन लॅंग्वेज)चे क्लास घेणे. त्यांचे दुभाषा म्हणून काम करणे.

१३) बँकिंग परीक्षा अथवा आय.ए.एस. च्या स्पर्धा परीक्षांचे क्लास घेणे.

१४) कॉम्प्युटर क्लास घेणे.

१५) कंपन्यांची उत्पादने घरोघरी विक्री करणे अथवा त्यांच्या उत्पादनाचे नमुने घरोघरी मोफत देणे अथवा नवीन उत्पादनाच्या जाहिरातीसाठी दुकानाबाहेर विक्री करणे हा मुलींचा, मुलांचा ग्रुप करून उद्योग करावा लागतो.

१६) शाळेच्या सहली व इतर सहली आखणे.

१७) मासिकांकरिता जाहिरात आणणे म्हणजेच ॲडव्हर्टायझिंग एजन्सी चालवणे.

१८) इस्टेट एजंट म्हणून काम करणे, घरे, दुकाने मिळवून देणे.

१९) विजेची व टेलिफोन बिले भरणे, बँकेतील काम करणे, रेल्वे, एअर तिकिटे काढून देणे.

२०) दिवाळी गिफ्ट कंपन्यांना पुरवणे.

२१) स्क्रीन प्रिंटिंग करून देणे. ऑफिसला सर्व स्टेशनरी माल पुरवणे.

२२) पाळणाघरे चालवणे, संस्कारवर्ग घेणे.

२३) बेकिंग, कुकरी क्लास, हस्तकला अथवा फुले बनवणे, त्याचे क्लास.

२४) फोटो काढणे, व्हिडीओ शुटिंग करून देणे.

२५) लग्नाची खरेदी करून देणे, पत्रिका बनवणे त्याचप्रमाणे वरातीची गाडी सजवणे.

२६) लग्नसमारंभात मेंदी, केशभूषा करून देणे किंवा ब्युटी पार्लर चालवणे.

२७) एल. आय. सी. एजंट म्हणून काम करणे.

२८) एअर कंडिशनर भाड्याने देणे.

२९) गाड्या भाड्याने देणे, स्कूल बस चालवणे.

३०) पासपोर्ट, व्हिसाची कामे करून देणे.

३१) प्लंबिंग, इलेक्ट्रिसिटी, रंगाची कामे.

३२) ॲडव्हर्टिजमेंटची पॅनेल भाड्याने रंगवणे.

३३) शाळेला लागणाऱ्या सर्व गोष्टी पुरवणे, खडू, डस्टर, राख्या, चॉकलेट, फुगे, झेंडे, फिनेल, पौष्टिक खाणे मुलांना देणे.

३४) हॉटेल बुकिंग करून देणे.

३५) पार्टी ॲरेंज करणे, डोहाळे जेवण, मंगळागौरीच्या पूजासामानापासून, स्वयंपाकापर्यंत सर्व तयारी करणे.

३६) कुरिअर सर्व्हिस.

३७) पाळीव प्राण्यांची पैदास - गांडूळशेती, मधमाश्या, ससा, कुत्रे, मांजर, पक्षी, मासे.

३८) शेअर ब्रोकर.

३९) डबे तयार करून देणे.

४०) इंटिरिअर डेकोरेशन करून देणे.

४१) वेगवेगळ्या कंपनीत नोकरी मिळवून देणे.

४२) तोरण, मोत्याबरोबर फुलांच्या माळा बनवून कार्यालय सुशोभित करणे.

४३) स्मृतिचिन्हे बनवून देणे, बॅजेस बनवणे.

हार्दिक शुभेच्छा

**S. P. Services**

डेकोरेल तसेच सर्व प्रकारच्या पडद्यांची शिलाई व फिरींगची कामे.

Sobeet कंपनीची लॅच लॉक फिटींग आणि घरगुती उपयुक्त वस्तूंची विक्री करतो. जसे टी.व्ही., वॉशींग मशीन, प्लॅस्टिक कव्हर्स, इ.

**संपर्क साधा :- एस.एस.मराठे**, किर्तीनगर, सह.गृहरचना संस्था, एफ-६, वडगांव बुद्रक, पुणे-४११०४१. (फोन ५३०२८४)

*With Best Compliments From*

**Nutan Udyog**

**Shri Sadanand R. Khambete**
"Bangashree", Edulji Road, Charai,
Thane 400 601 (Maharashtra)
Tel.: 534 5970

Marathe Pratishthan

# सिंधुदुर्ग जिल्हा "पर्यटन जिल्हा" म्हणून घोषित.

**२६ ऑगस्ट १९९७च्या शासन निर्णयाचा गोषवारा (गृहविभाग पर्यटन)**

महाराष्ट्र राज्याच्या दक्षिण टोकाला असलेला त्याचप्रमाणे गोवा या राज्यालगत असलेला पण खास विशिष्टपणे नटलेला छोटासा सुन्दर भाग हा सिंधुदुर्ग जिल्हा आहे. या जिल्हयाला एक निसर्गाचे देणे लाभलेले आहे. अतिशय रम्य, सुमारे १२ ते १४ रुपेरी वाळूच्या समुद्रसपाट्या, भोवतालची हिरवीगार भात शेती, तसेच माडाची वने, सुपारीच्या बागा, काजू-आंबा, फळबागा आणि किनाऱ्यालगतचा निळाभोर अरबी समुद्र या सर्व वैशिष्टयांनी हा जिल्हा संपन्न आहे. या निसर्ग सौंदर्यामुळे सिंधुदुर्ग सहाजिकच एक आकर्षक पर्यटन जिल्हा बनू शकेल.

सुंदर निसर्गाबरोबर या जिल्ह्यात अनेक पुरातन आणि ऐतिहासिक महत्वाची स्थळे, पारंपारिक लोककला आणि संस्कृती यांचीही जोड लाभलेली आहे. त्याचप्रमाणे गोवा राज्याकडे आकर्षित झालेल्या पर्यटकांचा ओघ सिंधुदुर्ग जिल्हयाकडे वळविण्यासाठी या जिल्हयाचे ठिकाण फायदेशीर ठरणार आहे. सिंधुदुर्ग जिल्हयात पर्यटनाचा विकास करण्यासाठी एक विशेष संधी उपलब्ध आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयाचा पर्यटनाच्या दृष्टीने सर्वांगीण विकास करण्यासाठी हा जिल्हा 'पर्यटन जिल्हा' म्हणून घोषित करण्यात आला आहे. या जिल्ह्याचा विकास आणि स्थानिक लोकांना रोजगाराची निर्मिती या दोन्ही गोष्टी 'इको फ्रेंडली टुरिझम' म्हणून साध्य होतील. सिंधुदुर्ग जिल्हा हा शासनाने पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केल्यामुळे संबंधित विभागांकडून खालीलप्रमाणे कार्यवाही व्हावयाची आहे.

**१) नगर विकास विभाग** :- सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या प्रादेशिक विकास आराखड्यास सन १९८७-८८ मध्ये अंतिम स्वरूप देण्यात आलेले आहे. या देण्यात आलेल्या अंतिम स्वरूपामध्ये सुधारणा करण्याची सूचना सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटनावर आधारित विकास आराखडा तयार करण्यासाठी नेमण्यात आलेल्या तज्ज्ञ समितीने केली आहे. आणि सुधारित विकास आराखडा हा नगर विकास विभागास पाठविण्यात आलेला असून, नगर विकास विभागाने विहित कार्यपध्दतीचा अवलंब केल्यानंतर सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या विकास आराखड्यामध्ये सुधारणा करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करायची आहे.

**२) उद्योग विभाग** :- सिधुदुर्ग जिल्ह्यामध्ये यापुढे रासायनिक आणि अपायकारक उद्योगांना बंदी घालण्याबाबतचे आवश्यक ते आदेश जारी केले जातील.

**३) पर्यावरण विभाग** :- सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटन विकासाबरोबर पर्यावरणाचे योग्य संतुलन आणि संरक्षण यावर भर देण्यात येईल. याबाबत योग्य ते नियोजन पर्यावरण विभागाने करायचे आहे.

**४) सांस्कृतिक कार्य विभाग** :- ऐतिहासिक वारसा असलेल्या स्थळांचे भारतीय पुरातत्व विभाग/ राज्य पुरातत्व विभागाने सहकार्य घेवून जतन करायचे आहे.

**५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग** :- जिल्ह्यामध्ये स्थानिक लोकांना रोजगाराची निर्मिती होण्याच्या उद्देशाने या जिल्ह्यामध्ये स्थानिक लोकांना पर्यटन व हॉटेल सेवा संबंधी प्रशिक्षण देण्याबाबत प्रशिक्षण केंद्र स्थापन करायची आहेत. यासाठी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी योग्य अशा जमीनीची निवड करून ती अशा संस्थेसाठी राखून ठेवायची आहे.

**६) सामान्य प्रशासन विभाग (नागरी विमान चालन)** :- भविष्यामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये आंतरराष्ट्रीय पर्यटकांचा ओघ विचारात घेता, म्हापण ता. वेंगुर्ला या ठिकाणी विमानतळ विकसित करण्यात यावयाचा आहे. विमानतळ विकसित करण्यासाठी भुसंपादनाची कार्यवाही करावयाची आहे.

**७) मूलभूत सोयी** :- सिंधुदुर्ग जिल्ह्याचा सर्वांगीण आणि पद्धतशीरपणे विकास करण्यासाठी संबंधित मंत्रालयांनी विविध विभागांना रस्ते विकास व पूल, पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा, दळणवळण, इत्यादी मूलभूत सोयी, निर्माण करण्याच्या दृष्टीने दरवर्षी तरतूद करणे शक्य व्हावे यादृष्टीने योजनेचे आराखडे व अंदाजपत्रक तयार करून पुढील ९व्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीमध्ये ही कामे टप्याटप्याने पूर्ण होतील, याची दक्षता घ्यावयाची आहे.

या जिल्ह्याचा पर्यटन दृष्ट्या विकास करण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी मुलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी गरज भासल्यास खाजगी उद्योजकांचा, त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय व वित्तीय संस्थांचाही सहभाग घेण्यात यावयाचा आहे.

***

## कोकणातील पर्यटन विकासाची स्थळे

राज्य सरकारने पर्यटन विकासासाठी निरनिराळ्या जिल्ह्यातली समुद्रकिनाऱ्याची ३२ ठिकाणे निश्चित केली आहेत. त्यांची जिल्हावार यादी खाली दिली आहे.

**ठाणे जिल्हा**

(१) बोर्डी, (२) माहीम-केळवा (३) सातपाटी-शिरगांव, (४) डहाणू, (५) वसई

**मुंबई जिल्हा**

(१) गोराई - मानोरी, (२) आकसे

**रायगड जिल्हा**

(१) रेवस - मांडवा - किहीम, (२) कामोटे - अलिबाग, (३) आळशी-नागांव, (४) काशीद - नाडगाव, (५) हरिहरेश्वर, (६) दिवेआगर, (७) मुरूड किल्ला

**रत्नागिरी जिल्हा**

(१) आंजर्ले, (२) हर्णे-मुरूड-लाडघर, (३) गुहागर, (४) वेळणेश्वर, (५) हेदवी, (६) नांदिवडे, (७) गणपतीपुळे, (८) भंडारपुळे, (९) भाट्या - कुर्ली

**सिंधुदुर्ग जिल्हा**

(१) मीठ - मुंब्री - कुनकेश्वर, (२) मिठबाव - हिंदळे, (३) विजयदुर्ग किल्ला, (४) सिंधुदुर्ग किल्ला, (५) तारकर्ली - देवबाग, (६) शिरोडा, (७) मोचेमाड, (८) वेंगुर्ली - अुभादांडा, (९) मालवण

***


*मराठे प्रतिष्ठानला हार्दिक शुभेच्छा*

**श्री. नारायण त्रिंबक मराठे** — ५, मदन विलास, रामवाडी, नौपाडा, ठाणे-४००६०२

**श्री. श्रीकांत जगन्नाथ मराठे** — ४६, नवयुग सोसा., विष्णुनगर, नौपाडा, ठाणे-४००६०२

Marathe Pratishthan

# पर्यटन विकासासाठी सरकारी प्रोत्साहने

महाराष्ट्र सरकारने पर्यटन व्यवसायाशी संबंधित सर्व प्रकारच्या कामांना "उद्योग" म्हणून १.१०.९३ पासून मान्यता दिली आहे. ३ नोव्हेंबर १९९३ रोजी जारी केलेल्या शासकीय आदेशानुसार पर्यटन व्यवसायाला प्रोत्साहन मिळावे म्हणून "पॅकेज स्कीम ऑफ इन्सेंटीव्हज फॉर टुरिझम १९९३" जाहीर केली आहे.

या योजनेखाली किमान १० लाख रुपये भांडवली खर्चाच्या पर्यटन विकासाच्या सोयींसाठी सरकारकडून विक्रीकर, जकात यांमधून सूट, इलेक्ट्रिसिटी ड्यूटीचा परतावा, लक्झरी टॅक्स मधून सूट, वीजदर व पाणी वापर खर्चाचा दर यांमधील वाढीपासून सूट, नवीन टॅक्सेसवर बंदी इ. सवलती इ.स. २००३ पर्यंत मिळायच्या आहेत. या सवलती खालील प्रकारच्या सोयींसाठी मिळू शकतात.

(१) हॉटेल्स, रिझॉर्टस् व हेल्थ फार्मस्
(२) मोटेल्स (३) अपार्टमेंट हॉटेल्स (४) वॉटर स्पोर्टस् (५) आर्ट व क्राफ्ट व्हिलेजेस (६) गोल्फ कोर्सेस (७) कँपिंग व टेंट फॅसिलिटीज (८) अॅम्युझमेंट पार्कस् (९) ऑरियल रोप-वे (१०) हेरिटेज होटेल्स (११) कन्व्हेन्शन सेंटर्स

या योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र टुरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन मार्फत व्हावयाची आहे. कोकणातल्या खालील विभागात या सवलती उपलब्ध होऊ शकतील.

१. **रत्नागिरी जिल्हा -** राजापूर, रत्नागिरी, गुहागर, दापोली आणि मंडनगड तालुके.
२. **सिंधुदुर्ग जिल्हा -** वेंगुर्ले, मालवण आणि देवगड तालुके.
३. **रायगड जिल्हा -** अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन, अुरण तालुके.
४. **ठाणे जिल्हा -** डहाणू, पालघर, वसई व ठाणे तालुका.

---

# एकमेका साह्य करू

### गोव्यात राहण्याची सोय

गोवा फिरायला, पहायला येणाऱ्या कुलबांधवांची रहाण्याची सोय श्री. मोरेश्वर हरी मराठे आपल्या म्हापसा रोड रेल्वे स्टेशन नजीक असलेल्या घरात करू शकतील (विनामूल्य नव्हे). असे ते कळवतात. गोवा दर्शनाची व्यवस्थाही ते करून देऊ शकतील. पूर्व सूचना देऊन जावे.

**पत्ता:-**
**मोरेश्वर मराठे,**
'स्वप्न', शिरसई, पो. थिवी (गोवा),
पिन - ४०३ ५०२. फोन - ०८३२/२९८४१८

### हसतमुख, निर्व्यसनी, सेल्समन हवे

यशवंत विठ्ठल मराठे (प्रा.) लि. यांना त्यांच्या दुकानात काम करण्यासाठी निर्व्यसनी, हसतमुख, सेल्समन हवे आहेत. शिक्षणाची अट नाही. मात्र मराठी, इंग्रजी, हिंदी भाषा बोलता यायला हव्या. वास्तव्य शक्यतो डोंबिवली ते भांडुप पर्यंतच्या परिसरात असावे. अडीच तीन वर्षात ६-७ हजारापर्यंत पगार मिळू शकेल.

कुलबांधवांना, ब्राम्हणांना, मराठी माणसांना प्राधान्य.

८-१० वर्षांनी स्वतंत्र व्यवसाय करण्याची इच्छा व जिद्द असणाऱ्या मंडळींना ही सुसंधी आहे.

लिहा : **श्री. आनंदराव मराठे, यशवंत विठ्ठल मराठे (प्रा.) लि, स्टेशन रोड, ठाणे ४००६०१.**
**(फोन : ५३३४७३५ / ५३३२२२४)**

### बांधकाम सुपरवायझर हवा

नाशिक येथे बांधकामावर देखरेख करण्यासाठी मराठे कुलबांधवांपैकी उत्साही व कामसू तरुणांना संधी देण्यात येईल. सिव्हिल इंजिनिअरिंगची पदविकाधारक असल्यास अधिक पसंती. योग्य गरजू तरुणांनी **श्री. वि.वा. खांबेटे यांच्याशी नाशिकला टे.क्र. ३५५०८९ वर संपर्क साधावा.**

---


हार्दिक शुभेच्छा

**डॉ. सुप्रिया रघुनाथ मराठे** B.H.M.S.
**होमिओपॅथिक फिजिशियन**

१४, खोत बिल्डिंग, अक्षीकर पथ, 'लाजरी' दुकानासमोर,
दादर (पश्चिम), मुंबई - ४०० ०२८.
टेलिफोन नं. ४३६१६०८

रत्नागिरी संमेलनास शुभेच्छा

**सुरेंद्रनाथ मराठे**
**सौ. सुलभा मराठे**

घाटकोपर, मुंबई.


Marathe Pratishthan

With Best Compliments From

# PARANJAPE BUILDERS PVT. LTD.



34, M.G. Road, Vile-Parle (East),
Bombay-400 057.
Phones : 614 6688/616 1602


Marathe Pratishthan

# विभाग ३ : 'मराठे' कोण? कुठले? मराठ्यांचे ललित लेखन

पृष्ठ


१. मराठे कुलाविषयी सामान्य माहिती ४१

मराठे आडनावाची व्युत्पत्ती, मराठ्यांचे मूळ गांव, मराठ्यांची घराणी, कुलदेवता व कुलाचार

२. मराठे कुलवृत्तांतातील घराणी, पिढ्या, जिवंत पुरुष व्यक्ती ४४

३. काणी सौव्वाराची (चित्पावनी भाषेचा नमुना) - विनायक गोपाळ मराठे ४६

४. प्रतिष्ठान वृत्त ४७

५. सभासद वृत्त ४८

६. जाईल कुटुंबीयांसाठी आवाहन ४८

७. गुणवंतांच्या पाठीवर कौतुकाची थाप ४९

८. **एकमेकां साह्य करू**

गोव्यात रहाण्याची सोय ३९

हसतमुख निर्व्यसनी सेल्समन हवे ३९

बांधकाम सुपरवायझर हवा ३९

मुंबईत रहाण्याची सोय ४९

**मराठ्यांचे ललित लेखन**

९. जीवन धारा (कथा) - विठ्ठल महादेव मराठे ५०

१०. घर (कविता) - गायत्री गणेश जोशी ५१

११. छत्रीचं फूल (कविता) - ऋता संजय करमरकर ५१

१२. मराठे संमेलनाची 'गावाकडची गोष्ट' - श्रीपाद माधव (आप्पा) मराठे ५२

१३. बेस्ट: नारी, नोकरी, निवारा, आणि खूप काही - गजानन भास्कर मराठे ५४

१४. रसिक (कविता) - मोरेश्वर हरी मराठे ५५

१५. परि विसरु नको आम्हाला (कविता) - हेमंत यशवंत मराठे ५५

१६. संसार (कविता) - मैना गोविंद मराठे ५५


## सभासदवृत्त पाठवण्याचे आवाहन

कुलबांधवांच्या जीवनातल्या महत्त्वपूर्ण घडामोडीची माहिती सर्वांपर्यंत पोचवणे हे हितगुजचे कामच आहे. मात्र त्यासाठी आपण अशी माहिती आमच्यापर्यंत पोचवली पाहिजे. (स्वत:विषयीची माहिती कळविण्यात संकोच बाळगण्याचे कारण नाही. आजचे युग प्रसिद्धीचे आहे; स्वत:ची प्रसिद्धी स्वत:च करावी लागते.)

स्वत:विषयी तसेच आपल्या माहितीतल्या अन्य कुलबांधवांविषयीची माहिती 'सभासद वृत्त' मधे छापण्यासाठी पाठवून सहकार्य करावे असे सर्व कुलबांधवांना आवाहन आहे.

तसेच कुलबांधवांचे सर्व प्रकारचे लेखनहि 'हितगुज'ला हवे आहे. - **संपादक**

Marathe Pratishthan

WITH BEST COMPLIMENTS FROM

# A.T.E. ENTERPRISES LIMITED

**Associated Textile Engineers**

P.G. Chakradeo
Product Manager

61, Dr. S.S. Rao Road, Parel (East), Mumbai-400 012. India
Phone : 91-22-4139193/4143918/4144138
Res. : 91-22-5425165/5433344
Fax : 91-22-4139335

Marathe Pratishthan

# मराठे कुलाविषयी सामान्य माहिती

मराठे आडनाव चित्तपावन, देवरुखे, सारस्वत, कराडा इत्यादी ज्ञातीत आहे. चित्तपावन कपिगोत्री. मराठे आडनावामध्ये विद्वांस, खांबेटे, चक्रदेव, जोशी, जाईल, फडणीस व रटाटे या आडनावांचा समावेश होतो. या आडनावांच्या मंडळींना आपले मूळचे आडनाव मराठे असल्याबद्दल जाणीव आहे. यापैकी काही विद्वांस व रटाटे मंडळी अलीकडे आपले मूळचे मराठे हे आडनाव लावू लागली आहेत.

मराठे यांचे गोत्र कपि, वेद ऋग्वेद, शाखा शाकल आणि सूत्र आश्वलायन. कपिगोत्रामध्ये आश्वलायन सूत्र असलेली आडनावे मराठे, विद्वांस, खांबेटे, चक्रदेव, जोशी, रटाटे, साने, भागवत, लाटे, मालदेव.

## मराठे आडनावाची व्युत्पत्ती

मराठे आडनावाची व्युत्पत्ती समजली नाही. आडनावांची प्रथा प्राचीन नाही. शिलालेख, ताम्रपट यामध्ये व्यक्तींचा उल्लेख करताना आडनावाचा उल्लेख नसून केवळ गोत्र व सूत्र यांचा उल्लेख आढळतो. अलीकडे सुमारे चारशे वर्षापासून आडनावाची प्रथा विशेष चालू झालेली दिसते. काही आडनावे गावाच्या नावाला कर लावून झाली आहेत. काही धंदा, वृत्ति, अधिकार, इत्यादिकांवरून पडलेली आहेत. कित्येक आडनावांना वरील कारणे लागू पडत नाहीत; अशा आडनावांपैकी मराठे हे आडनांव आहे.

मराठे आडनावातून निघालेल्या आडनावांपैकी **विद्वांस नावाची व्युत्पत्ति** पुढीलप्रमाणे समजते - मराठे घराण्यातील एक पुरुष अत्यंत विद्वान असल्यामुळे त्याला 'विद्वांस' असे म्हणू लागले. पुढे या पुरुषाच्या वंशजांचे विद्वांस असे आडनाव पडले.

मराठे घराण्यातील एक पुरुष यात्रेस गेला. त्याने यात्रेहून परत येताना पुष्कळ चक्रांकित देव आपल्याबरोबर आणले व ते लोकांस दिले. यावरून त्या पुरुषाला चक्रदेव म्हणू लागले. नंतर **त्याच्या वंशजांचे चक्रदेव आडनाव पडले.**

कोकणात एका गावी मराठे व पाटणकर ही घराणी राहात होती. भाऊबंदकीच्या त्रासाने या दोन घराण्यातील पुरुष दापोली तालुक्यात दुमदेव या गावी राहावयास गेली. **तेथे गेल्यावर मराठे यांनी जाईल आडनाव धारण केले** आणि पाटणकर यांनी माटे उपनाव धारण केले, अशी दंतकथा आहे.

**मराठे घराण्यातील एक पुरुष** प्रसिद्ध ज्योतिषी होऊन गेला. त्यावरून **त्याच्या वंशजांना जोशी म्हणू लागले**. खांबेटे आणि रटाटे या आडनावांची व्युत्पत्ति समजली नाही.

## मराठ्यांचे मूळ गाव

सर्व मराठे मंडळींचा कोकणातील **मूळ वास्तव्याचा एकच गाव नाही**. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये देवाचे गोठणे, शिवने, कुर्धे, नेवरे, पुरळ, वाडेपडेल इत्यादी गावी मराठे यांची पुष्कळ वर्षांपूर्वी वस्ती होती. आणि आजही शिवने, कुर्धे, पुरळ, वाडेपडेल या गावी मराठ्यांची वस्ती आहे. या मूळच्या गावांहून त्याच जिल्ह्यात कळंबुशी, पालशेत, आडिवरे, हिंदळे, विलये इत्यादी गावी मराठे मंडळी जाऊन स्थायिक झाली आणि काही अन्यत्र गेली.

आज मराठे मंडळींचे वास्तव्य काशी, प्रयागपासून गोमांतक, दक्षिण कन्नड येथपर्यंत ठिकठिकाणी आहे. तसेच इंग्लंड, अमेरिका, आफ्रिका, मध्यपूर्वेचे देश या भागातही व्यवसायाकरिता ही मंडळी जाऊन राहिली आहे.

सध्या निरनिराळया ठिकाणी राहात असलेल्या **मराठे मंडळींच्या मूळ वास्तव्याच्या ठिकाणावरून त्यांचे समान्यतः पुढीलप्रमाणे ४ विभाग होतात** - (१) रत्नागिरी जिल्हा (२) सिंधुदुर्ग जिल्हा (३) गोमांतक आणि (४) दक्षिण कन्नड. मराठे कुलवृत्तांतात समाविष्ट होणाऱ्या विद्वांस, खांबेटे इत्यादिकांची मूळ ठिकाणे रत्नागिरी जिल्ह्यातच असल्यामुळे त्यांचे वेगवेगळे विभाग होत नाहीत.

**विद्वांसांचे** रत्नागिरी जिल्ह्यातील **मूळ ठिकाण केळशी**. आजही तेथे त्यांची वस्ती आहे. विद्वांस यांच्या वंशावळीत १५ पिढ्या आहेत. तेव्हा ३७५ वर्षे विद्वांस हे आडनाव रूढ आहे असे दिसते.

**खांबेटे यांचे मूळ वास्तव्याचे गाव** दापोली तालुक्यात बुरोंडी, कोळथरे, केळशी, आंजर्ले हे आहेत. आज कोळथरे, केळशी, आंजर्ले या गावी खांबेटे यांची वस्ती आहे. खांबेटे यांच्या वंशावळीत १२ पिढ्या आढळतात.

**चक्रदेवांचा** एक मूळ पुरुष दाखविता येतो. यांचा **मूळ गाव कुर्धे**. चक्रदेव यांच्या वंशावळीत १४ पिढ्या आहेत. यावरून साडेतीनशे वर्षे चक्रदेव आडनाव प्रचलित आहे. कुर्धे येथे चक्रदेव यांचे स्वतंत्र ठिकाण असून त्यास 'ठिकाण चक्रदेव' असे म्हणतात.


**मराठे प्रतिष्ठान शुक्लेंदुप्रमाणे विकसित होवो**

**ही व्याडेश्वरचरणी प्रार्थना**

**Anything & Everything of Capsules**

**Nitin S. Marathe**

**Naupada, Thane. Ph. 542 3788**

**हार्दिक शुभेच्छा**

**वसुंधरा डेकोरेटर्स**

**पेंटिंग कॉण्ट्रॅक्टर्स**

नीलमणी, ३२, शिवाजी पार्क,

डॉ. मधुकर राऊत रोड,

दादर, मुंबई - ४०० ०२८.


Marathe Pratishthan

**जोशी यांचा मूळ गाव** राजापूर तालुक्यातील **आडिवरे.** तेथे सध्या त्यांची वस्ती नाही. आडिवऱ्याहून काही जोशी पेण व कोर्ले येथे गेले आणि काही जोशी मालवण तालुक्यात मसुरे येथे स्थायिक झाले. यांच्या वंशावळीत जास्तीत जास्त १२ पिढ्या आहेत.

**जाईल यांचा मूळ गाव** दापोली तालुक्यातील **दुमदेव** आहे. आज दुमदेव येथे जाईल यांचे वास्तव्य नाही. यांच्या वंशावळीत १४ पिढ्या आहेत.

**रटाटे यांचा मूळ गाव** दापोली तालुक्यातील **जालगाव**. तेथून हे कायगाव - टोके येथे व नंतर काशीस गेले. यांच्या वंशावळीत ११ पिढ्या आहेत.

## मराठ्यांची घराणी

मराठे कुलवृत्तांत ११५ घराणी असून त्यांपैकी मराठे यांची ९६, विद्वांसांची ४, खांबेटे यांची ८, चक्रदेवांचे १, जोशी यांची ३, जाईलांचे १ व रटाटे यांची २ अशी घराणी आहेत.

एकंदर ११५ घराण्यांपैकी ३२व्या घराण्यात अधिकात अधिक एकूण पुरुष व्यक्ती ७७१ असून जिवंत पुरुष व्यक्ती ३५० आहेत. तसेच लहानात लहान म्हणजे जिवंत पुरुष व्यक्ति केवळ एकच असलेली घराणी ८, १३, ४० व ८८. घराणे २०, ३१, ९४, ९५ मध्ये एकहि जिवंत पुरुष व्यक्ति नाही.

२८व्या घराण्यातील काही मराठे मंडळी **दीक्षित हे आडनाव**, आणि ३२व्या घराण्यातील काही लोक **फडणीस हे आडनाव** लावतात. तसेच ९७व्या घराण्यांतील काही विद्वांस मंडळी आणि ११४व्या घराण्यातील काही रटाटे मंडळी मराठे हे आडनाव लावतात.

मराठे आडनावाच्या मंडळींपैकी काहींना महाजन, ग्रामोपाध्ये, धर्माधिकारी, चिटणीस, देशमुख, नाईक, पंत इ. उपपदे आहेत.

## कुलदेवता आणि कुलाचार

मंगलकार्याचे प्रसंगी व वार्षिक नैवेद्याचे वेळी कुलदेवतांचे स्मरण करावे लागते. ज्या देवतेच्या कृपाप्रसादामुळे आपल्या पूर्वजांचा अभ्युदय झाला अशी भावना असते, ती देवता त्या घराण्यात परंपरेने कुलदेवता मानली जाते. घराण्यात परंपरागत असलेल्या कुलदेवता व कुलाचार यासंबंधाने निश्चित माहिती फारच थोड्या मंडळींना असते. स्थलांतर झाल्यामुळे मूळच्या देवतेचे विस्मरण होते.

देवतेच्या मूळ नावाचा उल्लेख काही लोक भिन्न प्रकारे करतात. व्याडेश्वर याबद्दल वाडेश्वरी असे लिहितात, जैनवीर याबद्दल जैतवीर किंवा जैतीर, वरदायिनीबद्दल वरदान वर्धनी इत्यादी. देवता एक सांगणारी घराणी मूळची एकाच ठिकाणी राहाणारी असून त्यांचा मूळ पुरुष एक असावा असे अनुमान करता येईल. व्याडेश्वर कुलदेवता सांगणाऱ्या मंडळींचे वास्तव्य गुहागर किंवा त्याच्या आसपास असावे, आदित्यनाथ सांगणारी मंडळी बहुधा नेवरे येथील, वीरभद्रेश्वर सांगणारी मंडळी पुरळ येथील, आणि वेतोबा कुलदेवता सांगणारी मंडळी आजगावची असावी.

मराठे घराण्यांतील मंडळींच्या कुलदेवता मुख्यत्वे गुहागर येथील व्याडेश्वर, आंबे येथील जोगेश्वरी व कोल्हापूर येथील महालक्ष्मी या आहेत. मराठे यांच्या ९६ घराण्यांपैकी १५ घराणी कन्नड जिल्ह्यातील

*हितगुज रत्नागिरी अधिवेशन विशेषांकास शुभेच्छा*

**कर्नल प्रमोदन प्रभाकर मराठे (निवृत्त)**
**डॉ. सौ. स्वाती प्रमोदन मराठे**
डेंटल सर्जन

ए-१, 'उषा',
४८ तुळशीबागवाले कॉलनी,
सहकार नगर नं. २,
पर्वती, पुणे - ४११००९.

Marathe Pratishthan

आहेत. या प्रांतातील मराठे मंडळी लक्ष्मीनारायण कुलस्वामी मानतात. या देवतेचे स्थान त्यांना माहीत नाही. बाकीच्या ८१ घराण्यांपैकी २९ घराण्यांतील लोकांनी व्याडेश्वर, जोगेश्वरी, महालक्ष्मी यांपैकी कोणतीच कुलदेवता सांगितली नाही. त्यांच्यापैकी काहींनी देवांच्या [illegible] कुलदेवता मात्र सांगितल्या आहेत.

व्याडेश्वर कुलदेवता सांगणारी घराणी १४, जोगेश्वरी सांगणारी घराणी १४ व महालक्ष्मी कुलदेवता सांगणारी घराणी ३० आहेत. तुळजापूरची भवानी कुलदेवता सांगणारी घराणी दोन आहेत.

मराठे कुलात **ज्या देवतांना वार्षिक नैवेद्य [illegible] त्या सर्व देवतांची नावे अकारादि क्रमाने पुढे दिली आहेत.** ज्या देवतेचा गाव [illegible] तो त्या देवतेच्या नावापुढे कंसात दिला आहे.

[illegible], अंबा (कोकिसरे व धामापूर), [illegible], आदित्यनाथ (नेवरे), आमणेश्वर (बुरंबाड), [illegible] (नेरूर), कवलाई (टेंबवली), कमादेवी ([illegible]), काळभैरव, काळकाई, खाजणादेवी (पाल), [illegible], [illegible] (नारिंग्रे), गांगो भराडी (शिवने), [illegible], गोवर्धनेश्वर (देवाचे गोठणे), घोडेमुख, [illegible], [illegible], चौंडेश्वरी, जाखाई, जानाई, जैतवीर ([illegible]), जैनदेव (शिवने), जोखाई, जोगेश्वरी (आंबे), ज्योतिबा (कोल्हापूर), डोंगरादेवी (डोंगर), दुर्गा (विलये), देवी ([illegible]), धोपेश्वर (राजापूर), नवलाई, नागदेव ([illegible]), [illegible] (राजापूर), पाचाची पूर्वा, पावणाई, [illegible], पूर्वाचारी, बहिरी (नागाव), बहिर्जी, ब्रम्हन्देव, [illegible], भगवती (देवली), भवानी (तुळजापूर), [illegible] (देवाचे गोठणे), भावाई (नारिंग्रे), भुमका ([illegible]), भूतनाथ, भैरोबा (सातारा), मल्लिकार्जुन, [illegible] (आडिवरे), महापुरुष, महालक्ष्मी (कोल्हापूर, [illegible], [illegible]), महाविष्णु (कुर्धे), माउली (रेडी), [illegible], रवळनाथ (आजगाव), रामलिंग (तुड्ये, गोवा), [illegible] ([illegible], विलये, नारिंग्रे, हिंदळे), लक्ष्मीनारायण ([illegible] व कन्नड जिल्हा), लिंगेश्वर (इळये), वडदेव ([illegible]), वरदायी, वर्धनी, वाघजाई, व्याडेश्वर (गुहागर), [illegible] (डोंगर), वीरभद्रेश्वर (पुरळ), वेताळ ([illegible]), शंभुमहादेव, शांतादुर्गा, सत्येश्वर (आडिवरे), [illegible] (कुर्धे, आजगाव), सागरेश्वर (देवराष्टे), सातेरी ([illegible]), [illegible] (सिद्धेश्वर व सुर्ल, गोवा), सोमेश्वर (शिरगाव), स्थानपुरुष, स्थानेश्वर (शिवने), हरिहरेश्वर (हरेश्वर), हसळादेवी (देवाचे गोठणे), हेडेश्वर (उपळे), क्षेत्रपाल (होडावडे), इत्यादी.

वरील देवतांना देवदिवाळीस नैवेद्य घालतात. काही घराण्यात देवदिवाळीशिवाय बलिप्रतिपदा, फाल्गुनी पौर्णिमा व श्रावणी सोमवार या दिवशी नैवेद्य घालतात. काही घराण्यांत कोकणातील देवांस वार्षिक नैवेद्य घालीत नाहीत.

आश्विनातील **नवरात्र** व **मंगल कार्यानंतर बोडण हे आचार बहुतेक घराण्यांत आहेत.** साधारणतः रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात राहात असलेल्या घराण्यांत घरी नवरात्र करण्याची चाल दिसत नाही. गावातील देवीच्या देवळातच त्यांचे नवरात्र होत असते. मराठे यांच्या चारपाच घराण्यांत चंपाषष्ठीस **खंडोबाची तळी भरणे** इत्यादी आचार आहेत. हे आचार कोकण सोडून देशावर बरीच वर्षे स्थायिक झालेल्या घराण्यांत रूढ झालेले दिसतात. मराठे यांच्या बारातेरा घराण्यांत **गोंधळाची व ओहर जाण्याची** म्हणजे नूतन वधूवरांनी कुलदेवतेच्या दर्शनास जाण्याची **चाल** आहे. दोन तीन घराण्यांत **गिरीचा व्यंकोबा** हे दैवत असून **त्याचे पारणे करण्याची चाल** आहे. एक दोन घराण्यांत **भाद्रपदातील गणपति** आणण्याची चाल नाही. क्रमांक २९ व ६५ या घराण्यांत अनुक्रमे झडके व वाडवळ हे विशिष्ट आचार आहेत.

विद्वांस यांची ४ घराणी आहेत, त्यांमध्ये **जोगेश्वरी व कोल्हापूरची महालक्ष्मी या कुलदेवता आहेत. याशिवाय पुढील देवता विद्वांस मंडळी मानतात.** व्याघ्रेश्वर (आसूद), महालक्ष्मी (केळशी), कालभैरव (बामणोली), जीवनेश्वर (श्रीवर्धन), हरिहरेश्वर (हरेश्वर), विष्णु, शंकर, बहिरी इत्यादी. या देवतांना देवदिवाळीस नैवेद्य घालतात. काही कुटुंबात फाल्गुनी पौर्णिमेसही नैवेद्य असतात. आश्विनातील नवरात्र, बोडण भरणे हे सामान्य आचार आहेत. लोहगड येथील विद्वांस मंडळी चंपाषष्ठीस खंडोबाची तळी भरतात.

**खांबेटे यांची आठ घराणी** आहेत. यांतील मंडळी जोगेश्वरी, आदित्यनाथ, कोळेश्वर, जाखाई, जोखाई (कोळथरे), लक्ष्मीकेशव (तुरवडे), महालक्ष्मी, बहिरी (केळशी), दारवठकरीण (बुरोंडी), साळकाय, गोळकाय या देवतांना देवदिवाळीस नैवेद्य घालतात. काही खांबेटे मंडळी बलिप्रतिपदा, फाल्गुनी पौर्णिमा व धुळवड या दिवशीही नैवेद्य घालतात. आश्विनातील नवरात्र व बोडण हे आचार आहेत.

**चक्रदेव यांचे एकच घराणे** असून व्याडेश्वर (गुहागर), जोगेश्वरी (आंबे), महालक्ष्मी (कोल्हापूर), सर्वेश्वर (कुर्धे), रवळनाथ, आदित्यनाथ, पावणाई, महापुरुष, वास्तुपरुष, गावराखा इत्यादि देवतांना देवदिवाळीस नैवेद्य घालतात. काही कुटुंबात गुढीपाडवा, फाल्गुनी पौर्णिमा व रंगपंचमी या दिवशीही नैवेद्य असतात. आश्विनातील नवरात्र व बोडण हेही आचार आहेत.

**जोशी यांची ३ घराणी** आहेत. हीं मंडळी महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती, सत्येश्वर, काळेश्वर, नगरेश्वर, रवळनाथ (आडिवरे), ब्रम्हदेव, जुगाई, जैनदेव, गांगोभराडी, रामेश्वर, सोमेश्वर (कोर्ले), शांतादुर्गा, काळभैरव, भावई, ब्रम्हनदेव (हिंदळे), यांना देवदिवाळीस नैवेद्य घालतात. काही मंडळी लक्ष्मी केशव कुलदेवता मानतात. आडिवरे घराण्यात गोंधळाची चाल आहे.

**जाईल यांचे एक घराणे** आहे. ही मंडळी महालक्ष्मी (कोल्हापूर), व्याडेश्वर (गुहागर), दुमदेव (दुमदेव), बहिरी, क्षेत्रपाळ, चिमा देवी, गणपति, वास्तुपुरुष यांना नैवेद्य घालतात. आश्विनी नवरात्र, बोडण व गोंधळ इत्यादि आचार आहेत.

**रटाटे यांची दोन घराणी** आहेत. या घराण्यांतील मंडळी महालक्ष्मी (कोल्हापूर), विंध्यवासिनी (रावतळे), व्याघ्रेश्वर, पन्हाळजा, पांगुळजा, बहिरी, गणपति यांना देवदिवाळीस नैवेद्य घालतात. काही कुटुंबात चैत्री व श्रावणी पौर्णिमा या दिवशीही नैवेद्य असतात. आश्विनातील नवरात्र, बोडण, गोंधळ हे आचार आहेत. काशी येथील रटाटे घराण्यात बालाजीचे पारणे करण्याची चाल आहे.

**(मराठे कुलवृत्तांतावरून)**

Marathe Pratishthan

# मराठे कुलवृत्तांतातील घराणी

| आडनाव | घराण्यांचे क्रमांक | घराण्यांची संख्या | घराण्यातील जिवंत पुरुष व्यक्ती |
|---|---|---|---|
| मराठे | १ ते ९६ | ९६ | ३५२९ |
| विद्वांस | ९७ ते १०० | ४ | ३५३ |
| खांबेटे | १०१ ते १०८ | ८ | २४९ |
| चक्रदेव | १०९ | १ | २०६ |
| जोशी | ११० ते ११२ | ३ | ७५ |
| जाईल | ११३ | १ | ५० |
| रटाटे | ११४ व ११५ | २ | १८ |
| | एकंदर | ११५ | ४४८० |

## प्रत्येक घराण्यातील पिढया व जिवंत पुरुष व्यक्ती १९९१

मराठे घराणी १ ते ९६

| घराणे क्रमांक | घराण्याचे नाव | घराण्यातील पिढ्या | जिवंत पुरुष व्यक्ती |
|---|---|---|---|
| १ | पुरळ-विजयदुर्ग | १२ | १९८ |
| २ | पुरळ-कालवी | ११ | १०० |
| ३ | पुरळ-वसई | १० | २७ |
| ४ | पुरळ-नागाव | ७ | १६ |
| ५ | पुरळ-पुणे | ११ | २० |
| ६ | पुरळ-कोचरे | ११ | २५ |
| ७ | पुरळ-तळेगाव ढमढेरे | ६ | २ |
| ८ | पुरळ | ६ | १ |
| ९ | वाडे-पडेल | १३ | १४३ |
| १० | वाडे पडेल-मालदौली | ९ | २५ |
| ११ | वाडे पडेल-अकोला | ९ | १७ |
| १२ | वाडे पडेल-पुणे | ८ | ६ |
| १३ | वाडे पडेल-रोहे | ९ | १ |
| १४ | वाडे पडेल-सातारा | ९ | ७ |
| १५ | हिंदळे-खुडीपाट | ९ | ८२ |
| १६ | हिंदळे-पालघर | ८ | ९ |
| १७ | हिंदळे-सोलापूर | ७ | ८ |
| १८ | हिंदळे | ९ | ३१ |
| १९ | हिंदळे-अलिबाग | १३ | १५ |
| २० | इळये-वाई | ८ | ० |
| २१ | कोकिस्त्रे | ८ | ८ |
| २२ | नारिंग्रे-इचलकरंजी | १० | ९ |
| २३ | कुर्धे | १४ | ९१ |
| २४ | कुर्धे | १० | ७ |
| २५ | कुर्धे-सिद्धेश्वर | १२ | ९० |
| २६ | नेवरे-पुणे | ११ | २० |
| २७ | नेवरे-भोगाव | ९ | ३० |
| २८ | नेवरे-पुणे-वसई | ११ | १३ |
| २९ | नेवरे-औरंगाबाद | ९ | २७ |
| ३० | नेवरे-करंजगाव | १३ | ९ |
| ३१ | नेवरे-पेण | ७ | ० |
| ३२ | देवाचे गोठणे | १३ | ३५० |
| ३३ | देवाचे गोठणे-भोर | ७ | १५ |
| ३४ | देवाचे गोठणे-अष्टमी | ९ | २८ |
| ३५ | विलये | १५ | २२० |
| ३६ | आडिवरे-शिरगाव | १२ | १६ |
| ३७ | आडिवरे-राजापूर | ६ | ६ |
| ३८ | आडिवरे-चिंचवड | १२ | १२ |
| ३९ | आडिवरे-कवाड | ६ | २ |
| ४० | आडिवरे | ५ | १ |
| ४१ | शिवने | ११ | १७१ |
| ४२ | शिवने | १३ | २२ |
| ४३ | शिवने-गोरेगाव | १० | ५७ |
| ४४ | शिवने-ग्वाल्हेर | ५ | ५ |
| ४५ | कोळथरे-पिलिभीत | ८ | ५ |
| ४६ | कळंबुशी | १३ | २४० |
| ४७ | पालशेत | १३ | ७३ |
| ४८ | वेंगुर्ले-कराची-तळकट | ११ | ३८ |
| ४९ | वेंगुर्ले-प्रयाग | १० | ४१ |
| ५० | वेंगुर्ले | ७ | ६ |
| ५१ | वेंगुर्ले-कोल्हापूर-पुणे | ७ | ५ |
| ५२ | वेंगुर्ले-सांगली | ८ | ३५ |
| ५३ | वेंगुर्ले-बडोदे | ६ | ९ |
| ५४ | वेंगुर्ले-गणेशवाडी | १० | ४७ |
| ५५ | रेडी | ७ | ७ |
| ५६ | रेडी | ७ | ८ |
| ५७ | रेडी-हरकूळ | १० | ६९ |
| ५८ | देवली | ७ | ४ |
| ५९ | धामापूर | ७ | १७ |
| ६० | आजगाव-मळेवाड | १० | ४८ |
| ६१ | आजगाव-ऐनापूर | १० | ५० |
| ६२ | आजगाव-अनगोळ | १३ | १११ |


**With Best Compliments From**

# M. S. Associates Engineers

598/99, Sadashiv Peth,
Laxmi Road, Pune - 411030.

हार्दिक शुभेच्छा

## महाराष्ट्र इंडस्ट्रीज डिरेक्टरी

महाराष्ट्रातील सर्व उद्योग धंद्याचे अेकत्रित संकलन

विधाता अपार्टमेंटस् , २रा माळा, दत्त मंदिरासमोर,
कॉलेज रोड, चेंदणी, ठाणे-४००६०१.
टेलि. ५३३६५१४/५४३१४९२ फॅक्स - ०२२-५३६६६६५

Marathe Pratishthan

| घराणे क्रमांक | घराण्याचे नाव | घराण्यातील पिढ्या | जिवंत पुरुष व्यक्ती |
|---|---|---|---|
| ६३ | आजगाव-इचलकरंजी | ११ | २९ |
| ६४ | आजगाव-ग्वाल्हेर | ७ | ५ |
| ६५ | आजगाव (कांदेरकर) | ९ | १५ |
| ६६ | आजगाव (पंत) | १३ | ४ |
| ६७ | गुळुंब (देस) | १० | ३४ |
| ६८ | गुळुंब (पाळव) | ८ | २१ |
| ६९ | माठ-होडावडे | १४ | ४० |
| ७० | गोमांतक | १० | ५१ |
| ७१ | गोमांतक | ९ | १२० |
| ७२ | गोमांतक | ९ | ७५ |
| ७३ | गोमांतक | १० | ४४ |
| ७४ | कानडा | ८ | १८ |
| ७५ | कानडा | ७ | ६८ |
| ७६ | कानडा | ७ | ११ |
| ७७ | कानडा | १२ | ७४ |
| ७८ | कानडा | ८ | २० |
| ७९ | कानडा | ५ | ३ |
| ८० | कानडा | ६ | ३ |
| ८१ | कानडा | ८ | ३१ |
| ८२ | कानडा | ६ | १० |
| ८३ | कानडा | ३ | ५ |

| घराणे क्रमांक | घराण्याचे नाव | घराण्यातील पिढ्या | जिवंत पुरुष व्यक्ती |
|---|---|---|---|
| ८४ | कानडा | ४ | २ |
| ८५ | कानडा | ८ | १६ |
| ८६ | कानडा | ७ | ९ |
| ८७ | कानडा | ६ | १४ |
| ८८ | कानडा | ४ | १ |
| ८९ | श्रीवर्धन | ५ | २ |
| ९० | महाड | ७ | १४ |
| ९१ | कुर्ला | ६ | ४ |
| ९२ | पुणे | ५ | ४ |
| ९३ | इंदूर (घ. १ मध्ये समाविष्ट) | | |
| ९४ | ग्वाल्हेर | ३ | ० |
| ९५ | काशी | ३ | ० |
| ९६ | गया | ८ | २५ |

**विद्वांस घराणी ९७ ते १००**

| | | | |
|---|---|---|---|
| ९७ | विद्वांस, केळशी-गुळसुंदे | १४ | १५१ |
| ९८ | विद्वांस, वावशी | १२ | ११६ |
| ९९ | विद्वांस, बामणोली | १३ | ७० |
| १०० | विद्वांस, लोहगड | ८ | १६ |

**खांबेटे घराणी १०१ ते १०८**

| घराणे क्रमांक | घराण्याचे नाव | घराण्यातील पिढ्या | जिवंत पुरुष व्यक्ती |
|---|---|---|---|
| १०१ | खांबेटे, बुरोंडी | १२ | ९० |
| १०२ | खांबेटे, केळशी | १० | ४० |
| १०३ | खांबेटे, हर्णे | १० | १२ |
| १०४ } १०५ | खांबेटे, आंजर्ले | १४ | ६७ |
| १०६ | खांबेटे, आंजर्ले | ८ | १९ |
| १०७ | खांबेटे, आंजर्ले | ८ | २० |
| १०८ | खांबेटे, आंजर्ले | ५ | १ |

**चक्रदेव घराणे १०९**

| | | | |
|---|---|---|---|
| १०९ | चक्रदेव, कुर्धे | १३ | २०६ |

**जोशी घराणी ११० ते ११२**

| | | | |
|---|---|---|---|
| ११० | जोशी, आडिवरे-पेण | ८ | ९ |
| १११ | जोशी, आडिवरे-कोर्ले | ११ | २७ |
| ११२ | जोशी, हिंदळे-मसुरे | ९ | ३९ |

**जाईल घराणे ११३**

| | | | |
|---|---|---|---|
| ११३ | जाईल, दुमदेव | १३ | ५० |

**रटाटे घराणी ११४ व ११५**

| | | | |
|---|---|---|---|
| ११४ | रटाटे, जालगाव | ११ | १४ |
| ११५ | रटाटे, जालगाव-काशी | ८ | ४ |
| | एकंदर | | ४४८० |


अधिवेशन विशेषांकास शुभेच्छा!



**श्री. मुकुंद कृष्ण मराठे**

**न्यू उत्तम रबर इंडस्ट्रीज**
**पुणे**

**१२७९, शुक्रवार पेठ,**
**पुणे -४११ ००२**
**फोन - ४७९२७३**

**मराठे प्रतिष्ठान रत्नागिरी संमेलनास**
**शुभेच्छा !**

**व्यंकटेश मार्गदर्शन केंद्र**
**संचालिका - सौ. नीलांबरी रमेश मराठे**
M.A.M.Ed

I.Q आणि APTITUDE चाचण्या देऊन
शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन केले जाते
वेळ - सकाळी १० ते १ सायं. ५ ते ८

६४३, नारायण पेठ, अप्पा बळवंत चौक,
प्राथमिक नू. म . वि. शाळेसमोर,
पुणे-४११०३०. (फोन-४५६२७०)




Marathe Pratishthan

# काणी सोंव्वाराची

**चित्तपावन कोकणस्थ ब्राम्हणांची भाषा चित्पावनी. अजूनहि द.कानडा, गोवा व कोकणाच्या काही भागात ही भाषा बोलली जाते तिचा एक नमुना. पेश केला आहे विनायक गोपाळ (पृ.६९) माहीम, मुंबई यांनी**

आयका परमेश्वरा सोंव्वारा, तुमची काणी. आटपाट नगर सलॉँ. त्यांहां एक राजा सलॉ. मॉठॉ शिवभक्त. तॅचॅ मनात आयलां की म्हादेवाचॉ गाभारॉ दुधान भरॅचॉ. पण तां घडचां कसां? तॅचॅ प्रधानान युक्ती सांगलीन, राजन दवंडी पिटलीन. 'गावांतलॅ सगळे लोकांय आपलॅ घरचां सगळां दूध घेवनी दर सोंव्वारां म्हादेवाचॅ दॅवळांत पूजाला यॅव्वॅचां'. सगळॅ जण भ्यालॅ. कोणीच घरांत दूध थेयलां नाय. सगळां दूध दॅवळांत घायलां. गांवांतलां सगळां दूध गाभारॅंत पडलां, तरी दॅवाचॉ गाभारॉ भरलॉ नाय.

गांवांत एक म्हातारी सली. त्या म्हाताऱ्यान आपलां घरचां काम उरकलान. भुर्गेबाळांना जॅव्वॅ खायवॅ घायलान. लेकी सुनांना न्हायवॅ घायलान. गायवासरांना चार घायलीन. सगळेंचॉ आत्माराम गार कॅलॉन. थोडी गंधफुलां घेतली, तांदुळाचे चार दाणॅ घॅतलॅन, दोन बॅलाची पानां घेतलीन अणि तांबुलीभरी दूध घेवनी म्हातारी सगळॅँ उपरांत दॅवळांत आयली. मनोभावान पूजा केलीन. थॉडां दूध नेवेद्याला थेयलान. दॅवाची प्रार्थना केलीन. 'जय दॅवा म्हादॅवा, नंदिकेसरा, राजान खूप दूध तुजॅ गाभारॅंत घायलान. तुजॉ गाभारॉ भरलॉ नाय. माजॅ चुळकॉभरी दुधान तॉ कसॉ भरनार? पण मॅ आपली तां तुला भक्तीभावान अर्पण करसां', असां म्हणनी उरलॅलां दूध गाभारॅंत अर्पण कॅलान.

अणि एकदम चमत्कार जालॉ. म्हातारी परतली अणि गाभारॉ भरनी गॅलॉ. गुरवान तां बगलान. तेणी राजाला कळयलान. कसां जालां कोण जाणॅ. दुसरॅ सोंव्वारां राजान दॅवळात शिपाय बेसयलॅन. तरीही कांयच कळलां नाय. चमत्कार मात्र तसॉच जालॉ. पुढां तिसरॅ सोंव्वारा राजा स्वता दॅवळांत बॅसलॉ. म्हाताऱ्यान दूध घालतांच गाभारॉ भरलॉ. तशी राजान म्हाताऱ्याचॉ हात धरलॉन. म्हातारी भ्याली. त्याला राजान अभय दिलां. तेडला म्हाताऱ्यान सांगलान - 'तुज्या आज्ञान वासरांचॅ, पॉराबाळांचॅ आत्मॅ तळतळलॅ. तां दॅवाला आवडलां नाय. म्हणी गाभारॉ भरलॉ नाय'.

चौथॅ सोंव्वारां राजान पूजा केलीन. बोड्यॅचेडींना गायवासरांना दूध थेयलान आणि उरलॅलां दूध दॅवाला दिलान. हात जोडनी प्रार्थना केलीन. दॉळॅ उघडुनी बगसॅ जालॅ दॅवाचॉ गाभारॉ भरलॅलॉ. राजाला आनंद जालॉ. तेणी म्हाताऱ्याला इनाम दिलान. ती लेकीसुनांना घेवनी सुखान ऱ्हॅंव लागली. तसॅ तुमी आमी नांदॉ या. ही साठां उत्तरांची काणी पांचा उत्तरी सुफळ संपूर्ण.


**स्पर्धेच्या पुढे एक पाऊल टाका**

इंटरनेटवर जाहिरात करा.

जलद,

किफायतशीर,

सरस,

दर्जेदार,

अद्ययावत,

तत्पर

**Get Global - Logon !**

**व्यावसायिक व विवाहविषयक जाहिरातीसाठी**

संपर्क : LogonIndia

२९१ श्रीनिवास, वीर सावरकर मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२८.

दूरध्वनी : ४४४ ३७ ४० पेजर : ९६२४-२३४५४९

**हितगुज सभासदांकरिता खास सवलत**



**MEI FINNED TUBES & FINNED COILS**



* Continuous Spirally Wound Finned Tubes with Crimpped Fins.
* Made On Automatic Special Fin Tube Making Machines.
* Super Quality - Maximum Contact of Core Tube & Fins.
* More Heat Transfer Surface Area in Compact Place
* Higher Heat Transfer Co-Efficient

CONTACT :

MR. S. K. MARATHE / MR. MILIND S. MARATHE

**MARATHE ENGINEERING INDUSTRIES**

4, MUNICIPAL INDUSTRIAL ESTATE, K. KHADE MARG, JACOB CIRCLE, MUMBAI - 400 011

* TEL. : 307 8392 * FAX : 307 8392


Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

**कार्यकारी मंडळ**

सप्टेंबर ते नोव्हेंबर या कालावधीत १३ व २७ सप्टेंबर, १८ व २५ ऑक्टोबर आणि ८ व २२ नोव्हेंबर रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. १३ सप्टेंबरच्या सभेत रत्नागिरी येथे व्हावयाच्या ६व्या मराठे परिवार संमेलनाच्या स्वागत समितीचे नावे आणि ४ व ५ ऑक्टोबरच्या संमेलनाच्या कार्यक्रमाची रूपरेषा पक्की करण्यात आली. या सभेला खुडीपाट मधील पुरामुळे विस्थापित झालेल्या कुलबांधवांपैकी एव८ श्री. [illegible] (पृ.११७) हे मुद्दाम उपस्थित होते. त्यांनी पुरामुळे कुलबांधवांची जी दैना झाली त्याचे सविस्तर वर्णन केले आणि मराठे प्रतिष्ठानने सहानुभूति म्हणून देऊ केलेल्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. अन्य कुलबांधवांशी चर्चा करून मदतीचे स्वरूप कशा स्वरूपात द्यावी ते कळवण्याचे त्यांनी मान्य केले.

२७ सप्टेंबरच्या सभेत कोषाध्यक्ष श्री. माधव [illegible] (पृ.३२९) यांची प्रकृतीच्या कारणास्तव त्यांना या जबाबदारीतून मुक्त करण्याची विनंती मान्य करून श्री. सीताराम गोपाळ खांबेटे (पृ.६७६) यांची कोषाध्यक्ष म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. 'मा.नां.'नी कोषाध्यक्ष म्हणून केलेल्या कार्याबद्दल कार्यकारी मंडळाने कृतज्ञता व्यक्त केली. 'मा.नां.' नीही सर्वांच्या भावनांबद्दल आभार मानले आणि प्रतिष्ठानचा सभासद व कार्यकर्ता म्हणून शक्य ते सर्व सहकार्य देत राहीन असे आश्वासन दिले. याच सभेत वार्षिक सर्वसाधारण सभेच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यात आला.

१८ ऑक्टोबरच्या सभेत वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजाच्या इतिवृत्ताचा मसुदा पक्का करण्यात आला. तसेच रत्नागिरी संमेलनाबद्दलचाहि एकूण आढावा घेण्यात आला. आत्तापर्यंतच्या संमेलनाचे सर्व उच्चांक या संमेलनाने मोडले. सुमारे सव्वातीनशे कुलबांधवांची उपस्थिती, दोन दिवसांचा भरगच्च कार्यक्रम आणि प्रवास - निवास - भोजनाची चोख व्यवस्था यांबद्दल अनेक कुलबांधवांनी काहीही हातचे न राखता स्थानिक कार्यकर्त्यांचे केलेले आभार प्रदर्शन स्वागताध्यक्ष कमलाकर नरहर (पृ.४६), निमंत्रक भास्कर नरहर (पृ.४६) आणि त्यांचे मुंबई प्रतिनिधी सुधाकर नरहर (पृ.४६) यांचेपर्यंत कृतज्ञता पूर्वक पोचवावे असे ठरविण्यांत आले.

वरील विशेष कामकाजाव्यतिरिक्त प्रत्येक सभेत पत्रव्यवहार वाचन, खर्च मंजुरी इ. नेहमीची कामे करण्यात आली.

**वार्षिक सर्वसाधारण सभा**

प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा १४.९.१९९७ रोजी सकाळी मराठे उद्योग भवनात झाली. सभेला सभासद आणि बक्षिसपात्र गुणवान विद्यार्थी व त्यांचे पालक अशी सुमारे ६० लोकांची उपस्थिती होती. वार्षिक सर्वसाधारण सभेची नित्याची कामे झाल्यानंतर प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेशभाऊ यांच्या हस्ते गुणवान विद्यार्थ्यांना गुलाबपुष्पासह बक्षिसे देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. प्रतिष्ठानच्या प्रचलित व भावी काळातल्या कार्यासंबंधीहि उपस्थित सभासदांनी आपले विचार व्यक्त केले.

या सभेचे एक वैशिष्ट्य म्हणजे रत्नागिरी येथे ४ व ५ ऑक्टोबर १९९७ रोजी होणाऱ्या परिवार संमेलनाचे निमंत्रक भास्कर नरहर (पृ.४६) हे कुलबांधवांना जातीने निमंत्रण देण्यासाठी आवर्जून उपस्थित होते. त्यांनी कुलबांधवांना संमेलनाचा कार्यक्रम व प्रवास निवास व्यवस्था यांबाबत सविस्तर माहिती दिली.

**मराठे परिवार संमेलन, रत्नागिरी**

६वे मराठे परिवार संमेलन रत्नागिरी येथे ४ व ५ ऑक्टोबरला थाटामाटात पार पडले. कोकणातल्या मातीची ओढ आणि कोकण रेल्वेची अपूर्वाई यांमुळे सुमारे सव्वातीनशे कुलबांधव या संमेलनाला उपस्थित होते. संमेलनाचा साद्यंत वृत्तान्त आणि कुलबांधवांच्या त्याबाबतच्या प्रतिक्रिया याच अंकांत सविस्तर छापलेल्या आहेत.

संमेलन प्रसंगी अनेक कुलबांधवांनी प्रतिष्ठानच्या कायम निधीला, शिक्षण निधीला, हितगुज संवर्धन निधीला आणि खुडीपाट येथील कुलबांधवांच्या मदतीसाठी देणग्या दिल्या. तसेच हितगुजची तहहयात वर्गणीहि अनेक कुलबांधवांनी स्वत:साठी तसेच काहींनी भाऊबीज भेट म्हणून मराठ्यांच्या माहेरवाशिणींच्या नावाने संमेलन प्रसंगी देऊन प्रतिष्ठानचे कार्य पुढे नेण्यात सक्रिय हातभार लावला.


**हार्दिक शुभेच्छा**
DTP व Printing ची कामे
अगदी बिनचूक, सुंदर व आकर्षक ठंगात, अगदी वेळेवर व वाजवी दरात
करून मिळण्याचे एकमेव ठिकाण
***विकास प्रिंटर्स***
संपर्क : विद्या धुमे
१, सुंदर निवास, सारस्वत कॉलनी, जोगेश्वरी (पूर्व),
मुंबई - ६०. ☎ ८३५ ३६२०

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्वात जुने
साप्ताहिक वृत्तपत्र
**"किरात"**
(स्थापना १९२२)
वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग
संपादक : श्रीधर केशव मराठे


Marathe Pratishthan

# सभासद वृत्त

### २८ वेळा रक्तदान करणारे खांबेटे

प्रतिष्ठानचे सभासद **सदानंद गोपाळ खांबेटे** (पृ.६७६) यांनी 'रक्तदान म्हणजे श्रेष्ठदान; रक्तदान म्हणजे जीवनदान; रक्तदान म्हणजे आत्मसन्मान' या भावनेतून समाजकार्य म्हणून स्वेच्छेने २८ वेळा रक्तदान केले आहे. ते बँक ऑफ महाराष्ट्र मधे नोकरी करीत असून बँकेच्या अध्यक्षांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन या अलौकिक समाजकार्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

कोणाहि कुलबांधवाला मुंबईत कोणत्याहि हॉस्पिटलमधे रक्ताची गरज लागली तर त्यांचे रक्तदानकार्ड वापरता येईल असेहि त्यांनी कळविले आहे. त्यांचा पत्ता : १/८ चैतन्य को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, पेरू बाग, मेन आरे रोड, गोरेगाव (पूर्व), मुबई ४०० ०६३. (फोन : अंधेरीतल्या थोरल्या बंधूंचा ८२० ६९ ९४).

रक्तादानी खांबेटे यांचा रक्तदानाचा हा कदाचित विक्रमच असेल. सर्व मराठे परिवारातर्फे त्यांना विनम्र अभिवादन!

### सत्तरीतले जलतरणपटु दत्तात्रय आत्माराम



नागपूर जिल्हा प्रौढ जलतरणपटू संघटनेतर्फे ऑक्टोबर १९९७ मधे नागपूर येथे आयोजित केलेल्या दुसऱ्या **राज्यस्तरीय प्रौढ जलतरण स्पर्धेत मुलुंड, मुंबई येथील सभासद दत्तात्रय आत्माराम** (पृ.३२६) यांनी ५० मीटर फ्री स्टाईल स्पर्धेत **रौप्यपदक मिळवले**. ७४ वर्षांचे श्री. मराठे नियमितपणे रोज पोहण्याचा व्यायाम घेत असतात. अशा स्पर्धेत प्रथम पदार्पणातच ते रौप्यपदकाचे मानकरी ठरले हे विशेष. मराठे परिवारातर्फे त्यांचे अभिनंदन.

### अरुण मराठे यांचा अमेरिकेत अभ्यासदौरा

युनायटेड स्टेट्स् एनर्जी असोसिएशनच्या निमंत्रणावरुन एक्झिक्युटिव्ह एक्सचेंज प्रोग्रामखाली बाँबे सबर्बन इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीतील सीनियर मॅनेजर, मराठे प्रतिष्ठानचे **मुलुंड, मुंबई येथील सभासद रामचंद्र गोविंद** (पृ.५३५) हे दि. ११-१०-१९९७ रोजी **न्यूयॉर्कला अभ्यासदौऱ्यावर** रवाना झाले. तेथे २४ ऑक्टोबरपर्यंत नायगरा मोहॉक पॉवर कॉर्पोरेशनमधील विविध विभागातल्या कामकाजाची माहिती घेऊन त्यानंतर पत्नीसह अमेरिकेत तीन आठवडे स्थलदर्शन करून ते परत आले.


### अनुराधा मराठे यांना आदिशक्ती पुरस्कार

पुण्यातील बन्सीलाल रामनाथ आगरवाल चॅरिटेबल ट्रस्टच्या महालक्ष्मी मंदिरातर्फे होणाऱ्या नवरात्र उत्सवात यंदापासून स्त्री-शक्तीच्या गौरवार्थ प्रत्येकी पाच हजार रुपयांचे 'आदिशक्ती पुरस्कार' देण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार सुगम संगीतातल्या कामगिरीबद्दल प्रतिष्ठानच्या **पुण्यातील सभासद सौ. अनुराधा मुकुंद** (पृ.२९७) यांना हा पुरस्कार देण्यात आला. मराठे परिवारातर्फे अनुराधा मराठे यांचे हार्दिक अभिनंदन.

### बी.फार्म मधे १ली ज्योत्स्ना शरद

मराठे प्रतिष्ठानचे **मिरज येथील सभासद शरद विष्णु (पृ.४५३) यांची मुलगी ज्योत्स्ना** हिने शिवाजी विद्यापीठाच्या बी.फार्म परीक्षेत विद्यापीठात १ला क्रमांक मिळवून गोल्ड मेडल मिळवले. GATE परीक्षेतहि तिने ९६.७१ टक्के मार्क मिळवले. ती सध्या एम.फार्म करीत आहे. मराठे परिवारातर्फे ज्योत्स्नाचे अभिनंदन.

### रेडिओच्या 'सुगम गायन' स्पर्धेत दुसरा रोहन



मराठे प्रतिष्ठानचे **पुण्यातील सभासद प्रमोद विष्णु (पृ.५१३) यांचा मुलगा रोहन** याने पुणे आकाशवाणी केंद्रावर २.९.१९९७ रोजी झालेल्या संगीत स्पर्धेत 'सुगम गायन' या विभागात दुसरा क्रमांक मिळवला. आकाशवाणी संगीत स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी रोहनच्या गायनाची ध्वनिफीत पुणे आकाशवाणीने दिल्लीला पाठवली असून या स्पर्धेचा निर्णय दिल्लीत ११.१२.९७ रोजी जाहिर होणार आहे. पुण्यातील यशाबद्दल रोहितचे अभिनंदन आणि दिल्लीच्या अंतिम स्पर्धेसाठी शुभेच्छा!

### गणितातल्या गमती करणारे श्याम मराठे

रत्नागिरी संमेलनात श्याम मराठे यांनी गणितातल्या गमतीजमती करून दाखवल्या होत्या. त्यांची मुलांसाठीची गणितात गोडी निर्माण करणारी पुस्तके हवी असणाऱ्यांसाठी **त्यांचा पत्ता** : 'लक्ष्मी', जीवन प्रकाश सोसायटी, स.नं. ४७/२ ब, तावरे कॉलनी, पर्वती, पुणे ४११ ००९. (फोन ४२१२७१).

### सहवेदना

(१) मराठे प्रतिष्ठानचे **लोणावळा येथील सभासद मोरेश्वर गजानन विद्वांस (पृ.६६४) यांच्या मातोश्री** शकुंतला गजानन यांना १५.९.९७ रोजी देवाज्ञा झाली.

(२) मराठे प्रतिष्ठानचे विलेपार्ले, मुंबई येथील सभासद **पद्माकर जगन्नाथ विद्वांस (पृ.६२९) यांची पत्नी सुलभा** हिचे दीर्घकालीन आजाराने १९ सप्टेंबर १९९७ रोजी निधन झाले.

**दोन्ही विद्वांस कुटुंबीयांच्या दु:खांत मराठे परिवार सहभागी आहे**

---

### जाईल कुटुंबियांसाठी आवाहन

जाईल परिवारांचे मूळ गाव दुमदेव. या ठिकाणी जाईलांचे एक गणपतीचे देऊळ आहे. सध्या या गणपतीच्या पूजेअर्चेचे काम श्री. मोडक गुरुजी पाहतात. सदर संस्थानने ट्रस्ट स्थापन केल्यास जाईल घराण्याच्या दृष्टीने सोयीचे होईल. तरी कृपया जाईल कुटुंबियांनी या संदर्भातील अधिक माहितीसाठी पुढील पत्त्यावर संपर्क साधावा.

**श्री. कमलाकर अनंत जाईल**
५९४, नारायण पेठ, उमा शंकर कॉम्प्लेक्स,
श्री.ना.दा.ठा. कन्याशाळेशेजारी,
पुणे ४११ ०३०. फोन नंबर : ४८११२५.

Marathe Pratishthan

# गुणवंतांच्या पाठीवर कौतुकाची थाप

**१०वी, १२वी, महाविद्यालयीन व अन्य परीक्षांत विशेष यश मिळवून बक्षीस पात्र ठरलेले विद्यार्थी (१९९६-९७)**

**पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा**

१. कुमार **सुकृत विनायक खांबेटे** (पृ.६९४), मुंबई - गुणवत्ता यादीत १५वा (८७.६६%)

२. कुमारी **मृणाल विश्वास**, (पृ.३७५), मुंबई गुणवत्ता यादीत १९वी (८६.३३%)

३. कुमार **अमेय यशवंत** (पृ.३९९) मुंबई - गुणवत्ता यादीत ३७वा (८०.००%)

**इयत्ता १०वी**

४. कुमारी **स्नेहल सुहास** (पृ.४१९), किर्लोस्करवाडी, गुण ८८.६६%

५. कुमार **गणेशप्रसाद रामकृष्ण** (पृ.२९०), मुंबई, गुण ८४.५३%

६. कुमार **अमेय अनंत** (पृ.३५९), ठाणे गुण ८४.४०%

७. कुमार **सागर सतीश आपटे** (पृ.४४४), मुंबई, गुण ८३.७३%

८. कुमारी **अमृता सुधाकर** (पृ.२५१), पुणे गुण ८३.०६%

९. कुमारी **शीतल गजानन** (पृ.१२९), पुणे गुण ८१.०६%

१०. कुमारी **श्रद्धा रामचंद्र** (पृ.५३५), मुंबई गुण ८०.५३%

११. कुमार **सौरभ सुरेश** (पृ.८७), डोंबिवली गुण ७८.००%

१२. कुमारी **वेदश्री माधव खांबेटे** (पृ.७०५), मुंबई गुण ७७.६०%

१३. कुमारी **अश्विनी श्रीराम** (पृ.४४०), मुंबई गुण ७६.५३%

१४. कुमार **रामचंद्र राजाराम** (पृ.५१५), गोवा गुण ७४.००%

१५. कुमार **विवेक सुधीर** (पृ.२०), कराड, गुण ७१.६०%

१६. कुमार **ऋषभ सुरेश** (पृ.४२६), पुणे गुण ६९.८३%

१७. कुमारी **अनुजा दिलीप** (पृ.३१४), मुंबई गुण ६९.०६%

**इयत्ता १२वी**

१८. कुमार **देवीदास गंगाधर** (पृ.४७), नागपूर गुण ९३.३३% **नागपूर बोर्डात गुणवत्ता यादीत ७वा.**

१९. कुमार **चिन्मय संतोष** (पृ.२३६), नागपूर गुण ८९.५०%

२०. कुमार **सुमीत सुरेश** (पृ.२३०), मुंबई गुण ८४.३३%

२१. कुमार **आशिष दत्तात्रय** (पृ.३३४), नागपूर गुण ८३.००%

२२. कुमार **अनुप वसंत** (पृ.४५१), पुणे गुण ८२.५०%

२३. कुमार **अजिंक्य अरुण कुळकर्णी** (पृ.४२७), कोल्हापूर (भालचंद्र कृष्ण यांचा नातू) गुण ८०.००%

२४. कुमारी **वर्षा सुधीर** (पृ.२०), कराड गुण ७९.००%

२५. कुमार **अमित शरद्चंद्र** (पृ.४००), ठाणे गुण ६८.३३%

२६. कुमारी **देवयानी बळवंत विद्वांस** (पृ.६४५), मुंबई गुण ६२.००%

२७. कुमार **संदीप मधुकर गोखले** (पृ.३६६), पुणे (वामन आत्माराम यांचा नातू) गुण ६०.००%

**पदविका**

२८. कुमार **समीर विलास** (पृ.२३५), ठाणे इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स गुण ६३.००%

**पदवी परीक्षा**

२९. कुमारी **दीपाली वसंत** (पृ.१६३), पनवेल **बी.ए.** गुण ७८.३३% **मुंबई विद्यापीठांत ५वी,** कॉलेजात १ली.

३०. कुमारी **अर्चना सदानंद** (पृ.२८५), हुबळी, **बी.ए.** गुण ७१.५८% कर्नाटक विद्यापीठ. **इंग्रजी लिटरेचरमध्ये १ले बक्षीस.**

३१. कुमारी **अदिती वसंत** (पृ.४५१), पुणे **बी.कॉम.** गुण ७३.८३%

३२. कुमार **सुबोध सुरेश विद्वांस** (पृ.६४८), मुंबई, **बी.कॉम.** गुण ७१.७१%

३३. कुमारी **आसावरी दिलीप** (पृ.३१४), मुंबई, **बी.कॉम.** गुण ६०.००%

३४. कुमारी **अश्विनी प्रकाश विद्वांस** (पृ.६४५), अहमदाबाद, **बी.ए.** गुण ६४.८०%

३५. कुमारी **मंजिरी गजानन** (पृ.६२), बेळगाव, **एल. एल. बी.** गुण ६०.५०%

३६. कुमार **आशिष विजय** (पृ.३९०), पुणे, **बी.ई.** गुण ६८.७३%

३७. कुमार **राहूल रमेश** (पृ.३६५), पुणे, **बी.एस्सी.** गुण ६६.६३% **गरवारे कॉलेजचे सर्वोत्तम विद्यार्थी पारितोषिक**

**पदव्युत्तर परीक्षा**

३८. कुमारी **दीप्ती लक्ष्मण** (पृ.५२०), मुंबई, **एम.एस्सी.** गुण ६७.००%

**कुमारी अनिता खांबेटे स्मृती पारितोषिके**

३९. कुमार **सुकृत विनायक खांबेटे** (वर क्र.१) मराठे कुटुंबीयांमधे पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत सर्वाधिक गुण.

४०. कुमारी **स्नेहल सुहास** (वर क्र.४) मराठे कुटुंबीयांमधे १०वीच्या परीक्षेत सर्वाधिक गुण.

४१. कुमार **धनंजय देवीदास** (वर क्र.१८) मराठे कुटुंबीयांमधे १२वीच्या परीक्षेत सर्वाधिक गुण.

(माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी कोणाचाहि अर्ज आला नाही.)

---

**एकमेकां साह्य करू**

**मुंबईत रहाण्याची सोय**

आपले कोणीहि कुलबांधव कामानिमित्त मुंबईत आल्यानंतर त्यांची रहाण्याची व्यवस्था आपणाकडे होऊ शकेल असे **श्री. सदानंद गोपाळ खांबेटे** (पृ.६७६) यांनी कळविले आहे. ते बँक ऑफ महाराष्ट्र मधे नोकरी करीत असून गोरेगाव येथे रहातात. इच्छुकांनी पुढील पत्तावर त्यांच्याशी संपर्क साधावा -
१/८ चैतन्य को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी,
पेरू बाग, मेन आरे रोड,
गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३.

Marathe Pratishthan

# जीवनधारा

**'अुत्तमकथा' मासिकाच्या कथास्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळालेली कथा.**

**- विठ्ठल महादेव (पृ. २३५), सांगली.**

एक दिवस अचानक ग्रामपंचायतीच्या ऑफिसात श्रीपतीला बोलविल्याचा निरोप आला. आता काहीतरी वसुलीचे प्रकरण आले असावे असे समजून तो मनात चरकला. आपल्या झोपडीपासून ग्रामपंचायतीच्या ऑफिसात जाईपर्यंत काय प्रश्न विचारले म्हणजे काय उत्तर द्यावे याची उजळणी करीत तो पंचायतीच्या पायऱ्या चढला.

पंचायतीच्या ऑफिसात सरपंचांच्या शेजारच्या खुर्चीत बसून जि.प. सदस्य गुलाबराव टेबलावर वाकून समोरच्या कागदावर काहीतरी रकाने आखीत होते. मध्येच फोनवर 'आज मिटींग आहे ना? माझ्या यादीतील सर्व नावे मंजूर व्हायला हवीत. सगळ्यांचे अर्ज उद्यापर्यंत पाठवतो'. असे सांगत होते.

गुलाबराव म्हणजे जि.प. मधील बडे प्रस्थ. सत्ताधारी पक्ष कोणताही असला तरी त्या पक्षात ते वजन राखून होते. आपल्या जि.प. सदस्य या स्थानाचा फायदा घेऊन बांधकाम विभागातील फायद्याची कंत्राटे स्वतःच्या मुलाच्या, पुतण्याच्या नावावर घेत असत. कामावरून काही वेळा अधिकाऱ्यांशी, पदाधिकाऱ्यांशी खटके उडत. पण कधी पडते घेऊन तर कधी वरून दबाव आणून वेळ मारून नेत. त्यांच्या या स्वभावामुळे सहसा कोणी त्यांच्या वाटेला जात नसत. गुलाबराव तेथे बसल्याचे पाहून श्रीपती अदबीने बाजूच्या बाकावर बसला.

श्रीपतीला बघून गुलाबराव म्हणाले, "शिरपा अरे कुठाय तुझा पत्ता? तुमच्या हिताच्या गोष्टी तुमच्या झोळीत टाकायलासुद्धा तुम्हाला बोलावणे लागते होय? तुमच्यासाठी मी आपल्या मतदारसंघात दहा विहीरींचा कोटा मंजूर करून घेतला. गेला महिनाभर त्यासाठी धावपळ करतोय, पण तुम्हाला त्याची किंमत असेल तर शपथ! अडचणीला मात्र माझ्या दारात उभे राहता. ही 'जीवनधारा' विहीर सरकार तुमच्या पदरात घाला म्हणतंय. पाहिजे की नको? सरकारच्या मेहेरबानीने तीस हजाराची विहीर फुकटात पदरात पडणार आहे. उद्या मिटींग आहे. आजच अध्यक्षांकडे यादी जायला पाहिजे, तरच मंजूर होईल. तुला विहीर पाहिजे असेल तर संध्याकाळपर्यंत अर्ज आणून दे".

"फुकटात मिळणारी विहीर नको कुणाला होईल गुलाबराव! पण त्याच्यामागे लई कटकटी असतात. सारा वेळ त्याच्यामागे धावावं लागेल. आज हे रावसाहेब, उद्या ते भाऊसाहेब, त्यापेक्षा आहे ही मीठभाकर गोड करून खातोय ती बरी हाय". श्रीपतीने विहीर का नको ते सांगितलं.

"तसं नाही. तू काही काळजी करू नकोस. फक्त फॉर्म भरून दे. बाकीचं सगळं आपसूकच होईल".

गुलाबरावांच्या बोलण्यात वरून शिरपाबद्दल कणव दिसत असली तरी आपल्या मतदारसंघात दहा विहिरी मंजूर करून घेतल्या याचे ते उद्या भांडवल करणार होते. शिरपाच्याच मागे लागण्याचं कारण म्हणजे त्या मतदारसंघात विहीर मिळण्यास पात्र लाभार्थी थोडेच होते. त्यामध्ये श्रीपतीचे सगेसोयरे जवळपासच राहात असत व मोलमजुरी करून गुजराण करीत असत. त्यामुळे विहिरीच्या कामाला श्रीपतीला मनुष्यबळ कमी पडणार नव्हते.

शिरपाच्या नावाने तीन महिन्यांपूर्वी विहीर मंजूर झाली. त्याआधी मंजुरीची ऑर्डर हातात पडेपर्यंत तीन महिने कसे गेले, ते शिरपाला समजले नाही. आज काय प्रकरण जि.प. सभेपुढे आहे, उद्या काय समन्वय सभेत दोन गटात अगदी पालकमंत्र्यांसमोर एकमेकांची गचांडी धरण्यापर्यंत मजल गेली, त्यामुळे मंजुरीचा निर्णय तसाच लोंबकळत राहिला, अशा प्रत्येक टप्प्यावर अडचणी येत गेल्या. त्या अगोदर ७/१२चा उतारा मिळवणे, दारिद्रयरेषेखाली असल्याचा, मागासवर्गीय असल्याचा इ. दाखले मिळवण्यात दिवस वाया गेले, ते निराळेच. या सर्व धावपळीत रोजगार बुडतच होता. आणि मिळत असलेल्या चतकोर भाकरीत तुकडा कमी पडत होता.

विहिरीचे काम सुरू होऊन महिना झाला. सगेसोयरे शक्यतो सर्व मदत करीत होते. इतरत्र कामाला न जाता शिरपाच्या विहिरीच्या कामावर येत असत. पण एकादेवेळी काही ना काही कारण होई आणि पंचायत समितीकडून झालेल्या कामाचा चेक मिळण्यास उशीर होई आणि मग सर्वच काम विस्कटून जाई. हातावरचे पोट असलेले सगेसोयरे एकादा दिवस वाट बघून दुसरीकडे कामाला जात असत. श्रीपतीलाही उपाशीपोटीच आढ्याकडे बघत गोणपाटावर अंग टाकावे लागत असे.

आज सकाळपासून दमून त्याने फोडलेल्या दगडाचे बारीक तुकडे करता करता आजपर्यंतचे हे चित्र त्याच्या डोळ्यांसमोरून सरकून गेले. सकाळी फोडलेल्या दगडाच्या बाजूला जरा ओलसर अंश दिसून येत होता. त्यावरून आता पाणी लागण्याची शक्यता दिसू लागली होती. त्यामुळे जरा जास्त जोमाने तो कामाला लागला होता.

त्यानंतर सुरुंगाच्या दोन फेऱ्या झाल्या आणि दुसऱ्याच आठवड्यात विहिरीच्या एका बाजूला मोठा झरा लागल्याचे द्रुपदाने बघितले आणि मोठ्या आनंदाने तिने 'पाणी लागलं', 'पाणी लागलं' अशी आरोळी मारली. विहिरीत काम करणाऱ्या साऱ्यांना आनंद झाला. श्रीपती विहिरीबाहेर होता. तो आरोळी ऐकून झरा बघण्यासाठी विहिरीकडे धावला. तोवर 'मालकाने पाण्याची पूजा केल्याशिवाय पाणी बघायचे नसते', म्हणून द्रुपदाने झरा झाकून ठेवला होता. पाटीखालून गार पाणी वाहात होते ते त्याने डोळ्याला लावले व पूजा करण्यासाठी भटाला बोलावण्यासाठी गावाकडे धावला.

श्रीपतीच्या विहिरीला पाणी लागले. तालुक्यातील ही शंभरावी यशस्वी विहीर होती. बातमी कळताच बी.डी.ओ., ओव्हरसिअर सर्वजण विहिरीकडे धावले. श्रीपतीने मोठ्या कष्टाने व जिद्दीने अवघड काम पूर्ण केल्याबद्दल त्यांनी त्याचे कौतुक केले. व या शंभराव्या विहिरीचा पूर्तता समारंभ करून विहीर औपचारिक रीत्या श्रीपतीच्या स्वाधीन करावयाची व उरलेली रक्कमही त्याचवेळी द्यावयाची असे ठरवून ते तालुक्याला परत गेले.



Marathi Pratishthan

विहीर यशस्वी झाल्याची वार्ता गुलाबरावांपर्यंतही पोहोचली होती.

एके दिवशी सकाळीच गुलाबराव श्रीपतीच्या झोपडीवर हजर झाले.

"श्रीपती, काय विहिरीला पाणी लागलं म्हणे! आम्हाला आनंद झाला".

"हे सर्व तुमचीच कृपा" असे म्हणून श्रीपतीने गुलाबरावांचे पाय धरले.

"किती पैसे मिळाले?"

"आतापातर वीस हजार मिळाले, आता पाच हजाराचे फायनल बिल निघणार आहे असे ओव्हरसिअर सांगत होते."

"मग एकूण पंचवीस हजारच खर्च होणार म्हण की!"

"हो, ते काय ते रावसाहेबांना माहीत."

हे बघ श्रीपती, मी तीस हजाराची विहीर मंजूर करून आणली. पंचवीस हजार खर्च करून पाच हजार राहिले त्याचे बिल करून मला पाच हजार दे असे ओव्हरसिअरला सांगितले तर तो ऐकत नाही. यात त्याच्या बापाचे काय जात होते का? हे सरकारी फार माजलेत. गेल्या वर्षात माझ्या प्रत्येक कामात त्यांनी मला अडथळा केला आहे. धर्मराजाचे अवतारच जणू लागून गेलेत. तेव्हा या ओव्हरसिअरला चांगला इंगा दाखवायचा आहे. त्याच्या बरोबरच त्या बीडीओला पण भोगायला लावीन" असे म्हणून गुलाबरावांनी एक लिहून आणलेला अर्ज खिशातून बाहेर काढला. "एवढ्या अर्जावर तू सही कर. पाच हजाराचे बिल करण्यासाठी मला दोन हजार रुपये मागितले, असे यात लिहिले आहे." असे म्हणून तो कागद गुलाबरावाने श्रीपतीसमोर ठेवला व आपल्या खिशाचे पेन काढून त्यावर आपटले.

गुलाबरावांनी आपल्याला विहीर मंजूर करून दिली हे श्रीपतीला मान्य होते. पण ओव्हरसिअरविरुद्ध खोटी तक्रार करून पैसे मिळवणे त्याला पसंत नव्हते. एका विचित्र पेचात तो अडकला होता. काय करावे हे सुचत नव्हते. तो तसाच गप्प बसून राहिला.

"काय विचार करतोस? सही करतोस ना?" गुलाबराव.

"होय - पण - तसं नाही, मी जरा समद्यांना विचारून सही करतो." श्रीपती चाचरत चाचरत कसेबसे दोन शब्द बोलला.

"तुला विहीर मंजूर करायला समदी आली होती का? आता तुझी गरज संपली म्हण की" असे म्हणून गुलाबराव उठू लागले.

आपल्याला पटत नसले तरी ही गुलाबरावाची पिडा तात्पुरती टळावी म्हणून श्रीपतीने अर्जावर मोडक्या तोडक्या अक्षरात सही केली. गुलाबराव कागद घेऊन निघून गेले.

कागदावर सही केल्यापासून श्रीपतीला चैन नव्हते. त्याला जेवण गोड लागत नव्हते. आपल्याला ज्याने पाणी दिले त्याला आपण संसारातून उठवणार म्हणून त्याच्या डोळ्यांत पाणी येत होते. दुसऱ्याच दिवशी त्याचा सत्कार व विहीर त्याच्या ताब्यात देण्याचा समारंभ होणार होता. तरी त्याच्या अंगात हुरूप नव्हता. विहिरीच्याजवळ पताका लावणे, मंडप घालणे ही कामे इतरांनीच पूर्ण केली.

सी.ई.ओ. साहेबांच्या हस्ते त्याचा सत्कार झाला. त्याने विहीर पूर्ण करण्यात घेतलेल्या कष्टाचे सर्वांनी कौतुक केले व तालुक्यातील शंभरावी विहीर औपचारिकपणे त्याच्या ताब्यात दिली. आता श्रीपतराव चार शब्द बोलतील म्हणून सरपंचांनी बळेच श्रीपतीला उठविले.

नाइलाज म्हणून श्रीपती उभा राहिला. त्याचे पाय लटपटत होते. हाताला कापरे भरल्यासारखे झाले होते. त्याने टेबलाचा आधार घेतला. त्याच्या तोंडून शब्द फुटेना. डोळ्यातून अश्रू वाहू लागले. "श्रीपतराव चार शब्द बोला" असे सी.ई.ओ.ने म्हणताच त्याचा दुःखाचा आवेग एकदम ओसरला, व त्याने बोलण्यास सुरवात केली

"साहेब, ही विहीर मी एकट्यानी केली नाही. माझे भाऊबंद व सर्व अधिकारी यांनी मला अमोल सहाय्य केले आहे. त्यांच्या पायावर मी कायमचं डोकं ठेवलं तरी त्यांचे उपकार फिटणार नाहीत. परंतु माझ्या हातून फार मोठं पाप घडलं आहे. मला आता विहिरीचं पाणी गोड लागत नाही. देवमाणसासारख्या असणाऱ्या ओव्हरसिअरबद्दल मी खोटा अर्ज दिला आहे व त्याला संसारातून उठविण्याच्या कटात सामील झालो आहे, याचं मला दुःख होत आहे. आम्ही अडाणी, गरीब असलो व वेळप्रसंगी अर्धपोटी राहात असलो तरी पोट भरण्यासाठी उपकारकर्त्याला संसारातून उठविण्याचा कृतघ्नपणा आम्ही करणार नाही. आमच्या अंगात कृतज्ञतेची जीवनधारा आहे. ती तशीच ठेवणार आहे. माझ्या हातून घडलेल्या पापाबद्दल क्षमा करा."

असे म्हणून श्रीपतीने साहेबांचे पाय धरले आणि क्षणार्धात पापक्षालनाची आंघोळ करण्यासाठी त्याने जीवनधारा विहिरीत उडी मारली.

---



## घर ?

गायत्री गणेश जोशी, पृ.६७६

घरानं तुला दिलं काय? प्रश्न साधाच-घर कुणाचं?  
"त्याचं हक्काचं", "तिला" ओझं मेहेरबानीचं  
सखी, पत्नी, माता, बिरुदावल्यांच्या चढत्या कमानी  
फरक फक्त तपशीलाच, स्त्री जन्मा ही तुझी कहाणी  
सत्ता त्याचीच मते त्यालाच, अंतिम निर्णय त्यानेच घ्यायचे  
गांधारीच्या डोळा पट्टी, बळेच त्याला अनुसरायचे  
अन्न-वस्त्र-निवारा फक्त, मिळून होईल का मन तृप्त?  
प्रश्न विचारायचे नाहीस तू, अबले, रहा सदा गप्प  
त्यागाची तर तू मूर्ती, कथा पुराणी दिगंत कीर्ती  
स्वगृहीच्या यज्ञी मात्र, सुखस्वप्नांची दे आहुती  
"पती परमेश्वर - घरी देव" समीकरण जरी खरे नाही  
तरी "चौकट" मोडून मात्र बाहेर कधी पडायचे नाही  
तुझं स्वतःचं काही नसलं तरीही तू हजर हवीस  
घडलं गैर कुणाचं काही, तुझीच हजेरी घेतील खवीस  
सदासतेज, सदाबहार, प्रसन्नतेचा तू ठेवा  
गरजा जाणून प्रत्येकाच्या मूकपणाने करी सेवा  
इतकं सर्व करूनही, घरात तुझं स्थान काय?  
धुडकावूया सारं म्हणशील तर ओढले जातील मागे पाय

---



## छत्रीचं फूल!

कु. ऋता संजय करमरकर, (वय ९), बदलापूर.

लक्ष्मण शंकर (पृ. ५२०) यांची नात - श्रुतीची मुलगी.

एक होती शेंडी,  
तिला जोडली दांडी,  
काड्या लावल्या आठ,  
जोरांत बटण दाबलं,  
छत्रीचं फूल उमललं!



Marathe Pratishthan

# मराठे संमेलनाची 'गावाकडील गोष्ट'

**कोकणी माणसाच्या तिरकस बोलण्याचा आणि प्रेमळ स्वभावाचा नमुना.**

**- श्रीपाद माधव उर्फ आप्पा मराठे (पृ.४६), रत्नागिरी.**

कोकणातील एक घर. ओटीवर हरी तक्क्याला टेकून बसला आहे. उजव्या बाजूला मागे ओटीवरून माजघरात जायच्या दारात त्याची पत्नी उभी राहून ओटीवर डोकावत आहे. हरी समोर १०/१२ मुंबई व पुण्याहून आलेले पाहुणे बसलेले आहेत. तो त्यांना गावाकडच्या गोष्टी सांगतो आहे.

**हरी** : तर मंडळी!

(हे ऐकून त्याची पत्नी पुढे येते)

**हरी** : अगो, मी तुला नाही पाचारले. तू कशाला पुढे आलीस? गोठ्यात जाऊन बघ बघू! म्हैस शेणली असेल.

**पत्नी** : असे काय ओरडायचे उगीच! मी आपली मंडळी किती आहेत ते बघीन आणि चहा टाकीन!

**हरी** : अकलेचे बोलली! जा आतां. तर मंडळी माझे नाव हरी. बट नॉट 'ओल्ड मॅन इन हरी टु गो'! (वर बोट दाखवतो) (मंडळीत हंशा) मी सोनापुरात पावत्या फाडायच्या कामावर होतो. आता गावी आलो आहे. आमचे गाव दक्षिणोत्तर पूर्वेस डोंगर व पश्चिमेस नदी याच्या चिपटीत वसलेले. सात आठ आमची ब्राम्हणांची घरे! प्रत्येक घराभोवती एकरा दो एकराची माडा पोफळीची बाग अशी रचना! मंडळींना बोलण्याची अनिवार हौस. पण सकाळी बागकामात वेळ मिळत नाही म्हणून कुचंबणा!

आमचा शेजारी वामन्या. (एक लक्षात घ्या आमच्याकडे सगळयांना एकेरी नावानेच पाचारतात मग तो कितीही मोठा असो. इतकेच नव्हे त्याच्या मागे त्याचा उल्लेख टोपण नावासह होतो. उदा. पोट्या वामन्या, बांबू बंड्या, सोट्या सोन्या इत्यादि). तर वामन्या सकाळी फानपटी उठून चहापाणी उरकून बागेस पाणी द्यायला आला आहे. सकाळची डोंगरा आडून उगवतीची कोवळी उन्हे भगव्या झालेल्या पोफळांवर पडली आहेत. पिकलेली सालासकट असलेली भगवी फळे म्हणजे पोफळे. साल काढली की सुपारी. तर त्या भगव्या पोफळांवर सोनेरी उन्हे पडली आहेत. जणू काही कोकणाचा देव परशुरामाचे भगवे धर्मध्वजच डोलताहेत अशी एकूण शोभा! अशी शोभा आम्ही रोजच पाहतो. तुमच्या नशीबात ती नाही. नशीब तुमचे!

कालचं काय झाले ते सांगतो. अगो चहा ठेवलासय नां! हां तर मंडळी काल असे झाले! हा वामन्या सकाळी बागेस शिंपणे करीत होता. बोलायची अनिवार हौस त्यास आवरेना म्हणून त्याने शेजारच्या भिकंभटास पाचारले.

**वामन्या** : रे भिकंभट, अरे भिकंभटा उलथलास कायरे? अरे इकडे ये ऽ ऽ ऽ

**भिकंभट** : ह्यास ओरडायास काय झाले? फुरसे चावले से वाटते. रे राम्या, गाडी जोडरे. त्या वामन्यास फुरसे चावलेसे वाटते. ह्या वामन्यास हॉस्पिटलात नेऊन टाकतो. पण हे बघ गाडी तिथेच ठेव. संध्याकाळी गाडीत आडवा घालून झाकून आणण्यास बरे पडेल! (हे सगळे बोलत ते दोघे आपापल्या मधल्या गडग्याजवळ येत आहेत)

**वामन्या** : काय रे भिकंभटा! माझ्या जिवावर का उठलास? कालचे बिजीक हरलास म्हणून वाटते! अरे हवीतेवढी भांग प्यालास मग काय होईल?

**भिकंभट** : अरे मेल्या हळू बोल, आमचे अर्धांग तिकडे फुले काढते आहे. ऐकलेन तर आज एकादशी घडेल. ते मरूंदे, पण जीव जाई पर्यंत ओरडून पाचारलेस तरी कशाला?

**वामन्या** : अरे तेच तर सांगतो आहे. पण तुझे तोंड थांबेल तेव्हां ना? तुझी जीभ नुसती ह्यांच्या सारखी वळवळतेय! थांब आता वैनीलाच सांगतो.

**भिकंभट** : आता तिला काय सांगतो आहेस! ती काय करणारे?

**वामन्या** : अरे तिला तुझ्या जिभेचा शेंडा चावायला सांगतो. म्हणजे तुझी जीभ थंड होईल.

**भिकंभट** : ती काय चावत्ये? तुला माहीत नाही. अरे ती जेव्हा आमच्या घरात आली तेव्हा सहा महिने अगदी गुपचूप होती. पण तानमान बघून जो काही तोंडाचा पट्टा चालवायला लागली! काही बोलायची सोय नाही. सहा महिने झाले शेवटी ठरवले काहीतरी जालीम उपाय केला पायजे!

**वामन्या** : काय, केलेस तरी काय? काही तरी अगोचर केले असशील?

**भिकंभट** : तसे काही अगोचर केले नाही. पण एकदा रात्री प्रेमात आल्याचे दाखवून मी तिच्या जिभेचा शेंडा चावला.

**वामन्या** : काय म्हणायचे काय तुला भिकंभटा! तू एवढा 'हा' असशील वाटले नव्हते! अरे ती बोंबटली असेल.

**भिकंभट** : म्हणजे अगदी तुकडा नाही रे पाडला! जरा उगीच दंश केला. तसे काही फारसे झाले नाही. पण तेव्हापासून बोलायची कमी आली एवढे मात्र खरे! अरे मी म्हणतो तू एवढा जो फुरसे चावल्या सारखा बोंबटून हाक मारीत होतास ते सांगणार तरी काय होतास?

**वामन्या** : तेच तर सांगतोय! पण तुझे तोंड थांबेल तेव्हा ना! अरे मी रत्नागिरीस गेलो होतो!

**भिकंभट** : तरीच दोन दिवस पायरवलास नाहीस तो! रत्नागिरीस कशाला तेंडूलकरांच्या प्रियेला बघायला गेला होतास!

**वामन्या** : अरे भिकंभटा, तुझ्या जिभेला काही हाड? जरा आसपास बघ तरी! तुझी वैनी तिकडे पडवीत बसली आहे भाजी चिरीत! तिने ऐकलन तर आज काही पोटात घासही जायची खात्री नाही.

**भिकंभट** : काही सांगू नकोस वामन्या! त्या पटवर्धनांच्या ओटीवर आपण बसलो होतो तेव्हा रंगीला सिणीमा लागला होता. तुझी नजर हलत नव्हती चोरा त्या प्रियेवरून!

**वामन्या** : अरे ती प्रिया मला काय करायची. आमची एकुलती एक प्रिया आहेना घरात! जरा दांत वर आहेत व रंग जरा रंगीच्या रंगाशी जवळीक साधणारा! पण म्हणून काय झाले घरची प्रिया ती घरची प्रिया!

**भिकंभट** : वामन्या ही रंगी कोण रे बाबा!

**वामन्या** : अरे आमची भोरी म्हैस रे! दुसरी कोण?

**भिकंभट** : आग लागो तुझ्या तोंडाला! अरे तू रत्नागिरीला कशाला गेला होतास ते सांग बाबा !



Marathe Pratishthan

**वामन्या** : अरे तेच तर सांगतोय. अरे तिथे अनुस्वांचा आनंदा आहेना! त्याच्या कार्यालयात मराठ्यांचा मेळावा होता.

**भिकंभट** : मराठे म्हणजे शहाण्णव कुळी की काय वामन्या नारू तावड्यासारखे? तू काय तिथे पूजा सांगायला गेला होतास? तुला त्यातले ओ की ठो येत नाही! मग तिथे तू तडमडलास कशाला?

**वामन्या** : अरे बाबा रे! मराठे म्हणजे शहाण्णव कुळी नव्हेत. मराठे म्हणजे कपि गोत्री चित्तपावन ब्राह्मण! त्यांचे संमेलन! समजलास!

**भिकंभट** : अरे तू तर रटाटे! दिवसातून ४ वेळा कडकडतोस आणि रटरटत असतोस! तुमच्या चुलीवर भांड्यांत काही नेहमी रटरटत असेत म्हणून तूम्ही रटाटे.

**वामन्या** : तसे नव्हे रे बाबा! रटाटे, जाईल, [illegible]ांस, खांबेटे, चक्रदेव, विद्वांस, कपि गोत्री जोशी आणि मराठे मिळून ८ घराण्यांचे एकच कूळ म्हणजे मराठे. त्यांचे संमेलन होते आनंदाच्या कार्यालयात!

**भिकंभट** : असे काय! तरीच परवा आनंदा एव्हढे मोठाले लोणचे घेऊन गेला तो! म्हटले लग्न कार्य तर पितृपक्षात नाही. याला एवढे लोणचे कशाला? मग म्हटले हल्ली काय वाटेल तेव्हा लग्ने होतात. आपण उगीच कशाला बोला! (हाताने पैशाची खूण करून) आमची तत्वांशी जवळ गाठ! मला म्हणाला हे तुम्हाला स्वस्तिवचन म्हणायला यावे लागेल म्हणून! पण माझी सोनू व्यायची होती म्हणून मी नाही म्हटले! सोन्यासारखी म्हैस मेली ते सोड.

**वामन्या** : तुझे पुराण असुदे रे. मी सांगतो ते ऐक! तिथे बघितले तर एकेक महामहीम मराठे जमलेले! कुणी कारखाना चालवतोय! कुणी बिल्डींगा बांधतोय! कुणी रस्ते बांधतोय, कुणी पूल बांधतोय, कुणी यंत्रे परदेशात पाठवतोय, कुणी डॉक्टर, कुणी त्या कॉम्प्युटरचा इंजनेर.

**भिकंभट** : काय म्हणतोस काय! मोठी मजा आली असेल नाही रे!

**वामन्या** : तर काय सांगतोय काय? ऐक तर खरा! किती प्रकारचे लोक होते, किती सांगू तुला! गायक होते, लेखक होते, संपादक होते! तबला, पेटी, बासरी वाजवणारे सुद्धा होते! एवढेच नव्हे तर अगदी वैदिक, याज्ञिक सुद्धा होते.

**भिकंभट** : अरे वामन्या पण बायका आल्या होत्या की नाही? कि आपले नुसते बाप्येच होते? आणि वैनीला नेले होतेस कि नाही? नाहीतर ती आपली घरी चुलखंडात तोंड खूपसून रहायची?

**वामन्या** : तू कलागती लावू नकोस! तिला जाऊन विचार जा! तेव्हढाच एक कप चहा फुकटात गिळशील!

**भिकंभट** : ते झालेच रे! चहा घेणारच! माझा हक्कच आहे तो! पण पुढे काय झाले ते सांगशिल कि नाही?

**वामन्या** : सांगतो रे, पण तू मध्ये बोलू नको, बायका पण होत्या. त्याषण किती प्रकारच्या! त्यातल्या काही बायका उद्योगी होत्या, लग्न जमविणाऱ्या होत्या, गायिका होत्या. आपल्या बायकांसारख्या घरकाम करणाऱ्या होत्या! सगळ्या होत्या!

**भिकंभट** : त्या सगळ्या असतील पण त्या टि.व्ही. वरच्या मालविका मराठे आणि मंजिरी मराठे त्या बातम्या सांगतात त्या? त्या होत्या कि नाही. ती मोठी माणेस ती कशाला येतील म्हणा!

**वामन्या** : नाही रे मंजिरी मराठे आली होती. किती सुंदर आणि साधी मुलगी! काय सांगू भिकंभट तुला? मी तिच्याशी बराच वेळ बोलत होतो. ती आपल्याकडे येणारे सुद्धा! पण तिला भेटल्यापासून जिवाला चैन नाही.

**भिकंभट** : कां रे बुवा!

**वामन्या** : अरे काय सांगु तुला! माझी पोर जगती ना तर अशीच दिसली असती! ती भेटल्यापासून माझ्या पोरीचा चेहेरा डोळ्यासमोरून हलत नाही रे माझ्या.

**भिकंभट** : सावर तू वामन्या! आधी सांवर तू आपल्याला! अरे पोर गेली त्याला पांच वर्षे झाली आता दु:ख कसले करतोस? मी कुठे नाही रडत बसलो तो?

**वामन्या** : तुझे कोण गेले आहे रे बाबा!

**भिकंभट** : अरे माझी सोनी म्हैस नाही का मेली? चांगली ५ लिटरची होती!

**वामन्या** : अरे पण गाढवाच्या धसा म्हैस आणि मुलगी एकच काय रे?

**भिकंभट** : नाहीतर काय? सर्वांभूती एकच आत्मा. आता आमच्या महादेवाच्या गोठ्यातला रेडा आणि तू यांच्यातला आत्मा एकच! फक्त खोळ निराळी!

**वामन्या** : तू दीड शहाणा आहेस! पुढे काय झाले ते ऐक. तिथे सगळे कार्यक्रम अगदी छान पार पडले. गायन, वादन, कीर्तन, गोंधळ, जाखडी सगळे सगळे काही कार्यक्रम झाले! खरी गोम पुढेच आहे. आमची पोरे काही धडपडतील असे वाटले तर त्यांच्यासाठी उद्योगधंदे कसे करावेत, शेती कशी करावी, त्यासाठी काय शिकावे, कुठे शिकावे सगळे अगदी पद्धतशीर सांगितलेनी! आपले अनुभव सांगायला. नाना भिडे आणि भाऊ पटवर्धन सुद्धा आले होते.

**भिकंभट** : अरे एवढे लोक एवढ्या प्रकारचे आले होते म्हणतोस! पण एकूण होते तरी किती? आणि कायरे तूम्ही एकूण मराठे परिवाराची माणसे तरी किती?

**वामन्या** : हे बघ, गोव्यापासून नागपूर पर्यंतची एकूण ३२१ माणसे आली होती. आम्ही मराठे कुळातली ५ हजार जिवंत पुरुष माणसे आहेत त्यातले ६% लोक रत्नागिरीत आले होते म्हण!

**भिकंभट** : छान आले हो! बोलावले असतेत तर मी सुद्धा आलो असतो रे!

**वामन्या** : तू कशाला? तू कोल्हटकर! तिथे काय कोल्हांट्या उड्या मारायच्या होत्या?

**भिकंभट** : झाले? गेलास तू वळणावर? जा आता! वैनी तिकडे तुझ्या नावाने ठणाणा करत्येय बघ! (वामन्या आणि भिकंभट आपआपल्या उद्योगाला निघून गेले)

**हरी** : तर मंडळी! अगो तू आलिस पुन्हा ओटीवर! मंडळी म्हटले की आली ओटीवर!

**पत्नी** : अहो असे काय करता? चहा आणायचा कां असे विचारायला आल्ये हो!

**हरी** : अकलेचे बोलली! आण चहा आण! तर मंडळी अशी ही आमच्या गावाकडील गोष्ट! असेच येत जाहो मे महिन्यात! नाही तरी इथे येतोय कोण ह्या खेड्यात! पोरे मुंबई पुण्यास पोटाच्या मागे! आणि आम्ही इथे घर बागा सांभाळीत बसलोय! आता दिवस पालटतायत! आता पुढच्या पोरांना तरी घर सोडून जावे लागणार नाही असे वाटतेय. या आता तुम्ही! माझी आंघोळ नि पुजेची वेळ झाली. अहो घरातंली मंडळी. अंघोळीला पाणी काढा हो.

Marathe Pratishthan

# बेस्ट:नारी, नोकरी, निवारा आणि खूप काही

**नोकरी सारेच करतात. पण आपले नेमून दिलेले काम करीत असतानाच अवतीभवती घडणाऱ्या घटना संवेदनशीलपणे पाहण्याची दृष्टी फारच थोड्यांना असते. मुंबईच्या बेस्टमधील ३७ वर्षाच्या नोकरीत श्री. गजानन भास्कर, (पृ.४२७), (फोन. ५१६ ३९ ०७ ) यांनी टिपलेले काही मासलेवाईक, मनोरंजक अनुभव.- संपादक.**

१९५२ ते १९८९ ह्या सदतीस वर्षाचा काळ झटकन निघून गेला. "कारकून" ते "सचिव" ह्या प्रवासात निरनिराळ्या खात्यातून वाहतूक, ऑडिट, अकौंट्स, भविष्य निर्वाह निधी, इत्यादी नाना प्रकारचे अनुभव आले. मनुष्यस्वभावाचे पैलू बघण्यास मिळाले. त्यातले हे काही मासले.

विसाव्या वर्षी नोकरीला लागल्या लागल्या एकदा मी बसच्या रांगेत उभा होतो. पाऊस कोसळत होता. माझा दहावा नंबर होता. बस आल्यावर 'फक्त १० प्रवासीच चढा', असे कंडक्टरने सांगून डबल घंटी मारली. माझ्या मागेच एक युवती सारखे घड्याळाकडे बघत अस्वस्थतेने स्टॉपवर उभी होती. मी बसमध्ये चढता क्षणीच "साथ मे है" असे बोलून गेलो. कंडक्टरने सिंगल बेल मारून तिला सुद्धा घेतले. मी तिचे तिकिट पण काढले व नंतर ओळखीचे रूपांतर लग्नात झाले. सेवानिवृत्तीच्या आधी ओनरशिप ब्लॉक बेस्टच्या भाडे खरेदी योजनेमुळे मिळाला. अशारीतीने बेस्टमुळे नोकरी, निवारा व नारी पण मिळाली.

भविष्य निर्वाह निधीमध्ये असताना एका अधिकाऱ्यानी आपला वारसदार म्हणून "कुत्री" नेमली. नियमाप्रमाणे व्यक्तीलाच वारसदार करता येते. शेवटी कुत्रीकरिता ट्रस्ट करून ट्रस्टीना त्यांनी वारसदार नेमले. त्या अधिकाऱ्याचे म्हणणे की, मनुष्यजातीवर त्याचा विश्वासच नाही. कुत्रा मात्र कधी दगा देणार नाही. याउलट काही लोकांनी मुलीच्या लग्नाकरिता खोट्याच पत्रिका छापून कर्ज घेतले. खोटे ग्रामपंचायतीचे दाखले देऊन घरांकरिता कर्ज घेतले.

अधिकाऱ्यांच्या पदनामाच्या आद्याक्षराच्या सारखेपणामुळे घोटाळे होत असत. कॅन्टीन मॅनेजर व कमर्शिअल मॅनेजर, दोघांचेही पदनाम सी.एम. कमर्शिअल मॅनेजर हे उप महाव्यवस्थापकाच्या श्रेणीतील एक पद होते तर कॅन्टीन मॅनेजर हा दुय्यम अधिकारी. एकदा कॅन्टीन मॅनेजरने काही मोठ्या खर्चाच्या प्रकल्पाकरिता त्याच्याकडे चुकून आलेल्या कागदांवर मंजूर म्हणून काही न वाचता सही करून कागद पाठविले व त्यावर कारवाईस सुरवात झाली. नंतर ऑडिटच्या लक्षात हा घोटाळा आला. मग कॅन्टीन मॅनेजरच्या ऐवजी कॅन्टीन सुपरवायझर असा हुद्दा करण्यात आला.

वाहतूक खात्यात तर खूपच गंमती. एका बसस्टॉपवर एक तरुण महिला आपल्या नोकराला रांगेत उभे राहण्याकरिता पाठवीत असे व नंतर पंधरा वीस मिनिटाने त्याच्या जागेवर येऊन थांबत असे. सहाजिकच लगेचच येणाऱ्या बसमध्ये तिला प्रवेश मिळे. एके दिवशी एका तरुणाने तक्रार केली की हे कायद्याविरुद्ध आहे व जर बेस्टने हे थांबविले नाही तर कोर्टात केस करण्याची धमकी दिली. त्याचे म्हणणे बरोबर आहे असे बेस्टच्या कायदाखात्याने सांगितले. व त्याप्रमाणे त्या तरुणीला कळविण्यात आले. त्यावर ती उद्गारली "मी त्याच्या लग्नाच्या मागणीला नकार दिला, म्हणून हा असा सूड उगवतो आहे."

एकदा एक बाई ऑपेरा हाऊसमधून महालक्ष्मी देवळात बसमधून चालल्या होत्या. त्या एकट्याच होत्या. परंतु कंडक्टरकडे त्यांनी दोन तिकिटे मागितली. कंडक्टर दोन तिकिटे एका व्यक्तीला देण्यास तयार नव्हता. इतक्यात मी वाहतूक अधिकारी या नात्याने बसमध्ये गेलो असता, ही समस्या माझ्यापुढे आली. बाईचे म्हणणे असे की, आदल्या दिवशी त्या ऑपेराहाऊसहून महालक्ष्मीला देवळात जाताना त्यांनी तिकिट काढले नव्हते व ती त्यांना टोचणी आहे. म्हणून त्यांना दोन तिकिटे हवी आहेत. मी त्यांना सांगितले की तुम्ही ऑपेरा हाऊस ते दादर असे तिकिट काढा (त्याचे भाडे ऑपेरा हाऊस महालक्ष्मी देऊळ ह्याच्या दुप्पट आहे.) व महालक्ष्मीला उतरा, म्हणजे कंडक्टरला दोन तिकिटे देण्यास लागणार नाही व तुमच्या मनाची टोचणी पण जाईल.

बेस्ट बसमध्ये प्रवाशांनी बालकांना जन्म दिला आहे तर काही प्रवासी बसमध्येच हृदयविकाराने मृत्यु पावले आहेत. कंडक्टरच्या वागणुकीबद्दल तक्रारी येतात व त्यांच्यावर खात्यांतर्गत शिक्षेची कारवाई पण केली जाते. काही वेळा कंडक्टरच्या चांगल्या वर्तणुकीबद्दल प्रवासी प्रशंसा करतात. एका प्रवाशाने (हौसिंग बोर्डाचा अधिकारी) एका कंडक्टरला त्याच्या चांगल्या वर्तणुकीबद्दल खूष होऊन हौसिंग बोर्डात जागा मिळवून देण्यास मदत केली. तो कंडक्टर युद्धकाळात सैन्यामध्ये होता व त्यांच्याकरिता काही सदनिका हौसिंग बोर्डात राखीव होत्या.

बेस्ट समिती व महाव्यवस्थापक यांच्या सहकार्यावर संस्थेची प्रगती अवलंबून असते. काही वेळा दोघांमध्ये तणाव झाला तर सचिव ते दूर करण्यात मदत करू शकतो. एकदा एका अधिकाऱ्याचे पद भरण्यासंबंधी महा व्यवस्थापक व कमिटी यात बरेच महिने एकमत होत नव्हते. कमिटीने असा पवित्रा घेतला की, महा व्यवस्थापक जोपर्यन्त या पदासंबंधी कमिटीचे ऐकत नाही तोपर्यन्त इतर अधिकाऱ्यांच्या कोणत्याही बढतीचे प्रस्ताव मंजूर करायचे नाहीत.

मी "सचिव" म्हणून सभासदांना म्हटले की - "कथा कुणाची व्यथा कुणाला" एका पदाच्या वादाकरिता सर्व अधिकारी बढतीपासून वंचित राहिले आहेत". हे उद्गार ऐकल्यावर वातावरण एकदम निवळले व अधिकाऱ्यांच्या बढतीचे प्रस्ताव कमिटीने मंजूर केले.

*मराठे प्रतिष्ठानला हार्दिक शुभेच्छा*

**हितचिंतक,**

ठाणे

**श्री. जगन्नाथ दामोदर मराठे**

१२, लक्ष्मीनारायण अपार्टमेंट, गेड क्रॉसभवन मार्ग, ठाणे(प)



Marathe Pratishthan

### रसिक

**- मोरेश्वर हरी (पृ. ५४२) गोवा.**

लोक अगणित, भरले वाटेत
बाजारी, दुकानी, फिरती बागेत.
सर्वत्र नाचरा, उल्हास भरला
नाचतात मुले, अभ्यास सरला.
एकाएकी आले, एक दोन थेंब
थेंबामागे थेंब, सारे ओले चिंब.
एकाच सरीने, तारांबळ सारी
गर्दी आडोशाला, दुकानाच्या दारी.
प्रत्येकाच्या मुखी, तक्रारीचा सूर
सरीने साऱ्यांना, केलेले बेजार.
अनामिक कुणी, सरीत भिजला
ब्रम्हानंदी टाळी, चालतो एकला.
भिजल्या पांथस्था, आत्यंतिक मोद
गेलेल्या सरीचा, त्यास नाही खेद.

सर गेली दूर, भिजले कितीक
आनंदला एक, खरा जो रसिक.

### परि विसरू नको आम्हाला

**- हेमंत यशवंत (पृ.२९) औरंगाबाद.**

सांग सांग ग ताई मला
तू जाणार ना तव घरा?
तुझं वागणं प्रेमळ असं
का आम्हाला करतंय पिसं
तुझं बोलणं चालणं कसं
साऱ्या मोठ्यांना आवडेल असं
सांग सांग ग ताई मला
तू जाणार ना तव घरा?
मी हेमंत भाऊ तुझा
हा निरोप देतो तुला
तू डोळे पूस जा ग
तू आनंदाने रहा ग

परि विसरू नको आम्हाला
हे त्रिवार सांगतो तुला
परि विसरू नको आम्हाला.

### संसार

**- श्रीमती मैना (मनोरमा) गोविंद (पृ.२३०), मुंबई.**

नाही संसार हा सोपा, नाही गंमत जंमत
क्षणभरच्या सौख्याची, भारी पडते किंमत.
किंमत ती मोजताना, येती डोळ्यामध्ये आसू
आसवानो माघारी जा, हवे ओठावर हासू.
हसू कायम असावे, गृहिणीच्या मुखावर
मुखावर ना दिसावा, मनी पेटला अंगार.
अंगारही एकांतात, हळुहळु विझु द्यावा
द्यावा असा कधीतरी, श्रांत मनाला विसावा.
विसावा तो काय सांगू, घ्यावे देवाजीचे नाव
नावामध्ये देवाजीच्या, सारे साठलेत भाव.
भाव-भावनांचे ओझे, संसारांतील सोडावे
सोडावेत राग लोभ, सोडावेत हेवे-दावे.
हेवे-दावे, राग-लोभ, जेव्हा मनातुनी जाती
जाती खेद-खंत होई, आपसूक शांतवृत्ती.
शांतवृत्तीच्या मनाला, कशाचा ना खेदखंत
जीविताच्या साफल्याचा, तेथे होई सारा अंत.


*मराठे प्रतिष्ठानास शुभेच्छा*

# यशवंत विठ्ठल मराठे (प्रा) लि.

कौपिनेश्वर मंदिर, स्टेशन रोड, ठाणे.
फोन : ५३३ ४७३५, ५३३ २२२४
फॅक्स : ५४३ ४६१०

**ऑक्टोबर मध्ये हिऱ्याचं नवीन दुकान सुरू**


Marathe Pratishthan

With Best Compliments From



# Kusters Calico Machinery Ltd.

Bamangaon, Dist. Baroda,
Gujrat State.

Marathe Pratishthan

# विभाग ४ : गणमान्य, उद्योगी मराठे


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | मराठे प्रतिष्ठानचे भीष्मपितामह<br>- श्री. प. तथा बापुसाहेब मराठे | ५७ |
| २. | गोमंतकातील गणमान्य मराठे<br>- कालिदास बाळकृष्ण मराठे | ५९ |
| ३. | 'मराठे उद्योगा'ची तीन पिढ्यांची 'स्विफ्ट' वाटचाल | ६१ |
| ४. | तीन पिढ्यांचा सराफी व्यवसाय -<br>मे. यशवंत विठ्ठल मराठे (प्रा.) लि., ठाणे | ६४ |
| ५. | मराठ्यांच्या तीन पिढ्यांनी चालवलेले साप्ताहिक 'किरात' | ६६ |
| ६. | तीन पिढ्यांनी जोपासलेली<br>मराठे यांची संगीत संस्था - श्री गंधर्व महाविद्यालय, पुणे | ६७ |
| ७. | मी अनुराधा मराठे व माझी मुलगी अंजली | ६८ |
| ८. | मूकबधिरांच्या जीवनात आनंद फुलवण्यासाठी<br>झटणारी सौ. सीमा संजय मुळ्ये | ७० |
| ९. | आकांक्षांपुढती 'जिच्या' गगन ठेंगणे अशी<br>स्वयंव्यावसायिक सौ. स्वाती श्रीपाद मराठे | ७१ |


**गणमान्य, उद्योगी मराठ्यांची माहिती कळवण्याचे आवाहन**

निरनिराळ्या क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या, प्रसिद्धीच्या झोतात असणाऱ्या आणि नसणाऱ्याहि, कुलबांधव आणि विशेषतः भगिनींचा परिचय हितगुजमधून करून देण्याचा हा प्रयत्न.

तसेच उद्योग-व्यवसायाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत सतत तीन पिढ्या कार्यरत असणाऱ्या मराठ्यांच्या उद्योग-व्यवसायांचीहि माहिती सर्व कुलबांधवांपर्यंत पोचवणे हेहि हितगुजचे निश्चितच काम आहे.

या विभागांत छापलेले लेख हे केवळ वानगीदाखल आहेत. वाचकांनी अशा घराण्यांचे आणि व्यक्तींचे परिचय लेख हितगुजकडे प्रसिद्धीसाठी पाठवावे. निदान त्यांची नावे व पत्ते तरी कळवावे, असे सर्व कुलबांधवांना आवाहन. - **संपादक**

Marathe Pratishthan

YOU NO LONGER HAVE TO WORRY ABOUT YOUR
PROFIT BEING WASHED OUT IN SOAP

UPGRADE YOUR OIL

AND

REAP RICH HARVEST EVEN FROM
INDUSTRIAL GRADE RICEBRAN OIL

BY USING LATEST TECHNOLOGY FROM :-

**PEG CONSULTANTS AND ENGINEERS PVT. LTD.**

A COMPANY YOUNG IN AGE BUT RICH IN EXPERIENCE

**ACHIEVEMENT OF LAST FIVE YEARS**

- MORE THAN 50 TURNKEY CONTINUOUS REFINING PLANT FROM 30 TPD. TO 150 TPD.
- 80 CONTINUOUS NEURALISATION PLANTS.
- 60 BLEACHING AND DEODORISING (BOTH BATCH & CONTINUOUS).
- 90 INDIGENOUS PRESSURE LEAF FILTER.
- 10 DEACIDIFICATION PLANTS.

**WE OFFER THE FOLLOWING PLANTS ON CONCEPT TO COMMISSIONING**

- CONTINUOUS DEGUMMING
- CONTINUOUS AND BATCH BLEACHING
- PHYSICAL REFINING
- ACIDULATION
- CONTINUOUS NEUTRALISATION
- CONTINUOUS AND BATCH DEODORISING
- DEWAXING
- VANASPATI PLANT

FOR LATEST AND LOW MAINTAINENCE COST TECHNOLOGIES.


ALWAYS CONTACT :

**PEG CONSULTANTS & ENGINEERS PVT. LTD.**

208, DAMJI SHAMJI UDYOG BHAVAN, VEERA DESAI ROAD,
ANDHERI (WEST), BOMBAY - 400 053.
PHONE : 626 7721, 626 1194, 626 8197, 633 3092
TELEX NO. 011-78250 PEG IN, GRAM : "REFINPLANT~ BOMBAY - 400053
FAX NO. 99-022-6292049.

**RES. PHONES :-** MR. L.R. MALIK 6261751
MR. N. K. BORAH 6261215
NR. V. B. VIDWANS 8391517
MR. S. R. SALUNKHE 8221536

Marathe Pratishthan



# मराठे प्रतिष्ठानचे भीष्म पितामह श्रीधर परशुराम तथा बापुसाहेब मराठे

रत्नागिरी संमेलनात ८० वर्षावरील तीन कुलबांधवांचा सत्कार करण्यात आला. त्यातले सर्वात ज्येष्ठ होते पुण्याचे श्री. बापुसाहेब मराठे (पृ.९८). नुकतेच त्यांनी ८५व्या वर्षात पदार्पण केले पण ४ तारखेला पहाटे पुण्याहून संमेलनानिमित्त एस.टी. बसने ५५ सहकाऱ्यांसह निघून संमेलन व कोकणदौरा असा सुमारे १२०० कि.मीटरचा धावता प्रवास करून ६ तारखेला रात्री १॥ वाजता पुण्याला परत. हा उत्साह तरुणांनाहि लाजवणारा. उत्तम शरीरप्रकृती तर हवीच पण त्याबरोबरच दुर्दम्य इच्छाशक्ती आणि जिद्द असल्याशिवाय हे शक्य नाही. बापुसाहेबांना हे जमले कारण त्यांच्या जीवनाचे बोधवाक्यच मुळी 'मदायत्तम् तु पौरुषम्' असे आहे.

त्यांचे अवघे जीवन म्हणजे त्यांच्या अशा प्रकारच्या पौरुषाचे दर्शन म्हणणे वावगे होणार नाही.

९ जुलै १९१३ रोजी चिपळूण जवळच्या एका खेड्यात मालदौलीला भिक्षुकाच्या घराण्यात जन्म. शिक्षण काकांकडे. मॅट्रिक मध्ये त्यांच्या शिक्षकांनी वर्गातल्या इतर मुलांबरोबरच श्रीधरलाहि प्रश्न विचारला "तू पुढे कोण होणार?" श्रीधरचे उत्तर "मी संस्कृत घेऊन पदवीधर होणार!" आणि खरोखरीच ते १९३६ मध्ये मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजमधून संस्कृत घेऊन बी.ए झाले. १९३८ मध्ये कायद्याची पदवी मिळवून सुमारे ४ वर्षे उच्च न्यायालयात ॲडव्होकेट म्हणून काम केले. पण वेटिंग पिरियड कसा घालवायचा प्रश्न निर्माण झाला. त्यांनी टेरिटोरियल आर्मीत पूर्वीच कमिशन घेतलेले असल्यामुळे इमर्जन्सी कमिशन घेऊन ते लष्करांत गेले. 'मला सैन्यात जाण्यास त्यावेळी माझ्या पत्नीने संमती दिली-एक वर्षाचा मुलगा पदरात असताना हे विशेष' असेहि ते आवर्जून सांगतात.

ज्याचे श्रेय त्याला द्यावे, आपण नामानिराळे रहावे हे बापुसाहेबांच्या सर्वच कार्याचे वैशिष्ट्य. याचे अधिष्ठान कदाचित त्यांचे गीताध्ययन असावे. अनेक लोक आपण गीता वाचत असल्याचे अभिमानाने सांगतात, बापुसाहेब 'गीता जगतात'. 'मा फलेषु कदाचन' अशा वृत्तीने ते आपल्या मनाला जे पटले ते शांतपणे पण ठामपणे करीत असतात.

पुढची बापुसाहेबांची जीवनातली वाटचाल अगदी चित्रपटात शोभावी अशीच. सात वर्षे सैन्यात '१७ डोग्राज' या रेजिमेंटमध्ये काम केल्यावर कोकोज बेटावर असताना लढाई संपली. तिथून मुंबईच्या रुइया, पोतदार आणि खालसा या तीनहि कॉलेजात यू.ओ.टी.सी.चा ट्रेनिंग ऑफिसर म्हणून काम केले. नंतर बॉंबे सब एरियामध्ये 'स्टाफ कॅप्टन ए' म्हणूनहि काम केले. नंतर बंगलोरला के.जी.आर.आय.एम. कॉलेजात ट्रेनिंग ऑफिसर म्हणून नेमणूक झाली. याच काळात यू.पी.एस.सी.च्या इमर्जन्सी रिक्रुटमेंट करता अर्ज केला होता. त्याचा निकाल लागून जुलै १९४९ मध्ये पोलिस सर्व्हिस करता बापुसाहेबांची निवड झाली. बावीस वर्षांच्या पोलिस खात्यातल्या निरनिराळ्या १४ पदांच्या जबाबदाऱ्या पार पाडून १९७१ मधे पुण्याच्या पोलिस कमिशनरपदावरून बापुसाहेब लौकिक अर्थाने 'सेवा' निवृत्त झाले.

म्हणजे 'सेवा' संपली नाही. फरक एवढाच की १९७१ पर्यंत बापुसाहेबांनी अधिकारपदावरून लोकसेवा केली. हे सेवाव्रत त्यापुढेही आजतागायत त्यांनी चालू ठेवले आहे. मात्र पैसे कमावण्यासाठी काहीहि न करण्याचा नियम तंतोतंत पाळून! १९७१ पर्यंत त्यांनी स्वत:च्या कुटुंबापुरता संसार केला. मात्र त्यानंतर 'वसुधैव कुटुंबकम्' अशा वृत्तीने अनेक सार्वजनिक संस्थांचे संसार बापुसाहेब निरलस वृत्तीने समर्थपणे संभाळत आहेत.

सेवानिवृत्त झाल्यानंतर बापुसाहेबांना त्यांचे पोलिस खात्यांतले 'बॉस' आय.जी.पी. नगरवाला यांनी फोन करून सांगितले "मूर्खा",तू (पोलिसात असूनहि) काही पैसा कमावलेला नाहीस. तेव्हा तुझ्याकरता मी मुंबईत एक नोकरी राखून ठेवली आहे. फर्निश्ड क्वार्टर्स, गाडी आणि जनरल मॅनेजरच्या हाताखाली डायरेक्ट काम करायचे". तसेच ज्योतिषविशारद अजंता जैन यांनीहि कोर्टात चालू असलेल्या त्यांच्या एका केसमधे त्यांचे वकीलपत्र घेण्याची विनंती करून मागाल ती फी


रत्नागिरी संमेलनास शुभेच्छा

सुरेश गोविंद मराठे
सौ. संजीवनी मराठे

माटुंगा रोड (पूर्व), मुंबई.

हार्दिक शुभेच्छा

डोंबिवलीत ब्लॉक, प्लॉट, बंगला,
लिव्ह लायसन्स, पागडी तसेच डिपॉजिट तत्वावर
जागेसाठी भेटा.

वि. वि. मराठे

केदारबन समोर, टाटालाईन मानपाडा क्रॉसरोड, डोंबिवली (पू)
वेळ - सकाळ १० ते १ संध्याकाळ ५.३० ते ८.३०
सोमवार बंद


Marathe Pratishthan

देण्याची तयारी दाखवली. पण बापुसाहेबांनी पूर्ण विचारांती दोघांनाहि नकार दिला! निवृत्त झाल्यानंतर काय करायचे याचा निश्चित विचार त्यांनी निवृत्तीपूर्वीच केला होता. त्या दृष्टीने पूर्वतयारी म्हणून तत्वज्ञान वेदान्त, भगवद्‌गीता, आवडीच्या विषयावरची काही पुस्तके त्यांनी जमा केली होती. काही संस्थांचे सदस्यत्वहि त्यांनी स्वीकारले होते.

रोज सकाळी नेमाने अर्धातास प्राणायाम, त्यानंतर व्यायाम, टेनिस यांमुळे प्रकृति निकोप राहिली. वेदशास्त्रोत्तेजक सभा, वैदिक संशोधन मंडळ, ग्रंथोत्तेजक सभा, गीताधर्म मंडळ, अखिल ब्राम्हण मध्यवर्ती संस्था, रामकृष्ण मठ, विवेकानंद केंद्र अशा अनेक संस्थांची धुरा वाहताना त्यांना अपार मानसिक समाधान मिळते, वेदान्ताचा अभ्यास करण्याचीहि संधी मिळत, असे बापुसाहेब आवर्जून सांगतात. मराठे प्रतिष्ठानच्या स्थापनेपासून बापुसाहेब प्रतिष्ठानच्या कार्याचे मित्र व मार्गदर्शक आहेत हे प्रतिष्ठानचे निश्चितच महद्‌भाग्य आहे. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली आणि उपस्थितीत दरवर्षी पुण्यांत मराठे प्रतिष्ठानचा वर्धापन दिन २६ जानेवारीला साजरा होत असतो.

नोकरीत आणि संसारातहि बापुसाहेबांनी अनेक कटु प्रसंग सोसले. निरलसता, व तत्वनिष्ठा यांचेशी त्यांनी कितीहि दडपणे आली तरी तडजोड केली नाही. नोकरी जाण्याची त्यांना कधीच भीती नव्हती, 'लाथ मारीन तिथे पाणी काढीन' असा जबर आत्मविश्वास होता म्हणूनच त्यांना हे शक्य झाले असणार. परिणामी २२ वर्षात १४ वेळा बदल्या-बढत्या पोलिस सेवेत त्यांच्या वाट्याला आल्या. पण त्याचे त्यांना दुःख नाही. अनेक जबाबदाऱ्या पेलल्यामुळे आपला अनुभव समृद्ध झाला, राज्याच्या

**संस्कृतात भाषण करणारा पोलिस कमिशनर**

बापुसाहेबांनी पुण्याच्या पोलिस कमिशनर पदाची सूत्रे हाती घेतली आणि महाराष्ट्र संस्कृत परिषदेचे अधिवेशन पुण्यात झाले. यावेळी स्वागताध्यक्ष म्हणून सुंदर संस्कृत भाषण झाले ते पोलिस आयुक्त बापुसाहेब मराठे यांचे. पुणेकरांना या आयुक्तांचे पहिले दर्शन झाले ते सार्वजनिक कार्यक्रमात संस्कृत भाषण करणारा पंडित म्हणून.

निरनिराळ्या भागातील माणसे जवळून पाहता आली, अनेक मान्यवरांशी संपर्क, मैत्री करता आली, ही या 'नाण्याची दुसरी बाजू' ते आपल्याशी बोलताना आवर्जून पुढे करतात.

सांसारिक आपत्तीहि त्यांनी पचवल्या. मोठा मुलगा २५ वर्षांचा होऊन १९६७ मध्ये पीएचडी साठी कॅनडात गेला असता मोटर अपघातात गेला. आठ वर्षांची असताना एकुलती एक मुलगीहि डिप्थेरियाने कारवार येथे निधन पावली. नुकतीच त्यांची पत्नीहि वर्षभराच्या आजारानंतर निवर्तली. असे तडाखे बसणे संसारी माणसाला अनिवार्य असते. मानव हा पराधीन असल्यामुळे काळ एवढेच त्यास औषध आहे अशी याबाबत त्यांची भूमिका आहे.

अशा स्थितप्रज्ञ वृत्तीने आपला इंजिनियर मुलगा व नातवंडांसह बापुसाहेब समाधानी वृत्तीने आणि तरुणाच्या उत्साहाने अनेक सार्वजनिक संस्थांना कल्पवृक्षाप्रमाणे मदत, मार्गदर्शन करीत आहेत. त्यांच्या बंगल्याचे 'कल्पद्रुम' हे नाव खरोखरीच सार्थ झाले आहे.


हार्दिक शुभेच्छा

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

मुख्य कार्यालय सातारा



हवी हवीशी वाटणारी बँक

With Best Compliments From

# Bit-byte Computers



Shrinivas, 1st Floor, 291, Veer Savarkar Marg,
Dadar, Mumbai - 400028.
Tel. 445 8621

Marathe Pratishthan

# गोमंतकातील गणमान्य मराठे

**- कालिदास बाळकृष्ण (पृ.५४१), गोवा.**

हितगुजच्या संपादकाकडून गोमंतकातील गणमान्य मराठे या शीर्षकाचा एक लेख लिहिण्याची विनंती करण्यात आली, त्यावेळी मराठे कुलवृत्तांतासारखा अत्याधुनिक संदर्भ हाती असल्याने अडचण आली नाही.

संपादकांनी सुचविलेल्या संगीत, शिक्षण, साहित्य, राजकारण, समाजकारण याचबरोबर बागायती, उद्योग या क्षेत्रातील गणमान्य व्यक्तींची यादी खालीलप्रमाणे देता येईल.

१. **शिक्षणक्षेत्रात** कै. पांडुरंग बाळकृष्ण मराठे (पृ.५२२), कै. काशीनाथ सखाराम (पृ.५२३), कै. रामकृष्ण (विठ्ठल) नारायण (पृ.५५२) या सध्या हयात नसलेल्या व हयात असलेल्यामध्ये श्री. मोहन बाळकृष्ण (पृ.५२०), श्री. अनंत दत्ताराम (पृ.५३८) व श्री. वसंत विष्णू (पृ.५४९) यांची नावे घ्यावी लागतील.

२. **संगीत क्षेत्रात** कै. लक्ष्मण बाळकृष्ण (पृ.५५९) व आजच्या काळातील बाळकृष्ण रामनाथ (पृ.५४८) यांचा समावेश करता येईल.

३. **विज्ञान क्षेत्रात** डॉ. चंद्रकांत रामचंद्र (पृ.५३५) व श्री. राजेंद्र विष्णू (पृ.५२१) यांचा परिचय करायचा आहे.

४. **साहित्य क्षेत्रात** श्री. हनुमंत मोरेश्वर (पृ.५३७) यांच्याबरोबर श्री. नारायण बाळकृष्ण (पृ.५५९) व श्री. मोरेश्वर हरी (पृ.५४२) यांचा समावेश केला आहे.

५. **राजकारण क्षेत्रांत** श्री. सदाशिव वामन (पृ.५४८) धारबांदोडा यांचे काम बरेच आहे.

६. **सामाजिक क्षेत्रात** श्री. पांडुरंग दत्ताराम (पृ.५३८) व खोतोडे येथील श्री. लक्ष्मण पांडुरंग (पृ.५४३) यांचे काम उल्लेखनीय आहे.

७. **बागायत शेतीक्षेत्रात** श्री. शिवराम जनार्दन (पृ.५३१), श्री. राजाराम रामचंद्र (पृ.५१५) व श्री. सदाशिव नारायण (पृ.५२१) यांचा परिचय करून घेणे योग्य ठरेल.

८. **उद्योगक्षेत्रांत** श्री. नीळकंठ विष्णू (पृ.५२१) यांचा उल्लेख करणे सार्थ ठरेल.

**साहित्यातील नाट्य - संपादन** वेगळे काढल्यास श्री. लक्ष्मण शंकर (पृ.५२०), हितगुजचे संपादक व श्री. गणेश (सुरेश) शंकर (पृ.५२०) नाट्यक्षेत्रातील कामगिरीमुळे गणमान्य ठरतात.

आता प्रत्येकाचा थोडक्यात परिचय पुढे देत आहे.

**कै. पांडुरंग बाळकृष्ण** - पोर्तुगीज लायसेयीमचा अभ्यासक्रम पूर्ण करणारे, ज्योतीषातील गणकभूषण पदवी मिळविणारे व ग्वाल्हेरसारख्या शहरात नाव कमविणारे पांडुरंग काकांची जिद्द वाखाणण्यासारखी होती.

**कै. पंडित काशीनाथ शास्त्री सखाराम** -



न्याय, तर्क स्मृती व वेदान्त या चारही शाखेतून तीर्थ पदवी मिळविणारे व त्याचप्रमाणे 'भूषण' पदवी मिळविणारे व इंदोर, अहमदाबाद, सौराष्ट्र इथे संस्कृत अध्यापन करणारे व त्यानंतर मायभूच्या प्रेमापोटी गोव्यात परतलेल्या काशीनाथ शास्त्रींनी गोव्यातही वेदपाठशाळा, गौडपादाचार्य मठ इथे संस्कृतचे अध्यापन करून शेवटपर्यंत लोकांचे शिक्षण केले.

**कै. रामकृष्ण नारायण** - विठ्ठलशास्त्री म्हणून प्रसिद्ध असलेले रामकृष्ण नारायण यांनी शंकरपाठशाळेत काम केले. श्री. **मोहन बाळकृष्ण** माध्यमिक शिक्षक म्हणून तर श्री **अनंत दत्ताराम** यांनी प्राथमिक शिक्षक म्हणून हजारो विद्यार्थी घडविण्याचे काम केले. श्री. **वसंत विष्णू** अजूनही हे काम करतात.



बाळकृष्ण रामनाथ

संगीत क्षेत्रातील कै. **लक्ष्मण बाळकृष्ण** यांनी कर्नाटकातील सदाशिवगड येथे २८ वर्षे संगीत विद्यालय चालविले होते. पहिले शास्त्रीय संगीत विशारद, **धारबांदोडाचे बाळकृष्ण रामनाथ** कलाअकादमीची संगीतातील पदवी घेऊन श्रीमती किशोरी आमोणकरांकडे पुढील शिक्षण घेत आहेत.

विज्ञान क्षेत्रातील **डॉ. चंद्रकांत रामचंद्र**



आज बेळगाव येथे रहातात. जिद्द, चिकाटी व सचोटी या गुणांच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितीत कसे पुढे येता येते याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे डॉ. चंद्रकांत होत. बीए. गणित विषय घेऊन प्रथम आलेले डॉ. चंद्रकांत यांनी डॉक्टरेट मिळवून मुंबईच्या आय.आय.टी मध्ये २८ वर्षे काम केले. 'मिरर स्क्रीन' चा शोध लावल्याबद्दल राष्ट्रपती पुरस्कार मिळविणाऱ्या डॉ. मराठ्यांनी आपल्या पत्नीच्या जोडीने 'प्रौढ शिक्षणाचा श्रीगणेशा' हे एक उत्तम पुस्तक लिहिले आहे. आज आडनाव-जात याच्यापलिकडे जाऊन एक मानव म्हणून आपले काम चालू ठेवावे असे त्यांना वाटते.

बिंबल येथील **डॉ. राजेंद्र विष्णू** यांनी बंगलोरच्या सायन्स इन्स्टिट्यूटमधून शेतकी शास्त्रात डॉक्टरेट मिळविली. सध्या ते परदेशांत आहेत.

श्री. **ह.मो.मराठे सध्या वास्तव्य पुणे** यांनी पत्रकारिता व साहित्य क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे. किर्लोस्कर, स्त्री, मनोहर मध्ये संपादनाला सुरवात करून मध्यंतरी घरदार हे स्वत:चे मासिक सुरू करून परत अपूर्व पब्लिकेशनच्या किर्लोस्कर, स्त्री, मनोहरचे काम करीत आहेत. अनेक कथा व कादंबऱ्या लिहिणारे ह.मो. आजहि हे क्षेत्र सातत्याने गाजवीत आहेत.

श्री. **नारायण बाळकृष्ण** पुण्यातच राहतात. राष्ट्रीय ग्रंथालयात संस्कृतचे संपादक म्हणून काम केल्यानंतर संशोधनविषयक अनेक पुस्तके लिहीत आहेत.



**थिवी येथील मोरेश्वर हरी** यांनी ३० कथा, दोन नाटके, १२५ कविता आतापर्यंत लिहून गोव्यात आपले नाव गाजविले आहे.



Marathe Pratishthan


धारबांदोडाचे **श्री. सदाशिव वामन** यांनी ग्रामपंचायतीची स्थापना झाल्यापासून सरपंच पद सात वेळा टिकवून गोव्यात एक विक्रम केला आहे. मध्यंतरी गोवा विधानसभेचे आमदार पण होते. आणि अजूनही होतील व मंत्री पण होतील अशी जिद्द आजही असणारे राजकारणातील एकमेव मराठे.



**श्री. पांडुरंग दत्ताराम** पर्वरी येथे रहातात. नाट्यक्षेत्रात नट व दिग्दर्शक म्हणून कीर्ती मिळविलेल्या पांडुरंगांनी साने गुरुजी कथामाला, गोमंतक मराठी अकादमीचे काम व इतर सामाजिक संस्थांचे काम मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेऊन सुरू ठेवले आहे.



श्री. **लक्ष्मण पांडुरंग** आपला व्यवसाय सांभाळून विश्व हिंदु परिषदेच्या कार्यात व इतर सामाजिक संस्थात संस्कृतप्रचार, संस्कारकेंद्र या क्षेत्रात सातत्याने काम करतात.



आंबेलीचे श्री **शिवराम जनार्दन** बागायत शेती क्षेत्रात प्रयोग करीत असतात व त्यांचा फायदा इतरांना देण्यास उत्सुक असतात. तर **धामश्याचे श्री. राजाराम रामचंद्र** आपण वडिलांचा वारसा पुढे चालवीत आहोत असे नम्रपणे सांगतात. **वेळगे** या क्षेत्रात महत्वाचे आहे.



श्री.**नीलकंठ विष्णू** यांनी डिचोली येथे स्वत:चा लकी टायर वर्क्स हा उद्योग सुरू करून मराठ्यातील तरुणांना आदर्श घालून दिला आहे. आज ते सीमेंट पाईप, प्री-फॅब्रिकेटेड सीमेंट चौक्या, कापड रंगवणे, लाँड्री असे अनेक व्यवसाय करीत आहेत.

श्री. **गणेश शंकर** यांनी दिल्लीत राष्ट्रीय नाट्य विद्यालयात (NSD) नाट्यक्षेत्रात बरेच काम केले आहे. मध्यंतरी गोव्यात कलाअकादमीत रंगमेळचे प्रमुख होते.

श्री. **लक्ष्मण शंकर** यांची 'हितगुज' मधील कामगिरी आपणा सर्वांसमोर आहे. त्यामुळे त्यांच्याविषयी अधिक न सांगता इथेच थांबतो.


*मराठे प्रतिष्ठानला हार्दिक शुभेच्छा*

**माधव परशुराम खांबेटे**
२३, क्षमा, स्टेट बँक कॉलनी, नौपाडा, ठाणे-४००६०२

**रमेश माधव मराठे**
ए-१३, शांती अपार्टमेंट्स, गवाणपाडा, मुलुंड(पू), मुंबई -८१

WITH BEST COMPLIMENTS FROM

**Alwin Sales Corporation**

Mfrs : Gift Articles & Novelties

ASHOK MARATHE
Ramachandra Niwas,
Beach Manwadi Pipe Road,
Kurla West, Mumbai - 400 070.
Tel.: 514 46 89, Res. 711-441350

With Best Compliments From

**Hemant Marathe**

**Project Consultant**

2/18, Shivanand Society,
Vile Parle East,
Mumbai - 400 051.
Tel.: 6152874/6177757



Marathe Pratishthan

# ऑफसेट छपाई यंत्राचे भारतातले आद्य उत्पादक व निर्यातदार 'मराठे उद्योगा'ची तीन पिढ्यांची 'स्विफ्ट' वाटचाल

**१९४७ मध्ये भारताच्या फाळणीच्या अरिष्टामुळे कराचीतले आपले उद्योग गुंडाळून सखाराम पुरुषोत्तम तथा आप्पासाहेब मराठे मुंबईत आले. त्यांनी इथे कारखानदारी सुरू केली. मराठे उद्योग भवन उभारले आणि स्विफ्ट्‌स्‌चे रोपटे लावले. त्यांचा पुत्र सुरेश याने ते निगुतीने वाढवले. १९७७ मधे भारतात ऑफसेट छपाई यंत्राची निर्मिती करून भारत सरकारकडून आयात पर्याय पारितोषिक मिळवले, १९९० मध्ये भारतात प्रथमच 'ऑटोमेटिक पेपर फोल्डिंग मशीन'चीहि निर्मिती केली. तिसऱ्या पिढीत यशवंत व वसंत यांच्या जमान्यात अमेरिकन कंपनीच्या तांत्रिक सहयोगातून जागतिक प्रतीची स्विफ्ट्‌स्‌ मुद्रणयंत्रे निर्माण करून परदेशांत निर्यात करण्यात येत आहेत.**

**महाराष्ट्रीय लोकांत उद्योजकता व धाडस नाही असे म्हणणाऱ्यांना हे चोख उत्तर आहे असे नक्कीच मानावे लागेल.**

काही माणसांना मोठ्या कुळांत जन्म झाल्यामुळे आपोआप मोठेपण मिळते, तर काही जण स्वतःच्या कर्तबगारीने आपल्या कुळाचे नाव रोशन करतात. वेंगुर्ल्याचे **सखाराम पुरुषोत्तम ऊर्फ आप्पासाहेब मराठे** हे दुसऱ्या प्रकारांत मोडणारे कर्तृत्ववान कुल-बांधव! त्यांचे वडील होते साधे चहाकॉफीच्या दुकानाचे मालक. प्रथम गोव्यांत पणजीला आणि नंतर महाराष्ट्रात सावंतवाडी आणि वेंगुर्ल्याला. त्या काळात हॉटेल व खानावळीचा धंदा कमी प्रतीचा मानला जात होता. पण माणसाची प्रतिष्ठा धंद्याच्या स्वरूपावर नसून तो चालवण्याचे कौशल्य आणि यशस्वीपणा यांवर अवलंबून असते अशी त्यांची मनोभूमिका होती. प्रामाणिकपणा, चिकाटी आणि कष्ट करण्याची तयारी या गुणांच्या बळावर त्यांनी हॉटेलचा धंदा यशस्वी केला.



आप्पासाहेबांचा जन्म १९११ मध्ये वेंगुर्ल्याला झाला. घरची गरिबी. त्यामुळे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण पूर्ण करून तत्कालीन अनेक महत्वाकांक्षी तरुणांप्रमाणे त्यांनी नशीब काढण्यासाठी मुंबईची वाट धरली. तिथे त्यांनी रेल्वेत काही दिवस नोकरी केली. पण नोकरीत त्यांचे मन रमले नाही. काहीतरी स्वतंत्र धंदा करावा, स्वोन्नती आणि राष्ट्रोन्नतीही होईल असे काहीतरी करावे असे त्यांना त्या वेळच्या स्वातंत्र्य विचारांनी भारलेल्या वातावरणात वाटत होते.

त्यांचे एक आप्त श्री. ना.पां. पटवर्धन यांच्या पी. शहा आणि कंपनी नावाच्या मोटार बॉडी बिल्डिंगला लागणाऱ्या सामानाची विक्री करणाऱ्या कंपनीत पांच वर्षे नोकरी केली. त्या अनुभवाच्या आधारावर त्याच कंपनीच्या कराची शाखेचे मॅनेजर म्हणून त्यांची नेमणूक झाली. शाखेचा कारभार तर त्यांनी उत्तम तऱ्हेने चालवलाच. पण आपली स्वतःची 'सनबीम इंजिनिअरिंग वर्क्स' या नावाने नवीन व्यवसाय संस्था १९४२ मध्ये सुरू केली.

### फाळणीचे अरिष्ट

आप्पासाहेबांचा कराचीत चांगलाच जम बसला. आपले उद्योग वाढवण्याची जिद्द त्यांच्यात निर्माण झाली. नवीन क्षेत्रे ते शोधक नजरेने हेरू लागले. कराचीजवळच्या समुद्रात शार्क मासे खूप, त्यांच्यापासून मिळणाऱ्या तेलांत व्हिटॅमिन 'ए'चे प्रमाण इतर ठिकाणच्या माशांपेक्षा मुबलक. त्यामुळे हा धंदा यशस्वी होणार ही त्यांना खात्री होती म्हणून १९४४ साली माशांच्या तेलाच्या उद्योगासाठी 'सिंध इंडस्ट्रियल ॲन्ड फार्मास्युटिकल कंपनी लि.' या नावाने नवीन कंपनी काढून लौकरच माशांच्या तेलाची फॅक्टरीहि चालू करण्यात आली. आप्पासाहेबांची जिद्द, चिकाटी यामुळे व्यवसायाची उत्तरोत्तर भरभराटच होत गेली.

पण नियतीच्या मनात काही निराळेच होते. १९४७ मध्ये भारताची फाळणी झाली. कराचीत बाहेरून आलेल्या गुंडांनी धुमाकूळ घातला. त्यात ते व त्यांचे कारखान्यासह उद्योग यांचा मोक्ष होण्याचा दुर्धर प्रसंग ओढवला. त्यातून बचावण्याचे त्यांनी शर्थीने प्रयत्न केले. शेवटी अगदीच नाइलाज झाला तेव्हा तिथले सर्व उद्योग गुंडाळून नेसत्या वस्त्रानिशी तिकडून पुन्हा मुंबईत येण्याचा निर्णय त्यांना घ्यावा लागला. सर्वांशी मिळून मिसळून वागण्याचा व गोड स्वभाव आणि स्थानिक मुसलमानांशी असलेले त्यांचे मित्रत्वाचे संबंध यांमुळे तिथल्या बोहरी मुसलमानांनी त्यांना संरक्षण दिले आणि सुखरूप मुंबईत यायला मदतहि केली.

अनेकांनी आप्पासाहेबांवरील विश्वासाने त्यांच्या कराचीतल्या कंपन्यांत मोठमोठ्या रकमा गुंतवल्या होत्या. धंदा ज्या परिस्थितीत गुंडाळावा लागला त्या परिस्थितीत अशा रकमा परत करणे कायद्याच्या दृष्टीने वादग्रस्त ठरणारे होते. पण कायद्याचा आश्रय न घेता आपली वैयक्तिक नैतिक जबाबदारी पार पाडण्याच्या भूमिकेतून, पराकाष्ठेची धडपड करून, प्रसंगी तिथला धोका पत्करूनहि भागधारकांचा पैसा शक्य तितका परत केला.

### पुनश्च हरि ओम्

मुंबईत आल्यावर आप्पासाहेबांनी कारखानदारीचा 'पुनश्च हरि ओम्' केला. 'सचिन आणि कंपनी' या नावाने, श्री. ना.पां. पटवर्धन यांच्या सहाय्याने, सरकारी व इतर टेंडर्स भरून मशिनरी, हार्डवेअर, टूल्स, इत्यादि माल ते पुरवू लागले. आणखी एक पाऊल पुढे टाकावे म्हणून १९५९ साली बांद्रयाला भाड्याच्या जागेत स्वतःच्या एकट्याच्या जबाबदारीवर 'सचिन इंजिनियरिंग

Marathe Pratishthan

कॉर्पोरेशन' या नावाने स्वतंत्र वर्कशॉप स्थापन केले. ती जागा अपुरी पडू लागल्यामुळे प्रभादेवी दादर येथे पोर्तुगीज चर्चच्या मालकीच्या इंडस्ट्रियल एरियांत सुमारे १६०० चौ. वार जागा ९९ वर्षांच्या कराराने घेऊन तिथे आज आपणाला दिसते ती 'मराठे उद्योग भवन' ही भव्य इमारत बांधून आपल्या सर्व उद्योगांचा संसार तिथे थाटला. सचिन इंजिनियरिंग कॉर्पोरेशन, स्विफ्ट्स् प्रा.लि. आणि अल्फा इलेक्ट्रिकल्स या आपल्या तीन कंपन्यांतून मोटारगाड्या, रेडियो, टाइपरायटर्स, डुप्लिकेटिंग मशीन्स इ. ना लागणाऱ्या वस्तूंचे, तसेच बोटींना लागणारे दिवे, पाण्याच्या बॅगा यांचेहि उत्पादन ते मोठ्या प्रमाणावर करू लागले.

कराचीत उध्वस्त झालेले आप्पासाहेब मराठे जणू फिनिक्स पक्ष्याप्रमाणे राखेतून मुंबईत पुन्हा उभे राहिले. त्यांच्या या औद्योगिक कार्य-कर्तृत्वाचा गौरव म्हणून मुंबई महानगरपालिकेने प्रभादेवी येथील 'मराठे उद्योग भवना' समोरून जाणाऱ्या प्रमुख रस्त्याला 'आप्पासाहेब मराठे मार्ग' असे नाव दिले हे उचितच मानावे लागेल.

कंपन्यांचा वाढता व्याप लक्षात घेऊन आप्पासाहेबांनी **त्यांचा मुलगा सुरेश** इंटर कॉमर्सला शिकत असतानाच त्याला १९६० मध्ये आपल्या व्यवसायांत सामील करून घेतले. पदवी मिळवणारे लोक केवळ सुखाची नोकरी करण्याच्या मागे लागतात, त्यांना वर्कशॉपमध्ये काम करणे कमीपणाचे वाटते अशी त्यांची धारणा होती. म्हणूनच त्यांनी विद्यापीठाच्या पदवीपेक्षा कारखान्यातल्या प्रत्यक्ष अनुभवाला प्राधान्य देऊन आपल्या मुलाला कारखानदारीत गुंतवून टाकले. अशा तऱ्हेने वयाच्या पंचविशीतच सुरेशभाऊंच्या कर्तृत्वाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

**'आयात पर्याय' पारितोषिक**

वडिलांची प्रेरणा आणि मार्गदर्शन यांच्या बळावर सुरेशभाऊंनी कारखानदारीत आपला जम बसवायला सुरवात केली. १९६९ साली वयाच्या अवघ्या ५८ व्या वर्षी वडिलांचे निधन झाले आणि ३२ वर्षांच्या अल्प वयांत सुरेशभाऊंवर एकट्यावर सर्व कंपन्यांची जबाबदारी पेलण्याचा प्रसंग आला. त्यांचे नातेवाईक नारायण ऊर्फ राजाभाऊ केळकर आणि दिवाकर गोविंद बर्वे यांच्या सहकार्याने ती समर्थपणे पेलली आणि आप्पासाहेबांनी लावलेल्या उद्योगवृक्षांची निगुतीने जपणूक करून ते वाढवले. दूरदृष्टि ठेवून भारतात त्यांनी प्रथमच ऑफसेट मुद्रण यंत्राची निर्मिती सुरू केली.

१९७७ मध्ये त्यांच्या या उत्पादनाला भारत सरकारकडून 'आयात पर्याय पारितोषिक' मिळाले. त्यांच्या स्विफ्ट्स् कंपनीतून मुद्रणाशी संबंधित वेगवेगळी यंत्रसामुग्री निर्माण होऊ लागली. त्यासाठी मुंबईतली जागा पुरेनाशी झाली. नाशिकजवळ अंबड येथील एम.आय.डी.सी. इंडस्ट्रियल एरियांत जागा घेऊन तिथे नवीन कारखान्याची उभारणी करण्यात आली. १९९० मध्ये स्विफ्ट्स्ने भारतात प्रथमच ऑटोमॅटिक पेपर फोल्डिंग मशीनची निर्मिती केली.

स्विफ्ट्स्च्या सर्व उत्पादनांना भारताच्या निरनिराळ्या भागातूनच नव्हे तर परदेशांतूनही चांगली मागणी आहे. त्यासाठी देशाच्या निरनिराळ्या भागांत अनेक शहरांत त्यांनी आपली विक्री व सेवा केंद्रे स्थापन केली आहेत.

या सर्व व्यापांत सुरेशभाऊंचे दोन्ही मुलगे - यशवंत आणि वसंत त्यांना आता समर्थपणे साथ देत


## "वास्तु शिल्पी"

**बिल्डर्स आणि डेव्हलपर्स यांच्या शुभेच्छा**



पर्यावरण मुक्त, धार्मिक स्थळ, नाशिक येथे
शांत आणि रम्य परिसरात
आपला ब्लॉक नोंदवा आणि
आपल्या गुंतवणीचा
भविष्यात भरपूर फायदा मिळवा.

**बुकिंग साठी संपर्क :**
खांबेटे, ६०१ रामतीर्थ, राममारुती रोड, ठाणे (प) ४०० ६०२
**फोन : ठाणे ५४२ ६९६३ नाशिक ३५५०८९**

**With Best Compliments From**

*M/s. Vaman Shankar Marathe*
*Pvt. Ltd.*
*Jewellers*

**Abhivadan, 1st Floor, Shivaji Path,**
**Thane-2. Maharashtra, India.**
**Tel. 54203337/542 2494**
**Fax. 91(022) 542 2042**




Marathe Pratishthan



यशवंत, सुरेश आणि वसंत

आहेत. थोरला यशवंत (जन्म १९६०) बी. एस्सी. पर्यंत शिकून व्यवसायांत प्रामुख्याने निर्यातीची व्यवस्था सांभाळत आहे. तर धाकटा वसंत (जन्म १९६३), डी. एम. ई., ए. एम. आय. ई. ई., एम्. एस्. (व्हर्जिनिया युनिव्हर्सिटी) याने 'कॉम्प्युटर एडेड डिझाईन' या विषयाचा विशेष अभ्यास केला असून मशिनरी डिझायनिंग बाबतच्या रिसर्च आणि डेव्हलपमेंटचे काम प्रामुख्याने पाहात आहे. नाशिक येथील कारखान्याची जबाबदारी मुंबईतून 'रिमोट कंट्रोल'ने पार पाडणे योग्य नाही या भूमिकेतून नाशिकमध्येच राहून ते या कारखान्याची जबाबदारी समर्थपणे पेलत आहेत.

### नवी झेप

भारत सरकारने अलिकडेच खुल्या व्यापाराचे धोरण स्वीकारले आणि स्विफ्ट्स्ने या वातावरणाचा फायदा घेऊन आणखी एक नवी झेप घ्यायचे ठरवले. जागतिक बाजारपेठेत स्विफ्ट्स्च्या ऑफसेट छपाई यंत्राची मोठ्या प्रमाणात निर्यात करण्यासाठी त्याचे आधुनिकीकरण करणे गरजेचे झाले. त्यासाठी स्विफ्ट्स्ने जगप्रसिध्द ए.एम. इंटरनॅशनल या अमेरिकन कंपनीशी तांत्रिक सहयोगाचा करार करण्याचे ठरविले. १९९५ च्या मध्यास यशवंत व वसंत या दोन तिशीतल्या तरुणांनी अमेरिकेत जाऊन ए.एम. इंटरनॅशनल या कंपनीशी तांत्रिक सहकार्याच्या करारावर सह्या केल्या. तसेच मुद्रकांची 'मक्का' मानल्या जाणाऱ्या 'द्रुपा' या जर्मनीतल्या मुद्रणविषयक प्रदर्शनालाही हजर राहून तिथे आलेल्या देश-विदेशांतल्या मुद्रकांना आपण आता भारतातून ही नवीन मशीन्स पुरवू शकू याचा विश्वास दिला. नाशिकच्या कारखान्यांत या यंत्राचे उत्पादन सुरू झाले असून वाजवी भावांत हे जागतिक दर्जाचे मशीन आता छोट्या मुद्रकांना उपलब्ध झाले आहे.

अलिकडेच स्विफ्ट्स्ने जपानच्या कानेमात्सू कॉर्पोरेशनबरोबर सहकार्याचा करार केला असून त्यांनी सीकी डिजिटल डुप्लिकेटर्स तसेच कॉपी प्रिंटर्स देशाच्या बाजारात आणण्याचे ठरविले आहे. शाळा, बँका, विद्यापीठे, सरकारी खाती अशांसाठी हे विशेष उपयुक्त ठरणार आहेत. बाजारपेठेचा अंदाज घेऊन या यंत्रांचेही उत्पादन 'स्विफ्ट्स्' च्या कारखान्यांत सुरू करण्याचा विचार यामागे निश्चितच असावा.

### सामाजिक बांधिलकी

आप्पासाहेबांनी २०-२२ वर्षांत मुंबईच्या औद्योगिक वातावरणावर स्वतःचा ठसा उमटवला हे त्यांचे कर्तृत्व निश्चितच वाखाणण्याजोगे आहे. पण त्याहून महत्त्वाची गोष्ट आहे ती म्हणजे त्याचे सामाजिक बांधिलकीचे भान ! स्वतःच्या उन्नतीबरोबरच आपल्या समाजातल्या उद्योगी व्यक्तींना व संस्थांना शक्य तितके सहाय्य करण्याकडे त्यांचे सतत लक्ष असे. पाकिस्तानच्या निर्मितीमुळे कराचीहून परत आलेला महाराष्ट्रीय समाज व त्यांच्या संस्था यांना त्यांचा नेहमीच आधार असे. तसेच आपल्या जन्मगावांतल्या शिक्षणसंस्थांनाही त्यांनी सढळ हाताने मदत केली. कृतज्ञता हा गुण त्यांचा स्थायीभाव होता. आपल्या हातून होत असलेल्या कार्यामागे अनेक व्यक्तींचा हातभार आहे असे ते नेहमी कृतज्ञतापूर्वक बोलून दाखवीत असत.

हाच त्यांचा वारसा सुरेशभाऊंनीहि पुढे चालवला आहे - 'कांकण'भर सरसच श्रेणीने म्हटले तर वावगे होणार नाही. कारण त्यांच्या या **सर्व कार्यात त्यांची पत्नी सुलभा यांची त्यांना 'सावली'सारखी साथ असते** असे म्हणणे वावगे होणार नाही. केवळ घरची आघाडीच नव्हे तर व्यावसायातल्या अडीअडचणीच्या वेळीही सुरेशभाऊ त्यांच्याशी सल्लामसलत करतात. मराठे प्रतिष्ठान सारख्या कुलबांधवांसाठी काम करणाऱ्या संस्थेचे कार्य हे जणू आपल्या घरचेच कार्य आहे अशा तऱ्हेने प्रतिष्ठानच्या प्रत्येक कामांत त्या जातीने लक्ष घालतात.



'केवळ स्वतःसाठी' जगलास तर मेलास, दुसऱ्यासाठी मेलास तरच खऱ्या अर्थाने जगलास' हे वि. स. खांडेकरांचे तत्वज्ञान सुरेश-सुलभा दोघांच्याहि जीवनाचा मूलाधार आहे. म्हणूनच सुलभाताईंनी विनातक्रार त्यांच्या आजारी सासूबाईंची प्रेमळपणे सेवा-चाकरी केली. आप्तस्वकीयांप्रमाणेच कारखान्यांतल्या नोकर-चाकरांच्याही अडी-नडीला त्या धावून जातात. आपल्या कारखान्यातले कामगार हेच आपले खरे आधार आहेत या भावनेने सुरेशभाऊ त्यांच्याकडे पाहतात आणि तेही त्यांच्या या 'भाऊं'ना देवमाणूस मानतात. आणि म्हणूनच इतक्या वर्षांच्या कारखानदारीत एकदाच त्यांच्या कारखान्यांत संप झाला. अगदी 'प्रेतयात्रा' काढण्यापर्यंत कामगारांची मजल गेली पण सुरेशभाऊ आपल्या भूमिकेवर खंबीर राहिले. त्यांच्या आर्जवी व मनमिळाऊ स्वभावाने ते कामगारांना आपले म्हणणे पटवून देऊ शकले आणि सामोपचाराने संप मिटला. कामगार खूष झाले. 'भाऊ' त्यांना अधिकच जवळचे वाटू लागले.

सुरेशभाऊंनी अनेक होतकरू तरुणांना मुद्रणव्यवसायांत उभे राहण्यास मदत केली आहे. उद्योगव्यवसायांत मराठी माणसांनी मोठ्या प्रमाणात पुढे यायला हवे हा त्यांचा निदिध्यास आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, दादर येथील ब्राह्मण सेवा मंडळ, मराठे प्रतिष्ठान अशा विविध संस्थातून जबाबदारीच्या जागा स्वीकारून ते याबाबत सतत प्रयत्नशील आहेत.

थोडीशी धडाडी, चिकाटी, जिद्द आणि प्रामाणिकपणा असेल तर महाराष्ट्रीय माणूसही गुजराती, मारवाडी, पारशी समाजाप्रमाणे घराण्याचा उद्योग चालवू शकतो हे आप्पासाहेब व सुरेशभाऊंनी दाखवून दिले आहे; 'साहसे श्रीः प्रतिवसति' हा वस्तुपाठ घालून दिला आहे. आप्पासाहेबांनी १९५९ मधे लावलेल्या इवल्याशा रोपट्याचा 'वेलू' आता 'गगनावरी' गेला आहे. त्यांचे नातू यशवंत आणि वसंत यांनी धडाडीने पदार्पणातच आंतरराष्ट्रीय सहकार्य कराराच्या रूपाने त्यांचे इरादे स्पष्ट केले आहेत. आतापर्यंतच्या इतिहासाप्रमाणेच पुढेही मुद्रण व्यवसायात नवनवी कीर्तिमाने प्रस्थापित करून मराठे उद्योगांची घोडदौड अधिक वेगाने चालू राहील याचे हे 'प्रसादचिन्ह'च म्हणावे काय ?

Marathe Pratishthan




# तीन पिढ्यांचा सराफी व्यवसाय
# मे. यशवंत विठ्ठल मराठे (प्रा.) लि., ठाणे.

**मे. यशवंत विठ्ठल मराठे (प्रा.) लि., ही पेढी गेल्या ५० वर्षाहून अधिक काळ ठाण्यात सोन्या-चांदीच्या दागिन्यांचा व्यवसाय करीत आहे. अलिकडेच त्यांनी यशवंत विठ्ठल मराठे अँड सन्स या नावाने फक्त हिऱ्याच्या दागिन्यांचे नवीन दुकान ठाण्यातच उघडले आहे. तिसऱ्या पिढीत घेतलेली ही नवी झेप आपणा सर्व कुलबांधवांना खचितच अभिमानास्पद आहे. या संदर्भात या पेढीचे मालक आनंदराव (आनंद यशवंत - पृ.२७७) यांच्याशी झालेली ही बातचीत. - संपादक**

यशवंतरावांचे वडील (विठ्ठल लक्ष्मण) ज्योतिषी. ते पंचांग करीत. भिक्षुकीचा व्यवसाय करीत. मग यशवंतराव या सोन्याचांदीच्या व्यवसायात कसे काय आले याबाबत आनंदरावांना विचारले असता त्यांनी सांगितले.

"यशवंतराव ४-५ वर्षाचे असतांना त्यांचे वडील वारले. मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण बेळगावात बहिणीकडे झाले. मॅट्रिकच्या परीक्षेसाठी ते ठाण्याला थोरले बंधु शंकर यांचेकडे आले. ते तिथे नोकरीला होते. परीक्षा पास झाल्यावर यशवंतरावांनी मुंबईत उदबत्त्या विकण्याचा व्यवसाय सुरू केला. भांडीकुंडी व अन्य वस्तूहि उदबत्त्यांबरोबरच विकू लागले."

"त्यांची ही व्यवसाय करण्याची जिद्द व सचोटी पाहून ठाण्यातच देशपांडे नावाच्या गृहस्थांनी त्यांना आपल्या सोन्याचांदीच्या दुकानात नोकरी दिली. तिथे ते सोनारकाम शिकले. या निमित्ताने त्यांचा मुंबईतल्या 'मिकामोटो' या कल्चर मोत्यांच्या व्यापारातल्या अग्रगण्य कंपनीशी संपर्क आला. या कंपनीने यशवंतरावांना मोत्यांच्या व्यापारात यायला प्रोत्साहन दिले. महाराष्ट्रभर फिरून कल्चर मोती विकण्यासाठी उधारीवर माल दिला."

"फिरत्या विक्रीव्यवसायातून मग स्थायिक दुकानदारीची कल्पना स्फुरली. भाड्याचे दुकान घेऊन लोकांकडून ऑर्डर घेऊन दागिने घडवून देण्याचे काम सुरू केले. या अनुभवातून आत्मविश्वास आला. तसेच मणिलाल चिमणलाल आणि मोहनलाल भगवानदास या दोन सोने विकणाऱ्या प्रसिद्ध पेढ्यांनी सर्व प्रकारच्या सहकार्याचे आश्वासन दिले. या बळावर १९४५-४६ च्या सुमारास यशवंत विठ्ठल मराठे (प्रा.) लि. या नावाने सध्याचे दुकान चालू केले".

दुकान चालू झाल्यानंतरच्या वाटचालीबाबत सांगताना आनंदराव म्हणाले "सुरवातीच्या काळातच अडचणीचे प्रसंग निर्माण झाले. प्रथम दुकानावर दरोडा पडला. गांधीवधानंतर तर काही काळ फारच अस्वस्थतेत गेला. आमच्या घरावर दगड येत. 'मराठे पितळ विकतात, सोने नव्हे' असे भिंतीवर लिहिले जाई. पण या सर्व प्रसंगातून धीराने व सचोटीने वाटचाल करीत दुकानाची प्रगती चालू राहिली. अडचणींच्या वेळी अनेकांनी ठेवींच्या रूपाने मदतहि केली. पुढे १९६६ मध्ये गोल्ड कंट्रोल कायदा आला. फक्त १४ कॅरेटचेच दागिने करायला परवानगी होती. शुद्ध सोन्याच्या दागिन्यांना बंदी घालण्यात आली. कायद्यातील पळवाटांचा फायदा घेऊन, शुद्ध सोन्याचे दागिने बनवून देणाऱ्या अनेकांनी या काळात खोऱ्याने पैसा केला."

"पण वडलांनी या मार्गाने जायचे नाही असे ठरवले. नियमबाह्य काम करून पैसा मिळवण्याचा मोह टाळला. याच वेळी मीहि B.Sc. होऊन दुकानाच्या कामात लक्ष घालीत होतो. पण लोकांच्या ठेवी परत करण्याचे तगादे वाढू लागले. त्यांना वाटले आता मराठे सराफ बुडणार. म्हणून काही दिवस मी निश्चित उत्पन्नासाठी नोकरी केली. घरच्याच धंद्यात काम करणारे माझे दोन काका - वामन आणि श्रीधर, यांनीहि साडी विक्रीचे दुकान काढले. पुढे गोल्ड कंट्रोल रद्द झाल्यावर त्यांनी साडीऐवजी दागिन्यांचे दुकान (शृंगार आर्ट ज्युवेलर्स) चालू केले. मागणी करणाऱ्यांना निश्चित तारीख देऊन त्या त्या वेळी नियमितपणे ठेवी परत करू लागलो. पैसे परत मिळतात हे पाहून लोकांचा विश्वास पुन्हा निर्माण झाला. काहींनी तर काढलेल्या ठेवी पुन्हा आणून दिल्या."

"१९७३ पासून मी स्वत: पूर्णपणे व्यवसायात काम करू लागलो. माझे दोघे भाऊ - विश्वास आणि विलासहि दुकानांत कामाला येऊ लागले. लोकांचा विश्वास वाढला तसतसा व्यवहार वाढला. आमच्या दुकानांतल्या मालाच्या शुद्धतेची खात्री लोकांना पटली. एकाकडून दुसऱ्याला, दुसऱ्याकडून तिसऱ्याला अशी 'माऊथ टु माऊथ' पब्लिसिटी झाली. धंदा वाढत गेला."

सोन्याचांदीकडून हिऱ्यांकडे कसे काय वळलात असे विचारले असता आनंदराव म्हणाले, "आम्हा तिघा भावांबरोबरच माझा मुलगा मंदार आणि विलासचा मुलगा शंतनु पण आता हाताशी आले. मंदारने B.Sc. नंतर आमच्याच वर्कशॉपमध्ये कारागिरीचे शिक्षण घेतले. तसेच जेम अँड ज्वेलरी कौन्सिलतर्फे दिले जाणारे कलर स्टोन, डायमंड इ.चेहि शिक्षण घेतले. विश्वासची मुलगी गौरीहि आता हे कोर्सेस करते आहे. तेव्हा व्यवसाय वाढीच्या दृष्टीने सर्वांनी सोन्या-चांदीतच गुरफटून न राहता नवी वाट चोखाळावी म्हणून हिऱ्यांच्या व्यवसायात नुकतेच (या दिवाळीतच) पदार्पण केले."

"केवळ हिऱ्यांच्या दागिन्यांचे असे ठाण्यातले आमचे एकमेव दुकान आहे. मुंबईत सुद्धा केवळ हिऱ्यांची अशी एकदोनच दुकाने असावी, बहुतेक सारी दुकाने सोन्या-मोत्यांबरोबर हिऱ्याचे दागिने विकतात. ठाण्यातले आमचे हे दुकान अगदी मुंबईतल्या नेपियन्सी रोडवरच्या पॉश लोकॅलिटीतल्या दुकानांहूनहि काकणभर सरस वाटते अशी प्रतिक्रिया काही दुकानदार मित्र व ग्राहकांनी व्यक्त केली". असेहि आनंदरावांनी अभिमानाने सांगितले.

हिऱ्यांचे दागिने बनवणाऱ्या व्यवसायांत

Marathe Pratishthan

बंगाली लोकांची जवळजवळ मोनोपॉली आहे, आपले लोक तर क्वचितच आढळतात. मराठी माणूस खपतो तो 'डायमंड कटिंग' च्या मेहनतीच्या कामात. अतिअल्प वेतनावर. पुढे त्याचे दागिने बनवण्याचा व्यवसाय हा खरा महत्वाचा म्हणून या व्यवसायात मराठी माणसांनी आले पाहिजे असेहि आनंदरावांनी अतिशय तळमळीने सांगितले. आपणाकडे कोणी मराठे कुटुंबीय अथवा मराठी माणूस सोने-चांदी-हिऱ्याचे काम शिकण्यासाठी आला तर त्याला शिकवण्याचीहि तयारी त्यांनी दाखवली. मात्र त्याच्याकडे प्रबळ इच्छाशक्ती व दोन अडीच वर्षे वाट पहाण्याची तयारी हवी. 'पी हळद की हो गोरी' अशा तऱ्हेने आज काम सुरू केले की २/४ महिन्यांत झाले सारे शिक्षण अशा 'झटपट रंगारी' पद्धतीने हे शिक्षण होऊ शकत नाही याची पूर्ण जाणीव इच्छुकांनी ठेवायला हवी असा इशाराहि द्यायला ते विसरले नाहीत.

केवळ आपल्यापुरते न पाहता आपण समाजाचेहि काही देणे लागतो या भावनेचेच हे प्रत्यंतर. यान भावनेतून 'यशवंत विठ्ठल मराठे स्कॉलरशिप फंड' दुकानाच्या नफ्यातून निर्माण केला आहे. गरजेनुसार या फंडात वेळोवेळी भर घातली जाते आणि येणाऱ्या व्याजातून विशेषत: ठाण्यातल्या गरजू विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, फी, लॅबोरेटरी इक्विपमेंट इ. साठी मदत करण्यात येते.

तसेच सर्व नोकरवर्गाच्या कुटुंबीयांसमवेत वर्षातून एकदा दुकानाच्या खर्चाने तीन दिवसांची सहलहि काढली जाते. दुकानातल्या नोकरांना हॉस्पिटलमध्ये रहावे लागले तर तो खर्च दिला जातो. त्यांच्या मुलांचा शिक्षणाचाहि खर्च केला जातो. यंदापासून सर्व नोकर वर्गाच्या कुटुंबीयांसमेत वर्षातून दोनदा सहभोजनाचीहि नवीन प्रथा सुरू केली आहे.

ज्ञानसाधना कॉलेज, कळवा संगीत सभा, महाराष्ट्र राज्य सराफांची संघटना अशा संस्थांच्या कार्यातहि आनंदरावांचा सहभाग आहे. मराठे प्रतिष्ठानचेहि ते विश्वस्त आहेत. आणि विशेष म्हणजे "विश्वस्त म्हणून मला काहीतरी निश्चित असे काम करायचे आहे आणि अजून तसे क्षेत्र वा संधी मिळालेली नाही" अशी टोचणी त्यांच्या मनात आहे हेहि मला त्यांच्याशी बोलताना जाणवले. असे 'कर्ते' विश्वस्त किती असतात? अनेक विश्वस्तांचा संस्थेच्या लेटरहेडवर नावापुरताच संस्थेशी संबंध असतो याचा अनुभव आपणापैकी अनेकांना असेलच.

मी आनंदरावांशी बोलत असतानाच त्यांच्या भावाने आम्हाला जरा थांबवले आणि पुढील २/३ दिवसातल्या काही महत्वाच्या देण्याघेण्याबाबतच्या नोंदीबाबत त्यांना दाखवल्या. या संदर्भात मी आनंदरावांना विचारले की दुकानाच्या व्यवहाराच्या वेगवेगळ्या खात्यांची जबाबदारी एकेकाने वाटून घेतली आहे काय? त्यावर आनंदराव म्हणाले "आम्ही व्यवहाराचे वेगवेगळे विभाग पाडून एकेकजण एकेक खाते संभाळतो" पण पुढे त्यांनी सांगितलेली गोष्ट अधिक महत्वाची. ते म्हणाले की "दर दोन महिन्यांनी आम्ही जबाबदारी बदलून घेतो. त्यामुळे सर्वांचा सर्व व्यवहाराशी, दुकानदारांशी, गिऱ्हाइकांशी सततचा संपर्क राहतो. शिवाय आम्ही सारे भाऊ-भाऊ आणि आता तर आमची मुलेपण रोज एकत्रितपणे दिवसाच्या व्यवहाराबाबत, महत्वाच्या घटनांबाबत चर्चा करतो. त्यामुळे सर्वांना सर्व व्यवहाराची माहिती असते. सर्वांचे विचार ऐकले जातात. एकोपा रहायला त्यामुळे मदत होते. आम्ही सारे भाऊ रहायलाहि एकाच घरात, पण बिऱ्हाडे वेगवेगळी, खाजगी व्यवहार प्रत्येकाचे स्वतंत्र. यामुळेहि मतभेदाला, संघर्षाला वाव मिळत नाही."

आनंदरावांच्या या बोलण्यावरून मला सुमारे तीन वर्षापूर्वी त्यांच्या घरी त्यांच्या वडलांच्या झालेल्या भेटीची आठवण झाली. ते एकटेच घरात होते. फुरसतीच्या वेळी आम्ही दोघे सुमारे तासभर बोलत होतो. त्यांच्याहि बोलण्यातून मला अशाच तऱ्हेची सुसंवादाची आणि सर्व मुले व्यवहार समर्थपणे संभाळीत असल्यामुळे समाधानी निवृत्तीची भावना जाणवली होती. व्यवसाय आणि सुखी-समाधानी कुटुंब या दोन्ही आघाड्यांवरचे हे यश पाहता 'सुयश' हे त्यांच्या बंगल्याचे नाव खचितच अन्वर्थक वाटते.

या यशाचे नवे शिखर - हिरे विक्री दुकान पहायला मात्र ते हयात नाहीत ही खंत आनंदराव आणि त्यांच्या भावांना वाटत असेल. मात्र आपल्या मुलांचे हे पुढचे पाऊल पाहून त्यांच्या वडिलांच्या आत्म्याला 'शिष्यादिच्छेत् पराजयम्' या स्वरूपाचा पराभवातला आनंद नक्कीच वाटत असणार!


रत्नागिरी संमेलनास व
हितगुज संमेलन विशेषांकास
शुभेच्छा

**प्रमोद विष्णु मराठे**

३१, आदित्य सोसायटी, ५०१ रस्ता पेठ,
पुणे - ४११ ०११



।। श्री ।।

**श्रेयस टी कॉफी ॲन्ड जनरल स्टोअर्स**

-: वितरक :-

- भांखरीआ चहा
- बेडेकर लोणची व मसाले
- किराणा मालाचे विक्रेते

संकल्प-सिध्दी, बिल्डींग नं. ७, दुकान नं. ६, कुळगाव बदलापूर (पूर्व).
प्रोप्रा. सौ. स्वाती श्रीपाद मराठे (फोन. ६९२११८)


Marathe Pratishthan

# मराठयांच्या तीन पिढयांनी चालवलेले साप्ताहिक किरात

**वृत्तपत्र हे माहिती प्रसारण, लोकशिक्षण आणि समाजप्रबोधनाचे साधन मानले जाते; ते चरितार्थाचे साधन क्वचितच होऊ शकते. बडे उद्योगपती अथवा उद्योगसमूह यांच्या आश्रयानेच अनेक वृत्तपत्रांचा संसार चाललेला दिसून येतो.**

**अशा परिस्थितीत वेंगुर्ल्यात अनंत वासुदेव मराठे नावाच्या शिक्षकाने सुरू केलेले 'किरात' साप्ताहिक त्यांचा मुलगा केशव आणि त्यांचे नंतर आता नातू श्रीधर यांनी चरितार्थाचा व्यवसाय म्हणून मोठ्या जिद्दीने समर्थपणे चालविले आहे. ही गोष्ट मराठे कुलबांधवांना खचितच अभिमानास्पद आहे. - संपादक**

**अनंत वासुदेव मराठे** (पृ.३९६). जन्म १८८६. कोर्टातल्या कारकुनाचा मुलगा. अवघ्या ४ वर्षांचा असताना वडील त्यांच्या २८व्या वर्षी निवर्तले. घरची थोडीशी शेती व त्याला जोड म्हणून याज्ञिकी करणाऱ्या आजोबांनी अनंताला वाढवले. मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण दिले. गरिबीची परिस्थिती, वृद्ध झालेले आजोबा (जन्म १८३१) आणि घरची शेतीची व्यवस्था पहायला दुसरे कोणी नसल्यामुळे वेंगुर्ल्यातच राहून चार पैसे मिळणारी नोकरी करणे क्रमप्राप्त होते. म्हणून शिक्षकी पेशा पत्करला. उच्च शिक्षण घेता आले नाही तरी निरनिराळे ग्रंथ वाचण्याकडे त्यांनी आपले लक्ष केंद्रित केले. त्यांना जणू वाचनाचे वेड होते. त्यांचे मित्र पदव्या मिळवून आले तेव्हा यांचे ज्ञान त्यांच्याबरोबरीचेच नव्हे तर काकणभर जास्तच असल्याचे आढळून आले.

'मागायला येईना भीक तर मास्तरकी करायला शीक' अशी शिक्षकी पेशाकडे पहाण्याची त्या काळात दृष्टि होती. अनंतरावांनाहि तो पेशा मानवणारा नव्हता. पण नाइलाज म्हणून एकदा शिक्षकाची नोकरी पत्करल्यावर तिथेहि त्यांनी आपले वेगळेपण दाखवलेच! केवळ घोकंपट्टीच्या शिक्षणापेक्षा औद्योगिक स्वरूपाचे काही शिक्षण विद्यार्थ्यांना द्यावे असे प्रयत्न त्यांनी चालवले. पण सहकाऱ्यांचे सहकार्य न लाभल्याने त्यांना तो विचार सोडून द्यावा लागला.

एकदा शाळेच्या छपाईच्या कामासाठी त्यांना १७ मैलांवरील सावंतवाडीस जावे लागले. वेंगुर्ल्यातहि छापखाना का नसावा असा विचार त्यांच्या मनात आला आणि पुढे त्यांनी वेंगुर्ल्यात 'किरात छापखाना' सुरू केला. त्याचबरोबर 'किरात' या नावाचे वृत्तपत्रहि चालू केले. अव्याहत वाचनाने विविध विषयांचे ज्ञान त्यांना झालेले होतेच. त्याचा उपयोग त्यांना हे वृत्तपत्र चालवताना झाला.

स्वत:ची जमीन गहाण ठेवून उभारलेल्या कर्जातून किरात प्रेस व वृत्तपत्राची निर्मिती झाली होती. दैनंदिन खर्च, नोकरचाकरांचे पगार भागवणे कठीण जात होते. अनेक हितशत्रूंकडूनहि नाना अडचणी उभ्या केल्या जात असत. पण या कशानेहि न डगमगता अनंतरावांनी त्यांचा **मुलगा केशव (जन्म १९१२) याच्या मदतीने किरातचे काम मोठ्या हिमतीने चालवले.** मुंबईतल्या 'विविध ज्ञान विस्तार' सारख्या भारदस्त मासिकाने किरातची भलावण केली. केसरी ट्रस्ट कडूनहि काही दिवस 'किरात'ला मदत मिळाली. यावरून 'किरात'च्या दर्जाची यथार्थ कल्पना येईल.

पुढे हे वृत्तपत्राचे क्षेत्रहि अनंतरावांच्या धडपड्या स्वभावाला अपुरे वाटू लागले. त्यांनी शालोपयोगी व इतर धार्मिक आणि ऐतिहासिक पुस्तके लिहिण्याचे काम सुरू केले. मुंबईचे सुप्रसिद्ध प्रकाशक केशव भिकाजी ढवळे यांनी अनंतरावांचा 'इंग्रजांचे स्वराज्य' हा पहिलाच हजार पृष्ठांचा ग्रंथ छापून तो केवळ अडीच रुपयांत देऊन शालोपयोगी पुस्तकांत विक्रम केला. हा ग्रंथ कॉलेजातहि शिकवण्याच्या लायकीचा ठरला. याशिवाय 'मराठी साहित्य रत्नहार', न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक, छत्रपती शिवाजी महाराज, इचलकरंजीचे घोरपडे, कोल्हापूरचे छत्रपती इत्यादि अनेक लहानमोठी चरित्रे आणि 'पूजामार्गप्रदीप', 'तीस तीन स्तोत्रे', 'जनी जनार्दन', इत्यादि धार्मिक पुस्तकेहि त्यांनी लिहिली. तसेच विषयवार वर्गीकरण केलेली संपूर्ण तुकारामाची हजार पृष्ठांची अभंग गाथाहि त्यांच्या संपादकत्वाखाली प्रसिद्ध झाली आहे. 'किरात' च्या संपादनाबरोबरच लेखनाचे हे काम उतारवयातहि चालूच होते.

सुमारे ५० वर्षे अनंतरावांनी किरातचे संपादकत्व केले. **१९७३ मध्ये त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा मुलगा केशव याने किरात प्रेस व किरात साप्ताहिक यांचा वाढता व्याप समर्थपणे पेलला.** वडलांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्याबरोबर ते या व्यवसायात आधीपासूनच पूर्ण वेळ गुंतलेले होतेच. त्यामुळे त्यांना ते फारसे जड गेले नाही.

केशवराव अनंतरावांच्या मानाने अल्पायुषी ठरले. वयाच्या ६९व्या वर्षी **१९८० साली** ते वारले. आणि **'किरातची' सर्व जबाबदारी आजचे संपादक श्रीधर (जन्म १९५०) यांचेवर अचानक पडली.** अल्पवयांत आलेल्या या जबाबदारीने भांबावून न जाता श्रीधरने धीराने परिस्थितीला तोंड द्यायला सुरवात केली. बी.ए. नंतर वृत्तपत्र विद्या आणि मुद्रणव्यवस्थापन शास्त्र या दोन्हीचे त्याने औपचारिक शिक्षण घेतलेले होते. या दोन्ही क्षेत्रांत त्याने आपला ठसा उमटवायला सुरवात केली. गेल्या १७ वर्षांच्या कारकीर्दीत किरात प्रेस आणि किरात साप्ताहिक नावारूपाला आणले.

'गावातील - तालुक्यातील महत्वपूर्ण घडामोडींची माहिती परगावी असणाऱ्या तालुक्यातील लोकांपर्यंत पोचवायची हे किरात सारख्या तालुका पातळीवरील वृत्तपत्राचे मुख्य काम आहे' असे सुस्पष्ट उद्दिष्ट डोळ्यापुढे आहे. त्याबरोबरच स्थानिक प्रश्न, राजकीय स्थित्यंतरे, राजकीय घडामोडी, सामाजिक समस्या इत्यादीबाबतहि संपादकीय व स्फुट लेखांमधून लक्ष्यवेध करीत प्रबोधनाचे काम किरात साप्ताहिक परिणामकारकपणे करीत आहे. कोकण रेल्वे आणि कोकण विकास अशा कोकणी माणसाच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर कॉलेजातल्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा घेऊन समाजाचे भावी आधारस्तंभ असणाऱ्या तरुण पिढीत या प्रश्नांबाबत जाणीव निर्माण करण्याचे महत्वाचे काम अलिकडे किरात ने सुरू केले आहे.

(पुढील पानावर)

Marathe Pratishthan

# तीन पिढ्यांनी जोपासलेली मराठे यांची संगीत संस्था
# श्री गंधर्व महाविद्यालय, पुणे.

**- पं.डॉ.सुधाकर जनार्दन मराठे (डॉक्टर ऑफ म्युझिक) (पृ.४५) पुणे.**

कोकणातील **'देवगड' तालुक्यातील 'कालवी' ह्या गावचे कै.सदाशिव लक्ष्मण मराठे** (पृ.४४) पुण्याला आले. मामलेदार कचेरीमध्ये जमीनमोजणी खात्यात त्यांची नेमणूक झाली. पुण्याहून सातारा, कोल्हापूर, नाशिक, इ. करीत मराठवाडा व विदर्भात जाऊन पोचले. अमरावतीमध्ये नोकरीस असतांना एकाच वाड्यामध्ये कै. सदाशिव मराठे यांना नटसम्राट बालगंधर्वांचे वडील यांच्या शेजारी बरीच वर्षे राहण्याचा योग आला.

कै. सदाशिवरावांना नाटकांचा नाद असलेने ते लहान-लहान संस्थांची नाटकं बसवीत. आवाज उत्तम असलेने कृष्णराव गोरे, भाऊराव कोल्हटकर, पंढरपुरकरबुवा, यांची हुबेहुब नक्कल ते करत. कै. गणपतराव बोडस यांना स्त्री पात्रासाठी नऊवारी लुगडे नेसवून, कै. सदाशिवरावांनी त्यांना प्रथम नाटकात आणले, असा कै. गणपतराव बोडसांनी आपल्या आत्मचरित्रांत उल्लेख केला आहे.

कै. सदाशिवराव १९१८ मध्ये सेवानिवृत्तीनंतर सातारा, सांगली, कोल्हापूर, कराड येथे भिक्षुकीचा व्यवसाय करू लागले, परंतु त्या व्यवसायावर कुटुंबाचे पालनपोषण होणे अवघड वाटू लागल्याने दहावे चिरंजीव लक्ष्मण सदाशिव हे प्रभात फिल्म मध्ये गेले व अकरावे चिरंजीव जनार्दन सदाशिव हे दिसायला चांगले व आवाज चांगला असल्यामुळे १९१८ साली साताऱ्याहून वर्धा (मध्यप्रदेश) येथे किर्लोस्कर कंपनीत (नाट्यकंपनी) वयाच्या सातव्या वर्षी गेले. त्या कंपनीमध्ये 'भक्तप्रल्हाद', 'भक्तध्रुव', व 'ताजेवफा' या तीन नाटकांत काम करीत होते. प्रल्हादाचे काम करीत असतांना "प्रल्हादाला उचलून कढईत टाकतात" या सीनमध्ये एकदा त्यांचा पितांबर पेटला होता. ही तिन्ही नाटकं व त्यातील गाणी त्यांना मुखोद्गत होती. ह्या तीनही हिंदी नाटकांमुळे त्यांचे हिंदी भाषेवर प्रभुत्व होते. १९२१ च्या मध्याला ही कंपनी डबघाईस आली. म्हणून उत्तर हिंदुस्थान सोडून वयाच्या दहाव्या वर्षी ते पुन्हा साताऱ्याला आले.

सहा महिने साताऱ्यात काढल्यानंतर १९२२ साली पुण्यात गंधर्व नाटक मंडळीत कै. जनार्दन पंतांची ट्रायल झाली. व दरमहा पस्तीस रुपये पगारावर त्यांची नियुक्ती झाली. दोन आणे सनलाईट साबणास व दोन आणे मनिऑर्डरला ठेवून ३४रु. बारा आणे कै.जनार्दनपंत, साताऱ्यास पाठवीत असत. कंपनीतच हीरोची भूमिका पं.विनायकराव पटवर्धन करीत. ते त्यांचे संगीतातील पहिले व शेवटचे 'गुरू'. त्यांचेकडे रोज, असे सतत दहा वर्षे कंपनीत शिकावयास मिळाले. १९३२ साली दोघाही गुरुशिष्यांनी कंपनी सोडली. ५ मे १९३२ साली पं. विनायकराव पटवर्धनांनी पुण्यात शनिवार पेठेमध्ये "गांधर्व महाविद्यालया"ची स्थापना केली. त्या संस्थेत कै. जनार्दन पंतांनी पं. विनायकरावांकडे शिकणे व विद्यार्थ्यांना शिकवणे व विद्यालयासाठी शिक्षक तयार करणे, असे सतत तीन वर्षे काम केले.

**१९३५ च्या गोकुळाष्टमीस जनार्दनपंतांनी स्वत:ची वरील संस्था रास्ता पेठेत स्थापन केली.** १९८८ पर्यंत अव्याहत ५३ वर्षे चालविली. हजारो विद्यार्थ्यांना विद्यादानाचे काम केले. **१९८८ साली ही संस्था त्यांनी मुलाकडे म्हणजे पं. डॉ. सुधाकर मराठे यांचेकडे सुपूर्त केली.**

डॉ.मराठे यांचे शास्त्रीय संगीताचे शिक्षण कै. जनार्दन पंत यांचेकडे झाले. १९६४ साली **'डॉक्टर ऑफ म्युझिक' या परीक्षेत डॉ. सुधाकर मराठे वयाच्या २३व्या वर्षी भारतात प्रथम क्रमांकाने पास झाले** गेली ४१ वर्षे ते विद्यादानाचे काम करत आहेत. १९८८ पासून वडिलांची 'श्री गंधर्व विद्यालय' ही संस्था चालवीत आहेत. डॉ. सुधाकर मराठे १९९२ सालापासून आकाशवाणी वर गात आहेत. सध्या ते "अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ" (मुंबई) या संस्थेचे पुढील तीनवर्षासाठी सेक्रेटरी म्हणून नियुक्त झाले आहेत. या संस्थेत ते पुण्यातील केंद्रव्यवस्थापक आहेत. त्यांना तीन चिरंजीव असून हेमंत, विवेक, संगीत विशारद आहेत. धाकटा धनंजय संगीत अलंकाराची तयारी करत आहे. सौ. माधुरी मराठे (डॉ. सुधाकर मराठे यांच्या पत्नी) सध्या संगीत विशारद या परीक्षेची तयारी करीत आहेत.

श्री गंधर्व महाविद्यालयाची दुसरी शाखा पुण्याच्या पश्चिम विभागात वारजे येथे १९९८ साली सुरू होत आहे. **त्याची संपूर्ण धुरा श्री. धनंजय मराठे म्हणजे मराठे घराण्याची तिसरी पिढी संभाळणार आहे.** अशा तऱ्हेने मराठे घराण्याच्या तीन पिढ्या संगीत सेवेत कार्यरत आहेत.

---

**साप्ताहिक किरात** (पृ. ६६ वरून)

**येत्या जानेवारीत (१९९८) मराठ्यांचे किरात अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. मराठे परिवाराला ही नक्कीच अभिमानाची गोष्ट आहे.** किरातचे संस्थापक अण्णा मराठे आणि संवर्धक बाबा मराठे यांना संपूर्ण मराठे परिवाराच्या वतीने मराठे प्रतिष्ठानतर्फे विनम्र अभिवादन. **सध्याचे संपादक श्रीधर केशव यांना किरातचे प्रबोधन कार्य उत्तरोत्तर अधिकाधिक प्रभावी होवो अशा शुभेच्छा!**

'हितगुजला' हार्दिक शुभेच्छा

नवजीवन विवाह मंडळ

५, रामकृष्ण हौ.सोसायटी, राममंदिर रोड, खेरवाडी,
बांद्रा (पू), मुंबई - ४०० ०५१
संचालिका - सौ. सीमा माधव मराठे
राजेन्द्र माधव मराठे
उमा माधव मराठे

Marathe Pratishthan



# मी अनुराधा मराठे आणि माझी मुलगी अंजली



**- सौ. अनुराधा मुकुंद (पृ.२९७), पुणे.**

**माझा जन्म १९५१ साली कोकणात चिपळूणजवळच्या एका गावात. बालपण धुळ्यात गेले. शाळा कॉलेजचे शिक्षणही तिथेच झाले. कारण माझे वडील राष्ट्रसेवादलाचे पूर्ण वेळ कार्यकर्ते म्हणून धुळ्याला होते.**

**माझी आई लहानपणी मेळ्यांत गायची. माझे वडील पोवाडे फार सुरेख गात. स्वत: कवि व लेखक असल्याने स्वत:च्या कविता स्वत:च चाली लावून फार छान गात. तात्पर्य, माझे आई व वडील दोघांकडूनहि माझ्यात गाणे आले.**

वयाच्या सातव्या वर्षी नाईकसरांकडे माझी गाणे शिकायची सुरवात झाली. शाळेची रोजची प्रार्थना मी म्हणत असे. दर आठवड्याला एक याप्रमाणे महिन्याला ४ अभंग सर शिकवीत. त्यामुळे नवीन नवीन शिकून गायची सवय होत गेली. माझी आवाजाची पट्टी उंच. अति तार षड्जहि त्यावेळी स्पष्ट लागत असे. त्यामुळे आठवीत असल्यापासून सरांबरोबर मैफलीत साथीला बसायला सुरवात केली. मॅट्रिकला असताना संगीत विशारद झाले.

कॉलेजच्या ४ वर्षात यूथ फेस्टिवलमध्ये भाग घेतला. दोन वर्षे मी बसवलेल्या लोकनृत्यांना प्रथम पारितोषिक मिळाले. नंतर एका वर्षी शास्त्रीय संगीतात मिळाले. त्यावेळी थोडेफार कथ्थकही शिकले, पेंटिंग्जही करत असे. कॉलेजात असतानाच नाटकांतहि कामे केली आणि महाराष्ट्र राज्य सरकारचे उत्कृष्ट अभिनयाचे रौप्यपदक मिळवले. कॉलेजात एकपात्री सौभद्र केले, पाच-सहा एकांकिकाही दिग्दर्शित केल्या. पण पुढे मात्र नाटक सोडून गाण्यावरच लक्ष केंद्रित केले. कॉलेजच्या तिसऱ्या वर्षाला असताना संगीत अलंकार झाले. टी.वाय.बीए ला गाण्यात युनिव्हर्सिटीत पहिली आले आणि भास्करबुवा बखले आणि बीनकार भावे पारितोषिक मिळाले. बी.ए. नंतर दोन वर्षे मुलींच्या शाळेत शिक्षिकेची नोकरीहि केली.

१९७४ मधे मी 'अनुराधा मराठे' झाले. मुकुंद कृष्ण मराठे हे माझे पति. त्यांना मी सांगितले की "मी शास्त्रीय संगीत शिकले आहे ते चालू रहावे ही इच्छा आहे". त्यांनी सांगितले "घर सांभाळून जेवढे गाणे करता येईल तेवढे कर. माझी ना नाही". हा शब्द त्यांनी तंतोतंत पाळला. कुठे कार्यक्रम करावा, कुठे करू नये यासाठी कधी आडकाठी नव्हती. आणखी एक दुर्मिळ गोष्ट म्हणजे मला मिळणारे पैसे मी कसे खर्च करते तेहि त्यांनी मला आजतागायत कधी विचारले नाही. ते स्वत:च्या रबराच्या वस्तूंच्या उत्पादनाच्या व्यवसायात मग्न असतात. कुठल्याहि परिस्थितीत न डगमगता शांतपणे संकटाला सामोरे जाणे ही यांची प्रवृत्ती असल्यामुळे मला त्यांचा खंबीर आधार सततच मिळाला. माझ्या कै. आजेसासूबाई यांचेहि प्रोत्साहन मिळाले. त्या तर 'कार्यक्रम कसा झाला? आवाज लागला ना नीट?' अशी चौकशी प्रत्येक कार्यक्रमानंतर आवर्जून करीत.

लग्नानंतर गुरुवर्य पं. टी.डी. जानोरीकर यांचेकडे गाणे शिकायला सुरवात केली. त्यांची भेंडीबाजार घराण्याची गायकी आत्मसात करायचा प्रयत्न करते आहे. शास्त्रीय संगीताचा रियाज मनासारखा होत नव्हता म्हणून गजाननराव वाटवे यांच्याकडे सुगम संगीत शिकायला सुरवात केली. लगेचच शास्त्रीय संगीताइतकेच तेहि अवघड आहे हे कळले. पहिल्याच दिवशी अण्णांनी (गजाननराव वाटवे) सांगितले 'तुझ्या आवाजाची जात दुर्मिळ आहे. आपल्या आवाजाची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन तू गा'. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली मी रेडिओ ऑडिशन पास झाले. आणि रेडिओवर गायला सुरवात झाली. पुढे टी.व्ही. चे हि कार्यक्रम झाले.

सुधीर मोघे, राम कदम, श्रीनिवास खळे, प्रभाकर जोग, यशवंत देव, हृदयनाथ मंगेशकर, श्रीधर फडके, अरुण दाते अशा मान्यवर संगीतकारांच्या मार्गदर्शनाखाली अनेक स्टेज शो केले. 'आनंदघन' या कार्यक्रमात 'तरुण आहे रात्र' गाऊन मी मागे जाऊन बसले तेव्हा माझे दैवत असलेल्या लतादीदींनी प्रत्यक्ष येऊन सांगितले "गाणे फार छान गायलात. अवघड आहे." मला धन्य वाटले. पु.लं.नीहि शब्दांच्या पलिकडले या टीव्ही कार्यक्रमांतले 'श्रावणातल्या त्या रात्रीची' हे गाणे ऐकल्यावर मला आवर्जून फोन करून सांगितले, "तुझे गाणे फार छान झाले, दृक्‌श्राव्य होते". मी तरंगायलाच लागले.

सध्या मी एकटीनेहि गाण्याचे कार्यक्रम करू लागले आहे. माझा एकटीचा महिनाभरचा ऑस्ट्रेलिया दौरा जुलै १९९६ मध्ये झाला. सिडनी, मेलबर्न, ॲडलेड, कॅनबेरा, अशा ठिकाणी एकूण १२ कार्यक्रम झाले. साथीदार तिथलेच पण प्रोफेशनल साथीदारांपेक्षा तसूभरहि कमी वाटले नाहीत. हा माझा तिसरा परदेश दौरा. १ला मस्कतला अरुण दाते यांच्याबरोबर 'शुक्रतारा' हा कार्यक्रम. त्यानंतर बृहन्महाराष्ट्र मंडळ, नॉर्थ अमेरिका यांच्या निमंत्रणावरून २२.३.९४ ते १५.६.९४ असा माझ्या तीन सहकाऱ्यांबरोबर केलेला दौरा. या दौऱ्यात २७ सुगम संगीताचे जाहीर कार्यक्रम आणि हिंदी व शास्त्रीय संगीताचे काही खाजगी कार्यक्रमहि झाले. जागतिक मराठी परिषदेच्या वेळी केलेली 'स्मरणयात्रा' ही ध्वनिफीत तिथे पोचलेली असल्याने आम्ही तिथल्या लोकांना नवे नव्हतो. काही कार्यक्रमांना तर चार-पाचशे लोक असायचे. त्यांना संगीताची जाणहि चांगली होती. जुन्या परिचित गाण्यांबरोबरच नवीन गाण्यांनाहि त्यांची दाद मिळायची.

मला हे सगळे करता आले ते प्रामुख्याने साऱ्या कुटुंबीयांच्या सहकार्यामुळेच. ती. रा. भावजी, जणू माझी बहीणच असलेल्या माझ्या ती. सौ. जाउबाई, दोन पुतणे, पुतणी आणि आम्ही दोघे व आमच्या मुली थोरली अश्विनी व धाकटी अंजली आणि हो आमचा कुत्रा ब्लॅकी असे दहाजण आम्ही घरात असतो. माझ्या जाउबाई घरात आहेत म्हणूनच

Marathe Pratishthan

मी बाहेर गावचे व परदेशचेहि कार्यक्रम करू शकते. माझ्यातल्या दोन्ही कला दोघी मुलींनी घेतल्या आहेत. थोरली अश्विनी कमर्शिअल आर्टिस्ट आहे. तिचा हात फार तयार आहे. धाकटी अंजली संगीत शिकते आहे.

अक्षरश: पोटांत असल्यापासून अंजलीवर गाण्याचे संस्कार झाले. तिच्यावेळी दिवस असताना मी अनेक कार्यक्रम गायले. पण तिच्यात गाणे आहे याची ओळख ती साडेतीन वर्षाची असताना झाली. माझ्या गाण्याच्या ट्यूशन्स घेऊन मी आत स्वयंपाकघरात आले. पेटी तशीच गालिचावर होती एकदम अंजलीचा आवाज आला म्हणून बाहेर गेले तर हाताला येईल ती हार्मोनियमची पट्टी दाबून त्या स्वरात त्याची धून झंकारली. मला आश्चर्य वाटलं म्हणून मी दुसरी पट्टी दाबली तर या पट्टीनं त्यात गाऊन दाखवले. तिची सुरांची समज मी जाणली आणि तिला रीतसर गाणे शिकवायला सुरवात केली.

ती ५वीत गेली तेव्हा तिला एका मोठ्या कार्यक्रमात भाग घ्यायची संधी मिळाली. सुधीर मोघे यांनी विचारले की, जागतिक मराठी परिषदेत एक कार्यक्रम करायचा आहे, तर 'नाच रे मोरा' तुमची मुलगी अंजली गायील का? मी तत्काळ हो म्हटले. पहिल्याच प्रॅक्टिसच्या वेळी आनंद मोडक अंजलीची एकच ओळ ऐकल्याबरोबर म्हणाले, "काय समज आहे या मुलीला!" मग मला त्यांनी तिला कशी तयार करा यावर एक तास सांगितले. नंतर त्यांनीच एका सिरियलसाठी (हिंदी) 'झूठे सच्चे गुड्डे बच्चे' टायटल साँग गाऊन घेतले.

नंतर एका अतिशय सुरेख कार्यक्रमात खूप मोठा रोल अंजलीला मिळाला. हेमा लेले यांचे 'चिमणगाणी'. हेमाने लहान मुलांसाठी अतिशय सुंदर कविता लिहिल्या. २२ छोटी मुले त्यात होती व सर्व कार्यक्रमाला आनंद मोडकांचेच संगीत होते. त्यात २-३ गाणी अंजली एकटीने गायची व बाकी सर्व कार्यक्रमभर ती स्टेजवर असायचीच. त्यानंतर 'चौकट राजा'चे संगीत मोडक करत होते. त्यांना ६ वर्षांच्या मुलीसाठी आवाज हवा होता. तो त्यांनी अंजलीचा घेतला व त्या मुलीच्या आईचा आवाज होता साक्षात आशा भोसले यांचा. ते गाणे ऐकल्यावर सुधीर मोघेंचा मला फोन आला. ते म्हणाले की अंजलीची शब्दश: दृष्ट काढा.

अंजलीचे शास्त्रीय संगीत घरी शिकणे चालूच होते. शाळेत तर मिस डॉक्टर या तिच्या शिक्षिकेची ती मानसकन्या होती. त्या मला नेहमी म्हणायच्या की, तुम्ही देवाचे आभार मानले पाहिजेत की त्याने तुम्हाला अंजलीसारखी मुलगी दिली. क्वायर, सेंट्राफेस्ट, नाट्यवाचन, स्ट्रीट प्ले सर्वात सर्व शिक्षिकांना अंजली हवी असायची व हे सर्व करून अत्यंत माफक अभ्यास करून ती ८०-८५ टक्के सहज मिळवायची.

**आशाबाईंची भविष्यवाणी**

'दोघी' या चित्रपटाचे पुरस्कारप्राप्त संगीतकार **आनंद मोडक लिहितात** -

चौकट राजा या चित्रपटाची गाणी करतांना 'हे जीवन सुंदर आहे' या गाण्याच्या ध्वनिमुद्रणाला विख्यात गायिका आशा भोसले या प्रकृति अस्वास्थ्यामुळे येऊन शकल्या नाहीत. चित्रपटाचा मुहूर्त तर या गाण्याच्या ध्वनिमुद्रणाने व्हायचा होता. आम्ही गाण्याचे म्युझिक ट्रॅक्स व अंजलीच्या ओळी ध्वनिमुद्रित केल्या.

आठ दिवसांनी आशाबाई जेव्हा गाण्याचे डबिंग करायला रेकॉर्डिंग स्टुडियोत आल्या तेव्हा गाण्याचा म्युझिक ट्रॅक व अंजूने गायलेल्या ओळी ऐकून त्या चकित झाल्या. त्या म्हणाल्या, "काय सुरेल आहे ही मुलगी सातआठ वर्षांनी आमच्यासारखं गायला लागेल".

आशाबाईंनी १९९१ डिसेंबरमध्ये वर्तवलेली भविष्यवाणी १९९६ मध्ये खरी होताना पाहून दर्यादिल असणाऱ्या महान गायिका आशाबाईंना सलाम करावासा वाटतो. तसंच अंजूचं कौतुक मनी दाटतं.

अंजली एस. एस. सी. ला असताना एक दिवशी मोडक यांचा फोन आला, 'दोघी' हा सुमित्रा भावे यांचा चित्रपट करीत आहे. त्यासाठी मला अंजलीचा आवाज हवा आहे. कसून तालमी ४-५ दिवस झाल्या. शब्दोच्चार सुमित्राताईंनी व्यवस्थित बसवून घेतले. पहिल्या टेकलाच गाणे ओ.के. झाले.

मग एकदम एक दिवशी अंजलीचे नॉमिनेशन झाल्याचे कळले व ते लताबाई व आशाबाईंबरोबर झाल्याचे कळले. मी उडालेच. वाटलं, आता बक्षिस नाही मिळाले तरी काही वाटणार नाही. बक्षिस मिळाल्यासारखेच आहे आणि चक्क अंजलीला उत्कृष्ट पार्श्वगायिकेचे राज्यशासनाचे बक्षिस मिळाले. फार फार आनंद झाला. त्या आनंदात असतानाच अचानक राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याची बातमी कळली. आतापर्यंत हे पारितोषिक मिळवणाऱ्यांमधे अंजली ही सर्वात लहान गायिका. हाहि तिचा विक्रमच.

राष्ट्रीय पातळीवरचे हे पारितोषिक मिळवणारी अंजली या आधी आंतरराष्ट्रीय पातळीवरहि चमकली आहे. १९९४-९५ मधे जपानमध्ये झालेल्या आशियातल्या ११ देशांच्या ज्युनियर रेडक्रॉस मेळाव्यात तिने भारताचे प्रतिनिधित्व केले होते. आपल्या देशातून फक्त दोनच मुली या मेळाव्याला गेल्या होत्या.

पार्श्वगायिकेचे पारितोषिक मिळाल्यामुळे टी.व्ही. सीरियल्ससाठी गाण्याच्याहि तिला ऑफर्स मिळाल्या आहेत. तिची लहान मुलांच्या गाण्याचीहि एक कॅसेट येत आहे. याआधी तिने पुणे आकाशवाणीवर बालोद्यानाची गायिका म्हणून ४-५ वर्षांची असतानापासूनच नाव मिळवले होते. ती शाळेत असताना पाश्चिमात्य संगीतहि शिकली आहे.

अंजलीला अतिशय नीटनेटके रहायची आवड आहे. इस्त्रीशिवाय ती कधीहि कपडे घालायची नाही. पाचवारी व चक्क नऊवारी साडीसुद्धा ती अतिशय सुरेख नेसते व दुसऱ्यांना नेसवतेहि.

लहान वयांतले हे यश अजून अंजलीच्या डोक्यात शिरले नाही. तिचे पाय जमिनीवरच आहेत याचे आम्हा आईवडिलांना समाधान आहे. ती 'ग्लॅमर' साठी संगीताकडे पाहत नाही तर कला म्हणून संगीताचा व्यासंग करते आहे. त्यासाठी सायन्स सोडून आर्ट्सचा शिक्षणक्रमहि तिने पत्करला.

तिला जे पटते ते ती करते; तिची तीच निवड करते. ती निवडते ते मला पटणारेच असेल असा मलाहि तिच्याबद्दल कॉन्फिडन्स आहे.

*मराठे प्रतिष्ठानला हार्दिक शुभेच्छा*
**श्रीधर परशुराम उर्फ बापूसाहेब मराठे**
'कल्पद्रुम', सदाशिव पेठ, पुणे-४११०३०



Marathe Pratishthan

# मूकबधिरांच्या जीवनात आनंद फुलवण्यासाठी झटणारी मराठ्यांची माहेरवाशीण सौ. सीमा संजय मुळये



श्री. सुरेश पांडुरंग (पृ.३२३), आंबा व्यापारी, रत्नागिरी, यांची मी कन्या. मराठे परिवाराची माहेरवाशीण असल्याचा मला सार्थ अभिमान आहे. माझ्या आताच्या कार्यात माझ्या आई-वडिलांची शिकवण, संस्कार, अत्यंत उपयोगी पडत आहेत. शालेय आणि कॉलेज जीवनात वडिलांनी मला मी एकुलती एक आहे म्हणून लाडावून न ठेवता समाजात कसे निर्भीडपणे जगायचे याचे उत्तम शिक्षण दिले. तसेच त्याचा अनुभव घेण्यासाठी मला संधी दिली.

शालेय जीवनातच मी क्रीडा विश्वात भाग घेवून कॉलेज जीवन संपेपर्यंत त्यात राहिले, वेगवेगळे विजय प्राप्त केले आणि ८८-८९, ८९-९० यावर्षी पॉवरलिप्टींगमध्ये बॉम्बे युनिव्हर्सीटीमध्ये दोन्ही वर्षे ब्रॉंझ मेडल मिळवून उच्चांक गाठला. तसे पाहता शाळेपासून ग्राऊंड इव्हेंट, खो-खो, बास्केट बॉल, हॅन्डबॉल, मॅरेथॉन सर्व प्रकारच्या खेळात भाग घेत होते, विजय मिळवत होते.

याचा फायदा आणखी जो झाला तो म्हणजे सर्व महाराष्ट्र, दक्षिण भारत मी फिरले. प्रवास, वेगवेळ्या ठिकाणी रहायच्या सोयी, त्यात येणाऱ्या अनेक अडचणी, त्या सोडवून पुढे जाणे, वेगवेगळ्या प्रकारची माणसे भेटली, त्यांचे स्वभाव, अनेक खाचा-खोचा शिकले. ह्या सर्वांमुळे आता माझ्या विद्यार्थ्यांना घेवून समाजात वावरताना मला कसलीही अडचण येत नाही. त्यांना समाजात कसे वावरावे, माणसे कशी ओळखावी यांचे शिक्षण देता येते. असो.

कॉलेज जीवनाची सुरवात झाल्या झाल्याच वडिलांनी मला त्यांच्या व्यवसायाची थोडी थोडी जबाबदारी टाकण्यास सुरवात केली. ती म्हणजे आमचे किराणामालाचे दुकान चालवणे आणि वडिलांच्या गैरहजेरीत आमची नर्सरी चालवणे. या दोन्ही गोष्टी सांभाळतांनाही मी जगात व्यवहारी कसे वागावे, समाजात आपल्याला फसवणारे असतात पण आपण न फसता कसे जीवन जगावे हे शिकले. हे व्यवसाय पहातांना माझ्या शिक्षणाचाहि मला उपयोग होत होता.

मी १९९० साली B.Com ही पदवी प्राप्त केली. मात्र मला बँकेच्या परीक्षा देवून बँकेत नोकरी करायची नव्हती. मी एका वेगळ्याच विश्वात जायचे ठरवले

तसे माझ्या मनात १२वी पासूनच होते. परंतु वडिलांनी आधी डिग्री घे मग तुला काय करायचे ते कर असे सांगितले. त्यांनी एवढी मुभा दिल्याने मीही तसेच करायचे ठरवले.

मी १९९१ साली पुणे येथील वि.रा.रुईया मूक-बधिर विद्यालयातून १ वर्षाचा डिप्लोमा करून आले. माझे विद्यार्थी नॉर्मल नसून मूक-बधिर आहेत. ज्यांना ऐकू येत नाही आणि बोलता येत नाही असे विद्यार्थी असल्याने नॉर्मल मुलांपेक्षा त्यांना समाजात स्वाभिमानाने, स्वतःचे स्वत्व ओळखून कसे जगावे हे शिकवणे अत्यंत कठीण असते.

तुम्ही म्हणाल मी या क्षेत्राकडे कशी वळले, याची माहिती मला कशी मिळाली? माझे स्वतःचे तीन मामा मूक-बधिर आहेत. त्यातील दोन रत्नागिरीत, तर एक पुण्याला आहे. तिघांनाही उत्तम नोकरी आहे. मला समजायला लागल्यापासून मी त्यांना पहात आल्याने मोठेपणी त्यांच्या विषयीचे प्रश्न समजू लागले. माझ्या आजोळची सर्व माणसे सुशिक्षित असल्याने त्या तिघांनाही मोठे होण्यास तसा त्रास झाला नाही. पण सर्व कुटुंबाना हे शक्य नसते. अशा मुलांनी जायचे कोठे हा विचार माझ्या मनात आला.

जोडीला थोडा स्वार्थहि होता. माझ्या आजोळी आनुवंशिकतेने मूक-बधिरत्व आले आहे. तसेच जर आपल्या बाबतीत झाले, म्हणजे माझे पुढे होणारे अपत्य जर मूक-बधिर असले तर मला या संकटाला समर्थपणे तोंड देता आले पाहिजे. त्यांना कशा प्रकारे शिकवावे, प्रत्यक्ष अनुभव कसा द्यायचा वगैरे बारीक सारीक गोष्टी शिकवण्यासाठी शास्त्रशुद्ध शिक्षण मला स्वतःला घेणे आवश्यक आहे. हे समजल्यावर मी हा कोर्स केला.

तो कोर्स करून आल्यावर रत्नागिरी येथील मूक-बधिर विद्यालयात २/३ महिने काम केले. तेथीलच श्री. फाटक सर यांनी माझ्यापुढे नवीन दालन उघडून दिले ते म्हणजे मतिमंद मुलांना शिकवणे. आपण म्हणतो 'जावे त्याच्या वंशा' ही उक्ति मतिमंद मुलांच्यात आल्यावर जास्त समजली. येथेही मी ४ वर्षे काम केले. तेथेही त्या मतिमंद मुलांना घेवून खूप ठिकाणी खेळांच्या स्पर्धेसाठी गेले. त्यांनी मिळवलेली बक्षिसे पाहून मला माझ्या बक्षिसांपेक्षा ती कितीतरी मोठी वाटत होती कारण मी / माझ्यासारखे अनेक नॉर्मल बक्षीसे मिळवतील; पण अपंग मुलांनी जे कष्ट करून बक्षिसे, यश मिळवले असेल ते आमच्या पेक्षा नक्कीच कितीतरी वरच्या दर्जाचे असते यात शंका नाही.

हे सर्व करतांना माझे सहकारी व मी, आम्हाला कितीतरी कष्ट करावे लागतात. पण ते कष्ट वाटत नाही. त्यातील आनंद हा औरच असतो.

या मतिमंदाच्या जगातून मी परत मूक-बधिरांमध्ये १९९५ साली आले. आणि येथील कार्यात परत भाग घेवू लागले. या ठिकाणीही शालेय शिक्षण देता देताच या मूक-बधिरांचा, सामाजिक, शारीरिक, व्यावसायिक विकास होण्यासाठी खूप गोष्टी कराव्या लागतात. त्या आम्ही करतच आहोत. त्यातील एक भाग म्हणजेच नाट्यकला. दरवर्षी मूक-बधिरांच्या नाट्यस्पर्धा पुणे, मुंबई येथे होतात त्यात भाग घेवून भरपूर यश मिळवतो. यामध्येही नाट्य सांस्कृतिक क्षेत्रातले दिग्गज श्री कमलाकर सोनटक्के आणि त्यांच्या सुविध पत्नी सौ. कांचन सोनटक्के यांच्या मुंबई येथील CCRR च्या नाट्यशाळे तर्फे होणाऱ्या प्रत्येक शिबिरात आम्ही भाग घेवून त्यानंतर त्यांच्या नाट्यस्पर्धेत भाग घेवून गेली २ वर्षे आमच्या रत्नागिरीच्या मूक-बधिर शाळेचे नाव पार दिल्लीपर्यंत पोहोचवले. ९५/९६ मध्ये मला स्वतःला आमच्या श्री. फाटक सरांनी भरपूर मार्गदर्शन करून "याला जीवन ऐसे नाव" ह्या नाटकाच्या लेखनाचे व नाटकालाही पारितोषिक मिळाले.

(पुढील पानावर)



Marathe Pratishthan



# "आकांक्षांपुढति 'जिच्या' गगन ठेंगणे" अशी स्वयंव्यवसायिक सौ. स्वाति श्रीपाद

**स्वातीचे आई-वडील दोघेहि नोकरी करीत. तिलाही नोकरी करण्याची इच्छा होती. पण लग्नानंतर पतीने सांगितले "नोकरी करायची नाही. मुलाला नीट संभाळ." घरात अवघी इन-मीन-तीन माणसे. मोकळा वेळ भरपूर. काहीतरी वेगळे करायची जबरदस्त ओढ. त्यातूनच कल्पना निघाली चहाची एजन्सी घेण्याची आणि पुढे एकांतून दुसरी अशा नव्या नव्या कल्पना साकारू लागल्या. - संपादक.**

**मी सौ.स्वाती श्रीपाद मराठे (पृ.३१). वय ३४. शिक्षण बी.ए. पत्ता - संकल्प सिद्धीनगर, इमारत क्रं.१२/बी-८, बदलापूर (पूर्व) जिल्हा ठाणे. ४२१५०३.**
**(फोन - ०२५१ - ५९२११८)**

१९९२ सालापासून बदलापूर येथे ४०० चौ. फूट गाळयामध्ये मी भांखरिआ चहाची एजंट म्हणून व्यवसाय सुरू केला. माझ्या दुकानाचे नाव श्रेयस टी, कॉफी व जनरल स्टोअर्स असे आहे. १९९२-९३ या आर्थिक वर्षातील रु. ७०,००० च्या उलाढालीवरून १९९६-९७ या आर्थिक वर्षात उलाढाल रु. २,३८,००० पर्यंत पोचली आणि १-५-९७ पासून मी वितरक म्हणून उदयाला आले.

तसेच फेब्रुवारी १९९७ पासून व्ही.पी. बेडेकर अँड सन्स प्रा.लि. या सुप्रसिद्ध कंपनीची वितरक म्हणून मला नेमण्यात आले. फेब्रुवारी/मार्च १९९७ या दोन महिन्यांच्या काळात रु. ९२,००० ची उलाढाल मी केली.

अर्थातच जोडीला किराणा मालाचा व्यवसाय आहेच. घरपोच सेवा हे आमचे वैशिष्ट्य!

आता लक्ष्य व्यवसाय वाढीचे आहे. त्यासाठी प्रसिद्ध दर्जात्मक उत्पादने शोधत आहे. तसेच काळानुसार व्यवसायात विविधता आणण्याचा प्रयत्न आहे.

काळ झपाट्याने बदलत आहे. लोकांच्या गरजाही वाढत आहेत. म्हणून सेवाक्षेत्रातही पाय रोवण्याचा विचार आहे. यासंबंधात दोन योजना निश्चित केल्या आहेत. पहिली गृहसफाईची, आणि दुसरी पाळणाघराची. आमचे पाळणाघर निश्चितच आदर्श असेल. कारण त्यात मूल गाडीने आणणे, पोचविणे, त्याची सांस्कृतिक व शैक्षणिक बैठक घडविणे, त्याच्या आरोग्याची काळजी घेणे या सेवांचा अंतर्भाव असेल.

व्यवसायात केवळ आर्थिक फायदा हे लक्ष्य नसावे, जनसंपर्क व समाजाभिमुखता हे दृष्टिकोन असणे महत्वाचे आहे हे मी गेल्या ५ वर्षात शिकले.

---

विविध वृत्तपत्रे आणि साप्ताहिके यांनी परीक्षण रूपाने नावाजलेले

**श्री. अनंत मराठे लिखित कथासंग्रह**

| | मूळ किंमत | मराठे कुटुंबियासाठी सवलत मूल्य |
|---|---|---|
| १) डयूटी ऑफीसर | रु. ६५ | रु. ५० |
| २) प्राक्तन | रु. ७५ | रु. ५५ |
| ३) आंधळा | रु. ७५ | रु. ५५ |

(रु. १५ पोस्टेज खर्च वेगळा)

## मराठे पब्लिशिंग हाऊस

बो ५/१७, बेस्ट राजहंस कॉलनी, लिंक रोड, घाटकोपर (पूर्व), मुंबई - ४०० ०७५. दूरध्वनी - ५१६ ५२२५

**महत्वाची टीप** - हया कथासंग्रहाच्या विक्रीतून जमा होणाऱ्या रकमेतील १०% रक्कम मराठे प्रतिष्ठान शिक्षण निधीकरिता दिली जाईल.

**सौ. सीमा संजय मुळ्ये** (पृ. ७० वरून)

१९९६/९७ मध्ये "वाल्याचा झाला वाल्मिकी" या नाटकाला सर्व महाराष्ट्रात १ ले आणि इतर उत्कृष्ट १ ली पारितोषिके मिळून माझ्या अजय पटवर्धन या विद्यार्थ्याला दिल्लीहून C.C.R.R. तर्फे ५ वर्षांची स्कॉलरशिप मिळाली. असे अनेक विजय आम्ही आमच्या मुलांवर कष्ट घेवून मिळवत असतो.

आता इथे मात्र मला 'मराठे प्रतिष्ठान' व आपल्या परिवाराला एक आवाहन करायचे आहे. ते म्हणजे प्रतिष्ठानतर्फे माझ्या शाळेतील एक विद्यार्थी त्यांनी दत्तक घ्यावा. माझ्याच शाळेतील असा आग्रह मला धरायचा नाही. इतरहि अपंग मुलांपैकी किमान एकातरी विद्यार्थ्याला मदत केली तर मला खूप बरे वाटेल.

माझ्या या कार्यात माझे पती श्री. संजय रघुनाथ मुळ्ये आणि सौ. सासूबाई, श्री. सासरे यांचे पूर्ण सहकार्य असल्याने मी हे कार्य करत आहे. त्यांचे आशीर्वाद माझ्या पाठीशी आहेतच.


- **सौ. सीमा संजय मुळ्ये**, 'शैलजा',
नाचणे पॉवरहाऊस मागे, नाचणे रोड, रत्नागिरी.


*[सौ. सीमाने मराठे परिवाराकडून जी अपेक्षा व्यक्त केली आहे त्याबाबत वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया प्रतिष्ठानकडे जरुर कळवाव्या.*
*- संपादक.]*


Marathe Pratishthan

# Unmatched Performance !

# Unbelievable Prices !!







**SWIFT - 150 EX**

Maximum Paper Size

10" x 15"

Maximum speed

5,000 iph

**Rs. 2,35,000/-***

**SWIFT - 300 EX**

Maximum Paper Size

20" x 15"

Maximum speed

5,000 iph

**Rs. 2,85,000/-***

**SWIFT - Multilith 1250**

Maximum Paper Size

11.7" x 17"

Maximum speed

10,000 iph

**Rs. 2,75,000/-***

**swifts**

*Small offsets. Big Advantages.*

*SWIFTS LIMITED*
**Regd. Office :** Marathe Udyog Bhavan, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai - 400 025. Tel.: 4301342/4302453/4302089
Fax : 91-22-4379863. E-mail : swifts@giasbm01.vsnl.net.in

* Excise, sales tax, freight & other Govt. levies extra at actuals.

Marathe Pratishthan

# वार्षिक सर्वसाधारण सभा - १४ सप्टेंबर १९९७




**प्रतिष्ठानचे पदाधिकारी**

(डावीकडून) हितगुजचे संपादक लक्ष्मण शंकर
नवनिर्वाचित कोषाध्यक्ष सी. गो. खांबेटे,
कार्योपाध्यक्ष गणेश विनायक,
अध्यक्ष सुरेश सखाराम,
कार्यवाह विनायक केशव
आणि
माजी कोषाध्यक्ष माधव नारायण

**गुणवत्ता पारितोषिक-धारक**

डावीकडून

उभे - दीपाली मराठे, श्रद्धा मराठे,
दीप्ती मराठे, वेदश्री खांबेटे

बसलेले - प्रमोद कृष्ण (गुणवत्ता
पारितोषिकांचे काम पहाणारे
कार्यकारी मंडळ सदस्य),
मृणाल मराठे, सुकृत खांबेटे,
अमेय मराठे आणि सौरभ मराठे



## लघु उद्योजकांचे दीपस्तंभ मधुसूदन रामकृष्ण खांबेटे यांचे व्यावसायिकांच्या समस्यांबाबत मार्गदर्शन

## १५ फेब्रुवारी १९९७





मराठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष
सुरेशभाऊ भाषण करताना



श्री. खांबेटे मार्गदर्शन करताना

Marathe Prathisthan




Marathi Pratishthan